## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – २४

## सभावृत्तांत

दिनांक – २०.१२.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे डिसेंबर २०१३ ची मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.१२.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

1. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
2. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
3. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
4. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
5. मा.भालेकर अरुणा दिलीप
6. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
7. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
8. मा.थोरात वनिता एकनाथ
9. मा.सायकर अजय शंकरराव
10. मा.जाधव साधना रामदास
11. मा.जाधव राहुल गुलाब
12. मा.आल्हाट मंदा उत्तम
13. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
14. मा.काळजे नितीन प्रताप
15. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
16. मा.जगदीश शेटटी
17. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
18. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
19. मा.उल्हास शेट्टी
20. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
21. मा.पवार संगीता शाम
22. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
23. मा.तानाजी विठ्ठल खाडे
24. मा.बो-हाडे शुभांगी संजय

**25.** मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
**26.** मा.भारती फरांदे
**27.** मा.आर.एस.कुमार
**28.** मा.जावेद रमजान शेख
**29.** मा.चारुशीला प्रभाकर कुटे
**30.** मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
**31.** मा.नंदा विकास ताकवणे
**32.** मा.नेटके सुमन राजेंद्र
**33.** मा.तरस बाळासाहेब जयवंत
**34.** मा.भोंडवे संगिता राजेंद्र
**35.** मा.मोरेश्वर महादू भोंडवे
**36.** मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
**37.** मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
**38.** मा.लोंढे गणेश नारायण
**39.** मा.शमीम पठाण (पठाणबाई)
**40.** मा.[illegible].संदीप गुलाब चिंचवडे
**41.** मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
**42.** मा.अपर्णा निलेश डोके
**43.** मा.अनंत सुभाष को-हाळे
**44.** मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
**45.** मा.पवार मनीषा काळूराम
**46.** मा.प्रसाद शेट्टी
**47.** मा.अविनाश (दादा) टेकावडे
**48.** मा.काळभोर वैशाली जालिंदर
**49.** मा.सौ.साळुंके सविता सुरेश
**50.** मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
**51.** मा.मासुळकर समीर मोरेश्वर
**52.**मा.मडिगेरी वर्षा विलास
**53.**मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
**54.**मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
**55.** मा.सुपे आशा रविंद्र
**56.**मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
**57.**मा.गोफणे अनुराधा देविदास
**58.**मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

**59.**मा.गव्हाणे सुरेखा शंकर
**60.**मा.महेशदादा किसन लांडगे
**61.**मा.श्रध्दा बाजीराव लांडे
**62.**मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
**63.**मा.लोंढे शुभांगी संतोष
**64.**मा.विश्वनाथ विठोबा लांडे
**65.**मा.ननवरे जितेंद्र बाबा
**66.**मा.सावळे सिमा रविंद्र
**67.**मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
**68.**मा.भोसले राहूल हनुमंतराव
**69.**मा.पालांडे सुजाता सुनिल
**70.**मा.बहल योगेश मंगलसेन
**71.**मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
**72.**मा.कदम सदगुरु महादेव
**73.**मा.गिता सुशिल मंचरकर
**74.**मा.कैलास महादेव कदम
**75.**मा.छाया जगन्नाथ साबळे
**76.**मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
**77.**मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
**78.**मा.वाघेरे सुनिता राजेश
**79.**मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
**80.**मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
**81.**मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
**82.**मा.पाडाळे निता विलास
**83.**मा.विनोद जयवंत नढे
**84.**मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
**85.**मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
**86.**मा.विमलताई सुरेश जगताप
**87.**मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
**88.**मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
**89.**मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
**90.**मा.बारणे माया संतोष
**91.** मा.ओव्हाळ शेखर अशोक
**92.**मा.यमुनाताई रमणनाना पवार

**93.**मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
**94.**मा.कलाटे स्वाती मयुर
**95.**मा.नांदगुडे विलास एकनाथ
**96.**मा.चौंधे आरती सुरेश
**97.** मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
**98.**मा.जवळकर वैशाली राहुल
**99.**मा.जगताप राजेंद्र गणपत
**100.** मा.शितोळे शैलजा बाबुराव
**101.** मा.जगताप नवनाथ दत्तु
**102.** मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
**103.** मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
**104.** मा.जम सोनाली पोपट
**105.** मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
**106.** मा.काटे रोहितअप्पा सुदाम
**107.** मा.गायकवाड संध्या सुरदास
**108.** मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
**109.** मा.शेंडगे आशा सुखदेव
**110.** मा.मोटे किरण बाळासाहेब
**111.** मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
**112.** मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
**113.** मा.पाटील सुजित वसंत
**114.** मा.बो-हाडे अरुण तुकाराम
**115.** मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी- आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.झुरे-सह आयुक्त, मा.गावडे, मा.खांडकेकर, मा.कुलकर्णी, मा.टेकाळे, मा.दुरगुडे -सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.चव्हाण -सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, सवणे, मा.चिंचवडे, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी - कार्य.अभियंता, मा.उबाळे-प्रशा.अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.कांबळे- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मा.लावंड - कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

(नगरसचिव पदावर नियुक्त झालेले श्री.उल्हास जगताप यांचा मा.महापौर, मा.आयुक्त, मा.अति.आयुक्त, मा.पदाधिकारी, मा.गटनेते, मा.नगरसेवक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व पुढील कालावधीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.)

-----------

(१) दापोडी ते निगडी व सांगवी ते किवळे रस्त्यावर बीआरटीएस बस सेवा सुरु करणेसाठी स्थापत्यविषयक व इतर अनुषंगिक कामे करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(२) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये एम.आर.आय. व सिटी स्कॅन सुविधा मोफत उपलब्ध करुन देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(३) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेप्रमाणे महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये ओ.पी.डी. व आय.पी.डी. सुविधा मोफत उपलब्ध करुन देणेबाबत मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आजच्या सभेचे कामकाज सुरु होण्यापूर्वी एक शंका आहे, आजच्या या अजेंडावर ताथवडे डि.पी.चा विषय आहे. एमआरटीपी अमेंडेड लॉ २०११ मधील सेक्शन २६ मध्ये वेगळी प्रोव्हिजन आहे. सेक्शन ३० मध्ये प्लॅनिंग ऑथोरीटी व प्लॅनिंग कमिटी आहे. स्टॅण्डींग कमिटीने २ महिन्यांत त्यांचा अहवाल दिला आहे. सेक्शन ३० मध्ये म्हटले आहे, सदर अहवाल जास्तीत जास्त ६ महिन्यांत राज्य शासनाकडे दिला पाहिजे. दोन्ही लॉ एकमेकांना कॉन्ट्रॅडीक्टरी आहेत. हा विषय आपण मा.महापालिका सभेसमोर ठेवलेला आहे. त्याला राज्य शासन मान्यता देणार आहे. २ महिन्यांचा विचार करता आजच्या सभेत हा विषय पारित व्हायला पाहीजे. अशी आमची धारणा आहे, नंतर ६ महिन्यांत राज्य शासनापर्यंत हा विषय जायला पाहीजे. हा निर्णय आजच्या मिटींगमध्ये न घेता पुढील मिटींगमध्ये घेऊ शकतो का? याबद्दल सभागृहाला मार्गदर्शन व्हावे. अन्यथा आम्ही आमच्या अधिकारांवर गदा आणू इच्छित नाही. अन्यथा सेक्शन १ मधील ६२ प्रमाणे त्यात ऑफीसर नेमायची प्रोव्हिजन आहे. पुणे महापालिकेत अशा प्रकारचा डिपी देत असताना जवळपास ८ महिने सभागृहासमोर तो विषय पडून होता. त्यांनी ९व्या महिन्यात निर्णय घेतला होता. आपल्याकडे मार्चपर्यंत अवधी आहे. आमची धारणा आहे, पुढील मिटींगमध्ये यावर निर्णय घेता येईल. त्याबद्दलचा खुलासा कायदा सल्लागार यांनी करावा अन्यथा नगररचना डीडीटीपी यांनी खुलासा करावा.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब, मुळात मिटींग होणार आहे का, चालू झाली का नाही. या विषयावर फार मोठी चर्चा घडवून आणण्याचा निर्णय घ्यायची गरज नाही. निर्णय घ्यायचा असेल तर या विषयावर सर्वांना बोलू द्यावे.

**मा.महापौर –** हा विषय तहकूब करणार आहोत. सर्वांनी बोलायचे नाही.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब,निर्णय घ्यायचा नाहीतर चर्चा करुन यातून फार मोठी क्रांती होणार आहे का.

**मा.मंगलाताई कदम –** मा.महापौर साहेब, या मिटींगनंतर हा विषय घेता येईल का. एवढा अवधी आहे का? विषय पुढे घेता येत असेल तर किंवा आजची डेडलाईन असेल तर या विषयावर आज चर्चा करायला पाहीजे. एक तासासाठी सभा तहकूब करु शकतो किंवा पुढे विषय घेता येत असेल तर मिटींग तहकूब करु शकतो. याची माहिती घ्यायची आहे. आजच २० तारीख ही शेवटची तारीख आहे का नाही याचा फक्त खुलासा व्हावा.

**मा.भदाणे (उपसंचालक, नगररचना) –** मा.महापौर साहेब, MRTP Act च्या सेक्शन २१ ते ३१ पर्यंत डेव्हलपमेंट प्लॅनच्या तरतूदी आहेत. त्यानुसार २८ च्या ४ मध्ये तरतूद आहे त्याप्रमाणे ताथवडे गावाच्या डेव्हलपमेंट प्लॅनसाठी कारवाई पूर्ण केलेली आहे. सेक्शन २८ आहे, त्यात सूचना/हरकती घेणे, कमिटी स्थापन करायची आहे. ती सुद्धा सेक्शन २६ खाली कमिटी स्थापन करायची तरतूद केली होती. सेक्शन २८ नुसार कमिटी स्थापन केली, या कमिटीपुढे ज्या सूचना/हरकती केल्या, त्यानुसार सेक्शन २८ नुसार त्यात २ महिन्यांची टाईम लिमिट होती. त्या सर्व सूचना/हरकतींवर सुनावणी घेऊन विदीन टाईम लिमिट प्लॅनिंग ऑथोरीटी यांनी दिले पाहीजे. सेक्शन २८ मी वाचून दाखवते – (वाचून दाखवले.) कायद्यात २ महिन्यांच्या आत प्लॅनिंग ऑथोरीटी यांना कमिटीने रिपोर्ट दिल्यानंतर निर्णय घेणे अपेक्षित होते. तशीच तरतूद आहे. सेक्शन ३० नुसार सेक्शन २८ ची कारवाई पूर्ण करुन प्लॅनिग ऑथोरीटी यांनी शासनाकडे सबमिट करायची तरतूद केली आहे. (तरतूद वाचून दाखवली.) सेक्शन ३० खाली त्याची कारवाई करायची आहे. ती पब्लिश झाल्यानंतर ६ महिन्यांत करायची आहे. त्याला पुढे शासनाने सेक्शन ३० मध्ये प्रोव्हिजन केली आहे. (वाचून दाखवले.) याचा अर्थ असा आहे, सेक्शन २६ पासून सेक्शन ३० पर्यंत मेन टाईम लिमिट ६ महिन्यांचा आहे. जनरली सर्व ठिकाणी ६ महिन्यांत होऊ शकत नाही म्हणून शासनाने अजून ६ महिन्यांचे एक्सटेंशन दिलेले आहे. It is agreegate. म्हणजे सेक्शन २६ पासून सबमिट करेपर्यंत सेक्शन ३० पर्यंत शासनाला सबमिट करेपर्यंत दि.६/३/१४ला कम्प्लिट होईल. ६ महिन्यांचे एक्सटेंशन धरुन. मेन सेक्शन २८ मधील प्रोव्हिजनमध्ये २ महिन्यांत ऑथोरीटी यांनी निर्णय घ्यायचा आहे.

**मा.सीमा सावळे -** मा.महापौर साहेब, इरादा जाहीर केल्यापासून सांगा. कोणी काय करायचे याचा आजच निर्णय घ्यायचा आहे.

**मा.भदाणे (उपसंचालक, नगररचना) –** मा.महापौर साहेब, ३ वर्षांची टाईम लिमिट आहे. सेक्शन २६ साठी २ वर्षे, २६ ते ३० साठी १ वर्षे आहे म्हणजे 6 months original & 6 months extend.

---------

**मा.अपर्णा डोके** - नेल्सन मंडेला - दक्षिण आफ्रिक्रेचे माजी अध्यक्ष, सिसराम ओला - केंद्रीय कामगार मंत्री आणि रोजगार मंत्री,अरुण उदध्वराव डिग्गीकर-महापालिकेचे माजी आयुक्त श्री.अनिल डिग्गीकर यांचे बंधू, भागवत देसाई - ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक व ज्येष्ठ सामाजिक नेते,विनय आपटे-ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, नारायण कोंडिबा सोनवणे- सुप्रसिध्द सनई व सुंद्रीवादक, अशोक गोगावले-निवृत्त तहसीलदार व प्रसिध्द संगीतकार अजय अतुल यांचे वडील,मधू रेगे-माजी कसोटीपटू, पै.देवराम राणोजी पवळे - महापालिका स्थायी समितीच्या माजी सभापती सुमन पवळे यांचे चुलत सासरे, गोकुळ

पवार-हास्य कवी,अशोक बोदडे-जनसंपर्क विभागाचे प्रशासन अधिकारी आण्णा बोदडे यांचे बंधू यांना श्रध्दांजली अर्पण करावी व सभा तहकूब करावी अशी विनंती करते.

**मा.सुभद्रा ठोंबरे** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.योगेश बहल** - ही सभा शुक्रवार दिनांक १०/०१/२०१४ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करावी अशी विनंती करतो.

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे शुक्रवार दिनांक १०/०१/२०१४ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे. सर्वांना नाताळ व नवीन वर्षाच्या हार्दीक शुभेच्छा व्यक्त करते.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २४**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०/१२/२०१३ ची तहकूब सभा )**

दिनांक – १०.०१.२०१४ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे डिसेंबर २०१३ ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.१०.०१.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१६. मा.जगदीश शेटटी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी
२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२२. मा.पवार संगीता शाम
२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२६.मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२७. मा.भारती फरांदे
२८. मा.जावेद रमजान शेख
२९.मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३०.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३१.मा.नंदा विकास ताकवणे
३२. मा.नेटके सुमन राजेंद्र
३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३७. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३८. मा.लोंढे गणेश नारायण
३९. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
४०. मा.†›।.संदीप गुलाब चिंचवडे
४१. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४२. मा.अपर्णा निलेश डोके
४३. मा.अनंत सुभाष को-हाळे
४४. मा.जयश्री वसंत गावडे
४५. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४६. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४७. मा.शेख अस्लम शैकत
४८. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४९. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५०. मा.वाबळे संजय मल्हारराव
५१.मा.मडिगेरी वर्षा विलास
५२. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५३. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
५४. मा.सुपे आशा रविंद्र
५५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५६. मा.अजित दामोदर गव्हाणे
५७. मा.गोफणे अनुराधा देविदास

५८. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५९. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६०.मा.महेशदादा किसन लांडगे
६१. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
६२.मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६३.मा.लोंढे शुभांगी संतोष
६४. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६५. मा.सावळे सिमा रविंद्र
६६.मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६७. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६८.मा.पालांडे सुजाता सुनिल
६९.मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७०. मा.कदम सदगुरु महादेव
७१.मा.कैलास महादेव कदम
७२. मा.छाया जगन्नाथ साबळे
७३. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
७४.मा.वाघेरे सुनिता राजेश
७५.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७७.मा.काळे विमल रमेश
७८. मा.पाडाळे निता विलास
७९. मा.विनोद जयवंत नढे
८०.मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८१.मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८२. मा.विमलताई सुरेश जगताप
८३. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८५. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
८६.मा.बारणे माया संतोष
८७. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८८. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८९.मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९०.मा.नांदगुडे विलास एकनाथ
९१.मा.चौंधे आरती सुरेश

९२.मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९३.मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९४. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९५. मा.जवळकर वैशाली राहुल
९६.मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९७. मा.जगताप राजेंद्र गणपत
९८.मा.शितोळे शैलजा बाबुराव
९९.मा.जगताप नवनाथ दत्तु
१००. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०१. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०२. मा.जम सोनाली पोपट
१०३. मा.प्रशांत शितोळे
१०४.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०५.मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०६.मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०७.मा.शेंडगे आशा सुखदेव
१०८.मा.मोटे किरण बाळासाहेब
१०९.मा.संजय केशवराव काटे
११०.मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१११. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
११२.मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति. आयुक्त, मा.माने,मा.खांडकेकर,मा.टेकाळे,मा.दुरगुडे-सहा.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय-प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी,मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.सवणे, मा.शरद जाधव, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत-कार्य.अभियंता,मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.ऊबाळे-प्र.अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

**मा.नारायण बहिरवाडे** - मा.महापौर साहेब, सोजाबाई दादू बनसोडे - आमदार आण्णा बनसोडे यांच्या मातोश्री, दाजीकाका गाडगीळ- सराफ उद्योग क्षेत्रातील ज्येष्ठ उद्योजक व पी.एन. गाडगीळ उद्योग समुहाचे प्रमुख, सुरेश खळदकर - प्रसिद्ध सनई वादक, सिताबाई जवळकर- ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, फारुख शेख - सिने अभिनेते, चंद्रभागा सहादू नेवाळे, शांताबाई बबन दिघे यांना श्रध्दांजली अर्पण करावी अशी विनंती करतो.

**मा.उल्हास शेटटी** – मा.महापौर साहेब, माळशेज घाटातील बस अपघातात आणि वांद्रे-डेहराडून एक्सप्रेसला आग लागून मृत्यूमुखी पडलेले प्रवासी श्रध्दांजली अर्पण करावी अशी विनंती करतो.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.मंगलाताई कदम** - ही सभा गुरुवार दिनांक १६/०१/२०१४ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करावी अशी विनंती करते.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे गुरुवार दिनांक १६/०१/२०१४ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २४**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०/१२/२०१३, १०/०१/२०१४ ची तहकूब सभा )**

दिनांक – १६.०१.२०१४ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे २० डिसेंबर २०१३ ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.१६.०१.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु.
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१५. मा.जगदीश शेटटी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.पवार संगीता शाम
२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२४. मा.भारती फरांदे
२५. मा.जावेद रमजान शेख
२६.मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२८. मा.पांढरकर निलेश शंकरराव
२९.मा.नंदा विकास ताकवणे
३०.मा.नेटके सुमन राजेंद्र
३१.मा.तरस बाळासाहेब जयवंत
३२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३३. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३४. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३५. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३६. मा.[illegible].संदीप गुलाब चिंचवडे
३७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३८. मा.अपर्णा निलेश डोके
३९.मा.अनंत सुभाष को-हाळे
४०. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४१.मा.पवार मनीषा काळूराम
४२. मा.प्रसाद शेट्टी
४३. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४४. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४५.मा.शेख अस्लम शैकत
४६. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४७.मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४९. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
५०. मा.सुपे आशा रविंद्र
५१.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५२. मा.अजित दामोदर गव्हाणे
५३. मा.गोफणे अनुराधा देविदास
५४. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५५. मा.महेशदादा किसन लांडगे
५६. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५७.मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५८. मा.लोंढे शुभांगी संतोष
५९. मा.सावळे सिमा रविंद्र
६०.मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६१.मा.भोसले राहूल हनुमंतराव
६२.मा.पालांडे सुजाता सुनिल
६३.मा.बहल योगेश मंगलसेन
६४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६५. मा.कदम सदगुरु महादेव
६६.मा.गिता सुशील मंचरकर
६७. मा.कैलास महादेव कदम
६८.मा.छाया जगन्नाथ साबळे
६९.मा.वाघेरे सुनिता राजेश
७०. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७१.मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७२. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७३. मा.काळे विमल रमेश
७४.मा.पाडाळे निता विलास
७५.मा.विनोद जयवंत नढे
७६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७७.मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७८. मा.विमलताई सुरेश जगताप
७९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८०.मा.बारणे निलेश हिरामण
८१.मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८२. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
८३. मा.बारणे माया संतोष
८४. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८५. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८६.मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८७. मा.कलाटे स्वाती मयुर
८८. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८९.मा.चौंधे आरती सुरेश
९०.मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९१. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९२.मा.बोकड रामदास गेणभाऊ
९३.मा.जवळकर वैशाली राहुल
९४. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९५. मा.जगताप राजेंद्र गणपत
९६.मा.शितोळे शैलजा बाबुराव
९७. मा.जगताप नवनाथ दत्तु
९८.मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
९९.मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१००. मा.प्रशांत शितोळे
१०४.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०५.मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०६.मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०७.मा.शेंडगे आशा सुखदेव
१०८.मा.मोटे किरण बाळासाहेब
१०९.मा.संजय केशवराव काटे
११०.मा.पाटील सुजित वसंत
१११. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
११२.मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.गावडे, मा.टेकाळे,मा.माछरे,मा.गायकवाड,मा.खांडकेकर,मा.माने,मा.कुलकर्णी,मा.दुरगुडे-सहा. आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.पाटिल-सहशहरअभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना),मा.दुधेकर, मा.निकम, मा.शरद जाधव, मा.साळवी,मा.पठाण,मा.कुलकर्णी, मा.दांगट, मा.काची-कार्य.अभियंता, मा.उबाळे-प्रशा.अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

**मा.गोरक्ष लोखंडे** – मा.महापौर साहेब, जेष्ठ साहित्यिक, कवी विचारवंत व दलित पँथरचे संस्थापक पद्मश्री नामदेव ढसाळ, शहिद अशोक कामटे यांचे वडील ले.कर्नल मारुतराव कामटे या मान्यवरांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी अशी विनंती करतो.

**मा.उल्हास शेटटी** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.अपर्णाताई डोके** - ही सभा शनिवार दिनांक १८/०१/२०१४ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत तहकूब करावी अशी विनंती करते.

**मा.झामाबाई बारणे** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब,दलित साहित्यिक, पद्मश्री पुरस्कार विजेते नामदेव ढसाळ, दलितांवर होणारा अन्याय, अत्याचार यासंदर्भात पेटून उठणारे व नवनवीन कवितांना जन्म देणारे, त्यांचे दुःखद निधन झाले आहे. आज त्यांची अंत्ययात्रा आहे. त्यांच्या जाण्याने खरोखरच दलित समाजाची फार मोठी हानी झाली आहे. आमच्यासारखे जे थोडेफार लोक समाजात आहेत, त्यामध्ये यांच्यासारख्या साहित्यिकांचा फार मोठा वाटा आहे. म्हणून त्यांना श्रद्धांजली देण्यासाठी मी उभी आहे. या नेत्याला, या साहित्यिकाला, या कवीला मी दलित परिवाराच्या वतीने विनम्र श्रद्धांजली अर्पण करते. तसेच शिवसेनेच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करते.

**मा.महापौर** - पद्मश्री नामदेव ढसाळ व ले.कर्नल मारुतराव कामटे यांना श्रद्धांजली वाहून उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे शनिवार दिनांक १८/०१/२०१४ रोजी दुपारी १.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २४**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०/१२/२०१३, १०/०१/२०१४, १६/०१/२०१४ ची तहकूब सभा )**

दिनांक – १८.०१.२०१४ वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे २० डिसेंबर २०१३ ची तहकूब मा.महापालिका सभा शनिवार दि.१८.०१.२०१४ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु.
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेटटी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश
१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२१. मा.उल्हास शेट्टी
२२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२३. मा.पवार संगीता शाम
२४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२५. मा.तानाजी विठठल खाडे
२६.मा.बो-हाडे शुभांगी संजय
२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२८. मा.भारती फरांदे
२९.मा.जावेद रमजान शेख
३०.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३१.मा.नेटके सुमन राजेंद्र
३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३४. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३५. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३६.मा.लोंढे गणेश नारायण
३७. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३८. मा.†।›।.संदीप गुलाब चिंचवडे
३९.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४०. मा.अपर्णा निलेश डोके
४१.मा.अनंत सुभाष को-हाळे
४२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४३. मा.जयश्री वसंत गावडे
४४. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४५. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४६. मा.शेख अस्लम शैकत
४७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४८. मा.वाबळे संजय मल्हारराव
४९. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५०. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
५१.मा.सुपे आशा रविंद्र
५२. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५३. मा.अजित दामोदर गव्हाणे
५४. मा.गोफणे अनुराधा देविदास
५५. मा.जालिंदर (बाप्पू) शिंदे
५६. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५७.मा.महेशदादा किसन लांडगे
५८. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५९. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६०.मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६१.मा.ननवरे जितेंद्र बाबा
६२.मा.सावळे सिमा रविंद्र
६३.मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६५. मा.पालांडे सुजाता सुनिल
६६.मा.बहल योगेश मंगलसेन
६७. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६८.मा.कदम सदगुरु महादेव
६९.मा.गिता सुशील मंचरकर
७०. मा.कैलास महादेव कदम
७१.मा.छाया जगन्नाथ साबळे
७२. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
७३. मा.आसवाणी सविता धनराज
७४.मा.वाघेरे सुनिता राजेश
७५.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७७.मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७८. मा.काळे विमल रमेश
७९. मा.पाडाळे निता विलास
८०.मा.विनोद जयवंत नढे
८१.मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८३. मा.विमलताई सुरेश जगताप
८४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८५.मा.बारणे निलेश हिरामण
८६.मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८७. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
८८. मा.बारणे माया संतोष
८९.मा.ओव्हाळ शेखर अशोक
९०.मा.यमुनाताई रमणनाना पवार

९१. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९२.मा.कलाटे स्वाती मयुर

९३.मा.नांदगुडे विलास एकनाथ

९४. मा.चौंधे आरती सुरेश

९५. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९६.मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९७. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९८.मा.जवळकर वैशाली राहुल

९९.मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

१००. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०१. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०२. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०३. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०४.मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०५.मा.प्रशांत शितोळे

१०६.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

१०७.मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०८.मा.गायकवाड संध्या सुरदास

१०९.मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११०.मा.शेंडगे आशा सुखदेव

१११.मा.मोटे किरण बाळासाहेब

११२मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११३.मा.संजय केशवराव काटे

११४.मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११५.मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११६.मा.पाटील सुजित वसंत

११७.मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११८.मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.गावडे, मा.टेकाळे,मा.माछरे, मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे-सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.पाटिल-सहशहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.शरद जाधव, मा.साळवी,

मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.दांगट, मा.काची - कार्य.अभियंता, मा.उबाळे-प्रशा.अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

**मा.उल्हास शेटटी –** मा.महापौर साहेब, दाऊदीबोहरी समाजाचे धर्मगुरु सैयदना मोहम्मद बुरहानुद्दीन यांचे दुःखद निधन तसेच त्यांच्या अंत्ययात्रेचे वेळी झालेल्या गर्दीतील चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्या १८ नागरीकांना श्रद्धांजली अर्पण करणेत यावी.

**मा.रामदास बोकड –** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

--------------

मा.महापालिका सभा क्र.२२ मध्ये विषय क्र.७ मधील “सदर ठरावाला अनुमोदन देणेत येत आहे” या मजकूरनंतरचा “मा.अरुणा भालेकर” हा मजकूर वगळून त्याऐवजी “मा.आरती चोंधे” हा मजकूर समाविष्ट करणेत येवून त्या दुरुस्तीसह दि.१९.१०.२०१३, २५.१०.२०१३, १६.११.२०१३ व २१.११.२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

## <u>प्रश्नोत्तरे</u>

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

--------------

## <u>मा.स्थायी समितीचे ठराव</u>

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/वा.क/कावि/१४६/२०१३ दि.३१/७/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४१०९ दि.२१/०९/२०१३

३) मा.महापालिका ठराव क्रमांक ३९६ दिनांक २१/११/२०१३

मा.शहर सुधारणा समिती सभा दिनांक २६/०८/२०१३ ठराव क्र.२७ नुसार, पुणे शहर वाहतूक पोलिसांनी केलेल्या मागणीनुसार पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील नियोजित बी.आर.टी. मार्गातून अवैधपणे/अनधिकृतपणे संचलन करणा-या शहरातील इतर रस्त्यावर 'नो पार्कींग' झोनमध्ये उभी राहणारी व शहरात इतर ठिकाणी अवैध पार्कींग करुन वाहतूकीचे सुरळीत संचलनात अडथळा ठरणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करणेस व त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावती पुस्तकाद्वारे वसूल करुन त्यातील ५० टक्के रक्कम वाहतूक पोलिसांना वाहतूकीचे साहित्य खरेदी इ.साठी ठेवून उर्वरित ५० टक्के रक्कम महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा वाहतूक पोलिसांनी करावा. सदर प्रस्तावानुसार मनपा रस्त्यावर अवैध पार्कींग करणा-या व 'नो पार्कींग' मध्ये उभ्या राहणा-या आणि बी.आर.टी. मार्गामधून अनधिकृतपणे संचलन करणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी आणि त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क खालीलप्रमाणे आकारणेत यावे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | विमोचन व प्रशासकीय शुल्क रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अवजड वाहने ट्रक, बस, ट्रेलर्स इ. | ५,०००/- |
| २ | रोड रोलर, इतर यंत्र सामुग्री | ३,०००/- |
| ३ | हलकी वाहने १० टनापर्यंत क्षमता | २,५००/- |
| ४ | कार, जीप इ. | २,०००/- |
| ५ | सहा आसनी रिक्षा, टेम्पो इ. | १,५००/- |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | १,०००/- |

उपरोक्त प्रमाणे वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावतीपुस्तकाद्वारे वसुल करण्यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०८ अन्वये मनपाचे अधिकार वाहतूक पोलिसांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेटटी** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला उपसूचना मांडतो –

मनपा रस्त्यावर अवैध पार्कींग करणा-या व 'नो पार्कींग' मध्ये उभ्या राहणा-या आणि बी.आर.टी. मार्गामधून अनधिकृतपणे संचलन करणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी आणि त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क खालीलप्रमाणे आकारणेत यावे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | विमोचन व प्रशासकीय शुल्क रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अवजड वाहने ट्रक, बस, ट्रेलर्स इ. | ५,०००/- |
| २ | रोड रोलर, इतर यंत्र सामुग्री | ३,०००/- |
| ३ | हलकी वाहने १० टनापर्यंत क्षमता | २,५००/- |
| ४ | कार, जीप इ. | २,०००/- ऐवजी १००/- |
| ५ | सहा आसनी रिक्षा, टेम्पो इ. | १,५००/- ऐवजी १००/- |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | १,०००/- ऐवजी ५०/- |

उपरोक्त प्रमाणे वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावतीपुस्तकाद्वारे वसुल करण्यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०८ अन्वये मनपाचे अधिकार वाहतूक पोलिसांना प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शत्रुघ्न काटे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, पुणे जिल्हयाचे वाहतुक शाखेने सुचविलेले हे दरपत्रक आहे. आणि हे दरपत्रक सुचवित असताना अवजड वाहने, ट्रक, ट्रेलर्ससाठी रु.५,०००/-, रोडरोलरसाठी रु.३,०००/- असे ठेवलेले आहे. नंतर वाहनांना आपण कमी केलेले आहेत. मा.आयुक्त साहेबांना याबाबतचा खुलासा करायला सांगावा. इथे महानगरपालिकेच्या क्षेत्रात डी.पी.चे किती रिझर्वेशन ताब्यात घेऊन संबंधित व्यावसायिकांची सोय केली आहे. प्रामुख्याने दंड आकारत असताना पेमेण्ट घेताना सूचवले म्हणून दंड करत असतो. वाहतुकीला अडथळा ठरत असेल तर दंड आकारला पाहिजे पण त्यांच्यावर अन्याय झाला नाही पाहिजे. याविषयाच्या अनुषंगाने मी एक महिन्यापुर्वी पत्र दिले होते. महापालिका क्षेत्रात अनेक मंगल कार्यालये आहेत आणि त्या मंगल कार्यालयांना पार्किंग नाही. वाहनतळासाठी जागा नसल्या कारणाने ती वाहने रस्त्यात येऊन उभी राहतात व ट्रॅफिक जाम होते. अनेकांना त्याचा त्रास होतो. दुसरे प्रामुख्याने म्हणजे बीआरटी रस्त्यावर भविष्यामध्ये अडथळा ठरु नये. परंतू बीआरटी रस्ता होत असताना जी दुकाने आहे ती शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये आहेत. जे व्यापारी आहेत. त्यांच्याकडे जाणारा प्रत्येक नागरीक,सर्वसामान्य माणसे आहेत, त्यांचेसाठी पार्किंगची व्यवस्था नसल्याने दुकानाच्या समोर पार्किंग करणारे त्यांच्यावर दंड आकारला जाणार असेलतर हा त्या दुकानदारावर अन्याय आहे, त्या नागरिकांवर व व्यावसायिकांवर देखील अन्याय आहे. यांचा आपण सहानुभूतीपूर्वक विचार केला गेला नाही. विषय ठेवत असताना मोघमपणे बीआरटी रस्त्यावर असे म्हटले आहे. काही भागात दुकाने रस्त्याला अतिशय खेटून आहेत. तिथे पार्किंगची व्यवस्था केली नाहीतर

मग तो औंध-रावेत रस्ता असेल, आळंदी रस्ता असेल, उद्या भविष्यात होणारा काळेवाडी मार्ग असेल, इथे देखील पार्किंग राहणार नाही. आपण वाहतुक पोलीसाला तडजोड करण्यासाठी, पैसे घेण्यासाठी चालना देतो काय असा प्रश्न उपस्थित होतो. मा.महापौर साहेब या विषयाच्या अनुषंगाने मी काही सूचना केल्या होत्या. सभागृहात विषय मांडत असताना या शहरामधील वाहतुकीसंदर्भात लेखी पत्र दिले होते की, पुणे महापालिकेत ठराव मंजूर करत असताना त्याची माहिती घ्या. पिंपरी चिंचवड महापालिकेत हा ठराव मंजूर होत असताना भविष्यात सर्वसामान्य माणसाला याचा त्रास होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. असे पत्र देऊनही आजतागायत मला प्रशासनाकडून कुठल्याही प्रकारचा खुलासा दिला गेला नाही. हा ठराव करीत असताना सर्व सदस्यांना एक विनंती राहील की, या विषयाच्या अनुषंगाने भविष्यात अडचणी वाढू नयेत याची सर्वांनी खबरदारी घेतली पाहिजे. आपण लोकप्रतिनिधी या नात्याने या सभागृहात निवडून येत असताना, एखादा विषय मंजूर होत असताना त्या विषयाचे गांभिर्य लक्षात घेऊन भविष्यात नागरीकांचे हाल होणार नाहीत हे देखील पाहिले पाहिजे. प्रशासनाची जबाबदारी आहे या शहरामध्ये पार्किंगची व्यवस्था असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने आजतागायत जागा ताब्यात घेतल्या नाहीत. त्या घेतल्या असत्या तर तेथे पार्किंगची व्यवस्था झाली असती. दुचाकी वाहने, कार यांचे दर कमी करतोय. मोठे व्यवसायीक ट्रक चालक, बसचालक यांना वाहनतळासाठी जागा नसेल तर ते रस्त्यावर गाड्या उभ्या करतात. हा ठराव करत असताना, याची सुरुवात करत असताना जाचकपणे सुरुवात होत असताना भविष्यात केवळ पैसे वसूल करणे हा उद्देश त्यामागे नसावा. त्या भागात भविष्यात गाड्या लावू नये, वाहतुकीला अडथळा ठरू नये,अनेक अपघात टळावेत म्हणून त्याची अंमलबजावणी करीत असताना त्याला देखील काही तरी कालावधी दिला पाहिजे. पोलीस खात्याने जरी सुचविले असेल तरी त्यांनी देखील या भागात संपूर्ण शहराचा सर्व्हे करत असताना या शहरातील पार्किंगच्या व्यवस्थेबाबत महापालिकेला काही सूचना केल्या आहेत का. अनेक नागरीक रस्त्यावरुन वाहनांचा वापर करतात. शहरात अनेक दुकाने आहेत. पोलीस खात्याने याबाबत सूचना केल्या असतील तर त्यादेखील इथे सांगाव्यात, एवढ्या माझ्या सूचनांचा विचार करावा.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, ख-या अर्थाने हा वाहतूकदारांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. आत्ताच मा.श्रीरंग बारणे यांनी सविस्तर सांगितले. जवळ जवळ दि.३१/७/१३ ला हा ठराव घेतला होता, किती महिने झाले, वसुली सुरु आहे. रु. ५,००० घ्यायला सुरुवात केली नाही. रु.३,०००, रु.२,००० ची पावत्या पुस्तके दिली आहेत का. आजपर्यंत छापून झाली आहेत, व्यवसाय सुरु झाला आहे. त्यांनी त्याचे पैसे महापालिकेत जमा केले आहेत का. वसूल केले तरी गेले ५/६ महिने आम्ही वाहतूकदारांची कोंडी झालेली आहे. दररोज जवळजवळ १५० गाड्या

असतात. कुठलीही घोषणा नाही. फक्त कायदा करुन पोलिसांनी दंड आकारणी करणे हे सगळे चूकीचे आहे. त्यांनी कार्ड छापले आहेत. दररोज इथे एक गाडी उभी करा. पैसे घेतले जाणार नाहीत. बंधने तेवढ्या पळवाटा हा प्रकार ठरलेला असताना पोलिस सांगतात तसे तुम्ही करायचे. आज ते शहरात करोडो रुपयांचा माल इथे आणतात. दररोज १५०० गाड्या इथे बाहेरुन येतात. माल घेऊन जातात. आम्हाला कधी बोलवले का. एवढी वाहतूक नगरी बनवली. किती गाड्या येतात. २५ टक्के माल असेलतर यावर कधी विचारणा केली आहे. केवळ तुम्ही सांगता, पोलिस सांगतात. त्यांना माल मिळावा, पैसे मिळावेत म्हणून ठराव केला आहे. या ठरावाचा विरोध केला पाहीजे. ठराव कॅन्सल करा. कशासाठी पैसे घेताय. महापालिकेकडे पैसे नाहीत म्हणून. बीआरटी रोडवर गाड्या उभ्या करायला जागा नाही. वाहनतळे कुठे केली आहेत का. निगडी नाक्यावर कधी गेलात, वाहतुक नगरीला कधी फिरकलात तर तिथे नगरसेवकाने पैसे खाल्ले ते कधी खाल्ले. त्याच्याकडून वसूल करत नाहीत. हा आमच्यावर लादलेला कर आहे. भूर्दंड घालताय. हा ठराव कॅन्सल करा. आम्ही पैसे देणार नाही. पाचशे रुपये दिलेतरी पावती फाडली जाणार नाही. तुम्हाला लिहून देतो. प्रत्येक ड्रायव्हरकडे पैसे नसतात. ड्रायव्हरला लुटले जाते म्हणून मोटर मालक एवढे पैसे देत नाहीत. जेवण्याखाण्यापुरते पैसे दिले जातात. ही वस्तुस्थिती आहे. चुकीची पद्धत आहे. तुम्हीच हा ठराव कॅन्सल करावा ही माझी कळकळीची विनंती आहे. तुम्ही या चोरांना पैसे वसूल करायला लावू नका. कार्ड पद्धत चालू करा. हा ठराव कॅन्सल करा ही माझी मागणी आहे.

**मा.महेशदादा लांडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आजच्या महासभेत २/३ विषय असे आहेत, ते गाड्यांच्या संदर्भातील विषय आहेत. दर वाढवायचे विषय आहेत. मी काही सूचना केल्या होत्या. प्रामुख्याने मी प्रत्येकवेळी का सांगत असतो. प्रत्येक ठिकाणी पार्किंगबाबत फार मोठी अडचण आहे. परत एकदा सांगावे लागेल. भोसरी, काळेवाडी इथे लक्ष वेधू इच्छितो. आपल्याकडे प्रायव्हेट बसच्या ड्रायव्हरांकडून दंड वसूल करतात. दिवसा वसूल करत नाही. संध्याकाळी ५.०० नंतर त्यांची व्यवसायाची वेळ आहे. रात्री १०/११ च्या दरम्यान या प्रायव्हेट बसेस एकाला एक लागून उभ्या असतात. याच वेळी कामगार कंपनीतून सुटलेले असतात. घरातील भगिनी मार्केटींगसाठी बाहेर आलेल्या असतात. शाळा सुटलेल्या असतात. त्यावेळी या बसेस रस्त्यावर उभ्या असतात. त्यावेळी त्यांच्यावर कारवाई होत नाही. त्याचवेळी त्यांच्यावर दंड मारला पाहीजे. अशा लोकांच्या गाड्या लावल्यामुळे नाहक वापरावर परिणाम होतो. अशावेळी धंदा कुठे होतो. मी ब-याच वेळा सांगितले. गावातला ब्रीज क्रॉस करुन बाहेर लावायला सांगा. यासाठी आपल्याकडून ट्रॅफिक विभागाला कळवा. त्यामुळे या गाड्या ब्रीजच्या शेवटी थांबतील. आपला फायदा होणार का. याची माहिती नाही. ज्यावेळी एलबीटीतून एवढा फायदा होईल असे वाटले होते, तसे काहीच झाले नाही. तसेच यातून

महापालिकेला एवढे एवढे उत्पन्न मिळणार, पण त्यातून काही होत नाही. आपण उत्पन्नाचे धोरण बंद करतो. संध्याकाळच्या वेळी कोणता अधिकारी तिथे दंड मारायला जाणार आहे. एखादा सदस्य म्हणणार, टपरीवाल्यांमुळे, हातगाड्यांमुळे, भाजी विकणा-यांमुळे रस्ता जाम आहे. याकडे कोण बघणार. माझी विनंती आहे, संध्याकाळी ५.०० नंतर यांच्यावर कडक कारवाई करा. त्यांना सुद्धा शिस्त लागले.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्वात महत्वाचा विषय आहे. खरेतर वाहतूक सुरळीत होण्यासाठी आहे का महापालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी हा विषय घेतला आहे. मा.आप्पा बारणे, मा.बाबासाहेब धुमाळ यांनी आत्ता सांगितले, सर्वांना प्राधान्य दिले पाहीजे. वाहतुक कशी सुरळीत होईल. खरेतर आपल्याला वाटते, पिंपरी चिंचवडमधील वाहतुक सुरळीत होण्यासाठी पार्किंग व्यवस्था करणे गरजेचे आहे. ठिकठिकाणी पार्किंग मॉल बांधले पाहीजेत. हा शहरातील सगळ्यात महत्वाचा विषय आहे. आपल्याकडे भरपूर समस्या आहेत. चारचाकी गाड्या पूर्णपणे रस्त्यावर येतात. यात उल्लेख केला आहे. अनधिकृत संचलन करणा-या सर्व वाहनांवर कारवाई करायची आहे. रात्री रस्त्यावर गाड्या उभ्या असतात. सगळीकडे हीच परिस्थिती आहे. आपण उत्पन्न वाढवण्याचे धोरण न ठेवता बेसिक अशा योजना असाव्यात. नागरीकांना शिस्त लावायची, त्यासाठी आधी पार्किंगची व्यवस्था करणे गरजेचे आहे. चौकाचौकात गाड्या पार्क करण्यावरुन खूप मोठी भांडणे होत असतात. प्रथमतः पार्किंग व्यवस्था शहरात करावी. प्रत्येक प्रभागात यंत्रणा उभी करावी. याचा विचार करावा. या विषयाला आमचा विरोध राहील.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझा प्रभाग क्र. १४ ट्रान्स्पोर्ट नगरी, त्यात ट्रक, ट्रेलर्स संपूर्णपणे रस्त्यावर उभे राहतात वारंवार चर्चा केली आहे, पत्र दिले आहे. ट्रॅफिक पोलिस, ट्रॅफिक डिपार्टमेंट, जिथे नागरीक राहतात, जिथे रस्त्यावर ट्रक, ट्रेलर्स लागलेले आहेत. त्यांना शिस्त लावायचा प्रयत्न करणार आहोत. यानंतर एकही दिसला नाही पाहीजे. तिथे लोकवस्ती आहे. मी वारंवार तक्रार करुन सुद्धा मला उत्तर मिळालेले नाही. एखादा इन्स्पेक्टर येतो, ट्रक हलवतो, रस्त्यावर २/२ ट्रेलर्स उभे असतात. अशा ठिकाणी कायदा करा. जेणेकरुन परत त्या रस्त्यावर ट्रेलर किंवा ट्रक लागले नाही पाहीजेत. आपण तिथे आलात तर लोकांना त्याचा फार त्रास होतो आहे हे कळेल. महिला बाहेर पडतात त्यावेळी हे लोक रस्त्यावर आंघोळ करत असतात. या दृष्टीने लक्ष द्यावे.

**मा.सुलभाताई उबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय मागील मिटींगमध्ये झाला होता त्यावेळी त्यावर चर्चा झाली होती. त्यावेळी मी देखील जागेचा उल्लेख केला होता. आयुक्त साहेबांनी हे ऐकले आहे. जसे मा.महेश लांडगे यांनी सांगितले, राजमाता जिजाबाई पथाच्या कडेला जो प्लॉट आहे, तिथे बसेस लागतात. पैस घेतले जातात. तिथे पाईपलाईन फोडली आहे. त्यातून जे पाणी बाहेर पडते, त्यात हे ड्रायव्हर आंघोळी करत असतात. स्वयंपाक करत असतात. आपण त्याची चौकशी केली होती. पाण्याचा अपव्यय होतो आहे. एमआयडीसीचे पाणी आहे. याबाबत पत्रव्यवहार केला पाहीजे. आयुक्त साहेब आपण ज्येष्ठपदी आहात. आपण जे नियम बनवता, त्या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करता. आपण जेव्हा दुस-याला नियम पाळायला मजबूर करते तेव्हा स्वतः नियम पाळले पाहीजेत. इथे महापालिका कोणतेही नियम पाळताना दिसत नाही. मंगल कार्यालये असतील, शॉपिंग कॉम्प्लेक्स असतील, तिथे काही ठिकाणी अनधिकृतपणे हॉटेल व्यवसाय सुरु आहे. कमर्शियल व्यवसाय करतात. तिथे ड्रायव्हर जेवायला गेल्यावर त्यांची वाहने ते बाहेर थांबवणार. तिथे गाड्या थांबवल्या म्हणून त्यांनी दंड सुद्धा भरायचा. इथे नागरीकांची छळवणूक सुरु आहे. दुचाकी वाहनांचा वापर महिला जास्त करत असतात. त्यांना पन्नास रुपये सुद्धा दंड भरणे शक्य नाही. पेट्रोलचे भाव वाढले आहेत. आम्हाला हे पन्नास रुपये सुद्धा मान्य नाहीत. आपण आधी वाहनतळाच्या जागा ताब्यात घ्याव्यात, वाहनतळे निर्माण करावीत. नंतर जे जे लोक कमर्शियल वापर करतात त्यांच्यावर दंड आकारून तो वसूल करावा. व्यावसायिकांकडे येणा-या ग्राहकांची त्यांनी सोय करावी. आपण स्वतः आधी काटेकोरपणे अंमलबजावणी केली पाहीजे. नंतर हे नियम लावले पाहीजेत. मी मागील वर्षी सूचना मांडली होती. त्याचा सुद्धा खुलासा आपण करावा.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शहरातील वाहतूक व्यवस्थित, सुरळीत होण्यासाठी पार्किंगचा अतिशय महत्वाचा विषय आहे. या संदर्भात विषय आला आहे. जे प्रशासकीय शुल्क, पावती पुस्तके देऊन जो काही दंड आकारला जाणार आहे, त्यात ५० टक्के महापालिका व ५० टक्के वाहतूक खाते यांच्याकडे ही रक्कम वर्ग करण्याचा हा विषय आहे. हा विषय मंजूर करण्यापूर्वी मी काही प्रश्न मांडू इच्छितो की, आत्तापर्यंत महापालिकेच्या माध्यमातून जी आरक्षणे विकसित केली होती ती शहराची वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यासाठी पार्किंग असणे आवश्यक आहे. शहराला शिस्त लावण्यासाठी महापालिकेने स्वतः किती आरक्षणे विकसित केली, यापुढील व्हिजन काय, यासंदर्भात शहरातील वाहतूक चांगल्या पद्धतीने व्हावी म्हणून विचार केला पाहीजे. चर्चा करण्यापूर्वी काय कृति केली ते आधी कळवावे. यासंदर्भात आधी खुलासा करावा. आरक्षणे ताब्यात घेऊन किती सार्वजनिक वाहनतळे सुरु आहेत, याचा पहिल्यांदा खुलासा व्हावा नंतर चर्चा करण्यात यावी.

**मा.शमीम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मागील महिन्यात या विषयावर चर्चा झाली होती. मी स्वतः माझ्या वॉर्डाबाबत एक पत्र आयुक्त साहेबांना दिले आहे. तसेच सन्मा. नगरसेविका सुलभाताई ऊबाळे यांनी सुद्धा दिले होते असे त्या म्हणाल्या. ज्येष्ठ नगरसेवक मा.श्रीरंग बारणे यांनी पत्र दिले आहे. या पत्रांवर काय कारवाई केली आहे. आपण ट्रॅफिक पोलिसाला त्या पत्रांबाबत, मी जे काही तुम्हाला दिले होते, त्याबाबत ट्रॅफिक पोलिसांना,त्या विभागाला आपण काही विचारणा केली आहे का. कारण त्याठिकाणी आजही वाहने उभी आहेत. टायर पंक्चर करुन उभी केली आहेत. मागील महिन्यात तुम्हाला मी आवाहन केले होते. तुम्ही बघून या. मला वाटत नाही, कोणत्या अधिका-याने तत्परतेने हे काम केले असेल. हा विषय ठेवताना आयुक्त साहेब, आपण ट्रॅफिक पोलिसांबरोबर त्यांच्या विभागाबरोबर चर्चा केली असेल तर ते सुद्धा इथे जाहीर करावे. आम्हाला सांगावे, आपण कोणता विषय त्यांच्यासमोर ठेवला आहे. त्यांनी तुमच्याकडे जे स्पष्टीकरणे केले आहे ते सुद्धा स्पष्ट केले पाहीजे. मा.सुलभाताई ऊबाळे यांनी जो विषय मांडला की, दुचाकी वाहनांना दंड आकारु नये. याला माझी सुद्धा हरकत आहे. नाहीतर आम्ही दुचाकीवाले सगळे येऊन आयुक्त साहेबांच्या किंवा महापौरांच्या गाडीजवळ लावून बाजाराला जात जाऊ. आपण आपले नियोजन केले आहे का. गाड्या कुठे लावायच्या. आपल्या डि.पी. मध्ये आपण पार्किंगचे जे जे बोलत आहोत. एखादी तरी जागा ताब्यात घेतली आहे का. तिथे वसूली केली आहे का. आपण वसुलीच करत नाही. आधी कार्यालय बुक करायचे, ऑर्डर द्यायची नंतर नव-यासाठी नवरी शोधायला सुरुवात करायची. आपण पार्किंग झोन तयार केलेला नाही, वसूली केलेली नाही. आपण डि.पी. त कोणता प्लॅन केला होता, तिथे काय वसूली केली होती. पुणे महापालिकेत फुले मंडईत जशी पार्किंग व्यवस्था केली आहे, तसे नियोजन आहे का. त्याप्रमाणे दंड लावून दुचाकी काय पण सायकलवाल्यांना सुद्धा दंड लावा. पैस कमवायचे हा एकच उद्देश्य असेल तर पायी चालणा-यांवर, उभे राहणा-यांवरदेखील दंड लावा. तुमच्याकडे रस्त्याचे नियोजन जे करतात त्यांनी पुन्हा स्पष्ट करावे की, आपण जो वाहतूक विभाग सुरु केला आहे, त्यांच्याकडून स्पष्टीकरण पाहीजे आहे. रस्ता तयार करत असताना शहरात फूटपाथ हे जवळजवळ रस्त्याच्या लेवलला केलेले असतात. तिथे ५/६ फूट ब्लॉक्स् बसवले म्हणून त्याला फूटपाथ म्हणायचे. तिथून सुद्धा वाहनांची वाहतूक होत असते. जसा गाड्यांचा विषय घेतला तसा पादचा-यांचा विषय मी इथे घेते. त्याचे स्पष्टीकरण करावे. रस्त्यापासून फूटपाथ किती ऊंच असावेत, नियमांत त्याची काही तरतूद आहे का. आपण तुघलकी कारभार करताय. ५,००० घ्या, ३,००० घ्या. मा.बाबासाहेब धुमाळ यांना मला सांगायचे आहे, ते ऑल इंडिया व्हेईकल असोसिएशनचे अध्यक्ष होते. तुमच्यासाठी वाहतूक नगरीत खास व्यवस्था केली आहे. प्लॉट दिलेले आहेत. तुमच्याकडून नॉमिनल पैसे घेतले आहेत. त्याठिकाणी आपल्या गाड्या पार्क होतात का नाहीत. मी माझ्या वॉर्डमधून जाते त्यावेळी वाहतूक नगरीतील वाहने तिथे

कशासाठी येतात. आपण याची जबाबदारी घ्यावी. आपण आणखी ४५०० प्लॉटस् मागवून घ्या. दिले नाहीत तर केंद्र सरकारकडे जा. त्याठिकाणी त्यांनी व्यवस्था केली आहे. तरीही एकच जागेत सगळीकडे जिथे जिथे पार्किंग आहे. किती दंड आकारावा त्याबद्दल काही म्हणणे नाही. परंतू ठिकठिकाणी वाहने, टू व्हिलर याचे दर कमी करावेत अशी माझी सुद्धा इच्छा आहे. स्पष्टीकरण विचारले होते. रस्त्याचे व फूटपाथचे नियोजन काही पत्रे पाठवणार असाल तर आपल्या डि.पी.त पार्किंग झोन आहे का, प्लॉट आहेत का, विकसित केली आहेत का, कशाची डिमांड केली आहे का किंवा घेण्याचा प्रयत्न केला आहे का याचे उत्तर द्यावे.

**मा.महापौर** – संबंधित अधिका-यांनी खुलासा करावा.

**मा.कुलकर्णी (सहा.आयुक्त)** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा सदस्य, हा विषय सभेपुढे मान्यतेसाठी ठेवलेला आहे. त्यात सन्मा. सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले आहेत. वाहतुकीचे नियंत्रणासाठी हा विषय सभागृहापुढे ठेवलेला आहे. काही सन्माननियांनी मुद्दा उपस्थित केला की, यातून उत्पन्न मिळावे हा उद्देश्य आहे का. तशी अवस्था निश्चित नाही. जून २००९ मध्ये असाच विषय सभागृहापुढे ठेवला होता. त्यात सर्व प्रकारच्या वाहनांसाठी अधिकृतपणे जागा देऊन किंवा अनेक ठिकाणी नोपार्किंगमध्ये पार्किंग केलेतर प्रशासकीय शुल्क वसूल करण्याचा विषय आहे. ज्यावेळी प्रशासनाने फक्त व्यापारी प्रयोजनासाठी फक्त आकारणी करावी असा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाप्रमाणे वाहतूक पोलिसांकडून २००९पासून कारवाई चालू आहे. या विषयात हा मुद्दा स्पष्ट करु इच्छितो, हा ठराव करुन धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर शहरातील असंख्य रस्त्यांवर पोलिसांना अधिकार प्राप्त होईल असे नाही. धोरणाच्या अनुषंगाने कोणकोणत्या रस्त्यांवर अशा प्रकारे प्रशासकीय शुल्क आकारणी करायची याचा प्रस्ताव पोलिस विभागाकडून महापालिकेकडे दिला जाणार आहे. ट्रान्सोर्ट विभाग, पोलिस खाते, वाहतूक शाखेचे उपआयुक्त, पोलिस निरीक्षक यांची आढावा बैठक दर महिन्याला होते. त्यामध्ये चर्चा होईल. त्याठिकाणी ज्या रस्त्यांवर तातडीने कारवाई करणे अपेक्षित आहे, अशाच रस्त्यांवर केली जाईल.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, तुम्ही शहराचा विषय का ठेवताय. एकदम शुल्क आकारणीचा विषय ठेवताय. कुठे कुठे नो पार्किंग झोन आहे ते सांगा. तुमचे नियोजन नाही आणि उगागच विषय ठेवताय.

**मा.कुलकर्णी (सहा.आयुक्त)** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा सदस्य, पोलिस खात्याकडून ज्यावेळी स्पेसिफीक प्रस्ताव देतील त्यावेळी करणार आहोत.

बीआरटी रस्त्याचा उल्लेख केला आहे. साधारणतः एप्रिल/मे पासून निगडी/दापोडी, सांगवी/किवळे या २ रस्त्यांवर बीआरटी सुरु होणार आहे.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – मा.महापौर साहेब, रात्री निगडी नाक्यावर किती गाड्या उभ्या केलेल्या असतात. त्यांच्याकडून पैसे घेतलेले आहेत.

**मा.कुलकर्णी (सहा.आयुक्त)** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा सदस्य, या मुद्यावर पोलिस अधिका-यांशी बोलता येईल. आपण फक्त व्यापारी प्रकारच्या वाहनांवर आकारणी करायचे अधिकार २००९ च्या ठरावाप्रमाणे दिलेले आहेत. बिगर परवाना वाहनांवर पोलिस कारवाई करत असले तरी ते चुकीचे आहे. महाराष्ट्र वाहन कायद्याखाली पोलिसांना अधिकार आहेत. त्याची अंमलबजावणी पूर्णपणे होत नाही.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – मा.महापौर साहेब, महाराष्ट्र व्हेईकल ऍक्ट हा आपल्यालाही माहित आहे. आपण हा शब्द वापरलात. त्यात प्रायव्हेट वाहने, व्यापारी वाहने याचा अर्थ काय आहे तो सांगावा.

**मा.कुलकर्णी** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा सदस्य, महाराष्ट्र व्हेईकल ऍक्ट या कायद्याखाली पोलिस वाहतूकविषयक कारवाई, त्याची अंमलबजावणी करतात.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – मा.महापौर साहेब,पिंपरी चिंचवड, पुणे इथे एकही वाहन अडवले तरी त्यावर कारवाई या कायद्याखाली केली जाऊ शकत नाही. फक्त बेकायदेशीर वाहनांकडून शुल्क वसुल करावे. नाक्यांवर वाहने उभी राहतात त्यांच्याकडून सुद्धा शुल्क वसूल केले जाते. ट्रकवाले इथे माल आणायला तयार नाहीत. ५,००० भाडे वाढवून देणार असाल तर मी येतो असे सांगतात. त्यामुळे भाडे देखील वाढले आहे. तुमच्या चुकीमुळे शहरात माल यायला तयार नाही. हा चुकीचे विषय आहे. हा विषय मागे घ्या.

**मा.कुलकर्णी** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा सदस्य, ज्या-ज्या ठिकाणी नियमबाह्य आकारणी होते, हे नियोजन आढावा बैठकीत पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. हे फक्त व्यापारी प्रयोजनासाठी दिले आहे. बिगरव्यापारी प्रयोजनासाठी महाराष्ट्र मनपा अधिनियमाच्या कलम २०८ खाली कारवाई करायचे अधिकार दिलेले नाहीत. तसे होत असेल तर हे निदर्शनास आणून दिले जाईल.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, परवा आकुर्डी पुलाच्या आतल्या बाजुला वाहने उभी राहतात, तिथे ट्रॅफिक पोलिस नव्हता. १०० मुले उभी होती. डि.वाय.पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाची मुले होती. मला फोन आल्यावर मी देखील तेथे गेले. मला नाव सुद्धा माहित होते. आयुक्त साहेबांना सांगणार होते. प्रत्येक मुलाकडून एक हजार रुपयांची मागणी केली गेली. त्यांना लाज वाटली पाहीजे, मुलांना सुद्धा त्रास देतात. मुलांकडून एक हजार रुपये काढल्यानंतर त्यांना जायला सांगितले. नंबर प्लेट बरोबर नाही. नंबर प्लेट तिरकी लागली आहे. परवाना झोनमध्ये सुद्धा चोरीचे काम करतात. आपण त्यांना अधिकार देत आहोत. पण त्यांच्यावर आपले नियंत्रण असणार आहे का. वाहतूक पोलिस दंड वसूल करतात मग साधे पोलिस सुद्धा दंड वसून करतात, तसा कायदा आहे का. तसे तुमच्या वाचनात आले आहे का. ट्रॅफिक पोलिसांवर कंट्रोल असणार आहे का. उद्या मला अडवले तर मी तुम्हाला फोन करु का. तुम्ही काही करणार आहात का. हा सगळा प्रकार आधीपासून चालू आहे. आपण हा विषय करुन त्यांच्या हातात कोलीत देतोय. मी मागील वेळी सुद्धा बोलले होते. आत्ता सुद्धा बोलते आहे. आपले नियोजन नसताना गाड्या लावायला प्रतिबंध करतोय. हे लक्षात घ्यावे. कोणतेही प्लॅनिग नाही, नियोजन नाही, असा माझा आरोप आहे. आमच्या पत्रांचे काय केले ते सुद्धा सांगावे.

**मा.सीमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, एवढी चर्चा कशासाठी होते तर त्या बीआरटी लाईनमध्ये कोणतेही वाहन आले नाही पाहीजे. त्यासाठी चर्चा चालू आहे. माझा सवाल आहे की, बीआरटीसाठी आपण स्पेशल रुट केले आहेत. मुंबई-पुणे रस्त्यावर आपण ब्रॅकेडस् मारुन रुटस् तयार केले आहेत. त्यावर खरेतर चर्चा व्हायला पाहीजे. म्हणजे पुढचे प्रश्न आपोआपच सुटतात. गेले सहा महिन्यांपूर्वी प्रेझेंटेशन दिले होते. मी मागणी केली होती. पहिले सेफ्टी ऑडीट कधी करणार आहात. त्याबद्दल मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करते. आय.टी.आय. पवई यांच्याकडून आपण सेफ्टी ऑडीट केले आहे. माझी हरकत आहे की, आय.टी.आय. पवई यांना सुद्धा सूचना देता आली नाही. मूळात शहराचा विकास पूर्वीच झाला असल्यामुळे इथे रस्ता रुंदीकरणासाठी आपल्याला जागा राहीलेली नाही. आहे त्या जागेत बीआरटी रुट स्थापन केला आहे. ज्या ठिकाणी ब्रॅकेडस् मारले आहेत. त्याच्या बाजूला गेलो की भास होतो आपण मुंबईला तर आलो नाही ना. डाव्या बाजुला ट्रॅफीक जाम होणार असेल तर बीआरटी रोडमध्ये लोक घुसणारच. आपण इथे लोकांकडून सूचना/हरकती मागविल्यात का. बीआरटीएस हा आपण लोकांवर लादलेला प्रोजेक्ट आहे. आपण लोकांना हा प्रोजेक्ट दाखविलात का. एका तासात ६३ बसेस जाणार असे बीआरटीएसच्या रिपोर्टमध्ये आहे. म्हणजे एका मिनिटाला एक बस ठेवणार, ही पुढे जाऊन थांबलीतर त्या बीआरटीएसमध्ये सुद्धा ट्रॅफीक जाम होणार. त्यांनी त्यांच्या बसेस स्पेशल रुटमध्ये

न्यायच्या. त्यांनी आमच्या रुटमध्ये सुद्धा बसेस घुसडायच्या. त्यांनी पाहीजे तसा खेळ करायचा. त्यांना बंधन नाही. आमचेही नागरीक कर देतात. त्यांनी मात्र सगळी बांधने पाळायची. यांना मात्र सगळ्या बाजुने बोलायचे. तुमच्या रस्त्यावर आम्ही उभे राहतो, श्वास घेतो म्हणून अडीच टक्के टॅक्स घेता. आपण जेएनएनयूआरएमचा फंड स्विकारला. आपल्यालाही नियम करताना आनंद होत नाही. परंतू नियम करणार असाल तर किमान जिथे रस्ता करायला जागा नाही, करु शकत नाही तिथे बीआरटीएसचा रुल लावू नये. आत्ता जशा बसेस जातात, तशा गेल्या पाहीजेत. या विषयाचे मूळ न धरता केवळ त्याठिकाणी दंड आकारला पाहीजे. आम्ही सत्ताधारी आहोत,हुकूमशहा आहोत. लोकांनी आम्हाला निवडून दिले आहे. ही विशेषणे तुमचीच होती. तुम्हीच भाषण केले आहे. आत्ता लोकांचा कळवळा येत असेल तर पुणे-मुंबई रोडवरचा बीआरटीएस रस्ता थांबवले पाहीजेत. त्याठिकाणी मॉल, दुकाने, कमर्शियल बांधकामे चालू आहेत, यांचा सर्वे झाला पाहीजे. खरेतर बांधकाम परवानगी घेऊन काम केले आहे का, नॉर्मस् प्रमाणे बांधकाम झाले आहे का, नसेलतर ती दुकाने पाडणार आहात का. मुंबई-पुणे हायवेची जागा इथे ज्या जागा १० टक्के मध्ये ताब्यात आलेल्या आहेत. इंडस्ट्रीयल झोनमधील जागा आहेत, त्यासाठी शासनाच्या नवीन आदेशाची वाट पाहीली. त्या जागा ताब्यात घेतल्या असत्या, ४/५ मजली वाहनतळ उभे केले असते तर हा प्रश्न कदाचित निर्माण झाला नसता. आपल्या चुकांमुळे इथे लोकांना भूर्दंड सोसायला लावतो हे स्पष्ट आहे. बीआरटी मधून वाहने गेलीच नाहीत असे होणार नाही. आजुबाजुच्या रस्त्याची विडथ् बघा. शहरात होणारे अपघात बघा. हे बघितले तर पार्किंगसाठी जागाच रहात नाही. बीआरटीएसमध्ये त्यात नियम सुद्धा आहेत. पार्किंगसाठी जागा दिली पाहीजे. पाथ-वे दिला पाहीजे. तो कुठे आहे. आपल्याकडे पार्किंगची जागा कुठे आहे. हे सोयीस्करपणे विसरता. दुसरीकडे मात्र असे नियम करतो. आयुक्त साहेब, आपण इथे नसताना आम्ही जेएनएनयूआरएमचा फंड उचलला आहे का, मागे झाले ते तुम्हाला पुढे रेटायचे एवढेच करायचे आहे. मी कौतुक करेल की,तुम्ही बीआरटीसंदर्भात प्रेझेंटेशन दिले. त्याचा आय.आय.टी पवई यांनी रिपोर्ट दिला. तुम्ही त्याचे पुन्हा एकदा अवलोकन करावे. खरेच आपल्याकडून होणार नाही. मिनिटा मिनटाला जीव जाईल अशी परिस्थिती आहे. शुल्क घ्यायचे का निःशुल्क करायचे यापेक्षा लोकांचे जीव जाणार आहे का हे महत्वाचे आहे. लोकांचा जीव जाणार असेल पैसा देऊन सुद्धा जीव विकत घेता येत नाही. हे सुद्धा तितकेच त्रिवार सत्य आहे. हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. बीआरटी करायची का नाही याचा सुद्धा आपण विचार करावा एवढे सांगते.

**मा.मंगलाताई कदम** – हा विषय बीआरटीएस संदर्भात आहे. आज हा विषय बघितला तर पुण्यामध्ये जेव्हा बीआरटी चालू केल्यानंतर पहिल्यांदा इतके ऍक्सिडंट झाले, मृत्यू होणा-या लोकांची संख्या बघितली तर खरोखरच धक्कादायक गोष्टी निदर्शनास येतात.

बीआरटीएसची व्यवस्था, अंमलबजावणी करायची असेल तर त्यासाठी उपाययोजना नक्की अंमलात आणली पाहीजे. आपण म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहराची पूर्वी असणारी २ ते ५ लाख लोकसंख्या व आज शहराची लोकसंख्या २० लाख झाली आहे. प्रत्येक कुटूंबात प्रत्येक व्यक्तीगणिक चारचाकी, दुचाकी गाड्या आहेत. एका घरात ४ ते ५ वाहने आहेत. प्रत्येकाला वाटते, माझा रस्ता सहजरित्या मार्गस्थ झाला पाहीजे. समाजात वावरत असताना समाजाची परिस्थिती बघितली जाते. कुठेही वाहने लावतात. वाहने कुठेही सोडून जातात. शहर व्यवस्थितरित्या मार्गस्थ व्हायला पाहीजे. शहरात बकालपणा होऊ नये. शहरातील लोकसंख्या इतकी वाढली आहे. इथून पुढे आणखी वाढणार आहे. नवीन इमारतींना असणारे पार्किंग बघता, आज मॉलस्, मंगल कार्यालये असतील, बिल्डींग परमिशन देताना इमारतीमध्ये पार्किंग व्यवस्थेचे काय करणार. दंड वसूल करायचा. दुकानदार, हॉटेलवाले, मंगल कार्यालये यांच्यावर सुद्दा दंड आकारला जावा. आज बीआरटीचा विषय आहे. या रुटमध्ये जिथे जिथे मला वाटते, वाहतूक व्यवस्थेचा पूर्णपणे सर्वे केला आहे. ही व्यवस्था व्यवस्थित होणे गरजेचे आहे. बाहेरुन जाणारी वाहने आहेत. पार्किंग बोर्ड नसेल तिथे वाहने लावली तर आपल्या गाड्या तिथून सुलभरितीने चालू शकतील का. कित्येक देशांची लोकसंख्या कितीतरी पटीने आहे. तिथे पोलिस यंत्रणा सुद्धा नाही. त्यांच्या प्रकारातून डायरेक्ट दंड वसूल केला जातो. आपण सुधारायचे नाही असे ठरवले असेल तर रोडरोलर असतील, सर्वसामान्य लोक असतील. ही कामगार नगरी आहे. सोसायट्यांच्या बाहेर ट्रक लागतात. १५/१५ दिवस ट्रेलर सोडून जातात. कंम्पलेण्ट केलीतर अजिबात सॉल्व्ह होत नाही. नागरीक टायर पंक्चर करतात. अशा गोष्टी घडत असतात. माझ्या वॉर्डात पीएमपीएमएलचे केंद्र तिथे आहे. मी स्वतः कार्यालयात गेले असताना बघितले, आज ट्रान्सपोर्ट नगरीतले ट्रक, ट्रेलर्स यांनी तो पूर्ण रस्ताच बंद केला आहे. बसेस बाहेर यायला रस्ता नव्हता. चारचाकी, ट्रक तिथे येतात. त्या केंद्राने या वाहनांची व्यवस्था नक्की करावी. नागरीकांना त्रास कशाला व्हायला पाहीजे. ट्रेलर चालवणारा माणूस ट्रेलर रस्त्यावर लावून रस्ता अडवणार असेल तर त्याच्यावर शंभर टक्के दंड आकारणी झाली पाहीजे. मध्ये कुदळवाडीत जो अपघात झाला होता, त्यात नेहरुनगरमधील इनामदार नावाच्या गृहस्थाचा एकुलता एक २२ वर्षीय मुलगा आज मरणयातना सोसतोय. या लोकांना रस्त्यावर ट्रेलर लावायला अधिकृत परमिशन दिली आहे तर हे लोक नागरीकांच्या जीवाशी खेळत आहेत. वाहने थांबवण्याबाबत कुठेतरी नियम पाहीजेत. ते झाले नाही तर शहराचा विकास कसा होईल, बकालपणा कसा दूर होईल. ज्यावेळी वाहतूक शाखेने कार, जीप साठी दंड आकारला आहे. २,००० रुपये, ३,००० रुपये नाहीतर वाहतूक शाखेचे लोक दंड वसूल करायची गरजच नाही, हे योग्य नाही. प्रत्येक टिकाणी प्रत्येक दिवसाला चोरीची बातमी येते आहे. बायकांचे चालणे सुद्धा मुश्कील झाले आहे. दुचाकीवरुन चांगले कपडे घालून येतात. पायी चालणा-या महिलांचे मंगळसूत्र ओढून

नेतात व सरळ सरळ जातात. लाईटचा फोकस डोळ्यावर घालतात. नागरीकांना चालणे सुद्धा मुश्कील झाले आहे. कॉलेज वर्ग असू द्या, माझा तुमचा मुलगा असू द्या. त्याच्याकडे गाडीची कागदपत्रे असलीच पाहीजेत. नंबर प्लेट असली पाहीजे का नको. गाडीला डुक्कर हॉर्न कशाला हवा. आम्हीसुद्धा फोन करतो. सहा आसनी रिक्शांमुळेसुद्धा ट्रॅफिक जाम होते. डाव्या हाताला वळण्यासाठी रस्ता रिकामा पाहीजे. सरळसरळ डाव्या हाताला उभ्या असतात. त्यांना वळण नाही कारण त्यांना दंड बसत नाही. खरेतर कुलकर्णी साहेबांनी खुलासा करायला नाही पाहीजे. भानुदास गायकवाड यांनी खुलासा करायला पाहीजे होता. त्यांनी सर्वे केला होता. त्यांना सगळी ठिकाणे माहित आहेत. नो पार्किंगचे बोर्ड आहेत तिथे सुद्धा गाड्या पार्क केल्या जातात. बर्ड व्हॅली इथे सगळे ट्रेलर सोडून जातात. ट्रान्स्पोर्ट नगरीतील प्रत्येक व्यक्तीचे ट्रेलर आहेत. निगडी पोलिस स्टेशनमध्ये स्वतः पावत्या वसूल केलेल्या आहेत. तुम्हीच एमआयडीसीतील महापालिकेचा भूखंड भाड्याने दिलेला आहे. अजंठानगरचा भूखंड भाड्याने दिला आहे. असे भूखंड दिले आहेत. इतर ठिकाणी सुद्धा भूखंड भाड्याने दिले आहेत. मी स्वतः विनंती केली होती, महापालिकेचे असे भूखंड जर भाड्याने घेणार असतील तर पार्किंगची व्यवस्था शहरात कशी होणार. पुणे महापालिकेने फुले भाजी मंडईत आर्यन टॉकीज इथे भाजी विक्रिला जाणा-या, येणा-यांसाठी पार्किंगची व्यवस्था केली आहे. ही काळाची गरज आहे. त्यानुसार वागले पाहीजे. २,००० रुपये दंड आकारला नाही. शिस्त ही शिस्तच असते. शिस्त कधीतरी लागली पाहीजे. म्हणून हा दंड म्हणून नाहीतर शिस्त लागावी म्हणून. पैसे गोळा करण्यासाठी नाही. पैसे गोळा करण्यासाठी उत्पन्नाचे इतर स्त्रोत बघितले पाहीजेत. प्रत्येक वेळी हा विषय करायचा नाही असे म्हटले तर हा विषय शहराचा नाही. हा विषय उपसूचनेसहित मंजूर करण्यात यावा अशी विनंती करते.

**मा.सुजाता पाडाळे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४१९ विषय क्रमांक - १
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. स्था/वा.क/कावि/१४६ /२०१३ दि.३१/७/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४१०९ दि.२१/०९/२०१३
३) मा.महापालिका ठराव क्रमांक ३९६ दिनांक २१/११/२०१३

मा.शहर सुधारणा समिती सभा दिनांक २६/०८/२०१३ ठराव क्र.२७ नुसार, पुणे शहर वाहतूक पोलिसांनी केलेल्या मागणीनुसार पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील नियोजित बी.आर.टी. मार्गातून अवैधपणे/अनधिकृतपणे संचलन करणा-या शहरातील इतर रस्त्यावर 'नो पार्कींग' झोनमध्ये उभी राहणारी व शहरात इतर ठिकाणी अवैध पार्कींग करुन वाहतूकीचे सुरळीत संचलनात अडथळा ठरणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करणेस व त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावती पुस्तकाद्वारे वसूल करुन त्यातील ५० टक्के रक्कम वाहतूक पोलिसांना वाहतूकीचे साहित्य खरेदी इ.साठी ठेवून उर्वरित ५० टक्के रक्कम महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा वाहतूक पोलिसांनी करावा. सदर प्रस्तावानुसार मनपा रस्त्यावर अवैध पार्कींग करणा-या व 'नो पार्कींग' मध्ये उभ्या राहणा-या आणि बी.आर.टी. मार्गामधून अनधिकृतपणे संचलन करणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी आणि त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क खालीलप्रमाणे आकारणेत यावे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | विमोचन व प्रशासकीय शुल्क रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अवजड वाहने ट्रक, बस, ट्रेलर्स इ. | ५,०००/- |
| २ | रोड रोलर, इतर यंत्र सामुग्री | ३,०००/- |
| ३ | हलकी वाहने १० टनापर्यंत क्षमता | २,५००/- |
| ४ | कार, जीप इ. | २,०००/- |
| ५ | सहा आसनी रिक्षा, टेम्पो इ. | १,५००/- |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | १,०००/- |

उपरोक्त प्रमाणे वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावतीपुस्तकाद्वारे वसुल करण्यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०८ अन्वये मनपाचे अधिकार वाहतूक पोलिसांना प्रदान करणेस मान्यता देणेची मा.महापालिका आयुक्त यांची मागणी असली तरी मनपा रस्त्यावर अवैध पार्कींग करणा-या व 'नो पार्कींग' मध्ये उभ्या राहणा-या आणि बी.आर.टी. मार्गामधून अनधिकृतपणे संचलन करणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी आणि त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क खालीलप्रमाणे आकारणेत यावे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | विमोचन व प्रशासकीय शुल्क रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अवजड वाहने ट्रक, बस, ट्रेलर्स इ. | ५,०००/- |
| २ | रोड रोलर, इतर यंत्र सामुग्री | ३,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | हलकी वाहने १० टनापर्यंत क्षमता | २,५००/- |
| ४ | कार, जीप इ. | २,०००/- ऐवजी १००/- |
| ५ | सहा आसनी रिक्षा, टेम्पो इ. | १,५००/- ऐवजी १००/- |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | १,०००/- ऐवजी ५०/- |

उपरोक्त प्रमाणे वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावतीपुस्तकाद्वारे वसुल करण्यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०८ अन्वये मनपाचे अधिकार वाहतूक पोलिसांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्रक्र.वैद्य/३/कावि/१५८७/२०१३, दि.१/११/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४७७४ दि.१२/११/२०१३

मनपा हददीमध्ये कारखाने, उद्योगधंदे यांचेकडून उद्योगधंदा परवाना फी वसुल करणेत येते तथापि, रुग्णालय व दवाखाना यांना कसलीही फी आकारली जात नाही. त्यामुळे रुग्णालय व दवाखाने यांचेकडुन नव्याने वैद्यकीय परवाना फी आकारणे आवश्यक आहे. सध्या मनपा हददीत खालीलप्रमाणे रुग्णालये व दवाखाने या विभागाकडे नोंदणी झालेले आहेत.

| अ.क्र | बेड संख्या | रुग्णालय/दवाखाने संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | १ ते १० | २२२ | प्रत्यक्षात पिंपरी चिंचवड म.न.पा. क्षेत्रात क्लिनिक, डिस्पेन्सरी, लॅबोरेटरी, कन्सलटेशन, पशु दवाखाने, फिजिओथेरेपी व इतर वैद्यकीय सेवा पुरविणा-या संस्था एकुण अंदाजे ५००० आहेत |
| | ११ ते ४९ | ११९ | |
| | ५० ते १०० | १४ | |
| | १०१ ते ४९९ | १० | |
| | ५०० चे पुढे | २ | |
| | **एकुण** | **३६७** | |
| २ | क्लिनिक/डिस्पेन्सरी | ७७० | |

मनपाचे उत्पन्न वाढीचे दृष्टिने - म.न.पा. हददीतील रुग्णालये व दवाखाने यांचेकडून खालीलप्रमाणे वैद्यकीय परवाना फी आकारणे आवश्यक आहे.

| अ.क्र | बेडची संख्या | फी (प्रति वर्षी) | दंड |
|---|---|---|---|
| १ | १ ते १० | १०००/- | १ एप्रिल ते ३० जुन या कालावधीत रक्कम जमा न केलेस प्रति महिना फी चे १०% तथापि कमाल १२०% वार्षिक दंड |
| २ | ११ ते ४९ | २०००/- | |
| ३ | ५० ते १०० | ४०००/- | |
| ४ | १०१ ते ४९९ | १००००/- | |
| ५ | ५०० चे पुढे | २५०००/- | |
| ६ | क्लिनिक,डिस्पेन्सरी,लॅबोरेटरी,कन्सलटेशन,पशु दवाखाने, फिजिओथेरेपी व इतर वैद्यकीय सेवा पुरविणा-या संस्था | ५००/- | |

वरीलप्रमाणे फी आकारणी केलेस खालीलप्रमाणे म.न.पा. स वार्षिक उत्पन्न मिळेल.

| अ.क्र | रुग्णालये बेडसंख्या | संख्या | दर | र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | १ ते १० | २२२ | १०००/- | २२२००० |
| | ११ ते ४९ | ११९ | २०००/- | २३८००० |
| | ५० ते १०० | १४ | ४०००/- | ५६०००/- |
| | १०१ ते ४९९ | १० | १००००/- | १०००००/- |
| | ५०० चे पुढे | २ | २५०००/- | ५००००/- |
| २ | क्लिनिक,डिस्पेन्सरी,लॅबोरेटरी,कन्सलटेशन, पशु दवाखाने, फिजिओथेरेपी व इतर वैद्यकीय सेवा पुरविणा-या संस्था | ५००० अंदाजे | ५००/- | २५०००००/- |
| | **एकुण** | | | **३१,६६,०००/-** |

म.न.पा. हददीतील रुग्णालये व दवाखाना/तत्सम क्लिनिक यांना वरीलप्रमाणे वैद्यकीय परवाना फी आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.किरण मोटे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - मनपा हद्दीमध्ये कारखाने, उद्योगधंदे यांचेकडून उद्योगधंदा परवाना फी वसूल करणेत येते. तथापि, रुग्णालय व दवाखाना यांना कसलीही फी आकारली जात नाही. त्यामुळे

रुग्णालय व दवाखाने यांचेकडून नव्याने वैद्यकीय फी प्रति वर्षी ऐवजी प्रति मासिक परवाना फी आकारण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.कैलास थोपटे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पाडाळे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -४२० विषय क्रमांक -२
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/३/कावि/१५८७/२०१३, दि.१/११/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४७७४ दि.१२/११/२०१३

मनपा हददीमध्ये कारखाने, उद्योगधंदे यांचेकडून उद्योगधंदा परवाना फी वसुल करणेत येते तथापि, रुग्णालय व दवाखाना यांना कसलीही फी आकारली जात नाही. त्यामुळे रुग्णालय व दवाखाने यांचेकडुन नव्याने वैद्यकीय परवाना फी आकारणे आवश्यक आहे. सध्या मनपा हददीत खालीलप्रमाणे रुग्णालये व दवाखाने या विभागाकडे नोंदणी झालेले आहेत.

| अ.क्र | बेड संख्या | रुग्णालय/दवाखाने संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | १ ते १० | २२२ | प्रत्यक्षात पिंपरी चिंचवड म.न.पा. क्षेत्रात क्लिनिक,डिस्पेन्सरी,लॅबोरेटरी, कन्सलटेशन, पशु दवाखाने, फिजिओथेरेपी व इतर वैद्यकीय सेवा पुरविणा-या संस्था एकुण अंदाजे ५००० आहेत |
| | ११ ते ४९ | ११९ | |
| | ५० ते १०० | १४ | |
| | १०१ ते ४९९ | १० | |
| | ५०० चे पुढे | २ | |
| | **एकुण** | **३६७** | |
| २ | क्लिनिक/डिस्पेन्सरी | ७७० | |

मनपाचे उत्पन्न वाढीचे दृष्टिने - म.न.पा. हददीतील रुग्णालये व दवाखाने यांचेकडून खालीलप्रमाणे वैद्यकीय परवाना फी आकारणे आवश्यक आहे.

| अ.क्र | बेडची संख्या | फी (प्रति वर्षी) | दंड |
|---|---|---|---|
| १ | १ ते १० | १०००/- | १ एप्रिल ते ३० जुन या कालावधीत रक्कम जमा न केलेस प्रति महिना फी चे १०% तथापि कमाल १२०% वार्षिक दंड |
| २ | ११ ते ४९ | २०००/- | |
| ३ | ५० ते १०० | ४०००/- | |
| ४ | १०१ ते ४९९ | १००००/- | |
| ५ | ५०० चे पुढे | २५०००/- | |
| ६ | क्लिनिक,डिस्पेन्सरी,लॅबोरेटरी, कन्सलटेशन,पशु दवाखाने, फिजिओथेरेपी व इतर वैद्यकीय सेवा पुरविणा-या संस्था | ५००/- | |

वरीलप्रमाणे फी आकारणी केलेस खालीलप्रमाणे म.न.पा. स वार्षिक उत्पन्न मिळेल.

| अ.क्र | रुग्णालये बेडसंख्या | संख्या | दर | र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | १ ते १० | २२२ | १०००/- | २२२००० |
| | ११ ते ४९ | ११९ | २०००/- | २३८००० |
| | ५० ते १०० | १४ | ४०००/- | ५६०००/- |
| | १०१ ते ४९९ | १० | १००००/- | १०००००/- |
| | ५०० चे पुढे | २ | २५०००/- | ५००००/- |
| २ | क्लिनिक,डिस्पेन्सरी,लॅबोरेटरी, कन्सलटेशन,पशु दवाखाने, फिजिओथेरेपी व इतर वैद्यकीय सेवा पुरविणा-या संस्था | ५००० अंदाजे | ५००/- | २५०००००/- |
| | **एकुण** | | | **३१,६६,०००/-** |

म.न.पा. हददीतील रुग्णालये व दवाखाना/तत्सम क्लिनिक यांना वरीलप्रमाणे वैद्यकीय परवाना फी आकारणेस तसेच मनपा हद्दीमध्ये कारखाने, उद्योगधंदे यांचेकडून उद्योगधंदा परवाना फी वसूल करणेत येते. तथापि, रुग्णालय व दवाखाना यांना कसलीही फी आकारली जात नाही. त्यामुळे रुग्णालय व दवाखाने यांचेकडून नव्याने वैद्यकीय फी प्रति वर्षी ऐवजी प्रति मासिक परवाना फी आकारण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ३

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/१/कावि/१४४५/२०१३, दि.०३/१०/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४९१६ दि.२६/११/२०१३

मा.क्रीडा समिती दिनांक ०३/१०/२०१३ ठराव क्रमांक ४६ व मा.विधी समिती दिनांक १२/११/२०१३ ठराव क्रमांक १० नुसार, प्रस्तावासोबत जोडणेत आलेल्या मनपा क्रीडा धोरण मसुद्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेस तसेच पान ३० विषय क्र. १ मधील अनुक्रमांक ८ मध्ये कै.प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल ऐवजी नावात दुरुस्ती करुन कै.प्रबोधनकार केशव ठाकरे क्रीडा संकुल/स्केटींग ग्राऊंड यमुना नगर निगडी असा मजकूर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.रामदास बोकड –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,याठिकाणी क्रिडा धोरणाचा विषय सभागृहासमोर आलेला आहे. सभागृहातील सर्व सदस्यांना विनंती करतो, या शहरात कुस्ती, खो-खो अनेक प्रकारचे खेळ आहेत. त्या शासनाने आणखी १४ खेळ समाविष्ट केले आहेत. त्यात तुमची आमची सर्वांची मुले, शहरातील विद्यार्थी, कॉलेजमधील विद्यार्थी असतील. आज शहरात खेळाच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड नगरीचे नाव पूर्ण देशात उंचावले आहे. त्यासाठी महापालिकेने कटीबद्ध रहावे. हे महापालिकेचे कर्तव्य आहे. म्हणून याठिकाणी अनेक सन्माननीय सहका-यांच्या वतीने केलेल्या सूचनेनुसार याठिकाणी शहरात आपण मोठमोठ्या योजना केल्या. त्याबद्दल मा.क्रिडा समितीचा सभापती म्हणून सदस्यांचे अभिनंदन करतो. जेवढ्या प्रकारचे विषय क्रिडा धोरणातील त्रुटी यासाठी हा विषय सभागृहात आणला आहे. क्रिडा धोरण करत असताना गेले ६ महिने आदरणीय महेश लांडगे असतील, सभागृहात जे खेळाडू सदस्य आहेत, सर्व सदस्यांनी यात सहभाग घेतला आहे. हे धोरण करत असताना सन्मा. सदस्यांना प्रत्येकाला क्रिडा समितीचा सभापती या नात्याने मी एक पत्र दिले होते. गेले ३ महिन्यांपूर्वी हे पत्र प्रत्येकाच्या घरी घरपोच झाले आहे. शहरात खेळाडूंसाठी काय सुविधा असाव्यात, क्रिडा धोरण कशा पद्धतीने मांडले जावे यासाठी सदस्यांकडून मी सूचना देण्याची मागणी केली होती. त्यानुसार माझ्याकडे २५ उपसूचना आल्या आहेत.

हा विषय मंजूर करताना या उपसूचना समाविष्ट करुन विषय मंजूर करणार आहोत. अनेक नवनवीन योजना या क्रिडा धोरणात आणल्या आहेत. एकूण २५ उपसूचना आहेत. त्याला कव्हरींग लेटर दिले आहे. धोरणात काही दुरुस्त्या होत्या, त्याचा सुद्धा उल्लेख करतोय. सर्व सदस्यांना विनंती करतो की, कव्हरींग लेटर जोडून या उपसूचना सादर करत आहोत. हा विषय उपसूचनेसहीत मंजूर करण्यात यावा अशी सभागृहाला व मा.आयुक्त साहेबांना विनंती करतो.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महेशदादा लांडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, क्रिडा धोरणाचा हा विषय त्यातील त्रुटी, अडचणी दूर करण्यात बरेच महिने घालवले आहेत. क्रिडा धोरणाच्या या विषयात प्रशासकीय भाग वेगळा ठेवावा हे मी प्रत्येक वेळी सांगितले होते. या गोष्टी करणे आवश्यक होते. प्रत्येक कोणकोणता अधिकारी कोणकोणत्या सदस्याच्या संपर्कातील आहे. प्रशासकीय अडचणींमुळे हे धोरण लांबवले गेले होते. जे क्रिडा शिक्षक, क्रिडा अधिकारी नेमायचे, त्यांची पदोन्नती हा पूर्ण भाग प्रशासकीय प्रमुख म्हणून तुमच्याकडे रहावा. खेळाडूंच्या योजना राबवायच्या हे धोरणात समाविष्ट व्हावे. एकिकडे खेळाडूंसाठी क्रिडा धोरण करतोय. मला प्रत्येक सदस्याला विचारायचे आहे, कोणत्याही वॉर्डातील, पिंपरी चिंचवडमधील कोणताही खेळाडू असू द्या, त्याचा सत्कार इथे येऊन करायला कोणाला अडचण वाटते. त्यासाठी एवढी वर्षे का जातात. कोणाला एवढे महत्व दिले जाते. कोणाचा अमुल्य वेळ या खेळाडूंच्या सत्कारासाठी जातो. कोणत्याही सदस्याने इथे सांगावे. आपण त्यांना सभागृहात बोलवून त्यांचा बहुमान करतो का अपमान करतोय. त्यांना इथे बोलवायचे योग्य काम करा. पिंपरी चिंचवड शहराकडून भारताला एखादा खेळाडू द्या. आपण त्यांच्यासाठी काय करणार. आपण सत्कार करायला त्यांच्यासाठी वेळ देत नाही. नुसते क्रिडा धोरण करुन उपयोग नाही. अनेक खेळाडूंना प्रशस्ति द्या, समाजात चांगले उदाहरण द्या. त्यांना चांगली साधने द्या. त्यांचा सत्कार हीच त्यांना बक्षिसी आहे. त्यांना जिथे पुरस्कार मिळतो तिथे त्यांचा बहुमान होतो. माझ्या वॉर्डातल्या एखाद्या खेळाडूला वाटते, त्याचा सत्कार महापौरांच्या हस्ते, आयुक्तांच्या हस्ते व्हावा. पण आपल्याला वेळ नाही. असे कुठले युद्ध पेटले आहे की तुम्हाला सत्कार करण्यासाठी वेळ नाही. क्रिडा धोरण कशाला करताय. तुम्हाला खेळाडूंबद्दल आपुलकी नाही. क्रिडा धोरण करायची काय गरज. काहीतरी करा, नुसते बोलू नका. आपले बाकीचे उद्योग आहेत. सगळ्यांना समस्या आहेत. सगळीकडे विकास जर करायचा आहे तर त्यांना अपमानीत करु नये. खेळाडू दत्तक योजना चालू केली होती. ज्ञानप्रबोधिनीत आदिवासी समाजातील विद्यार्थी आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील ते नाहीत. त्यांचा संपूर्णपणे खर्च शाळा करते. त्यांना सुद्धा एखादी अट शिथिल करुन

सहभागी करुन घ्या. आदिवासी तरुणांसाठी महाराष्ट्र शासन विविध योजना राबविते आहे. ज्ञान प्रबोधिनी शाळा त्यात भाग घेते आहे. याचा सुद्धा आपण विचार करावा. आमच्या समोर खेळाडूंचा सत्कार होऊ द्या. महापालिका सभा अर्धा तास केलीतरी कोणत्याही नगरसेवकाची तशी तक्रार असेल तर तसे सांगावे. आमचा विकास कमी आहे. टाईम वेस्ट होतो. नाहीतरी अनेक गोष्टींमुळे आपला वेळ जातोय.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज पुन्हा एकदा क्रिडा धोरणाचा विषय आला आहे. अनेक वेळा स्थायी समितीपुढे हा विषय मांडण्यात आला. धोरण देताना निश्चितपणे त्यावर बोलतो. इतकी खंत वाटते, धोरण राबविताना त्याची आवश्यकता समोर आणणे सोप्पे आहे. एका ठिकाणी कुठेतरी क्रिडा प्रबोधिनीकडून स्पर्धा भरविल्या जातात. कोणत्याही प्रकारचे यश मिळवायला आपले विद्यार्थी निकामी ठरतात. आमच्या मुलांच्यांत क्षमता नाही असे मुळीच नाही. त्यांना मार्गदर्शनाचा अभाव असतो. खेळाडूंसाठी दत्तक योजना राबवतो. त्यावेळी तुटपूंजी रक्कम देतात, ती सुद्धा वेळेवर मिळत नव्हती. आज सुद्धा त्यांना किट मिळालेले नाही. ते सक्षम असते तर, त्यांचे पालक आर्थिकदृष्ट्या सक्षम असते तर त्यांनी तुमच्यापुढे हात पसरवले नसते. त्यांना वाटते, ४ आणखी मिळतात. त्यातून मुलांचे साहित्य घेता येऊ शकेल या अपेक्षेने ते आपल्याकडे येतात. आपण त्यांना निराश करण्यापेक्षा वेगळे त्यांच्या पदरात काहीच टाकत नाही. क्रिडा प्रबोधिनी शाळेचे किती अर्ज आपल्याकडे आले आहेत. मागण्या करायच्या. घरांतून मदत घेतात असे होत नाही. शाळेतील विद्यार्थी घडण्यासाठी ज्या मागण्या केलेल्या असतात, त्या वेळेत पूर्ण होत नाहीत. प्रत्येक वर्षी ही अडचण आहे, ही समस्या आहे. निश्चित नकारार्थी भूमिका घेऊन क्रिडा धोरणाबाबत खेळाडूंकडे बघितले जाते. हे थांबले पाहीजे. विद्यार्थी घडवण्यासाठी सगळ्या सोयी लागतात. त्या त्या वेळेला त्या सुविधा मुलांना मिळणे गरजेचे असते. दत्तक योजनेत नियम काय आहेत. या वर्षाच्या खेळाडूला जर पुढील वर्षी दत्तक योजनेत सामिल करतो. त्याला प्रशिक्षण मिळाले नाही ही त्याची चूक आहे का. तो मुलगा इथे बाद केल्यासारखी गोष्ट आहे. या गोष्टी कुठेतरी थांबवाव्यात. क्रिडा धोरण राबविताना तत्परतेने त्या त्या गोष्टी राबविल्या पाहीजेत. या वर्षीचे बील त्या वर्षी काढलेतरी निश्चित काही फरक पडणार नाही. किमान क्रिडा धोरणातून तरी खेळाडू घडतील. निश्चितपणे पिंपरी चिंचवड शहराचे नाव देशात, जगात चमकल्याशिवाय राहणार नाही. ज्यावेळी क्रिडा धोरणामार्फत शिक्षक महापालिकेत रुजू झाले होते, त्यावेळी त्यांनी रुजू होत असताना प्रायमरी शिक्षक म्हणून रुजू झाले होते. ग्रॅज्युएशन पूर्ण करताना त्यांना सांगितले होते, क्रिडा शिक्षक म्हणून रुजू व्हा. मागिल पूर्ण वर्ष आपण त्यांना तासिका दिल्या होत्या. शिक्षकांप्रमाणे सुट्ट्या देत होतो. त्यांच्याबाबतीत कोणताही सक्षम निर्णय घेतलेला नाही. कायद्याप्रमाणे

असे करता येते का. ते शिक्षक म्हणून इतके दिवस इथे राहीले. इथून पुढे ८ तास नोकरी त्यांना देता येते का याचा खुलासा करावा.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी आपण क्रिडा धोरणाचा विषय सभागृहापुढे आणला आहे. मूळात क्रिडा धोरण ठरवित असताना त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही. यामागे खरी कारणे आम्ही सगळ्यांनी अनेक वेळा भांडल्याप्रमाणे सांगितली आहेत. क्रिडा विभागातील स्टाफ याला कारणीभूत आहे. ते मुळात क्रिडा विभागातील कामाबद्दल उदासीन आहेत. त्यामुळे कोणतीही योजना प्रत्यक्षात राबविली जात नाही. इथे अनेक कर्मचारी देखील खेळाडू आहेत. वेगवेगळ्या विभागांत काम करतात. ज्या कर्मचा-यांना खेळात इंटरेस्ट आहे त्यांची या विभागात ट्रान्फर केलीतर त्याचा आऊटपुट निश्चित ते देऊ शकतील. या दृष्टीने पाऊल उचलावे. आपल्याकडे नवीन अधिकारी आले आहेत. त्यावेळी मी मागणी केली होती, स्टाप बदलून मागीतला नाही का. त्यांनी सांगितले, आम्ही मागणी केली होती, तशी आमची मागणी मंजूर झाली नाही. आपल्या शहरात अनेक आरक्षणे ताब्यात येत आहेत. ही आरक्षणे महापालिका लगेच डेव्हलप करु शकत नाही. तसे असेल तर तात्पुरत्या स्वरुपात क्रिडांगण म्हणून प्रत्येक आरक्षणाचा वापर करावा. निश्चितपणे त्याचा फायदा होईल. एकूण सहका-यांना वाटते आहे, शहरात मुलांना खेळायला जागा राहीलेल्या नाहीत. मोबाईल, टि.व्ही. कम्प्यूटर यात मुले बंदिस्त होतात. त्यामुळे जी आरक्षणे ताब्यात येतात ती विकसित करा. क्रिडांगण म्हणून विकसित करावीत. शहरातील मुलांसाठी खूप चांगला उपयोग होऊ शकतो. वेगवेगळ्या शहरांत क्रिडा संकुले उभारली जातात. या धर्तीवर भोसरी इथे एमआयडीसीत लांडगे कुस्ती केंद्र सुरु केले आहे. त्याचे टेंडर निघाल्यानंतर तांत्रिक अडचणींमुळे ते करायचे राहून गेले. अशा प्रकारचे क्रिडा संकूल वेगवेगळ्या खेळांसाठी जसे हॉकीसाठी ग्राऊंड केले. पिंपरी चिंचवड शहराचे आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव झाले आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरात चांगले खेळाडू घडतील. इथे चांगले कार्यक्षम खेळाडू आहेत. माझी इच्छा आहे, ज्यांना या क्षेत्रात काम करायची इच्छा आहे त्यांना अपॉईंट केलेतर निश्चितपणे आपल्याला खूप फायदा होईल.

**मा.उल्हास शेटटी** – मा.महापौर साहेब, हा खेळाडूंच्या आवडीचा विषय आहे. खेळाडूंना बोलायला दिलेच पाहीजे. मी मा.महेशदादा लांडगे यांनी मांडलेल्या सत्काराच्या विषयाला, मा.अजित गव्हाणे यांनी मांडलेल्या सूचनांना अनुमोदन देतो. खरोखरच शहरात खेळाडू घडत नाहीत. एखादा खेळाडू राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर गेल्यावर हा सगळ्यात मोठा सोपस्कार असतो, त्याचा सत्कार. त्यांना सभागृहात बोलवून त्यांचा सत्कार केलातर त्यांच्या आई-वडीलांची छाती अभिमानाने फुलते. क्रिडा धोरण ठरविता असताना सगळे खेळाडू मित्र बोलत असतात. सत्कार करताना आयएएस ऑफिसर

असतात. त्यांना कौतुक वाटते.धोरण ठरवायचे झालेतर क्रिडा विभागाची परिस्थिती पाहाल तर ते फक्त महापौर चषक आयोजित करतात. इतकीच त्यांची मर्यादा राहीली आहे. आपला महापौर चषक घ्यायचा म्हणजे आपले काम संपले. माझ्यासारख्या नगरसेवकाला बरोबर घेऊन तुम्ही फूटबॉल स्पर्धा घ्या, व्हॉलीबॉल स्पर्धा घ्या. शहरातील खेळाडूंना त्याचा कितपत उपयोग होतो. एक वातावरण निर्मिती नक्की होते. बॉक्सिंग स्पर्धा, कुस्ती स्पर्धा असू द्या. महापालिकेचे काम फक्त महापौर चषक इतकेच मर्यादित आहे का. आज क्रिडा विभागाला मरगळ आली आहे. त्यांना एवढेच वाटते, ८ तास काम करायचे. त्यांना काम करायचा उत्साह राहीलेला नाही. स्पोर्टस् मेन घडवले पाहीजेत. १०० कोटींचे बजेट केले आहे. ५ कोटी कपड्यांसाठी तरतूद केली आहे. स्पोर्टस् साठी साहित्य खेळाडूंना द्या. एवढा निर्णय केला पाहीजे. १ ते ७ वर्षे तो खेळाडूच असतो. नंतर त्याची डेव्हलपमेंट होते. नंतर त्याची आवड निवड कळते की तो कोणत्या पद्धतीचा स्पोर्टसमन होऊ शकतो. हा अव्वल खेळाडू होऊ शकतो का. कुस्ती खेळू शकतो का. आपल्याकडे क्रिडांगणे नाहीत. याबाबत आपल्याला उपाय य़ोजता येत नाहीत. क्रिडा शिष्यवृत्ती देताना ६ महिने झाले त्यांना धोरण ठरवता येत नाही. काय केले पाहीजे. एकाच एक्सवाय नावाच्या व्यक्तीला टेंडर देता. हॉकी स्टीक घेण्यासाठी इतर क्रिडा साहित्याचे रेट प्रचंड आहेत. या आयटमसाठी एकच रेट मिळणार आहे का. म्हणून त्यात स्पर्धा करा. तुम्ही म्हणणाल एकच टेंडर आले. तर तुम्ही ते रिटेंडर केले पाहीजे. तुम्ही निविदा प्रक्रिया करा. तुम्हाला स्वतःला वाटत नाही का, कसे केले पाहीजे. त्यामुळे स्पोर्टस् मन यांची साध्या-साध्या गोष्टींसाठी उपेक्षा होते. त्यांच्या मागण्यांची पूर्तता होत नाही. मग धोरणाचा काय उपयोग. जोपर्यंत मनापासून इच्छा होत नाही, शहरात स्पोर्टस् मन घडले पाहीजेत, शहराचे नाव नॅशनल, इंटरनॅशनल लेवलवर गेले पाहीजे, तोपर्यंत महापौर चषकासाठी पर्याय नाही. फक्त यातून वातावरण निर्मिती होते. मी सतत बोलत राहणार. या धोरणाचा अजिबात उपयोग होणार नाही. स्टाफवर तर अजिबात परिणाम होणार नाही. त्यांना काही महत्व सुद्धा नाही. क्रिकेट प्लेअर, ऍथेलेटिक्स शिकवणारे, फूटबॉल, बॅडमिंटन शिकवणा-यांची अशी परिस्थिती झाली आहे. तुम्हाला चॅलेंज करतो. एखाद्या शिक्षकाला विचारा, फूटबॉलची ग्राऊंड साईज किती असते. ऍथेलेटला स्पाईस याचा काय उपयोग असतो, त्यातील स्टार्टर याचा काय उपयोग असतो ते सांगावे. त्यांना फक्त ड्युटी करायची आहे. त्या विभागात जो यासाठी काम करेल असा एक चांगला अधिकारी नेमावा. मुळात विद्यार्थ्यांना ग्राऊंड पाहीजे असे नाही. मदनलाल धिंग्रा स्टेडियममध्ये कितीतरी लाखो रुपये खर्च केले त्याची आज परिस्थिती पाहून या. शेजारी मोठे गटर केले आहे. लहान लहान मुळे किती वेळा पडलेली आहेत. आम्ही सगळ्या गोष्टी सांगायच्या. या गोष्टी तुम्ही केल्या पाहीजेत. एवढे चांगले लॉन टाकले आहे, त्याचे मेंटेनन्स केले पाहीजे. हे लॉन आठवड्यातून एक दिवस बंद ठेवून त्यावर पाणी मारा. क्रिडा धोरण असेच राहणार. महापौर चषक स्पर्धेसाठी

फक्त क्रिडा धोरणाचा उपयोग होणार. क्रिडा अधिका-यांनी शाळा पातळीवर किती दिवस स्पर्धा घेतल्या. त्यांच्यात स्पर्धा लावल्या तर आई वडीलांना किती अभिमान वाटेल, माझा मुलगा मुलगी सर्वोत्कृष्ट प्लेअर आहे. फक्त नॅशनल लेवल, इंटरनॅशनल लेवल यांना प्रोत्साहन. प्रोत्साहन ग्राऊंड लेवलवर मिळाले पाहीजे. पेपरमध्ये मुलांचे फोटो आले पाहीजेत. यांचे आधी गट करा, ट्रेंड करा. आम्ही स्पर्धा घेतो. या मुलांचे फोटो आले पाहीजेत, त्यांना प्रोत्साहन मिळाले पाहीजे. प्राधिकरणातील बॅडमिंटन कोर्ट बघा. तिथे टेंडर पास झाले असे आत्ता सांगितले. त्याची काय परिस्थिती आहे. काही लोक फिटनेससाठी खेळतात, काही लोक वेळ आहे म्हणून खेळतात. आपली खूप मोठी जबाबदारी आहे. खेळाडू निर्माण करायचा असेलतर इच्छा असेल तर नुसते धोरण तयार करुन उपयोग नाही. क्रिडा शिक्षकांचा इथे उपयोग होत नाही. जनगणनेसाठी त्यांचा वापर करतात. याचा जरुर विचार करावा. नागरीकांची सनद आपण जाहीर केली आहे. यात क्रिडाचा उल्लेख केलेला नाही. यात सांगितले पाहीजे. माझी विनंती आहे, मा.महेश लांडगे यांनी सांगितल्याप्रमाणे पुढील वर्षी शंभर टक्के जे खेळाडू नॅशनल लेवल, इंटरनॅशनल लेवलवर जातील त्यांचा सभागृहामध्ये सत्कार करा. खूप मोठी लाईन लागली आहे. कोणीही पत्र देतो, माझ्या वॉर्डातला कार्यकर्ता आहे. त्याचा सत्कार करा. त्यांच्यात स्पर्धा लागल्या पाहीजेत. आज याचा सत्कार झाला, उद्या माझा झाला पाहीजे. इथे आपल्याकडे सत्कार स्विकारायला लाईन लागली पाहीजे अशी माझी मागणी आहे. पुढील वर्षी स्थायी समितीमध्ये अजिबात घेऊ नका. विद्यार्थ्यांचा अपमान करु नका. क्रिडा विभागाकरिता एक चांगला आयएएस ऑफीसर चांगला स्पोर्टस् मन द्या. आमच्या मानधनातून रक्कम घ्या पण एक चांगला क्रिडा अधिकारी घ्या.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर क्रिडा धोरण म्हणजे कागदी धोरण आहे. मा.उल्हास शेट्टी यांच्या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे. आजपर्यंत क्रिडा विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांना कधी अडवले आहे का. शहरात खेळांत प्रगती करण्यासाठी, खेळाडूंना प्रगती करण्यासाठी धोरण झाल्यानंतरच प्रगती होईल का. त्यानंतर फार मोठे खेळाडू घडतील का. मुळात मानसिकता घडली पाहीजे. काम करणा-या कर्मचा-यापासून अधिका-यांपर्यंत मानसिकता बदलली पाहीजे. तोपर्यंत अशी धोरणे फक्त कागदावर राहतील. या सभागृहात अशी अनेक धोरणे पाहीली आहेत. अतिरिक्त आयुक्त कोंडे साहेबांनी क्रिडा लायब्ररी केली होती. त्याची आज अवस्था काय आहे. माझ्या कारकीर्दीत मगर स्टेडियम झाले आहे. आज ४ वेळा दुरुस्ती झाली. कोट्यावधी रुपये खर्च केले, आज त्याची अवस्था काय आहे. तिथे क्रिकेट खेळायला जातात. हे स्टेडियम ॲथेलेटिक्स यांच्यासाठी आहे. आजची परिस्थिती पाहीलीतर तिथे सुविधा तेवढ्या मिळत नाहीत. धोरण केवळ नावापुरते राहते. महापौरांच्या नावाने क्रिडा चषक भरवले जातात. ते सुद्धा केवळ निविदा प्रक्रियेसाठी भरवले जातात. खेळाडूंसाठी

नाही. मा.उल्हास शेट्टी यांच्या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे. महापालिकेच्या जीमची तीच परिस्थिती आहे. कोट्यावधींचे साहित्य खरेदी केले होते. शहरात खाजगी जिममध्ये महिन्याला दोन हजार रुपये घेतले जातात. त्यांची परिस्थिती पहा. ज्यावेळी साईचे कोच होते, ते चांगले खेळाडू घडवायचे काम करत होते. आपल्या अधिका-यांनी त्याच पद्धतीने कोच बंद केले. अधिकारी केवळ आमच्यापेक्षा चांगले राजकारण करतात. कोणत्याही सदस्याला त्रास देण्याची भूमिका ठेवली. दुसरीकडे विकृत राजकारण्याची भूमिका क्रिडा अधिकारी, क्रिडा पर्यवेक्षक करतात. स्पर्धा केवळ गवगवा करण्यासाठी होते. खेळाडू घडवण्यासाठी होत नाही. कागदावरचे धोरण कागदावरच राहणार आहे. कोणी कितीही ओरडू द्या, सांगू द्या, मानसिकता बदललीतर ख-या अर्थाने धोरणाला अर्थ राहील. थेरगाव बोटक्लबला ११ महिन्यांची मुदत ठेवली. ४ महिने पावसाळ्यात जातात. राज्य शासनाच्या पाटबंधारे विभागाकडे परमिशन देण्यासाठी १ कोटी डिपॉझिट ठेवण्याची अट घातली आहे. हे १ कोटी कुठून आणणार. धोरण ठरवताना त्याचा अभ्यास केला नाही. केवळ एखाद्या टेबलवर बसून कोणाच्यातरी सांगण्यावरुन माहिती गोळा करुन केलेले आहे. खेळाडू घडत नाहीत. मानसिकता बदलली पाहीजे. खेळाडूंची मानसिकता दुखवायचे काम क्रिडा विभागाच्या माध्यमातून केले जाते. आयुक्त साहेब, तुम्ही या धोरणाची प्रखरपणे अंमलबजावणी कराल का नाही शंका आहे. आजच्या पेपरमध्ये तुमच्या बदलीची बातमी आहे. पुढील मिटींगमध्ये तुम्ही असाल किंवा नसाल माहित नाही. मी पेपरमधील बातम्यांच्या अनुषंगाने सांगतोय, महापालिकेत सगळ्या गोष्टी बोलत असताना आयुक्त त्याची अंमलबजावणी निश्चित करतील. आयुक्त साहेब राहतील किंवा नाही, कर्मचा-यांना, अधिका-यांना इतके कडक आयुक्त नको आहेत म्हणून सांगतोय. आम्ही आमचा वेळ घालवत असताना आपल्या जबाबदारीबरोबर महापौरांची सुद्धा जबाबदारी मोठी आहे.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, धोरण निश्चित चांगले असते. या विभागात काही मिळत नाही म्हणून अधिका-यांना इथे इंटरेस्ट नसतो. माझ्या वॉर्डात मदनलाल धिंग्रा स्टेडियम येथे कमिश्नर शर्मा यांनी व्हिजिट घेतली होती. मॅट ३ वर्षापूर्वीचे होते. लॉन बसवायचा निर्णय घेतला. ७ लाखाचे टेंडर काढले. १८ महिने झाले, काम झाले नाही. स्थापत्य विभागाने क्रीडा विभागाकडे दिले. मेंटनन्स कोण करणार, का केला नाही. क्रिडा विभागात विचारले तर ते म्हणाले, मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्ट नाही. स्थापत्य विभाग म्हणाला, दोन मनुष्य पाणी मारायला ठेवले होते. तिथे आत्ता जाऊन बघितले तर दिसेल, इतकी हालत खराब आहे. सिनिअर सिटीझन मला सांगतात, बघा महापालिकेचे काम. लॉन कुठेही नाही. ज्यावेळी क्रिडा विभागाकडे हॅण्ड ओव्हर केले त्यावेळी त्यांनी ताबडतोब मेंटनन्स कॉन्ट्रॅक्ट मागवायला पाहीजे होते. कमिशनर यांना अधिकार आहे. ५/१० लाखाची डायरेक्ट ऑर्डर देण्याचा अधिकार आहे. कॉंट्रॅक्ट द्यायला

पाहीजे होते. आत्ता लाखो रुपये खर्च करुन लावलेले लॉन कुठे आहे असे मला नागरीक विचारतात. तसेच बॅडमिंटन कोर्टाचे मेंटेनन्स आत्ता सुरु झाले आहे ५/५ वर्षे पाठिमागे लागतो. व्यायामशाळेसाठी ५/५ वर्षे साहित्य मिळत नाही असे क्रिडा विभागाचे काम आहे. या विभागात काम करणारी व्यक्ती, इंटरेस्ट घेऊन काम करणारी पाहीजे. अधिका-यांना इंटरेस्ट नसतो. प्रत्येक अधिका-याला २/३ वर्षांसाठी तिथे टाका, काम करायलाच पाहीजे. मदनलाल धिंग्रा स्टेडियमचे लॉन झाले त्यासाठी जबाबदार कोण आहे. स्थापत्य क्रिडा विभागाला सांगते, क्रिडा विभाग स्थापत्य विभागाला सांगते. पेपरमध्ये फोटो छापून येतात. मला विनंती करायची आहे की, धोरणे चांगली असतात. त्याची अंमलबजावणी करताना पूअर इम्प्लिमेंटेशन होते. चांगली अधिकारी टाका, चांगले काम करतो. त्याला फक्त तोच विभाग द्या. अनेक वेळा ऍडीशनल चार्ज म्हणून हा विभाग दिलेला असतो. या विभागाला एक चांगली अधिकारी द्या. धोरण ठरवताना त्याप्रमाणे काम होते का नाही याकडे लक्ष द्यावे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, गेले ६ महिने क्रिडा धोरणाच्या विषयार चर्चा चालू आहे. हा विषय पहिल्यांदा आला होता त्यावेळी खूप उपसूचना आल्या म्हणून परत हा विषय क्रिडा समितीकडे पाठवला. त्यात दुरुस्ती करुन विषय पुन्हा महापालिका सभेकडे आणला आहे. परंतू ज्यावेळी क्रिडा धोरण टाईप झाले त्यावेळी त्यात शब्दांच्या ज्या दुरुस्त्या झाल्या आहेत, त्या नसत्यातर आज दुरुस्त्यांसाठी उपसूचना द्याव्या लागल्या नसत्या. २०/२५ उपसूचना शब्दांच्या दुरुस्त्यांसाठी आहेत. शब्दांच्या दुरुस्तीत ध चा मा होतो. म्हणून पुन्हा द्याव्या लागल्या. हे काम नीट झाले असते तर उपसूचना द्याव्या लागल्या नसत्या. तुम्ही नेहमी चांगले काम करता. पूर्वी फोटो काढून आणून दाखवले होते. ग्राऊंड बांधले आहे, त्याखाली हॉल आहे. ग्राऊंडवरचे साहित्य हॉलमध्ये ठेवावे. चांगल्या गोष्टींसाठी उपयोग झाला पाहीजे. शहरात महापालिकेची एवढी क्रिडांगणे आहेत, त्यांना सिक्युरिटी आहे का. जसे मा.आर.एस. कुमार यांनी सांगितले की, मदनलाल धिंग्रा स्टेडीयमवर जेवढे मोठे ग्राऊंड आहे, या ५/६ एकरच्या प्लेग्राऊंडवरून माती उधळली जाते. याचा बंदोबस्त कसा करावा हे एकाही टेक्निशियनला माहित असावे असे वाटत नाही. स्टेडियमच्या आजूबाजूला २७ सोसायट्या आहेत. त्यांची तक्रार आली आहे. नागरीकांच्या तक्रारीची दखल तुम्ही लवकर घेतली पाहीजे. नागरीकांनी तक्रारींत म्हटले आहे, दररोज ग्राऊंडवरील लाल माती श्वास घेताना श्वसनातून नाकात घेत असतो. त्याचे काही केले का. ग्राऊंडवर पाणी कुठून येणार, बोअरमधून मारले पाहीजे. रोलर फिरवला पाहीजे. महापालिकेच्या व्यायामशाळा चालविताना बचत गटांना रु.२,०००/- महिन्याला मानधन दिले जाते. खाजगी व्यायामशाळांचा दर्जा व महापालिकेच्या व्यायामशाळांचा दर्जा बघा. बचतगटांना रु.२,०००/- दिलेतर त्याचे लाईट बील रु.४०,०००/-, पाणीपट्टी इ. वसूल

करतो. म्हणजे एखाद्या संस्थेने व्यायामशाळा फुकट चालवाव्यात अशी महापालिकेची अपेक्षा आहे. आपल्या व्यायामशाळांत नेमके काय चालते. पत्ते खेळले जातात. गैरव्यवहार चालले जातात. मग तुम्ही कर का घेता. अशा कितीतरी व्यायामशाळा आहेत, ज्या बंद पडण्याच्या स्थितीत आहेत. ग्राऊंड बंद पडण्याच्या स्थितीत आहेत. कुठेही जागा नाही, ट्रॅक नाही. नागरीकांसाठी तुम्ही एवढी कामे करता. मग शहरात मोठ्या प्रमाणावरचे असे एखादे तरी क्रिडींगण असले पाहीजे. नागरीकांना खेळाच्या दृष्टीकोणातून स्केटींग, फूटबॉल, सायकलवर व्यायाम करायचा असेल तर त्यासाठी मोठे ग्राऊंड उपलब्ध व्हायला पाहीजे. जेव्हा होते त्यावेळी मगर स्टेडीयमची परिस्थिती काय झाली आहे. मी फोटो काढून दाखवले आहेत. आमची कामे कुठे होत नाहीत. सगळी कामे करणारी मंडळी आहेत. यातून काय निष्पन्न झाले. जैसे तैसे परिस्थिती आहे. खेळाडूंना टॉयलेटला जाता येत नाही. बाथरुम स्वच्छ अवस्थेत नाही. त्याला टेंडर नाही. आम्हाला सुद्धा वाटते, सगळेच श्रीकर परदेशी व्हावेत. पण अशी परिस्थिती आहे का. खेळाडू निर्माण होऊ शकत नाही. कारण खेळाडूला ग्राऊंड नाही. योजना कागदावरच राहते. मंगलाताईंचा वॉर्ड मॉडेल वॉर्ड केव्हा होईल. माझ्या वॉर्डात सायकल ट्रॅक करुन नेमके काय झाले. त्याची अंमलबजावणी कुठे झाली नाही. ग्राऊंडबाबतीत तशीच परिस्थिती आहे. सगळ्या सदस्यांनी धोरण राबवायचे. ग्राऊंडबाबत नेमके काय होते. माती टाकली जाते. दुस-या दिवशी १,००० रुपये भाड्याने ग्राऊंड दिले जाते. हे मी पाच/सहा वेळा बोलले आहे. ग्राऊंड कोणालाही भाड्याने मिळू नये, भाड्याने देण्यासाठी परमिशन मिळू नये,. ज्या-ज्या गोष्टीसाठी ते ग्राऊंड केले आहे त्याचसाठी त्याचा उपयोग करण्यात यावा. खरेतर कोंडे साहेबांची यावेळी आठवण येते. ते ज्यावेळी अतिरिक्त आयुक्त म्हणून या महापालिकेत होते, शहरातील खेळाडूंना खरोखरच न्याय मिळत होता. धनराज पिल्ले, शामराव देवांग यांनी सांगितले, पिंपरी चिंचवडमध्ये आम्हाला सन्मानाची वागणूक मिळत नाही. काम करायला उत्साह वाटत नाही. तेव्हा कोंडे साहेब म्हणाले, नेमके काय करायचे. महापौरांना सांगायचे, इथे महापौर चषक घेतला गेला पाहीजे. महापौर चषक दरवर्षी घेतला जातो. आपले अधिकारी तो कितपत मनावर घेतात. लोकांपर्यंत जातच नाही. स्पर्धा बघायला १० लोक सुद्धा नसतात. फक्त ज्यांनी घेतला त्यांना वाटते, माझ्या वॉर्डात कार्यक्रम घेतला. अधिकारी याची पुस्ती करतात का. महापौरांचे नाव वापरू नका. कमीत कमी एक लाख लोक कार्यक्रम बघायला आले पाहीजेत. जो चांगले काम करतो, त्यांना तिथे का घेत नाहीत. तिथे जो दर्जा असला पाहीजे, तो नसतो असे म्हणून चालणार नाही. ज्या ज्या गोष्टी करायच्या आहेत, त्या फक्त कागदावर असू नयेत. त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे केली पाहीजे. क्रिडा धोरण करताना खरोखरच आनंद होतो. निश्चितपणे सदस्य म्हणत असतात, नागरीकांसाठी जितके जास्त देता येईल तेवढे देता यावे. या दृष्टीकोणातून देण्याचा प्रयत्न करतो. बोटींग बाबतीत कोणी मजा करण्यासाठी बोटींग करायला जाणार

नाही. एक पॉईंट ठेवला तर, खेळाडू तयार होण्यासाठी, प्रॅक्टीस करण्यासाठी बोटींग दिले जाईल. आपल्याला करमणूक कर भरावा लागणार आहे. शासनाच्या पाटबंधारे खात्याने १ कोटी रुपये भरा असे सांगितले आहे. नदीमध्ये अनधिकृतपणे बोटींग चालूच आहे. पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नोटीस येईल की, १ कोटी भरा. हे ठेवले आहे. त्या माणसाला कटींग कसे ठेवले आहे. म्हणजे तिथे अनधिकृतपणे काम चालते. तिथे स्पर्धा भरणार आहेत. दमानिया मॅडम या उद्योगक्षेत्रातील इतके मोठे नाव असले तरी त्यांनी हॉकी स्पर्धा खूप मोठ्या प्रमाणात घेण्याचे काम केले आहे. विद्यार्थ्यांना फॉरेनला घेऊन जातात. प्रॅक्टीससाठी १ कोटी भरावे लागले तरी चालतील. हे पॉईंट निर्माण केले पाहीजेत. आज नुसती चर्चा न करता त्याची कागदावर अंमलबजावणी झाली पाहीजे. नगरसेवक पोटतिडकीने बोलतात. काही बोलतात, काही बोलत नाहीत. तरीसुद्धा त्यांच्या मनात हीच भावना आहे. शहरात चांगले स्पोर्टस् मन, चांगले कार्यकर्ते निर्माण झाले पाहीजेत. खेळलो तर शहर सुद्दढ होईल, तरच नागरीकांचे आरोग्य उत्तम असेल. या दृष्टीकोणातून विचार करावा. आपण जिम चालवणार, त्याचा स्टाफ, इन्फ्रास्ट्रक्टर, सिक्युरीटीसाठी खर्च होणार. खरेतर इतर संस्थांना इतके कमी लेखु नका. महिन्याला लाखो रुपये खर्च होतात. कमीत कमी रु.१०,०००/- मानधन द्या. क्रिडांगणे भाड्याने देऊ नका. विभागात काम करणारी शिक्षक मंडळी यांची एकदा परेड घ्या. ते खरेच खेळतात असे वाटते का. त्यांची काम करायची इच्छा आहे का. ते काम करु शकतात का खुलासा द्यावा. अन्यथा त्या-त्या खेळासाठी, त्या-त्या शिक्षकांना तिथे टाकावे अशी विनंती करते.

**मा.सुजाता पाडाळे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ४२१ | विषय क्रमांक - ३ |
| दिनांक - १८/०१/२०१४ | विभाग- मा.आयुक्त |

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/१/कावि/१४४५/२०१३, दि.०३/१०/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४९१६ दि.२६/११/२०१३

मा.क्रीडा समिती दिनांक ०३/१०/२०१३ ठराव क्रमांक ४६ व मा.विधी समिती दिनांक १२/११/२०१३ ठराव क्रमांक १० नुसार, प्रस्तावासोबत जोडणेत आलेल्या मनपा क्रीडा धोरण मसुद्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेस तसेच पान ३० विषय क्र. १ मधील अनुक्रमांक ८ मध्ये कै.प्रबोधनकार

ठाकरे क्रीडा संकुल ऐवजी नावात दुरुस्ती करुन कै.प्रबोधनकार केशव ठाकरे क्रीडा संकुल/स्केटींग ग्राऊंड यमुना नगर निगडी असा मजकूर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करण्यास मान्यता देणेस तसेच सलग तीन वर्षे राष्ट्रीय स्पर्धेत (शालेय किंवा संघटनेमार्फत) सहभागी होऊन प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूचा रोख रकमेसह पारितोषिक देऊन सन्मान करावा. भाग १ (ड) अनुक्रमणिका २ शिष्यवृत्ती – यामध्ये फक्त खुल्या वरिष्ठ खेळाडूंचा समावेश न करता सर्व वयोगटातील खेळाडूंचा समावेश करावा. तसेच विंटर ऑलिंपिक व एशियन विंटर चॅम्पियनशिप याचा समावेश व्हावा. भाग १ (ड) अनुक्रमणिका ३ आंतरराष्ट्रीय स्पर्धा आर्थिक सहाय्य – सर्व वयोगटातील खेळाडूंचा समावेश व्हावा तसेच महाराष्ट्राबाहेर होणा-या राष्ट्रीय स्पर्धांसाठी २५,०००/- पेक्षा अधिक खर्च असेल तर आर्थिक सहाय्य करावे. ४-१ भाग १ ई खेळाडू दत्तक योजना – स्केटिंग या खेळाची मुलांमध्ये असलेली क्रेझ पाहता रोलर स्केटिंग, आईस स्केटिंगचा समावेश व्हावा. ४-२ भाग १ इ – क्रीडा समिती – क्रीडा समिती नेमतांना धोरणाप्रमाणे एखाद्या खेळाचा अर्जून वा छत्रपती पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थी आपल्या शहरात नसेल तर उदयोन्मुख खेळाडूंचा विचार करता शहराबाहेरील पण आपल्या शहरात येऊन मार्गदर्शन (ट्रेनिंग) देणा-यांचा विचार केला जावा. भाग १ अनुक्रमणिका २ अटी नियम क्र. यामध्ये रोलर स्केटिंगचा समावेश करण्यात यावा.

पान १४ भाग १ ड – शिष्यवृत्ती अ.क्र.१ – म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती यामध्ये उप क्र.१० मधील "परंतु क्रीडा शिष्यवृत्ती अदा केली असल्यास ती वसूल केली जाईल." हा मजकूर वगळण्यात यावा.

पान क्र. १७, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभाग झालेल्या खुल्या वरिष्ठ खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणेबाबतचे धोरण यामध्ये अटी व नियम अ.क्र. ९- मध्ये, "विहित नमुन्यातील अर्जासाठी क्रीडा विभागाकडे शुल्क र.रु.१००/- भरणे आवश्यक आहे." हा मजकूर वगळून, "विहित नमुन्यातील अर्ज म.न.पा. संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन घेता येईल."

पान क्र.४० – जलतरण तलावाचे नियम – जलतरण तलावावरील सभासदांसाठी सूचना, यामध्ये अ.क्र. ३१ नंतर, सभासदांच्या जलतरण पासेसची मुदत, यानंतरचा मजकूर वगळून, "जलतरण तलावाचा तिमाही, सहामाही, वार्षिक पासधारक सभासदत्व कोणत्याही महिन्यात होता येईल. पासधारक होण्यासाठी एप्रिल, जुलै, ऑक्टोबर, जानेवारी या महिन्याची वाट पहावी लागणार नाही. असा मजकूर समाविष्ट करावा.

पान क्र.२० – भाग १ ई – १) खेळाडू दत्तक योजना – यामध्ये संघाला दत्तक घेणे इ. बाबींवर खर्च करण्यास मंजुरी दिली आहे. या मजकुरानंतर, "महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, परिपत्रक क्र. जी.ई.एन.१०९८/प्रा.क्र.-२१/९८/नवि-२४ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि. ९ मार्च १९९८ मध्ये, (दोन) महानगरपालिकांनी/नगरपालिकांनी आपल्या वार्षिक खर्चापैकी विशिष्ट टक्के (५) टक्के खर्च क्रीडा क्षेत्रासाठी करावा असे

बंधन असावे असे नमूद आहे. त्यानुसार म.न.पा.ने एकूण वार्षिक खर्चापैकी ५ टक्के खर्च क्रीडा क्षेत्रासाठी करण्यासाठी आवश्यक ती तरतूद करावी, यामधून सर्व प्रकारच्या क्रीडा सुविधा, विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा तसेच क्रीडा सुविधा, क्रीडा स्पर्धांवर होणारा सर्व प्रकारच्या खर्चाचा समावेश असावा,” हा मजकूर समाविष्ट करावा. २) अटी व नियम क्र.९ मध्ये, “ खेळाडू दत्तक योजनेत राष्ट्रीय स्तर क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना लाभ देण्याकरीता, “एक क्रीडा समिती” याऐवजी एक समिती नेमावी.” अशी दुरुस्ती करावी. ३) अटी व नियम क्र.९ मध्ये, क्रीडा समितीत खालील सदस्य नेमावेत यातील,“क्रीडा” शब्द वगळावा तसेच मा.सभापती, क्रीडा समिती व सदस्य याऐवजी “मा.सभापती, क्रीडा समिती अथवा १ सदस्य, क्रीडा समिती” असा मजकूर समाविष्ट करावा.

पान क्र. २५ – भाग – १ ग, अनुदाने – अ) टीप -१ मध्ये नियम क्र. ५ व ९ क्रमांक केले यामधील “क्रमांक केले” हा मजकूर वगळण्यात यावा.

**पान क्र.३० – भाग २ विविध क्रीडा सुविधा मध्ये**, “म.न.पा.च्या सर्व क्रीडा सुविधांसाठी, मा.आयुक्त यांचे मान्यतेने १ साप्ताहिक सुट्टी राहील. साप्ताहिक सुट्टी बदलण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील. क्रीडा सुविधांच्या दुरुस्ती कामासाठी अथवा म.न.पा.च्या विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा काळात नागरिकांना क्रीडा सुविधांचा लाभ घेता येणार नाही. याबाबत तशी सूचना संबंधित क्रीडा सुविधा ठिकाणी ३ दिवस अगोदर लावणे आवश्यक आहे.” असा मजकूर समाविष्ट करावा. तसेच “म.न.पा. क्रीडा सुविधा, भाडे कराराने चालविण्यास घेतल्यास अथवा सेवा शुल्क तत्वावर चालविण्यास घेतल्यास तेथील पाणी बिल, वीज बिल संबंधित चालविण्यास घेणारी संस्था भरेल. परंतु त्या मिळकतीचा कर म.न.पा. भरेल. क्रीडा सुविधा चालविण्यास घेतलेल्या संस्थेने सदर ठिकाणी नेमलेल्या कर्मचा-यास किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील. आवश्यक ते सर्व शासन कर त्या संबंधित संस्थेने भरणे बंधनकारक राहील तसेच भविष्य निर्वाह निधी कायद्यानुसार आवश्यक वाटल्यास त्या संबंधित कर्मचा-याचा भविष्य निर्वाह निधी संबंधित कार्यालयात जमा करुन तसा पूर्तता अहवाल म.न.पा. कडे सादर करणे बंधनकारक राहील.” असा मजकूर समाविष्ट करावा.

पान क्र.३१ – भाग- २ विविध क्रीडा सुविधा – नियम खालीलप्रमाणे राहतील यामध्ये अ.क्र. ७ मधील, “तसेच आरक्षण शुल्क परत केले जाईल.” हा मजकूर वगळण्यात यावा. तसेच अट क्र.१५ मध्ये बहुउद्देशीय मैदानाची, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी परवानगी फक्त रात्री १०.०० पर्यंतच दिली जाईल हा मजकूर समाविष्ट करावा.

पान क्र.३५ – ५) हॉकी पॉलीग्रास मैदान मधील अ.क्र. ५,६ नजरचुकीने दिले गेले आहेत ते फक्त आकडे वगळण्यात यावे.

पान क्र. ४१ – उन्हाळी शिबिरासाठी म.न.पा. जलतरण तलाव भाड्याने देणेबाबतच्या अटी मधील अ.क्र. ११, “मतिमंद, अपंग मुकबधीर व अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांना पोहोण्याच्या सरावासाठी तलाव सवलती दरात उपलब्ध करुन देण्यात येईल. हा मजकूर वगळून, “अपंग विद्यालयातील विद्यार्थ्यांना/नागरिकांना पोहोण्याच्या सरावासाठी तलावावर विनामूल्य प्रवेश दिला जाईल. परंतु अशा अपंग विद्यार्थी / नागरिकाकडे ४० टक्के अपंगत्वाचे सक्षम वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. याकामी त्यांनी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. विद्यालयामार्फत एकत्रित विद्यार्थी पोहोण्याच्या सरावासाठी येण्यापूर्वी रीतसर अर्ज देऊन परवानगी घेऊन विद्यार्थ्यांना पोहोण्याच्या सरावासाठी आणणे आवश्यक आहे. त्यांची सर्व प्रकारची जबाबदारी संबंधित विद्यालयाची राहील. असा मजकूर समाविष्ट करावा.

पान क्र. ६० – भाग ४ – विविध क्रीडा सुविधा दरपत्रक – १) बहुउद्देशीय मैदान – उप क्र. ४ -“**भोसरी तळ्यात जवळील मैदान भोसरी** याऐवजी “भोसरी तळे मैदान भोसरी” अशी दुरुस्ती करावी.

पान क्र. ६६-भाग-४- विविध क्रीडा सुविधा दरपत्रक – क्र.१३ मध्ये “म.न.पा. विविध क्रीडा सुविधांचे शुल्क, दर ३ वर्षांनी सक्षम समितीची मान्यता घेऊन, गतवर्षीच्या दरात १० टक्के दर वाढ करण्यात येईल.” असा मजकूर समाविष्ट करावा.

पान क्र.२१ भाग -१- ई- खेळाडू दत्तक योजना – मध्ये अटी व नियम यामध्ये, “ अट क्र.२३ वगळून, खेळाडू दत्तक योजनासाठी, महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे तर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या SSC बोर्ड, CBSC BOARD, अंध व अपंग शालेय विद्यार्थी तसेच इंटर युनिवर्सिटी, आंतर विद्यापीठ (राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेले खेळाडू तसेच राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा नॅशनल स्कूल गेम/स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंनाच लाभ घेता येईल. फेडरेशनमार्फत घेतलेल्या राज्य/राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना याचा लाभ घेता येणार नाही. असा मजकूर समाविष्ट करावा.

**पान क्र.६६ भाग -४ विविध क्रीडा सुविधा दरपत्रक** मध्ये खालील प्रमाणे प्रशिक्षण दर समाविष्ट करावे.

| अ. क्र. | क्रीडा सुविधेचे नाव | प्रशिक्षणासाठी प्रति दिन ताशी दर र.रु | शेरा |
|---|---|---|---|
| १ | संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल येथील एथलेटीक्स मैदान | र.रु ५०० /- | नागरिकांसाठी सरावाच्या वेळा व मार्गदर्शकांसाठी प्रशिक्षणा साठी वेळा निश्चित करण्याचे अधिकार मा. |
| २ | स्क्वाश कोर्ट | र.रु ५००/- | |
| ३ | टेबल टेनिस सेंटर | र.रु.५००/- | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | स्केटिंग ग्राउंड | र.रु.५००/- | आयुक्त यांना राहील .सराव वेळेत प्रशिक्षण देता येणार नाही. तसेच राज्य व राष्ट्रीय खेळाडूंना सरावासाठी आरक्षणाच्या वेळा राखून ठेवण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहील |
| ५ | लॉंन टेनिस कोर्ट | र.रु.५००/- | |
| ६ | बॅडमिंटन कोर्ट | र.रु ५००/- | |

तरी पान क्र.६६ भाग -४ विविध क्रीडा सुविधा दरपत्रक मध्ये वरील प्रमाणे प्रशिक्षण दर समाविष्ट करावे.

**पान क्र.५३ भाग-२ म.न.पा. व्यायाम शाळा मध्ये अटी व नियम यामध्ये, "अट क्र.२३**, "व्यायाम शाळेच्या इमारतीतील पारंपारिक आखाडे व्यायाम शाळेमध्ये समाविष्ट करावे. सदर व्यायाम शाळा सेवा शुल्कावर देताना त्या सोबत आखाडेही चालविण्यास दिले जातील.

अट क्र.२४ –व्यायाम शाळेस साप्ताहिक सुट्टया व शासकीय सुट्टया म.न.पा कर्मच्या-या प्रमाणे देय राहील.

अट क्र.२५ –म.न.पा.अधिकारी,कर्मचारी, सदस्य यांना कोणतीही क्रीडा सुविधा (व्यायाम शाळा सभासदत्व) मोफत दिली जाणार नाही त्यांनाही क्रीडा सुविधांची नियमानुसार फी भरणे बंधनकारक राहील", या अटींचा समावेश करावा.

**पान क्र.६ भाग -१-ब -,२ विभाग ,राज्य,राष्ट्रीय स्तर शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना स्पर्धासाठी पाठविणे –उद्दिष्टे क्र.२** मध्ये, खेळाडूस प्रतिदिन दैनिक (भोजन) भत्ता र.रु.२००/- व त्याचे समवेत जाणा-या क्रीडा शिक्षक/मार्गदर्शक/प्रशिक्षक यांना प्रतिदिन दैनिक (भोजन)भत्ता र.रु.२००/- देय्य राहील. यामध्ये बदल करण्याचे अधिकार सक्षम समितीस राहील. या मजकुराचा समावेश करावा.

पान क्र. २१ , भाग -१-ई -,**खेळाडू दत्तक योजना – अटी व नियम-क्र.२५** मध्ये खेळाडू दत्तक योजने अंतर्गत खेळाडूंना बाहेरील विविध क्रीडा स्पर्धे साठी पाठविण्यात येईल.त्यांच्या सोबत १ क्रीडा शिक्षक/मार्गदर्शक/प्रशिक्षक पाठविला जाईल त्यांना विभाग,राज्य,राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना /तसेच क्रीडा शिक्षक/मार्गदर्शक/प्रशिक्षक यांना ज्या प्रमाणे प्रवास भत्ता दिला जातो त्याप्रमाणे प्रवास भत्ता देय्य राहील. तसेच दैनिक भत्ताही त्याप्रमाणेच देय्य राहील.

**अटी व नियम-क्र.२६** मध्ये ,खेळाडू दत्तक योजने अंतर्गत लाभ घेणा-या खेळाडूंना सर्व प्रकारच्या क्रीडा सुविधा उदा. आहार भत्ता,क्रीडा गणवेश,पी.एम.पी.एम.एल. बस पास या दिल्या जाणार असल्यामुळे त्यांना येथून पुढे ,शालेय क्रीडा शिष्यवृत्तीचा लाभ देता येणार नाही. या मजकुराचा समावेश करावा.

**पान क्र.६२, भाग -४ –विविध क्रीडा सुविधा दरपत्रक मध्ये,क्र.४-**श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणी नगर भोसरी या मजकुरानंतर, "येथील एथलेटीक्स मैदान " हा मजकूर समाविष्ट करावा. तसेच "आरक्षणाचा दीड तास १ ब्याचचे" हा मजकूर वगळून "तपशिल" हा मजकूर समाविष्ट करावा. तसेच सदर तक्त्यातील रकाना क्र. ३,४ मध्ये स्पर्धेसाठी या मजकुरानंतर, " सरावासाठी " हा मजकूर समाविष्ट करावा.

पान क्र. ५७, भाग क्र.३ प्रशासकीय अनु क्र. १ क्रीडा पर्यवेक्षक अटी नियम शर्ती अ.क्र.१ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लोकसंख्येत झालेली वाढ लक्षात घेऊन नागरीकांना मुलभूत सुविधा देण्याची कामकाज पद्धती सुलक्ष व्हावी, यासाठी महापालिकेने सहा प्रभागांची निर्मिती केली आहे. परंतु, या प्रभाग प्रशासन व्यवस्थापनेमध्ये क्रीडा बाबत विचार होणे आवश्यक आहे. प्रभागात मैदाने, व्यायामशाळा, जलतरण तलाव, बॅडमिंटन हॉल, लॉन टेनिस व क्रीडा आरक्षणे इ. सुविधा विचारात घेता नागरीकांना व खेळाडूंना प्रभागांतर्गत क्रीडा सुविधा देण्यासाठी प्रत्येक प्रभागात एक क्रीडा अधिकारी याप्रमाणे सहा प्रभागात सहा क्रीडा अधिकारी, क्रीडा पर्यवेक्षकांमधुन सेवाज्येष्ठतेनुसार नियुक्ती देण्यात यावी, असा मजकुर समाविष्ट करणेत यावा.

पिं.चिं. म.न.पा.च्या क्रीडा धोरणात साहसी खेळांसंदर्भात खालीलप्रमाणे बदल असावेत.

**मुद्दा क्र.१**

आपण आपल्या क्रीडा धोरणामध्ये पान क्रमांक २२ वर ६ क्लाईंबिंग वॉल उभारण्यात येतील असे म्हटले आहे. परंतु आपण आपल्या क्रीडा धोरणामध्ये १० किंवा अधिक क्रीडा केंद्र उभारण्याचे योजले आहे. या दोन्ही बाबी विचारात घेता पान क्रमांक २२ वरील मसुद्यात आपण ६ ऐवजी प्रत्येक क्रीडा केंद्रात एक क्लाईंबिंग वॉल उभारण्यात यावी असा बदल करावा.

**मुद्दा क्र.२**

क्रीडा धोरणातील परिशिष्ट "ह" मधील भाग क्र.२ मध्ये (पान क्रमांक ३६ ते ३८) क्लाईंबिंग वॉल (गिर्यारोहण भिंत) भाडेकराराने चालविण्यास देणेबाबतच्या अटी शर्तीनुसार कोणतीही संस्था सदर क्लाईंबिंग वॉल (गिर्यारोहण भिंत) चालविण्यास तयार नाही असे निदर्शनास आले आहे.

सदर क्रीडा धोरणातून क्लाईंबिंग वॉल (गिर्यारोहण भिंत) भाडेकराराने चालविण्यास देणेबाबतच्या अटी शर्ती वगळण्यात याव्यात व सदर क्लाईंबिंग वॉल (गिर्यारोहण भिंत), स्पोर्ट क्लाईंबिंग या खेळातील अनुभवी अशा संस्थेला सेवाशुल्क देऊन कमीत कमी ५ ते १० वर्षासाठी चालविण्यात देण्यात यावी.

**मुद्दा क्र.३**

क्रीडा धोरणातील परिशिष्ट “ह” मधील भाग क्र.४ मध्ये (पान क्रमांक ६३) वर क्लाईबिंग वॉल (गिर्यारोहण भिंत) साठीचे दरपत्रक दिले आहे. सदर दरपत्रक पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | क्रीडा सुविधा तपशील | जुने दर र.रु. | प्रस्तावित दर र.रु. | अनामत र.रु. |
|---|---|---|---|---|
| ५ | म.न.पा. गिर्यारोहण भिंत सभासद फी | ----- | ५०० | ५०० |

सदर प्रस्तावित दरपत्रकामध्ये पुढीलप्रमाणे दर असावेत.

| अ. क्र. | क्रीडा सुविधा तपशील | प्रस्तावित दर रजि. (Registration for life time) फी. र.रु. | प्रस्तावित दर प्रती तास र.रु. | प्रस्तावित दर प्रती महा र.रु. | प्रस्तावित दर प्रती साल र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| ५ | म.न.पा. गिर्यारोहण भिंत सभासद फी | १०० | १०० | १००० | ९००० |

सदर प्रस्तावित दरपत्रकापेक्षा जास्त रक्कम या ठिकाणी आकारता येणार नाही. परंतु जर या ठिकाणी सदर प्रस्तावित दरपत्रकापेक्षा कमी रक्कम आकारायची असेल तर सदर क्लाईबिंग वॉल चालविणा-या संस्थेस त्याचे हक्क राहतील.

**मुद्दा क्र.४**

ऍडव्हेंटर स्पोर्टस् ही काळाची गरज आहे. साहसी क्रीडा प्रकारांमुळे नेतृत्व गुणांचा विकास, धैर्य, चिकाटी, कल्पकता, साहसीवृत्ती, निसर्गाशी एकरुपता, सकारात्मकता, सांघिक भावना रुजणे इ. बाबींचा विकास होतो. आपत्कालिन प्रशिक्षणात व सेवेत देखील ऍडव्हेंचर स्पोर्टसचा मोलाचा वाटा आहे या दृष्टीकोणातून महाराष्ट्र शासनाने देखील नविन धोरणानुसार ऍडव्हेंचर स्पोर्टस् ला विशेष प्राधान्याने विचारात घेतलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या या धोरणाशी सुसंगत असे धोरण पिं.चिं. मनपाने राबविण्याचे ठरविले आहे. यासाठी ऍडव्हेंचर स्पोर्टस् ला विशेष प्राधान्याने विचारात घेऊन क्रीडासाठी खर्च करण्यात येणा-या एकूण रकमेच्या दहा टक्के रक्कम सर्व ऍडव्हेंचर स्पोर्टस् साठी खर्च करण्यात यावी.

क्रीडा धोरणातील परिशिष्ट क मधील २ ड (पान क्र.३५-३६) प्रमाणे म.न.पा. रायफल शुटींग केंद्र प्रवेशासाठी नियम व अटी दिलेल्या आहेत.

पिंपरी चिंचवडमधील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी सदर केंद्राच्या नियम व अटींमध्ये खालीलप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे.

१. सदर केंद्राची वेळ ही सकाळी ८ ते रात्री ८ असावी.

२. रायफल शुटींग केंद्रामध्ये खालील अत्याधुनिक साहित्य पुरविण्यात यावे.

- Automatic Pulley
- Imported Pistol
- Imported Rifle
- Imported Pellets
- Rifle Shooting Kit, Stand
- Target, Air Compressor
- Etc.

३. या केंद्रात सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात यावी.

४. सदर रायफल शुटींग केंद्र चांगल्या पद्धतीने चालावे यासाठी पिंपरी चिंचवडमधील एखाद्या अनुभवी संस्थेला सेवा शुल्क देऊन सदर केंद्र चालवावे.

१) पान क्र. ७, भाग-१ ब, अ.क्र.५ महापौर चषक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे, अटी, नियम, शास्ती अ.क्र. ९, उप. क्र. २ मध्ये, "महापौर चषक राज्यस्तर क्रीडा स्पर्धा आयोजित करावयाची झाल्यास, महाराष्ट्र राज्य संबंधित क्रीडा संघटना ही, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असणे बंधनकारक आहे. तसेच महापौर चषक जिल्हास्तर क्रीडा स्पर्धा आयोजित करावयाची झाल्यास, पुणे जिल्हा संबंधित क्रीडा संघटना ही त्या महाराष्ट्र राज्य संबंधित क्रीडा संघटनेशी संलग्न असणे आवश्यक आहे व सदर राज्य क्रीडा संघटना महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असणे आवश्यक आहे" असा मजकूर समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/८१२/२०१३, दि.२१/०६/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.३७ दि.०६/०९/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४०१ दि.२१/११/२०१३

डॉ.के.अनिल रॉय, वैद्यकीय अधिकारी यांना र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० या वेतनश्रेणीमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, हा विषय तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.रामदास बोकड –** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, डॉ.के.अनिल रॉय, वैद्यकीय अधिकारी यांना पदोन्नतीने नेमणूक देण्याचा विषय आला आहे. या विषयाच्या अनुषगांने काही गोष्टी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, पहिला प्रश्न अनधिकृत बांधकामाचा आहे. या डॉक्टरांनी चिखली गावात अनधिकृत बांधकाम केले होते. त्या माध्यमातून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे. दि. ५/९/२०१३ रोजी गुन्हा दाखल झाला असताना त्यांना पदोन्नती देत असालतर हा विषय योग्य वाटत नाही. आमच्या भागात अनेक लोकांवर गुन्हे दाखल केलेले आहेत, त्यावेळी काही लोकांनी बांधकाम काढले. काही लोकांवर गुन्हा दाखल झाला त्यांना बांधकाम काढले म्हणून हा विषय मांडला असे समजते. त्यांनी बांधकाम काढले असेल तर त्यांच्यावर नोंदवलेला गुन्हा काढणार होतो का. एकाला एक न्याय, एकाला एक न्याय. सर्वसामान्य नागरीकांवर गुन्हा दाखल झाला असेल तर त्याला शेवटपर्यंत कोर्टात चकरा मारायला लावत असाल तर ते योग्य नाही. डि.पी.एच. संदर्भात सांगतो, डी.पी.एच. ची परीक्षा देत असताना डॉ.रॉय यांनी पिंपरी चिंचवड मनपाच्या वैद्यकीय अधिकारी पदावर काम करत असताना जो दोन वर्षांचा कालावधी होता, त्या कालावधीत पिंपरी चिंचवड मनपात सुद्धा ९ ते ५ या वेळात काम केले होते. त्यांची डि.पी.एच. करण्यासाठी डी.वाय. पाटील इथे सुद्धा १० ते ६ या वेळात ९७ टक्के हजेरी लावली आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या माध्यमातून त्यांनी महापालिकेचा पगार घेतलेला आहे. पगार घेत असताना तिकडे डी.पी.एच. ची परीक्षा सुद्धा दिलेली आहे. एकिकडे डी.पी.एच. परीक्षेसाठी ९७ टक्के हजेरी लावलेली असताना, एकिकडे पालिकेचा पगार सुद्धा घेतला असेल ही गोष्ट माझ्या पचनी न पडण्याइतकी आहे. हा विषय आपल्यासमोर येतो आहे तो योग्य वाटत नाही. आपला ठराव असताना कोर्टाचा निर्णय आला आहे, डि.पी.एच. परीक्षा पूर्ण झाल्यानंतर त्यांना वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देणार होतो. या पदासाठी ५ वर्षांचा अनुभव लागतो. डॉ.अय्यर यांना अनुभव नसताना त्यांनी पदोन्नतीचा विषय आणला होता. डॉ.अय्यर यांना महापालिकेच्या मुख्य कार्यालयात असताना १९८० मधे

त्यावेळचे चीफ ऑडीटर यांना औषध खरेदीबाबत जो चौकशी अहवाल दिला होता. डॉ.अय्यर यांना त्यांच्या कालावधीत अनावश्यक औषध खरेदी करुन महापालिकेचे नुकसान केले म्हणून वैयक्तिक जबाबदार धरले आहे. पुरावे नष्ट करण्याबाबत त्यांना आम्ही महापालिका सभेत जाब विचारु म्हणून तडकाफडकी छोट्या दवाखान्यांत औषधे शिफ्ट केली होती. त्यांनी त्यांच्या पदावर १० वर्षे कालावधी पूर्ण केला. त्यावेळी डॉ. अय्यर यांना १०/- रुपये दंड झाला होता. कोर्टाचा सुद्धा निर्णय आहे. डी.पी.एच. परीक्षे बरोबर ५ वर्षांचा अनुभव असल्याशिवाय पदोन्नती देता येत नाही. हा कोर्टाचा निर्णय आहे. तिसरी गोष्ट म्हणजे, गेल्या वर्षी १३ डिसेंबरला पुढारी वर्तमानपत्राच्या माध्यमातून एक विषय आला होता. त्यात पिंपरी चिंचवड महापालिकेत इंजेक्शन्स् तालेरा हॉस्पीटल इथे सापडली होती. अनागोंदी कारभार चालला आहे. हे सर्व होत असताना डॉक्टर ज्या पदावर आहेत त्यांचे लक्ष आहे का नाही. औषध खरेदी विक्रीत भ्रष्टाचार चालला आहे का. हे आपल्यासमोर आणून दिले आहे. हे आपल्यासमोर सादर करतोय. महापालिकेची इंजेक्शन असतील तर यात कळाले आहे का. साही यांना आपण जाब विचारला होता. लेखनिकाला सस्पेण्ड केले आहे. चोर सोडून संन्याशाला फाशी. आपल्या भागात औषधे विकायचे काम तो एकटा साही करु शकतो का. मुख्य सुत्रधार सुटले आहेत. गरीबाला सजा द्यायचे काम झाले आहे. मी आपल्याला जाहीर विनंती करतो की, जो पदोन्नतीचा विषय आला आहे, तो मागे घ्यावा. हा विषय परत पुढे येणार नाही. डॉक्टरांवर गुन्हे दाखल आहेत. त्यांनी जी भाषा वापरली होती. आय.टी.आर. ऍक्ट च्या कलम ६६ ए, ६६ बी नुसार सजा होते. आपल्याकडे या माध्यमातून तक्रार केली होती. याची केस सुद्धा चालू आहे. हा विषय मागे घ्यावा. या पदोन्नतीला आमचा कायमस्वरुपी विरोध राहील.

**मा.महापौर** - विषय क्रमांक ४ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ४२२ विषय क्रमांक - ४
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/८१२/२०१३, दि.२१/०६/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.३७ दि.०६/०९/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४०१ दि.२१/११/२०१३

.

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सशअ/३१५/२०१३, दि.२७/०८/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३० दि.१२/११/२०१३

पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक आणि कला धोरण मा.महापौर, सन्माननीय पदाधिकारी, शहरातील विविध कला क्षेत्रातील कलावंत आणि सांस्कृतिक संस्था यांच्या कडून प्राप्त झालेल्या सुचना/अभिप्राय विचारात घेऊन तयार करण्यात आले आहे. प्रस्तावा सोबतचे परिशिष्ट अ, ब, क, ड, इ, प, व फ प्रपत्रामध्ये नमुद सांस्कृतिक आणि कला धोरणास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हे सांस्कृतिक धोरण मान्य करताना विविध संस्था व कलावंत यांना विचारात घेतले आहे. ज्या पद्धतीने खेळाडू तयार करतो, त्या पद्धतीने पिंपरी चिंचवड महापालिकेत कलावंत तयार करायचे काम करावे लागेल. सांस्कृतिक ऍकेडमीचा विचार करता संपूर्ण प्रभागांत एकतरी सांस्कृतिक ऍकेडमी व्हावी. मुंबई इथे कॉलेजस्तरीय विविध स्पर्धा घेतल्या जातात. तशा प्रकारच्या फोकल डान्स, सोलो डान्स, वक्तृत्व स्पर्धा असेल कॉलेज विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाव्यात. कलावंत तयार करणे महत्वाचे आहे. क्रिडा क्षेत्रात केले त्या पद्धतीने कलावंत दत्तक घेऊन या पद्धतीने पिंपरी चिंचवड महापालिकेत सांस्कृतिक धोरणाची सुरुवात करावी. आपण स्वरसागरसारखे बरेचसे कार्यक्रम करतो. पुणे महापालिकेत वसंत उत्सव चालू आहे. असे अनेक कार्यक्रम देणे महापालिकेचे कर्तव्य आहे. हे करणे महत्वाचे आहे. आज ज्या पद्धतीने एखादी संस्था, विविध देशांबरोबर मैत्री करार केला आहे. मुंबई महापालिकेत कलावंतांची देवाणघेवाण, दळणवळणाचे काम करतो, हे आपण सुद्धा करावे. सदर ठरावाला उपसूचना देते – पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल पिंपरी चिंचवड शहरातही आयोजित करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.भारती फरांदे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४२३ विषय क्रमांक - ५
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सशअ/३१५/२०१३, दि.२७/०८/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३० दि.१२/११/२०१३

पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक आणि कला धोरण मा.महापौर, सन्माननीय पदाधिकारी, शहरातील विविध कला क्षेत्रातील कलावंत आणि सांस्कृतिक संस्था यांच्या कडून प्राप्त झालेल्या सुचना / अभिप्राय विचारात घेऊन तयार करण्यात आले आहे. प्रस्तावासोबतचे परिशिष्ट अ, ब, क, ड, इ, प, व फ प्रपत्रामध्ये नमुद सांस्कृतिक आणि कला धोरणास तसेच पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल पिंपरी चिंचवड शहरातही आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/१/कावि/३४८/२०१३, दि.०३/०९/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३१ दि.१२/११/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २०१३ प्रस्तावासोबत नमुद केलेप्रमाणे (प्रारुप) तयार करणेत आलेली आहे त्यास तसेच मनपा मिळकत वाटप नियमावली २०१३ मधील भाग-५ मध्ये मिळकत विनियोगाचा प्राधान्यक्रम ठरविणेत आला आहे. तथापि सदर नमुद १ ते ७ प्राधान्य वर्गासाठी जाहिर निविदेद्वारे काही वर्गासाठी निविदा प्राप्त न झालेस किंवा कमी संख्येत प्राप्त झाल्यास इतर आरक्षीत वर्गासाठी त्या मिळकती वाटप करणेचे अधिकार मा.महापालिका सभेला असतील.

यामध्ये ज्या आरक्षीत वर्गासाठी शासन निर्णय / आदेश असतील त्याला बाधा न येता मा.महापालिका सभेस निर्णय घेता येतील यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमीम पठाण** – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ६ तहकूब करणेत यावा.

**मा.आशा सूर्यवंशी** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - विषय क्रमांक ६ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ४२४ विषय क्रमांक - ६
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/१/कावि/३४८/२०१३, दि.०३/०९/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३१ दि.१२/११/२०१३

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नगररचना/१७/२७९/२०१३, दि.०८/१०/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३५ दि.१२/११/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आरक्षणे तसेच निळी, लाल पुररेषा व नदीचे सर्वेक्षण करणे कामाच्या रक्कम रुपये २.५५ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, पिंपरी चिंचवड मनपाचा जूना व नविन मंजूर विकास आराखडयातील सर्व आरक्षणे तसेच सर्व रस्ते, सर्व नद्यांबाजूची निळी व

लाल पुर रेषा सर्वेक्षण करणे व अनुषंगीक कामे करणेच्या कामास र.रु.४,००,००,०००/- (अक्षरी र.रु.चार कोटी) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.सुनिता वाघेरे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - विषय क्रमांक ७ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -४२५ विषय क्रमांक - ७
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नगररचना/१७/२७९/२०१३, दि.०८/१०/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३५ दि.१२/११/२०१३

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.-

------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४२६ विषय क्रमांक - ८
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/बप्र/०२/कावि/८५/२०१३, दि.१४/१०/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३९ दि.१२/११/२०१३

ब प्रभाग कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.२१ मधील परिसरातील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे (पान क्र.१८१ अ.क्र.८८) असे आहे. सदर कामास अंदाजपत्रक सन २०१३-१४ मध्ये २ लाख एवढी तरतूद असून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४ लाख एवढी

आहे. सदर कामास मा.स्थायी समिती मध्ये वाढीव तरतूद र.रु.६४,००,०००/- ठराव क्र.४१८८ दिनांक २४/०९/२०१३ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. सदर कामास अंदाजपत्रकीय रक्कम कमी पडत असल्याने र.रु.९९,००,०००/-चे खर्चास नव्याने प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४२७ विषय क्रमांक - ९

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था.प्रकल्प/जा/कावि/ २८०/२०१३, दि.०५/१०/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१४२ दि.१२/११/२०१३

मुंबई-पुणे रस्ता पिंपरी चौक ते निगडी डांबरीकरण, देखभाल व दुरुस्ती करणेकामी येणा-या र.रु.१,४९,५८,३००/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणपन्नास लाख अठ्ठावन्न हजार तिनशे फक्त) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४२८ विषय क्रमांक - १०

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था.प्रकल्प/जा/कावि/२७९/२०१३, दि.०५/१०/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१४३ दि.१२/११/२०१३

मुंबई-पुणे रस्ता दापोडी ते पिंपरी चौक डांबरीकरण, देखभाल व दुरुस्ती करणेकामी येणा-या र.रु.१,४९,७६,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणपन्नास लाख शहात्तर हजार फक्त) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**-------**

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ११

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. प्रशा/१/कावि/१३८६/२०१३, दि.१८/१०/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१६२ दि.९/१२/२०१३

पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व उप अभियंता (स्थापत्य) पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कालावधी इत्यादी सेवाविषयक तपशील पडताळून तसेच श्री.संजय कांबळे, उपअभियंता यांना आदेश क्र.आ.कक्ष/कावि/१०३/१३, दि.६ एप्रिल २०१३ अन्वये केलेली शास्ती विचारात घेऊन खालीलप्रमाणे नमुद उपअभियंता(स्थापत्य) पदावरील अधिका-यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावर पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: एक वर्ष कालावधीकरीता पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देणेत येत आहे

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | शैक्षणिक पात्रता | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. कन्हेरे बिमलरॉय रामराव | डी.सी.ई. | खुला |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्री. कांबळे संजय दिनकर | डी.सी.ई. | खुला (अनु.जाती) |

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब सदर ठरावाला उपसूचना देतो -

उपअभियंता पदावरील खालील पदविकाधारक उमेदवारांची १७ वर्षे इतकी प्रदिर्घ सेवा झाली असल्याने त्यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १) फारुक शेख | २) विलास जगताप | ३)सुधीर रत्नपारखी | ४)जीवन गायकवाड |
| ५) प्रदिप पुजारी | ६) संजय भोसले | ७) विशाल कांबळे | ८) संजय घुबे |
| ९) प्रशांत पाटील | | | |

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पाडाळे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४२९ विषय क्रमांक - ११
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. प्रशा/१/कावि/१३८६/२०१३, दि.१८/१०/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१६२ दि.९/१२/२०१३

पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व उप अभियंता (स्थापत्य) पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कालावधी इत्यादी सेवाविषयक तपशील पडताळून तसेच श्री.संजय कांबळे, उपअभियंता यांना आदेश क्र.आ.कक्ष/कावि/१०३/१३, दि.६ एप्रिल २०१३ अन्वये केलेली शास्ती विचारात घेऊन खालीलप्रमाणे नमुद उपअभियंता(स्थापत्य) पदावरील अधिका-यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावर पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: एक वर्ष कालावधीकरीता पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | शैक्षणिक पात्रता | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. कन्हेरे बिमलरॉय रामराव | डी.सी.ई. | खुला |
| २ | श्री. कांबळे संजय दिनकर | डी.सी.ई. | खुला (अनु.जाती) |

तसेच उपअभियंता पदावरील खालील पदविका धारक उमेदवारांची १७ वर्षे इतकी प्रदिर्घ सेवा झाली असल्याने त्यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) फारुक शेख | २) विलास जगताप | ३)सुधीर रत्नपारखी | ४)जीवन गायकवाड |
| ५) प्रदिप पुजारी | ६) संजय भोसले | ७) विशाल कांबळे | ८) संजय घुबे |
| ९) प्रशांत पाटील | | | |

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४३० विषय क्रमांक - १२

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. प्रशा/१/कावि/१४०६/२०१३, दि.२२/१०/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१६३ दि. ०९/१२/२०१३

पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व उप अभियंता (विद्युत) पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कालावधी इत्यादी सेवाविषयक तपशील पडताळून तसेच शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००५/प्र.क्र.२/१००५/१२,दि.२५/०२/२००५ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे नमुद उपअभियंता (विद्युत) पदावरील अधिका-यांना कार्यकारी अभियंता (विद्युत) पदावर पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: एक वर्ष कालावधी करीता पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | शैक्षणिक पात्रता | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. गलबले बाळासाहेब यशवंत | डी.सी.ई. | खुला |
| २ | श्री. घोडे प्रविण आण्णासाहेब | डी.सी.ई. | खुला (इ.मा.व.) |
| ३ | श्री. केदारी पांडूरंग साबा | डी.ई.ई. | अनु.जमाती |

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४३१ विषय क्रमांक - १३

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बप्र/वि/ड/कावि/२४९/२०१३, दि.१९/११/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१६४ दि. ०९/१२/२०१३

मुंबई पुणे रस्त्यावरील दापोडी ते फुगेवाडी सी.एम.ई. रस्ता रुंदीकरणातील रस्ता सुधारणा करणेच्या कामांतर्गत विद्युत विषयक कामासाठी येणा-या र.रु.८६,१८,५००/- (अक्षरी र.रु.शहाऐंशी लाख अठरा हजार पाचशे फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४३२ विषय क्रमांक - १४

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.बप्र/स्था/७/कावि/१६५/२०१३, दि.०५/१२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१६७ दि. ०९/१२/२०१३

मनपाचे ब प्रभागातील चिंचवड परिसरात वॉर्ड सेंटर बांधणे व १० कलमी कार्यक्रमासाठी आवश्यक कामे करणेकामी र.रु.५.०६ कोटीचे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४३३ विषय क्रमांक - १५

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.बप्र/स्था/५/जा/२५८/२०१३, दि.०५/१२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१६८ दि. ०९/१२/२०१३

पर्यटन विकास आराखडयांतर्गत मोरया गणपती मंदीर परिसर चापेकर स्मारक कामास र.रु.१२,२९,६६,९९२/- (अक्षरी र.रु.बारा कोटी एकोणतीस लाख सहासष्ट हजार नऊशे ब्याण्णव फक्त) इतकी सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४३४ विषय क्रमांक - १६

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/अमु/६१९/२०१३, दि.०५/१२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१६९ दि.०९/१२/२०१३

प्रभाग क्र.१७, से.क्र.२६ मध्ये नाटयगृह बांधणेकामी येणा-या र.रु.४१,७३,६२,५००/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस कोटी त्र्याहत्तर लाख बासष्ट हजार पाचशे फक्त) खर्चाचे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १७

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/कमु/१४०४/२०१३, दि.०५/१२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१७० दि. ०९/१२/२०१३

पुणे आळंदी रस्ता (च-होली फाटा) ते नियोजित पुलापर्यंत (इंद्रायणी नदी) विकास आराखडयातील रस्त्यावर सी.डी.वर्क्स बांधणे, विकसित करणेकामी येणा-या र.रु.३,७५,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन कोटी पंच्याहत्तर लाख फक्त) चे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.शांताराम भालेकर -** महापौर साहेब सदर ठरावाला उपसूचना देतो -

भोसरी नाशिक महामार्गावर शितलबाग येथे फुटओव्हर ब्रीज बांधणे (निविदा क्र. ८/१-२०१२/१३) निविदा र.रु.७१,०५,०८७/-अन्वये काम काढण्यात आलेले आहे. निविदा ड्रॉईंग प्रमाणे नियोजित असलेले फुट ओव्हर ब्रीजचे डिझाईन हे जुन्या पद्धतीचे आहे. ते डिझाईन अत्याधुनिक पद्धतीचे ६१.०० मी. रुंदीप्रमाणे तयार करुन त्यानुसार फुट ओव्हर ब्रीज बांधणेसाठी र.रु.६,००,००,०००/- (अक्षरी सहा कोटी फक्त) खर्च अपेक्षित आहे. तरी सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.उल्हास शेटटी** - महापौर साहेब, सदर उपसुचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पाडाळे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४३५ विषय क्रमांक - १७
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/कमु/१४०४/२०१३, दि.०५/१२/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१७० दि. ०९/१२/२०१३

पुणे आळंदी रस्ता (च-होली फाटा) ते नियोजित पुलापर्यंत (इंद्रायणी नदी) विकास आराखडयातील रस्त्यावर सी.डी.वर्क्स बांधणे, विकसित करणेकामी येणा-या र.रु.३,७५,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन कोटी पंच्याहत्तर लाख फक्त) चे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस तसेच भोसरी नाशिक महामार्गावर शितलबाग येथे फुटओव्हर ब्रीज बांधणे (निविदा क्र. ८/१-२०१२/१३) निविदा र.रु.७१,०५,०८७/-अन्वये काम काढण्यात आलेले आहे. निविदा ड्रॉईंग प्रमाणे नियोजित असलेले फुट ओव्हर ब्रीजचे डिझाईन हे जुन्या पद्धतीचे आहे. ते डिझाईन अत्याधुनिक पद्धतीचे ६१.०० मी. रुंदीप्रमाणे तयार करुन त्यानुसार फुट ओव्हर ब्रीज बांधणेसाठी र.रु.६,००,००,०००/- (अक्षरी सहा कोटी फक्त) खर्च अपेक्षित आहे. तरी सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १८
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.कप्र/स्था/१४०५/२०१३, दि.०५/१२/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१७१ दि. ०९/१२/२०१३

पिंपरी चिंचवड शहराचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा तयार करुन त्याची टप्प्या टप्प्याने अंमलबजावणी करणे (१) बालनगरी कामास येणा-या र.रु.१८,५०,००,०००/- (अक्षरी र.रु.अठरा कोटी पन्नास लाख फक्त) चे सुधारीत पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.संजय वाबळे -** महापौर साहेब सदर ठरावाला उपसूचना देतो -

पिंपरी चिंचवड शहराचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा तयार करुन त्याची टप्याटप्प्याने अंमलबजावणी करणे. (१) बालनगरी कामास येणा-या र.रु.१८,५०,००,०००/- (अक्षरी अठरा कोटी पन्नास लाख फक्त) चे सुधारीत पुर्वनगकपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेकामी ऐवजी सदर कामास र.रु.२५,५०,००,०००/- (अक्षरी र.रु पंचवीस कोटी पन्नास लाख फक्त) चे सुधारीत पुर्वनगणकपत्रकात व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.वसंत काटे** - महापौर साहेब, सदर उपसुचनेला अनुमोदन आहे..

**मा.सुजाता पाडाळे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४३६ विषय क्रमांक - १८

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.कप्र/स्था/१४०५/२०१३, दि.०५/१२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१७१ दि. ०९/१२/२०१३

पिंपरी चिंचवड शहराचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा तयार करुन त्याची टप्प्या टप्प्याने अंमलबजावणी करणे (१) बालनगरी कामास येणा-या र.रु.१८,५०,००,०००/- (अक्षरी र.रु.अठरा कोटी पन्नास लाख फक्त) चे सुधारीत पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेची मा.महापालिका आयुक्त यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड शहराचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा तयार करुन त्याची टप्याटप्प्याने अंमलबजावणी करणे. (१) बालनगरी कामास येणा-या र.रु.१८,५०,००,०००/- (अक्षरी अठरा कोटी पन्नास लाख फक्त) चे सुधारीत पुर्वनगकपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेकामी ऐवजी सदर कामास

र.रु.२५,५०,००,०००/- (अक्षरी र.रु पंचवीस कोटी पन्नास लाख फक्त) चे सुधारीत पुर्वनगणकपत्रकात व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४३७ विषय क्रमांक - १९

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/कमु/१४०७/२०१३, दि.०५/१२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१७२ दि. ०९/१२/२०१३

पुणे आळंदी रस्ता (च-होली फाटा) ते नियोजित पुलापर्यंत (इंद्रायणी नदी) विकास आराखडयातील रस्ता विकसित करणेकामी येणा-या र.रु.६,००,००,०००/- (अक्षरी र.रु.सहा कोटी फक्त) चे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**-------**

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २०

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव

२) अ प्रभाग समिती सभा दिनांक ०९/१०/२०१३ ठराव क्रमांक १९५

३) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.४३ दि. १०/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकुर्डी रुग्णालयामध्ये प्रसुतीगृह, कुटूंबकल्याण, जन्ममृत्यू व दैनंदिन रुग्ण तपासणीची कामे केली जातात. सदर

रुग्णालय हे अपुरे पडत असून त्याचा विस्तार करणे अत्यंत गरजेचे आहे. रुग्णालयाचे शेजारी आरक्षण क्र.२७१ ही अडीच एकर जागा आहे. या जागेवर असलेले खाजगी शाळेचे आरक्षण रद्द करुन ती जागा रुग्णालयाच्या विस्तारासाठी आरक्षित करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला उपसूचना देते -

मौजे आकुर्डी येथे मनपाचे रुग्णालय आहे. सदर रुग्णालय अपुरे पडत असल्याने सदर रुग्णालयाच्या बाजुला आ.क्र. २७१ माध्यमिक शाळा व आ.क्र. २६८ बेघरांसाठी घरे, दुकानदाराचे पुनर्वसन, दुकान केंद्र यांचे आरक्षण आहे. रुग्णालयाची जागा कमी पडत असल्याने आ.क्र. २७१ मधील ३० आर व आ.क्र. २६८ ची संपुर्ण २० आर जागा अशी एकूण ५० आर जागा रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी आरक्षित करणेस व आ.क्र. २६८ चे २० आर क्षेत्र हे आ.क्र. २७१, माध्यमिक शाळा मधील ताब्यात आलेल्या जागेत स्थलांतरीत करणेस व वरील सर्व प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि. १९६६ च्या कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.जावेद शेख** - महापौर साहेब, सदर उपसुचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पाडाळे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४३८ विषय क्रमांक - २०
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव
२) अ प्रभाग समिती सभा दिनांक ०९/१०/२०१३ ठराव क्रमांक १९५
३) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र.४३ दि. १०/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकुर्डी रुग्णालयामध्ये प्रसुतीगृह, कुटूंबकल्याण, जन्ममृत्यू व दैनंदिन रुग्ण तपासणीची कामे केली जातात. सदर रुग्णालय हे अपुरे पडत असून त्याचा विस्तार करणे अत्यंत गरजेचे आहे. रुग्णालयाचे शेजारी आरक्षण क्र.२७१ ही अडीच एकर जागा आहे. या जागेवर असलेले खाजगी शाळेचे आरक्षण रद्द करुन ती जागा रुग्णालयाच्या विस्तारासाठी

आरक्षित करणेस तसेच मौजे आकुर्डी येथे मनपाचे रुग्णालय आहे. सदर रुग्णालय अपुरे पडत असल्याने सदर रुग्णालयाच्या बाजुला आ.क्र. २७१ माध्यमिक शाळा व आ.क्र. २६८ बेघरांसाठी घरे, दुकानदाराचे पुनर्वसन, दुकान केंद्र यांचे आरक्षण आहे. रुग्णालयाची जागा कमी पडत असल्याने आ.क्र. २७१ मधील ३० आर व आ.क्र. २६८ ची संपुर्ण २० आर जागा अशी एकूण ५० आर जागा रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी आरक्षित करणेस व आ.क्र. २६८ चे २० आर क्षेत्र हे आ.क्र. २७१, माध्यमिक शाळा मधील ताब्यात आलेल्या जागेत स्थलांतरीत करणेस व वरील सर्व प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि. १९६६ च्या कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २१

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.मंदाकिनी ठाकरे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव
२) मा.क्रिडा समिती सभा ठराव क्र.५४ दि.०८/११/२०१३

अ प्रभाग कार्यक्षेत्रात प्रभाग क्रमांक १३ यमुनानगर निगडी येथील से.क्र.२१ अंतर्गत आण्णाभाऊ साठे क्रीडांगणाचा समावेश होतो. सदरचे मैदानाचे क्षेत्रफळ सुमारे ४-५ एकर आहे. सदरचे मैदान दाट लोकवस्तीच्या भागात येत असलेने नागरिकांच्या सोयीसाठी १) जॉगिंग ट्रॅक, २) मैदानाचे सपाटीकरण, ३) हॉलिबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट, बास्केटबॉल कोर्ट इ., ४) मैदानाचे सुशोभिकरण, वृक्षारोपण, लॉन्स इ., ५) रखवालदार निवासस्थान (watchman quarter), ६) वाहनतळ व्यवस्था (पार्कींग), ७) सिमाभिंत गेट दुरुस्ती, रंग सफेदी, ८) पावसाळी पाण्याची व्यवस्था (SWD) बंद पाईप गटर्स, ९) रात्रीच्या स्पर्धासाठी आवश्यक विद्युत व्यवस्था, हायमास्ट इ., १०) स्टेज इ. स्थापत्य विषयक कामे करणेस तसेच सदर कामाचा अंतर्भाव मनपाच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते -

ब प्रभाग कार्यक्षेत्रात प्रभाग क्र. २३ केशवनगर, चिंचवड येथिल महासाधू मोरया गोसावी क्रिडांगणाचा समावेश होतो. सदर मैदानाचे क्षेत्रफळ सुमारे २ ते ३ एकर आहे. सदरचे मैदान दाट लोकवस्तीच्या भागात येत असलेने नागरीकांच्या सोयीसाठी १) जॉगिंग ट्रॅक २) मैदानाचे सुशोभिकरण ३) हॉलिबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट, बास्केट बॉल कोर्ट ४) मैदानाचे सुशोभिकरण, वृक्षारोपण, लॉन्स ५) व्यायामशाळा, सुरक्षारक्षक खोली ६) ज्येष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा कैंद्र ७) रंग सफेदी ८) पावसाळी पाण्याची व्यवस्था (SWD) बंद पाईप गटर्स ९) रात्रीच्या स्पर्धेसाठी आवश्यक विद्युत व्यवस्था, हायमास्ट इ. १०) स्टेज वरती लोखंडी छत विद्युत विषयक कामे करणेस तसेच सदर कामाचा अंतर्भाव मनपाच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** – मा.महापौर साहेब, सदर उपसुचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पाडाळे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ४३९ | विषय क्रमांक - २१ |
| दिनांक - १८/०१/२०१४ | विभाग- मा.आयुक्त |

संदर्भ:-१) मा.मंदाकिनी ठाकरे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव
२) मा.क्रिडा समिती सभा ठराव क्र.५४ दि.०८/११/२०१३

अ प्रभाग कार्यक्षेत्रात प्रभाग क्रमांक १३ यमुनानगर निगडी येथील से.क्र.२१ अंतर्गत आण्णाभाऊ साठे क्रीडांगणाचा समावेश होतो. सदरचे मैदानाचे क्षेत्रफळ सुमारे ४-५ एकर आहे. सदरचे मैदान दाट लोकवस्तीच्या भागात येत असलेने नागरिकांच्या सोयीसाठी १) जॉगिंग ट्रॅक, २) मैदानाचे सपाटीकरण, ३) हॉलिबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट, बास्केटबॉल कोर्ट इ., ४) मैदानाचे सुशोभिकरण, वृक्षारोपण, लॉन्स इ., ५) रखवालदार निवासस्थान (watchman quarter), ६) वाहनतळ व्यवस्था (पार्कींग), ७) सिमाभिंत गेट दुरुस्ती, रंग सफेदी, ८) पावसाळी पाण्याची व्यवस्था (SWD) बंद पाईप गटर्स, ९) रात्रीच्या स्पर्धासाठी आवश्यक विद्युत व्यवस्था, हायमास्ट इ., १०) स्टेज इ. स्थापत्य विषयक कामे करणेस तसेच सदर कामाचा अंतर्भाव मनपाच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात करणेस तसेच ब प्रभाग कार्यक्षेत्रात प्रभाग क्र. २३ केशवनगर, चिंचवड येथिल महासाधू मोरया गोसावी क्रिडांगणाचा समावेश होतो. सदर मैदानाचे क्षेत्रफळ सुमारे २ ते ३ एकर आहे. सदरचे मैदान दाट लोकवस्तीच्या भागात येत असलेने

नागरीकांच्या सोयीसाठी १) जॉगिंग ट्रॅक २) मैदानाचे सुशोभिकरण ३) हॉलिबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट, बास्केट बॉल कोर्ट ४) मैदानाचे सुशोभिकरण, वृक्षारोपण, लॉन्स ५) व्यायामशाळा, सुरक्षारक्षक खोली ६) ज्येष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र ७) रंग सफेदी ८) पावसाळी पाण्याची व्यवस्था (SWD) बंद पाईप गटर्स ९) रात्रीच्या स्पर्धेसाठी आवश्यक विद्युत व्यवस्था, हायमास्ट इ. १०) स्टेज वरती लोखंडी छत विद्युत विषयक कामे करणेस तसेच सदर कामाचा अंतर्भाव मनपाच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २२

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१०/कावि/८५४/ २०१३, दि.१९/१०/२०१३

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४१६, दि.२१/११/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कासारवाडी येथे मनपामार्फत मैलापाणी शुद्धीकरणासाठी टप्पा क्र. १,२ व ३ असे एकुण तीन Sewage Treatment Plant आहेत. सदर प्लॅन्टमध्ये सद्यस्थिती सर्वसाधारण ७४ ते ८० एम.एल.डी. मैलापाण्यावर प्रक्रिया केली जाते. सद्यस्थितीत प्रक्रियायुक्त पाण्याचा पुर्नवापर काही प्रमाणात मनपाचे उद्यानासाठी करणेत येतो व उर्वरित पाणी नदीपात्रामध्ये सोडणेत येते. CME येथे कासारवाडी STP पासून पंपिंगद्वारे पाणी पुरविणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम २,४७,४८,२११/- इतकी येत असलेबाबत, त्यांना यापूर्वी कळविलेले आहे. त्यानंतर त्यांनी दिनांक २५/०७/२०१३ रोजीचे पत्रानुसार सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम मनपाकडे डिपॉझीट म्हणून जमा करणेची, तसेच या रक्कमेतून काम पूर्ण झालेनंतर देखभाल, दुरुस्तीकामी प्रति महिना आवश्यक ती रक्कम देणेची संमती दर्शविलेली आहे. तसेच सदरचे काम त्यांनी त्वरीत पूर्ण करुन देणेबाबत कळविलेले आहे. परंतु सदर कामासाठी CME यांचेकडून सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकानंतर (म्हणजे २५ जुलै २०१३ रोजी) पत्र मिळाले असून या विभागामार्फत सदर कामाचे खर्चासाठीची तरतुद या वर्षाच्या मनपाच्या अंदाजपत्रकामध्ये करणेत आलेली नाही. परंतू सदर कामासाठी आवश्यक

असणारी रक्कम CME कडून मनपाकडे जमा होणार असलेने त्या रक्कमेतून सदर काम मनपामार्फत करुन घेणेस येणारे अंदाजे सुमारे र.रु.२,४८,००,०००/- चे रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, मागिल मिटींगमध्ये हा विषय आला होता. त्यावेळी मी सांगितले होते, हा विषय पिंपरी चिंचवड शहरासाठी चांगला आहे. शुद्धीकरण केलेले पाणी सीएमई वापरणार होते, ते पैसे देणार होते. यातून आर्थिक नुकसान होणार नाहीतर आर्थिक फायदा होणार आहे. ज्या संस्थेसाठी हा विषय आणला आहे, ती संस्था शहरातील नागरीकांना त्रास देते आहे. त्यांना सूचना व्हावी म्हणून हा विषय तहकूब ठेवावा. बोपखेल भागातील नागरीकांना, महापालिका कर्मचा-यांना सीएमईतून जाऊ येऊ देत नाहीत. दिघीतून या असे सांगतात. मिलिटरी ही नागरीकांच्या संरक्षणासाठी आहे. ते संरक्षण करण्याऐवजी नागरीकांना त्रास देतात. याची त्यांना जाणीव करुन देणे आपले कर्तव्य आहे. म्हणून हा विषय आणखी २ महिने तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.संजय वाबळे –** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - विषय क्रमांक २२ तहकूब करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -४४० | विषय क्रमांक - २२ |
| दिनांक - १८/०१/२०१४ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१०/कावि/८५४/२०१३, दि.१९/१०/२०१३
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४१६, दि.२१/११/२०१३

विषय क्रमांक २२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २४ ते ३० प्राधान्याने घेणेत येवुन विषय क्रमांक २३ शेवटी घेणेत यावा अशी मी सूचना मांडतो.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर -** विषय क्रमांक २४ ते ३० प्राधान्याने घेणेत येवुन विषय क्रमांक २३ शेवटी घेणेत येत आहेत.

-------

**मा.सुजाता पालांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २४

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/कावि/१०/७१/२०१३, दि.१८/११/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका यांचे सांडपाण्यामुळे मुळा-मुठा व भिमा नदीचे पाणी दुषित झाल्यामुळे बाधित गावांमध्ये आर.ओ. यंत्रणा बसविणेबाबत मा.विधानसभा अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली दि.९/७/२०१३ रोजी विधानभवन येथे झालेल्या बैठकीत त्यांनी बाधित गावांसाठी आर.ओ. यंत्रणा बसविणेकरिता येणारा खर्च एकूण र.रु.१०.१३ कोटी दोन्ही महानगरपालिकेने समसमान सोसावा असे सुचित केले. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने एकूण रक्कमेच्या ५०% रक्कम र.रु. ५.०६५ कोटी पुणे जिल्हा परिषद यांना दि. ३१/७/२०१३ चे धनादेशान्वये अदा करणेत आली आहे. तदनंतर दि.४/९/२०१३ रोजी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली व संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधी यांचे उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये वरील दिलेल्या रक्कमेमध्ये फक्त ८२ गावांसाठी आर.ओ. यंत्रणा बसविणे शक्य होत आहे. त्या व्यतिरिक्त जादा ३४ गावांमध्ये आर.ओ. सयंत्र बसविणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे. या गावांकरिता एकूण ३.७७ कोटी इतक्या अधिक निधीचा आवश्यकता असल्याने दोन्ही महानगपालिकेने सदरचा निधी समप्रमाणात पुणे जिल्हा परिषदेकडे वर्ग करणेबाबत ठरले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हिश्याची रक्कम रु.१८८.५० लक्ष पुणे जिल्हा परिषदेकडे वर्ग करणेबाबत विभागीय आयुक्त यांनी दि.३०/१०/२०१३ चे पत्रान्वये कळविले आहे बैठकीत झालेल्या निर्णयानुसार बाधित जादा ३४ गावांसाठी आर.ओ. सयंत्र बसविणेकामी म.न.पा.चे हिश्याची ५०% र.रु.१८८.५० लक्ष पुणे जिल्हा परिषद यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.राजु मिसाळ** – मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २४ तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.शांताराम भालेकर** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - विषय क्रमांक २४ तहकूब करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -४४१ विषय क्रमांक - २४
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ **:** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/कावि/१०/७१/२०१३, दि.१८/११/२०१३

विषय क्रमांक २४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.शांताराम भालेकर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -४४२ विषय क्रमांक - २५
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**मा.विधी समिती**

अ) दिनांक दिनांक ०४/१०/१३ व १८/१०/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक १८/१०/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दिनांक १/११/१३ व १२/११/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.शांताराम भालेकर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ४४३ विषय क्रमांक - २६
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

**अ)** दिनांक ०४/०९/१३ व १९/०९/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**ब)** दिनांक १९/०९/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**क)** दिनांक ०३/१०/१३, १७/१०/१३, २१/१०/१३ व १२/११/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**ड)** १७/१०/१३, २१/१०/१३ व १२/११/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**इ)** ०६/११/१३ व १२/११/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**ई)** २०/११/१३ व २२/११/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.शांताराम भालेकर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ४४४ विषय क्रमांक - २७
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.नगरसचिव

**मा.क्रिडा समिती**

अ) दिनांक ३०/१०/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक १७/१०/१३,२१/१०/१३ व ०८/११/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दिनांक ०८/११/१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

अनुकूल – ७९ प्रतिकूल – ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -४४५ विषय क्रमांक - २८
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/८५५/२०१३, दि.१९/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतूक सेवा पुरविणेअंतर्गत बीआरटीएस बस सेवा चालू करणेचे नियोजन हाती घेतले आहे. यामध्ये दापोडी ते निगडी कॉरीडॉर, सांगवी ते किवळे कॉरीडॉर, नाशिक फाटा ते वाकड कॉरीडॉर, काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी कॉरीडॉर व देहू आळंदी रस्ता या बीआरटीएस कॉरीडॉरचा समावेश आहे. दापोडी ते निगडी रस्त्याचे रोड सेप्टी ऑडीट आय.आय.टी. पवई, मुंबई या केंद्र शासनाच्या संस्थेकडून करुन घेतले आहे. सदर रोड सेप्टी ऑडीटनुसार सदर रस्त्याचा वापर करणा-या नागरिकांचे सुरक्षिततेच्या व बीआरटीएस बस सेवा विना अडथळा वाहतुकीच्या दृष्टीने सदर रस्त्यावरील अंडरपासेस, मर्ज इन, मर्ज आऊट व सदर रस्त्यामधील चौक येथे काही सुधारणा सुचविल्या आहेत. सदर सुधारणाअंतर्गत दिशादर्शक फलक लावणे, बस लेन रंगविणे, चौकांमध्ये झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे रंगविणे, विद्युत सिग्नल बसविणे, विद्युत दिवे बसविणे, बस स्टॉपचे रॅंप वाढविणे, त्यांना रोलिंग करणे इ. बाबींचा समावेश असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१२-१३ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय र.रु.१,७२,००,०००/- इतकी येत आहे. दापोडी ते निगडी, सांगवी ते किवळे व नाशिक फाटा ते वाकड, काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्ता या रस्त्यावर बीआरटीएस बस स्टेशन बांधणेचे काम पुर्ण झाल्यानंतर प्रत्येक बस स्टेशनसाठी वॉर्डन, सुरक्षारक्षक व साफसफाईसाठी मजुर यांच्या नेमणुका कराव्या लागणार असून त्यासाठी अनुक्रमे र.रु.२,३०,००,०००/- व र.रु.१,८०,००,०००/- इतका खर्च येणार आहे. दापोडी ते निगडी या बीआरटीएस कॉरीडॉरवरील बसेस या भोसरीपर्यंत जाणार आहे. याकरिता भोसरी येथील फ्लायओव्हरखाली बस टर्मिनल तसेच पुणे नाशिक हायवे व टेल्को रोड जवळील पेट्रोल पंपाशेजारील जागेत बस पार्किंग करणेकरिता सदर जागा विकसीत करणे आवश्यक असून त्यासाठी सुमारे र.रु.१,८५,०,,०००/- इतका अंदाजित खर्च येणार आहे. सांगवी ते किवळे रस्त्यावरील EHV Electrical Line खाली ४ बीआरटीएस बस स्टेशन्स येणार असून ITMS सुरळीत कार्यान्वित राहणेसाठी EHV Line ला आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक असून त्यास र.रु.५०,००,०००/- एवढा अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

दापोडी ते निगडी व सांगवी ते किवळे या बीआरटीएस कॉरीडॉरवर मार्च-एप्रिल २०१४ मध्ये बीआरटीएस बससेवा सुरु करणेचे मनपाचे नियोजन असून निविदा प्रसिद्ध करणे व प्रत्यक्ष कामे करणे यासाठी लागणारा कालावधी याचा विचार करता सदरच्या विषयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १ के अंतर्गत खालीलप्रमाणे मान्यता घेणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मुंबई-पुणे रस्त्याचे दापोडी ते निगडी या दरम्यानच्या कॉरीडॉरचे रोड सेप्टी ऑडीटनुसार स्थापत्य व विद्युतविषयक कामे करणे. | र.रु.१,७२,००,००० |
| २) | दापोडी ते निगडी व सांगवी ते किवळे या बीआरटीएस रस्त्यावरील बीआरटीएस बस स्टेशनसाठी वॉर्डन, सुरक्षारक्षक व साफसफाईसाठी मजुर यांची नेमणुक करणे. | र.रु.२,३०,००,००० |
| ३) | नाशिक फाटा ते वाकड व काळेवाडी फाटा ते देहू आळंदी या बीआरटीएस रस्त्यावरील बीआरटीएस बस स्टेशनसाठी वॉर्डन, सुरक्षा रक्षक व साफसफाईसाठी मजुर यांची नेमणुक करणे. | र.रु.१,८०,००,००० |
| ४) | भोसरी फ्लायओव्हरखाली बस टर्मिनल विकसीत करणे तसेच पुणे नाशिक हायवे टेल्को रोड जवळील पेट्रोल पंपाशेजारील जागा विकसीत करणे. | र.रु.१,८५,००,००० |
| ५) | सांगवी किवळे रस्त्यावरील EHV विद्युत लाईनखाली येणा-या बीआरटीएस बस स्टेशनच्या भागात EHV Line ला आवश्यक ती उपाययोजना करणे. | र.रु.५०,००,००० |
| | **एकूण अंदाजपत्रकीय खर्च** | र.रु.८,१७,००,००० |

तरी दापोडी ते निगडी, सांगवी ते किवळे या बीआरटीएस रस्त्यांवर बीआरटी बस सेवा सुरु करणेसाठी उपरोक्त उल्लेख केलेल्या अ.नं.१ ते ५ या कामांना एकूण र.रु.८,१७,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.दत्ता साने –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - २९

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/२/कावि/१८११/२०१३,
दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये महाराष्ट्र शासनातर्फे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविण्याचे प्रस्तावित असून त्यामध्ये पिवळे व केसरी रेशनकार्ड धारक नागरिकांना मोफत आय.पी.डी. सुविधा पुरविण्यात येणार आहेत. तथापि, सदर योजनेअंतर्गत असणा-या लाभार्थ्यांना ओ.पी.डी. सुविधासुद्धा मोफत उपलब्ध करण्यात यावी. याकरिता दि.३/१२/२०१३ रोजीचे मा.स्थायी समितीमध्ये ठराव क्र. ५०३४ ठराव पारित करण्यात आलेला आहे.

वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये एम.आर.आय. व सिटी स्कॅनची सुविधा आऊटसोर्सिंगद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यासाठी रुग्णांना पैसे भरुन सदरची सुविधा प्राप्त करुन घ्यावी लागते. परंतु राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची रक्कम स्विकारण्याची तरतूद नाही.

वाय.सी.एम. रुग्णालयातील विविध ओ.पी.डी. मधून एम.आर.आय. व सिटी स्कॅनसाठी अंदाजे २५-३० रुग्णांना दररोज रेफर करण्यात येते. अशा रुग्णांकडून योजनेचे लाभार्थी म्हणून महानगरपालिकेस रक्कम स्विकारता येणार नाही.

वाय.सी.एम. रुग्णालयातील एम.आर.आय. व सिटी स्कॅनसाठी रेफर करण्यात येणा-या पिवळे व केसरी रेशनकार्ड धारक नागरिकांना मोफत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी खर्च करण्यात येणा-या रकमेची प्रतिपूर्ती उक्त संस्थेस महानगरपालिकेमार्फत करुन द्यावी लागणार आहे.

सबब, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत दाखल होणा-या पिवळे व केसरी रेशनकार्ड धारक नागरिकांना एम.आर.आय. व सिटी स्कॅन सुविधा मोफत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील असे मत आहे. तसेच अशा रकमेची प्रतिपूर्ती उक्त संस्थेस महानगरपालिकेमार्फत करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला उपसूचना देते – १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अन्य ७ रुग्णालयांमधे दाखल होणा-या हद्दीबाहेरील पिवळे व केसरी रेशन कार्ड धारक नागरिकांना मोफत सुविधेचा लाभ लागू राहणार नाही. २) वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये रुबी ऐलकेअर या संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या एम.आर.आय. व सिटी स्कॅन सेंटर योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला असून कॅथलॅब विभागाचाही त्यामध्ये समावेश करण्यात यावा व त्याकामी रुबी ऐलकेअर यांचेसमवेत तसा करारनामा करण्यात यावा. ३) वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये राजीव गांधी जिवनदायी आरोग्य योजनेचे लाभार्थी म्हणून पात्र न ठरलेल्या पिंपरी चिंचवड

शहराबाहेरील रुग्णांना मोफत सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार नाही. ४) सदर योजनेअंतर्गत लाभार्थी म्हणून पात्र नसलेले पिंपरी चिंचवड शहराचे हद्दीतील पिवळे रेशनकार्डधारक नागरिकांनाही महानगरपालिकेमार्फत मोफत जेवण पुरविण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये आजी व माजी नगरसेवकांना व त्यांचे कुटूंबियांना मोफत उपचार महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात यावी.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर उपसुचनेला अनुमोदन आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला उपसूचना देतो - पिंपरी चिंचवडमधील अंध, अपंग व मतिमंद यांना महानगरपालिका सर्व दवाखान्यांमध्ये (वाय.सी.एम.एच. व मनपा इतर हॉस्पिटल) मोफत उपचार देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, सदर उपसुचनेला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत राज्य शासनाने पिंपरी चिंचवड महापालिकेचा समावेश केलेला आहे. १२ मध्ये केला आहे. वास्तविक एवढे मोठे हॉस्पीटल चालवतो, आपण त्यावर केलेला खर्च पाहता ७ए मिळाला पाहिजे. तो मिळालातर आपल्या परिसरातील दीड/दोन लाख रुग्णांना मोफत व इतर सुविधा सेवा वाढवून मिळतील. त्यासाठी महापौर साहेब आपण आयुक्तांना व प्रशासनाला आदेश द्यावेत. त्याचा फायदा परिसरातील जास्तीत जास्त रुग्णांना होईल. अपर ग्रेडसाठी, ए प्लससाठी अप्लाय करणा-या रुग्णांना नॉर्मस् प्रमाणे विलिनीकरण करावे अशी सूचना करतो.

**मा.शमीम पठाण-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज सर्व सदस्यांना सांगते की, आपण आपल्या सन्माननीय आयुक्त श्रीकर परदेशी यांचे अभिनंदन केले पाहीजे. त्यांनी ही योजना वायसीएम साठी लागू केली आहे. अनेक कारणांसाठी आयुक्त साहेब अभिनंदनास पात्र आहेत. ही योजना फक्त पिंपरी चिंचवडमध्ये लोकमान्य हॉस्पिटलमध्ये, डी.वाय. पाटील हॉस्पिटलमध्ये लागू केली आहे. आपण या योजनेसाठी लगेचच तयारी दर्शविली होती. तसेच ब-याचशा रुग्णांना सवलतीच्या दरात उपचार करतोय. शासनाकडे योजना आहे, त्याचा सुद्धा आपल्याला लाभ होईल. इतर कारणांसाठी जसे आत्ता सांगितले होते, रुग्णांना जेवण मोफत द्यावे. गरीब नागरीकांसाठी

ठिक आहे. जेवढे करु तेवढे कमीच पडते. काही गोष्टींसाठी या योजनेत शासनाचा हातभार लागणार आहे. रुग्णांना याची माहिती व्हावी यासाठी वर्तमानपत्रांमधून अटी जाहीर केल्या पाहीजेत. रुग्णालयांच्या बाहेर नियम लावले पाहीजेत. ठराविक उत्पन्न गटातील, पिवळा व केशरी रंगाचे रेशन कार्डधारक, योजनेमध्ये केंद्र सरकारने मंजूर केल्या आहेत त्या क्रमांकाच्या सुविधा पत्रकारांनाही ही योजना लागू आहे. रेशन कार्ड सँक्शन करतात, त्यांना ही योजना लागू पडत असेल तर त्यांना या योजनेचा लाभ होतो. जी नावे आहेत, नंबर आहेत. अशी नावे, नंबर लावले पाहीजेत. म्हणजे लोकांचा भ्रमनिरास होणार नाही. या योजनेत २४ तासांची मर्यादा आहे. पेशंट गेलातर तो लगेच दाखल होत नाही. हा २४ तास कालावधी वाढवून घ्यावा. या योजनेसाठी त्याचा लाभ पूर्णवेळ म्हणजे २४ तासांनंतर सुद्धा द्यावा अशी विनंती करते. पुन्हा एकदा ही योजना राबविल्याबद्दल अभिनंदन करते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, राजीव गांधी योजना वायसीएम हॉस्पिटलमध्ये करणार आहोत. वायसीएम हॉस्पिटल किंवा इतर हॉस्पिटलस् चा विचार करता आपल्याला ए ग्रेड मिळायला पाहीजे होता. यासाठी आपण योजना मंजूर करतो आहोत. त्याच बरोबर आम्ही सगळ्यांना सांगतोय, दीड लाखापर्यंत खर्च, जेवण सगळे फ्रि असणार आहे. परंतू या योजनेअंतर्गत अपेंडीस ऑपरेशनला मान्यता नाही. अपेंडीस फुटले तर त्याला मान्यता आहे. छोटे पुस्तक काढले गेले पाहीजे. जेणेकरुन नागरीकांना कळाले पाहीजे. हा आपल्या हॉस्पिटलमधील योजनेतील भाग नाही. लोकमान्य, निरामय हॉस्पिटल्स् इथे रुग्णांना गेल्यावर त्याला माहिती पाहीजे. कोणत्या योजनेअंतर्गत अंतर्भाव केला आहे, कोणत्या अटी शर्ती आहेत. कोणकोणते आजार आहेत. त्याचे पुस्तक काढावे. ५/१० रुपये चार्ज घ्यावा. या-या आजारावर या या गोष्टी उपलब्ध होणार आहेत. रेशन कार्डाबाबत मुद्दा आहे. योजना मोठ्या प्रमाणात राबविताना नागरीकांसाठी प्रत्येक वॉर्डात एक सेंटर उभे केले पाहीजे. किंवा प्रभागात सूचना दिल्या पाहीजेत. फॉर्मस् स्विकारले पाहीजेत. रेशनकार्ड अपडेट आहे का, रुग्णाने आजारी पडल्यानंतर रेशन कार्ड घेण्यापेक्षा ते आधीच त्याच्याजवळ असेल तर २४ तासांची मर्यादा असेल किवां आपण तर ४८ तासांची मर्यादा असावी असे म्हणतो. नागरीकांनी आधीच रेशन कार्ड काढून ठेवावे, अशी तरतूद चारही प्रभागांत जिथे जिथे हॉस्पिटल आहे तिथे तिथे हेल्थ कार्ड करावे. ही योजना राबवली तरच ही योजना नागरीकांपर्यंत पोहोचेल. हा विषय उपसूचनेसहीत मंजूर करण्यात यावा.

**मा.तानाजी खाडे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४४६ विषय क्रमांक - २९
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/२/कावि/१८११/२०१३, दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये महाराष्ट्र शासनातर्फे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविण्याचे प्रस्तावित असून त्यामध्ये पिवळे व केसरी रेशनकार्ड धारक नागरिकांना मोफत आय.पी.डी. सुविधा पुरविण्यात येणार आहेत. तथापि, सदर योजनेअंतर्गत असणा-या लाभार्थ्यांना ओ.पी.डी. सुविधासुद्धा मोफत उपलब्ध करण्यात यावी. याकरिता दि.३/१२/२०१३ रोजीचे मा.स्थायी समितीमध्ये ठराव क्र. ५०३४ ठराव पारित करण्यात आलेला आहे.

वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये एम.आर.आय. व सिटी स्कॅनची सुविधा आऊटसोर्सिंगद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यासाठी रुग्णांना पैसे भरुन सदरची सुविधा प्राप्त करुन घ्यावी लागते. परंतु राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची रक्कम स्विकारण्याची तरतूद नाही.

वाय.सी.एम. रुग्णालयातील विविध ओ.पी.डी. मधून एम.आर.आय. व सिटी स्कॅनसाठी अंदाजे २५-३० रुग्णांना दररोज रेफर करण्यात येते. अशा रुग्णांकडून योजनेचे लाभार्थी म्हणून महानगरपालिकेस रक्कम स्विकारता येणार नाही.

वाय.सी.एम. रुग्णालयातील एम.आर.आय. व सिटी स्कॅनसाठी रेफर करण्यात येणा-या पिवळे व केसरी रेशनकार्ड धारक नागरिकांना मोफत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी खर्च करण्यात येणा-या रकमेची प्रतिपूर्ती उक्त संस्थेस महानगरपालिकेमार्फत करुन द्यावी लागणार आहे.

सबब, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत दाखल होणा-या पिवळे व केसरी रेशनकार्ड धारक नागरिकांना एम.आर.आय. व सिटी स्कॅन सुविधा मोफत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील असे मत आहे. तसेच अशा रकमेची प्रतिपूर्ती उक्त संस्थेस महानगरपालिकेमार्फत करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अन्य ७ रुग्णालयांमद्ये दाखल होणा-या हद्दीबाहेरील पिवळे व केसरी रेशन कार्ड धारक नागरिकांना मोफत सुविधेचा लाभ लागू राहणार नाही. २) वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये रुबी ऐलकेअर या संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या एम.आर.आय. व सिटी स्कॅन सेंटर योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला असून कॅथलॅब विभागाचाही त्यामध्ये समावेश करण्यात यावा व त्याकामी रुबी ऐलकेअर यांचेसमवेत तसा करारनामा करण्यात यावा. ३) वाय.सी.एम.

रुग्णालयामध्ये राजीव गांधी जिवनदायी आरोग्य योजनेचे लाभार्थी म्हणून पात्र न ठरलेल्या पिंपरी चिंचवड शहराबाहेरील रुग्णांना मोफत सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार नाही. ४) सदर योजनेअंतर्गत लाभार्थी म्हणून पात्र नसलेले पिंपरी चिंचवड शहराचे हद्दीतील पिवळे रेशनकार्डधारक नागरिकांनाही महानगरपालिकेमार्फत मोफत जेवण पुरविण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये आजी व माजी नगरसेवकांना व त्यांचे कुटूंबियांना मोफत उपचार महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यास तसेच पिंपरी चिंचवडमधील अंध, अपंग व मतिमंद यांना महानगरपालिका सर्व दवाखान्यांमध्ये (वाय.सी.एम.एच. व मनपा इतर हॉस्पिटल) मोफत उपचार देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.तानाजी खाडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ३० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ४४७ विषय क्रमांक - ३०

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/२/कावि/१८१३/२०१३, दि.१८/१२/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये महाराष्ट्र शासनातर्फे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविण्याते प्रस्तावित असून त्यामध्ये पिवळे व केसरी रेशनकार्ड धारक नागरिकांना मोफत आय.पी.डी. सुविधा पुरविण्यात येणार आहेत. तथापि, सदर योजनेअंतर्गत असणा-या लाभार्थ्यांना ओ.पी.डी. सुविधासुद्धा मोफत उपलब्ध करण्यात यावी. याकरिता दि.३/१२/२०१३ रोजीचे मा.स्थायी समितीमध्ये ठराव क्र.५०३४ ठराव पारित करण्यात आलेला आहे.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही सध्या फक्त वाय.सी.एम. रुग्णालयातच राबविण्याचे प्रस्तावित असून सदर योजनेअंतर्गत पिवळे व केसरी रेशनकार्डधारक नागरिकांना मोफत आय.पी.डी. व ओ.पी.डी. सुविधा पुरविण्यात येणार असल्याने त्यामुळे वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये रुग्णसेवेवर त्याचा अतिरिक्त ताण पडण्याची शक्यता आहे. तथापि, महानगरपालिकेच्या अन्य सात रुग्णालयांमध्ये मोफत आय.पी.डी. व ओ.पी.डी. सेवा मोफत उपलब्ध करुन दिल्यास तसेच २१ दवाखान्यांमध्येही मोफत ओ.पी.डी. सेवा पुरविल्यास त्याचा फायदा शहरातील पिवळे व

केसरी रेशनकार्ड धारक नागरिकांना महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये व दवाखान्यांमध्ये घेता येईल.

सबब, महानगरपालिकेच्या अन्य सातही रुग्णालयांमध्ये वाय.सी.एम. रुग्णालयाप्रमाणेच पिवळे व केसरी रेशनकार्ड धारक नागरिकांना मोफत आय.पी.डी व ओ.पी.डी. सुविधा तसेच २१ दवाखान्यांमध्ये मोफत ओ.पी.डी. सेवा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.-

------

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३वर पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – २३

दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१६/२३२/२०१३, दि.१९/१०/२०१३

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४१७, दि.२१/११/२०१३

मौजे ताथवडे हे गाव शासन अधिसूचना क्र. पीसीसी ३००७/१२६७/प्र.क्र.१७४/०७/ नवि-२२,दिनांक ३०/०७/२००९ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेले आहे. त्याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ०६/०८/२००९ रोजी प्रसिद्ध झालेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम २१ मधील तरतुदीनुसार सदर नव्याने समाविष्ट ताथवडे गावाची प्रारुप विकास योजना तयार करुन ती ३ वर्षांच्या आत शासनास मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ७२८ दि. २१/०८/२००९ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम २३ व २४ मधील तरतुदीनुसार मौजे ताथवडे या गावाच्या क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर केला आहे. सदर इराद्याबाबत दिनांक ०१/०१/२०१० रोजी जाहिर केला असून सदर सूचना शासनाच्या राजपत्र दिनांक १४/०१/२०१० मध्ये प्रसिद्ध झालेला आहे. सदर क्षेत्राची विकास योजना तयार करण्याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महासभेने संदर्भ क्र.२ च्या ठरावाने उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची नगर अधिकारी म्हणून नेमणूक करण्यास मान्यता

दिलेली आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये मौजे ताथवडे या गावाची विकास योजना तयार करण्याकामी उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची नगररचना अधिकारी म्हणून कार्यालयीन आदेश क्र. नरवि/कावि/५/ ५८/२०११, दि.०५/०३/२०११ अन्वये नेमणुक केली आहे. त्यानुसार ताथवडे गावाचा विद्यमान जमिन वापर नकाशा उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दि.२०/०१/२०१२ रोजी सादर करण्यात आला आहे.

उपरोक्त विकास योजना तयार करण्याचा इरादा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१(१) अन्वये जाहीर केल्यापासुन ३ वर्षांच्या आत शासनास सादर करणे आवश्यक आहे. सदर विकास योजना तयार करण्याचा इरादा दि.१४/०१/२०१० च्या शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेला आहे. तथापि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील सुधारीत तरतुदीनुसार आणी त्याअन्वये शासनाने पत्र क्र. टिपीएस-१८११/१८४८/ प्र.क्र.२१९/११/नवि-१३ दि.०५/१२/२०११ अन्वये दिलेल्या मार्गदर्शनानुसार सदर विकास योजना तयार करण्याचा इरादा दि.०५/०४/२०११ रोजी झाली असल्याचे गृहीत धरण्यात येत आहे. सदर दि.०५/०४/२०११ इरादाची तारीख गृहीत धरल्यास तदनंतर ६ महिन्याच्या आत म्हणजेच दि.०४/१०/२०११ पर्यंत विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणे उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक आहे. त्यामुळे विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणेकरीता दि.०५/१०/२०११ ते दि.२०/०१/२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत मा.महासभेने ठराव घेण्याकरीता मान्यतेसाठी सादर.

मौजे ताथवडे या गावाची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्याकरीता मा.महासभेने संदर्भ क्र.३ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर विकास योजना दि. ७.३.२०१३ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाली आहे.

सदर विकास योजना प्रसिद्धीनंतर प्राप्त होणा-या हरकतधारकांना सुनावणी देण्याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम २८(२) अन्वये नियोजन समितीमध्ये मनपाच्या स्थायी समिती मधील ३ सदस्य श्री.जगताप, श्रीमती बारणे, श्रीमती वाघेरे यांच्या नेमणुकीबाबत मा.महासभेने ठराव क्र. २८१ दि.९/०५/२०१३ रोजी मान्यता दिलेली आहे. तसेच मा.संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि. ४/०४/२०१३ चे पत्रान्वये नगररचना विभागातील निवृत्त अधिकारी श्री.कोलटकर, श्री.कुलकर्णी, श्री.रानडे यांची नियोजन समितीमध्ये सदस्य म्हणुन नियुक्त करणेत आले आहे. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र.नरवि/कावि/१०/ताथवडे/ ५७२/२०१३ दि.१२/०८/२०१३ अन्वये नियोजन समिती स्थापन करणेत आली आहे. सदर नियोजन समितीने दि.२१/०८/२०१३ ते दि.३१/०८/२०१३ पर्यंत संबंधित हरकत धारकांना सुनावणी देवुन

प्रसिद्ध विकास योजनेच्या अनुषंगाने त्यांचा अहवाल दि.११/१०/२०१३ च्या पत्राने सादर केलेला आहे. नियोजन समितीने सादर केलेला अहवाल मा.महासभेच्या मान्यतेसाठी सोबत सादर करीत आहे. सदर विकास योजना महाराष्ट प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम ३० अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो आहे - मौजे ताथवडे या गावांची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्याकरीता मा.महासभेने ठराव क्र.२३७, दि.२०/०२/२०१३ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर विकास योजना दि.७.३.२०१३ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाली आहे. सदर विकास योजना प्रसिद्धीनंतर प्राप्त होणा-या हरकतधारकांना सुनावणी देवुन उक्त अधिनियमाच्या कलम २८(२) अन्वये नियोजन समितीने त्यांचा अहवाल दि.११/१०/२०१३च्या पत्राने सादर केलेला असुन सदर अहवाल मा.महासभेच्या मान्यतेसाठी तसेच सदर विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि. १९६६ च्या कलम ३० अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर करणेकरीता मान्यता मिळणेकरीता प्रस्तुत विषय महासभेपुढे ठेवण्यात आलेला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये विकास योजना प्रसिद्ध झालेनंतर ६ महिन्याच्या व तदनंतर वाढीव ६ महिने असे एकुण १ वर्षाच्या आत म्हणजे कलम २६ अन्वये राजपत्रात प्रसिद्धीचा दि.७/३/२०१३ पासुन १ वर्ष दि.६/३/२०१४ पर्यंत शासनास सादर होणे आवश्यक आहे. तत्पुर्वी १ महिना कलम २८(४) अन्वये महासभेने घेतलेला निर्णय जनतेच्या अवलोकनार्थ ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे मौजे ताथवडे या गावाची विकास योजना कलम ३० अन्वये शासनास सादर करणेकरीता वाढीव ६ महिनेसाठी (दि.६/९/२०१३ पासुन पुढील सहा महिने) मुदतवाढ देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शांताराम भालेकर** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, मुदतवाढीची उपसूचना स्विकारली आहे.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आज या ठिकाणी अनेक महिने वृत्तपत्रांमधून गाजणारा विषय म्हणजे ताथवडे विकास आराखड्याच्या विषयावर अनेक उलटसुलट चर्चा झाली. खरेतर डि.पी म्हणजे डेव्हलपमेंट प्लॅन. डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये

डेव्हलपमेंट नक्की कोणाची. डेव्हलपमेंट ज्यांची झाली, त्यात टाऊन प्लॅनिंगच्या भदाणे मॅडम असतील, त्या विभागातले अधिकारी असतील, सत्ताधारी पक्षातले असतील, विविध ठेकेदार, बिल्डर असतील. या सगळ्यांसाठी डि.पी. मंजूर करायचा घाट याठिकाणी घातला जातो आहे. आम्हाला माहित आहे, ज्या पद्धतीने तत्कालिन आयुक्त शर्मा साहेब असतानाच हा डि.पी. सभागृहासमोर का आला नाही याचा खुलासा भदाणे मॅडम यांनी करावा. भदाणे मॅडम म्हणजे उत्कृष्ट उदाहरण आहे पिंपरी चिंचवड शहराच्या टाऊन प्लॅनिंग विभागाचे. भदाणे मॅडमला हे चांगले माहित होते, शर्मा साहेब,आयुक्त साहेब गेले की आपण सोयीप्रमाणे बदल करु शकतो, थैल्याच्या थैल्या कमवू शकतो. बोलताना नवीन सदस्य बोलायला लागला तर त्याला निबंध म्हणायचे, ही आपली परंपरा आहे. याठिकाणी हा डि.पी. का सादर केला गेला नाही. शर्मा साहेब गेल्यानंतर खरेतर त्या डि.पी.त वेळोवेळी योग्य ते बदल केले गेले ते स्वतःच्या स्वार्थासाठी, सामान्य नागरीकांची डेव्हलपमेंट कुठेतरी कडेला लोटली गेली. आपली कशी भरभराट करुन घेता येईल याचे नियोजन अत्यंत चांगल्या पद्धतीने करण्यात आले. मा.आयुक्त साहेब, खरेतर जेव्हा डि.पी. प्लॅन केला जातो, तेव्हा तो प्रत्यक्षात जागेवर जाऊन करावा लागतो. टेबलवर बसून होत नाही. कुठेतरी फॉरेन कंट्रीजची मदत घेतली पाहीजे. आयुक्त साहेबांनी एकदा सांगितले होते, फॉरेनमध्ये दोरा पकडून रस्ता आखला जातो. तसे आपल्याकडे केले जात नाही. ताथवडे इथे बिल्डर धार्जिणे वेगवेगळे रस्ते टाकले गेले. सामान्य नागरीकांच्या घरांवरुन रस्ते टाकले. बिल्डरांसाठी जागा मोकळ्या केल्या गेल्या. त्यांच्या सोयीसाठी केले गेले. याठिकाणी जे काही असंख्य बदल सूचवले होते, त्याबाबत पिंपरी चिंचवड शहरात शिवसेनेच्या वतीने मोठ्या प्रमाणात चळवळ उभी केली होती. सूचना/हरकती घेतल्या गेल्या. शेतक-यांचे, नागरीकांचे मेळावे घेतले, त्यांच्या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अनेक वेळा सांगितले, आमच्या घरावरून रस्ता जातो आहे. ज्या-ज्या हरकती घेतल्या, त्यात ते बदल घेतले. कमिटीने त्या काही प्रमाणात विचारांत घेतल्या. त्यामुळे काही प्रमाणात नागरीकांची घरे वाचवण्यात समाधान आम्हालाही मिळाले. तरी आमच्या हरकती/सूचना पूर्णपणे मान्य झाल्या नाहीत. त्यामुळे नागरीकांवर अन्याय झाला आहे. बिल्डरांसाठी चांगल्या सवलती सत्ताधा-यांनी केल्या, भदाणे मॅडम यांनी केल्या आहेत. अनेक वेळा आमच्या पक्षावर टिका केली जाते. परंतू ३७ प्रमाणे आम्ही हरकती/सूचना घ्यायला काहीच हरकत नाही. अनेक वेळा सभागृहात ३७ च्या मॉडीफिकेशन केल्या जातात, कोण करतो, हे सगळ्यांना माहित आहे, ओपन सिक्रेट आहे. स्वतःचे घर भरायचे, स्वतःचा फायदा करायचा. नागरीकांचे हित साधायची पद्धत इथे नाही. त्यामुळे खरेतर हरकती/सूचना घेणे आमची परंपरा आहे. ज्यावेळी नागरीक सुविधा मागतो, त्यावेळी नागरीकाचे हित साधता यावे. इथे ताथवडे डि.पी. चा विषय अत्यंत चुकीच्या पद्धतीने इथे आला आहे. मी विनंती करते की, जो डि.पी. आपल्यासमोर आला आहे, तो कुठेतरी नागरीकांच्या

हिताचा नाही. पेपरमध्ये वृत्त आले होते, ताथवडेतील ग्रामस्थांनी सभा घेऊन सांगितले, जी फेरफार केली, बदल केला ते निश्चितपणे आमचे यश आहे. आम्ही लोकांना जागरुक केले. याचा अभिमान वाटतो. निश्चितपणे माझ्या घरावरुन रस्ता जातो आहे हे मला माहित नसते. नागरींकाना सूज्ञ करायचे काम प्रशासनाकडून कधीच केले जात नाही. विनंती करते, ताथवडे गावाचा जो काही डि.पी. केला, त्यात दफनभूमीचे आरक्षण, शाळेचे आरक्षण कुठे टाकले आहे हे कोणत्या धुंदीत केले गेले. यात बस टर्मिनस कुठेही ठेवलेला नाही. कोणी डी.पी. तयार केला त्यांनी त्यांची भरभराट करुन घेतली, झोळ्या भरल्या. यात सगळे लक्ष बाजूला ठेवले. याठिकाणी बेसिक गोष्टी टाकायचे भान आमच्या भदाणे मॅडम यांना राहीले नव्हते. याठिकाणी दोन पूररेषांचे नकाशा, त्याच्या पाठिशी असणा-या, सर्वज्ञात वैशाली घोडेकर होत्या. त्यांनी यात पुन्हा एकदा कात टाकायचे काम चांगल्या पद्धतीने केले. त्यांना किती महत्व द्यायचे, त्यांच्यावर किती विश्वास ठेवायचा हे समजण्याइतक्या तुम्ही सुद्धा जाणकार आहात. तुम्ही इतकी वर्षे राजकीय वातावरणात राहीला आहात. विनंती करते, हा विषय फेटाळून लावावा.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, त्या आमच्या पक्षाच्या महापौर होत्या. वैयक्तिक नाव घेऊन कोणी कोणाबद्दल बोलू नये. त्यांच्याविषयी कोणत्याही गोष्टीवर बोलणे आम्ही सहन करु शकत नाही. त्यांनी शब्द माघारी घ्यावेत. सत्ताधारी पक्षाने झोळ्या भरल्या, अमुक केले, तमुक केले. कोण काय करते, दिवसभर दप्तर घेऊन कोण दारोदार हिंडते हे सगळ्यांना माहित आहे. आम्ही काय बोलतो ते आमच्या लक्षात असते. आज त्या या सभागृहात नाहीत याचा अर्थ त्यांचे नाव घ्यायचे असा होत नाही. त्या सभागृहात नसल्यातरी त्या या शहराच्या प्रथम नागरीक होत्या, महापौर होत्या, असे असताना त्यांचे नाव घेण्याचे कारण नाही. माघार घ्यायची सवयच नाही. शिवसेनेचे गटनेते इथे आहेत त्यांनी सांगावे अशाप्रकारे नाव घेणे योग्य आहे का? महापौरांविषयी सभागृहात असे बोलणे योग्य नाही.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृह सुरु होत असताना याठिकाणी अनेक विषय झाले. सभागृहात तेवढी सदस्य संख्या नव्हती. परंतू ताथवडे डि.पी. चा विषय आला सभागृह फुल झाले. नेमके या विषयात काय आहे. काय दबले आहे हे याठिकाणी सदस्यांना कळत नाही. वरवर अभ्यास केलातरी आम्ही नवीन सदस्य आहोत. आमचा खोलवर अभ्यास झालेला नाही. ताथवडे विकास आराखड्याबाबत महापालिका सभागृहात अनेक वेळा विषय आला तरी तो बाजूला ठेवला गेला. मला कळले नाही की हा विषय वारंवार का पुढे ढकलला जात होता. हे सगळे होत असताना पेपरमध्ये अनेक बातम्या आल्या. मोठमोठे लेख लिहिले गेले. रंगले गेले. प्रत्यारोपाच्या फैरी छेडल्या गेल्या. नेमका कोण रोष घेतोय. शहरात सर्वसामान्य

लोकांमध्ये प्रश्न निर्माण झाला की, ताथवडे विकास आराखड्यात असे काय आहे. त्यावर चर्चा केली जाते. याठिकाणी हे नागरीकांना समजवायला तयार नाही. हे होत असताना आरक्षणात जे फेरबदल झाले, जे मोठ्या प्रमाणात फेरबदल झाले. जवळ जवळ २५ टक्के आरक्षणे त्यानंतर बदलली गेली. परंतु हे बोलत असताना कोणाचा व्यक्तिशः नामोल्लेख करायची खरेतर गरज नाही. परंतु या डि.पी.मध्ये ख-या अर्थाने प्रशासनाची भूमिका आहे, ज्यावेळी विकास आराखडा तयार केला गेला. ज्या अधिका-यांच्या अधिपत्याखाली तयार केला गेला. कारण या फेरबदलात असेही होते, ज्यांच्या घरावरुन रस्ता गेला, त्याठिकाणी जागा योग्य नाही म्हणून हरकती नोंदविल्या गेल्या. प्रश्न निर्माण होतो, अधिकारी प्रत्यक्ष जागेवर जाऊन आरक्षण टाकत नाहीत का? पार्किंगचा विचार केलातर अधिकारी मुद्दामुनच चुक करतात. चुका केल्याशिवाय त्यांच्या थैल्या भरत नाहीत. पहिल्यांदा चूक करायची, नंतर त्या सुधारायचे नाटक करायचे. याठिकाणी या सर्वासाठी जी समिती नेमली गेली होती, त्याच्या माध्यमातून जे काही बदल झाले. या एकंदरीत प्रकारामध्ये मी खरेतर प्रशासनाला धारेवर धरतो. प्रशासनाकडून अशा चूका मोठ्या प्रमाणात कशा झाल्या? डि.पी.साठी मोठ्या प्रमाणात हरकती आल्या. आधी चूक करायची नंतर त्याची दुरुस्ती करण्यासाठी तिथे संगनमताने घोडेबाजार करायचा. हा अत्यंत दयनीय असा विषय इथे शहरातील नागरीकांनी पाहीला आहे. ज्येष्ठ मंडळी इथे बोलतीलच. परंतु हा शहरातील सामान्य नागरीकांना पडलेला प्रश्न आहे. मा.महापौर साहेब, आपण अतिशय जाणत्या आहात. तुमचे सभागृहातील कामकाज अतिशय पारदर्शी आहे. तुमचा कौतुक करण्यासारखा कारभार आहे. खरेतर आत्तापर्यंत जे वादग्रस्त निर्णय झाले, तिथे कुठेही महापौरांचा स्पर्श दिसला नाही. इतके चांगले काम आपण केलेले आहे. म्हणून शहरातील जनतेला आपल्याकडून अपेक्षा आहे की, ताथवडे प्लॅन सभागृहात मंजूर करण्यापूर्वी यात अनेक प्रश्न, शंका निर्माण झाल्या आहेत. यात कुठेतरी पारदर्शकता निर्माण व्हावी. सभागृहात व सभागृहाबाहेर व्यवस्थितरित्या निर्णय व्हावा म्हणून या समितीवर चौकशी समिती नेमावी. सत्य काय आहे, कोणत्या आरक्षणांत बदल केले, या गोष्टींत कोणत्या प्रकारच्या काय घडले गेले हे जनतेसमोर आणणे गरजेचे आहे. पारदर्शकपणे निर्णय करायची गरज आहे. पालिकेच्या माध्यमातून सन्मा.मुख्यमंत्र्यांना याविषयी पत्र लिहून शासकीय समिती नेमावी. यात जोपर्यंत पारदर्शक निर्णय होत नाही, अहवाल सादर केला जात नाही, तोपर्यंत हा विकास आराखडा मंजूर केला जाऊ नये अशी नेत्यांना व पक्षनेत्यांना मी याठिकाणी विनंती करतो.

**मा.शारदा बाबर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ताथवडे डि.पी. चा हा विषय भरपूर वादग्रस्त होत चालला आहे म्हणजे आहेच. मला असे वाटते, याठिकाणी ताथवडेमध्ये इतक्या शैक्षणिक संस्था आहेत, हाय-वे आहे असे असताना तिथे एकही

बसडेपो नाही. बसडेपो आरक्षण तिथे करण्यात यावे. या वादग्रस्त विषयातील भ्रष्टाचार बाहेर काढायचा असेल तर हा विषय इथेच थांबवावा. विषय मंजूर करु नये. संपूर्ण अधिकारी, पदाधिकारी यांच्या पिंपरी चिंचवड शहर संशयाने पाहते आहे. यात काही आहे का या दृष्टीने सगळीकडे पाहीले जाते आहे. जोपर्यंत सत्य या विषयातुन बाहेर येत नाही, तोपर्यंत तो मंजूर केला जाऊ नये अशी आपल्याला विनंती आहे.

**मा.शेखर ओव्हाळ** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,ताथवडे डी.पी.चा विषय बरेच दिवसांपासून चालला आहे. माझी विनंती आहे की, हा विषय मंजूर करावा. पण मला या विषयावर अभ्यास करण्यासाठी एक महिन्याची मुदत द्यावी. शेतक-याच्या १०/२० गुंठ्यांवर आरक्षणे पडल्यानंतर त्यांनी काय करायचे? माझा विरोध नाही पण हा विषय मंजूर होत असताना दोन्ही नगरसेवकांनादेखील विचारात घ्यायला पाहीजे होते. मी याविषयी पत्रव्यवहार केला होता पण मला त्याचे उत्तर मिळाले नाही. यात कायद्याचा प्रश्न आहे. मी मागासवर्गीय घरातील तरुण आहे. मी निवडून आलो आहे पण मला यात घेतले नाही. हा विषय मंजूर केलातर मी आत्मदहन करेल. या विषयावर अभ्यास करा, त्यानंतर हा विषय मंजूर करावा.

**मा.कैलास कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ताथवडे विकास आराखड्याच्या माध्यमातून या शहरात विकास झाला पाहीजे या मताशी आम्ही व्यक्तिशः ठाम आहोत. परंतू हा डी.पी. तयार झाला आहे, जो सभागृहापुढे मांडण्यात आला आहे. आजच्या सकाळ वृत्तपत्रामध्ये बातमी आली होती. महापौर साहेब आपले सुद्धा स्टेटमेंट होते, सन्मा. सदस्यांचे सुद्धा स्टेटमेंट होते. एक सन्मा.सदस्य म्हणतात,भदाणे मॅडम यांनी हा विकास आराखडा तयार केला आहे. दुसरे सन्मा. सदस्य म्हणतात, आयुक्त साहेबांनी हा विकास आराखडा तयार केला आहे. नक्की हा विकास आराखडा भदाणे मॅडम यांनी तयार केला आहे का, आयुक्त साहेबांनी तयार केला आहे का प्रशासकीय इमारतीबाहेर तयार झाला आहे. आयुक्त साहेब, तुमच्या बाबतीत देखील संशयाची पाल चुकचुकते. आज आयुक्त साहेबांनी हा डि.पी. मंजूर केला याचा अर्थ काय? यासंदर्भात जी कमिटी नेमली होती, ती शासकीय समिती होती. त्याठिकाणी मी देखील विरोध नोंदविला होता की, हा डि.पी. बिल्डरधार्जिणा असणार आहे. याठिकाणी नागरीकांचे हिताचा नसल्याकारणाने या डि.पी. ला माझा वैयक्तिक विरोध असणार आहे.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ख-या अर्थाने जवळजवळ 4/5 महिने झाले हा विषय तसाच खितपत पडला आहे. काय गौडबंगाल आहे कळत नाही. आत्ताच राष्ट्रवादीचे स्थानिक नगरसेवक यांनी इथे अंतःकरणपूर्वक आपली व्यथा मांडली. ख-या अर्थाने तो त्यांचा वॉर्ड आहे मग त्यांना विश्वासात का घेतले नाही. हे

दूर्देव आहे. ते सुद्धा निवडून आले आहेत. आयुक्तांबद्दल आमच्या मनात प्रेम आहे. भदाणे मॅडम आपण सुद्धा इतके दिवस त्या विषयात होता. तुमच्याबद्दल मला आदर होता, या बाई काहीतरी करुन जातील. शेवटी तुम्ही आमच्या भावनांवर नांगर फिरवला असे माझे स्पष्ट मत आहे. कारण याठिकाणी हा ठराव होताना एक महिन्याची मुदत द्यावी. कदाचित शनिवारचे आपण चांगले काम करत नाही. याला अंधश्रद्धा म्हणता येत नाही. आपण देवाला मानणारी मंडळी आहोत. तरीसुद्धा या ठिकाणी ज्या नगरसेवकांनी आपली प्रेमाची भावना व्यक्त केली, सूचना मांडायला एक महिन्याची मुदत द्यावी. भदाणे मॅडम यांना मी विनंती करतो की, कदाचित आपण ठराव ठेवला आहे. आपण इथे समोर येऊन मोठ्या अंतःकरणाने सांगावे, एक महिना मुदत देतो. नाही म्हटले तर माझी इच्छा आहे, या विषयावर मतदान घ्यावे. मा.कैलास कदम इथे बसले आहेत. तुमच्या युतीतील आहेत, ते सुद्धा आमच्याबरोबर मतदान करायला तयार आहेत. भाजप, आरपीआय, अपक्ष, मनसे काही दुस-या पक्षांचीदेखील मंडळी इथे आहेत. ते सुद्धा हात वर करतील. आपण मतदान घ्यावे. माझी इच्छा आहे, एकदा होऊन जाऊ द्या. महापौर साहेब, आपल्या कारकीर्दीला दोन/अडीच वर्षांचा इतिहास आहे. आपण बोलता,तुमचा हसरा चेहरा आहे. आपण मतदान घ्या नंतर आपला निकाल दिला तरी चालेल.

**मा.यमुनाताई पवार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय मांडला आहे तो सगळ्या शेतक-यांना मंजूर आहे. मग कशासाठी थांबायचे याचा खुलासा करावा.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ताथवडेच्या विषयासाठी कोरम फुल आहे. पत्रकारांचे लक्ष आहे. माझे पण मत आहे, ताथवडेचा डि.पी. मंजूर करण्यात यावा. डि.पी. बनवत असताना सोप्पे आहे. कमिशनर व भदाणे मॅडम यांनी तो चांगला तयार केला असेल, नंतर कमिटीने, त्यातील रिटायर्ड शासकीय अधिका-यांनी त्यात विशेष लक्ष देऊन चांगल्या पद्धतीने डि.पी. तयार केला आहे. हा विषय सभागृहापुढे चर्चेसाठी आला आहे. प्रत्येक जण त्याचे मत मांडण्यासाठी उभा आहे. मी आयुक्तांना सांगू इच्छितो, हा डि.पी. बनवत असताना त्यात गार्डन, शाळा, रस्त्याचे रिझर्वेशन सगळ्या गोष्टी ए.सी. केबीनमध्ये बसून बनवणे सोप्पे आहे. परंतू त्याचे इम्प्लिमेंटेशन करताना मोठी कसरत असते. जुनी गावे असू द्या. नवीन गावे असू द्या. चिखली प्राधिकरण असू द्या. इथे डि.पीची अवस्था काय आहे? आरक्षणांची परिस्थिती काय आहे? किती टक्के आरक्षणे आपल्या ताब्यात आलेली आहेत? किती आरक्षणांवर अतिक्रमणे आहेत? एमआयडीसी असू द्या. प्राधिकरण असू द्या, रेड झोन आहे, पूररेषा सुद्धा आहे. या गोष्टी आपल्या निदर्शनास आणून दिल्यातरी माझ्या वॉर्डात जुन्या प्राधिकरणांत ज्या पद्धतीने डि.पी. तयार झाला, त्यावेळच्या लोकसंख्येनुसार, परिस्थीतीनुसार त्याठिकाणी आरक्षणे दाखल झाली. गार्डन, प्ले ग्राऊंड, शाळा अशी

आरक्षणे, एम.आय.डी.सी.ने, प्राधिकरणाने टाकली तरी काही आरक्षणे नको म्हणून ती वर्ग केली होती. त्यावेळी यावर सूचना/हरकती घेणे गरजेचे होते. आज लोकांच्या हरकती घेतल्यानंतर, सुनावणीनंतर फायनलाईज होत असते. दत्तवाडी परिसरात एका शाळेचे आरक्षण आहे. ते आयुक्त साहेबांना माहिती आहे. तुम्ही तिथे अतिक्रमण काढण्यासाठी नोटीस दिली होती. हे आरक्षण प्राधिकरणाचे होते. आपल्या महापालिकेने टाकलेले आरक्षण नव्हते. प्राधिकरणाने त्यांच्या गरजेप्रमाणे त्यांना शाळेची आवश्यकता होती म्हणून त्याठिकाणी 1 एकर 40 गुंठ्यांवर आरक्षण टाकले. तिथे दाट वस्ती होती. जागेचा मोबदला मिळणार नव्हता. त्यांचा हेतू साध्य होणार नव्हता म्हणून ही जागा दत्तवाडीत वर्ग केली. नंतर तुम्ही ताबा घेतला, त्या जागा मालकाला सूचना/हरकतीसाठी संधी दिली नाही. आज गेले १५/१६ वर्षे, ही प्रॉपर्टी आरक्षणात आहे. 50/60 घरे कुटूंबे तिथे एक/दीड गुंठ्यात घरे बांधून राहतात. तिथे धार्मिक स्थळ आहे, चर्च आहे. आपण आज ही आरक्षणे काढायला निघालात. 15 वर्षांपूर्वी हीच आरक्षणांतील शाळा बांधायचा प्रयत्न केला असता तर आज जी 50 कुटूंबे उद्ध्वस्त होणार आहेत ती कुठेतरी वाचली नसती का? आपले अधिकारी पण कुठेतरी चुकले आहेत. अनधिकृत वर शास्तीकर लावताय. घरे पाडताय. जागा मालकाने घरे विकली आहेत. त्याला दोन पैसे मिळाले आहेत. ही वस्ती काढून पुन्हा मूळ मालकाला मोबदला मिळणार आहे. जी ५०/६० घरे तिथे आहेत, त्यांचा काय दोष आहे? सुप्रिम कोर्टाने आदेश दिला म्हणून तुम्ही ही बांधकामे तोडायला निघालात. त्यांची जबाबदारी नव्हती का? महापालिकेची जबाबदारी नव्हती का? मग त्याने केलेले योग्य व यांनी केले ते चूक आहे का? १५ वर्षांत तिथे प्रचंड कुटूंबे मोठी झाली आहेत. त्यांना बाहेर काढताय हे कितपत योग्य आहे. तिथे शाळेचे आरक्षण टाकताय. पण शेजारी शाळा आहे का नाही हे तुम्ही विचारात घेत नाही का? इथे ऑलरेडी दोन अनधिकृत शाळा आहेत. सेंट उर्सूलासारखी मोठी शाळा आहे. तिथे 40 गुंठ्यांमध्ये शाळेचे आरक्षण टाकून काय मिळणार आहे? आज महापालिकेच्या शाळांची परिस्थिती काय आहे? आपल्याकडे विद्यार्थी येत नाहीत. हे कुणासाठी करताय. ही पळवाट आहे. तुम्ही त्याठिकाणी म्हणालात, आम्ही परपज चेंज करतोय. आज प्लॅनिंग करताय, हे त्यावेळी केले असतेतर ही 50 कुटूंबे वाढली नसती. त्यांच्यावर टांगती तलवार आली नसती. या लोकांनी कर्ज घेऊन, रिटायरमेंटनंतर घरे बांधली आहेत. त्यावेळी त्यांना वेठीस धरले असते तर ही वेळ आज आली नसती. माझी नम्र विनंती आहे. डि.पी. करताना याचा विचार केला का. अशीच परिस्थिती पूररेषेची, रेड झोनची आहे. डेव्हलपमेंट करु देत नाही. आहे त्या जागा ताब्यात घेत नाही. माझ्या वॉर्डात 3 आरक्षणे आहेत. आज परिस्थिती काय आहे? आपल्याकडे यंत्रणा नाही, फंड नाही. उद्या आरक्षणे टाकताय, त्याचा पोझिशन आहे का? 128 नगरसेवक कोण कोणावर आरोप करतोय. आपल्याकडे पैसे नाहीत. अशा परिस्थिती आहे, एलबीटीतून पैसे गोळा करु शकत नाही. फंड नाही. लोकांना आश्वासने देताय. प्लेग्राऊंड करु,

नाट्यगृह करु, काय उपयोग आहे, आहे त्या परिस्थितीचा विचार करणे गरजेचे आहे. लोकांच्या जागा आहेत. त्यांचा प्रश्न मिटवू शकत नाही. जुन्या आरक्षणांचा प्रश्न मांडू शकत नाही. किवळे,रावेत, वाकड इथे पूररेषेतली आरक्षणे आहेत. त्याचा आपण विचार याठिकाणी केला आहे का? तिथे लायब्ररीचे आरक्षण असले तरी तिथे लायब्ररी करु शकत नाही. ती डेव्हलप करु शकत नाही. तुमच्या नियमाप्रमाणे रेडझोन किंवा पूररेषेत डेव्हलपमेंट करु शकत नाही, करु देत नाही. याची पूर्तता करता येईल का याचा विचार केला आहे का? माझा डि.पी. पाहिल्यानंतर रिव्हर्स फंडची चांगली मोकळी जागा ठेवली आहे. त्याच्या शेजारी नॉन डेव्हलपमेंट झोनचा एक तुकडा ठेवला होता. तेवढा ठेऊन परत अतिक्रमण करण्यासाठी वाव देताय. जो मालक असेल तो तिथे थोडेतरी बांधणार नाही का? परत ही वेळ येणार नाही का? एसटीपी प्लॅन, वॉटर टँकसाठी तिथे आरक्षण ठेवले होते. पण पूर रेषेतील ही जागा ताब्यात घेण्यासाठी प्रोव्हिजन केलेले आहे का? उद्या डि.पी. झाल्यानंतर आरक्षणे झाल्यानंतर तिथली काय परिस्थिती होणार आहे. पूररेषेतील प्लॉट ताब्यात घ्यायचा आहे का? जागा हस्तांतरित करत असताना १ तारखेपासून तुम्हाला डबल पेमेण्ट करावे लागणार आहे. आत्ताच्या परिस्थितीत अवॉर्ड करायला पैसे नाहीत. डेव्हलमेंटला पैसे नाहीत. त्याठिकाणी आरक्षणे ताब्यात घेताना तुम्हाला डबल भावाने, रेडी रेकनरप्रमाणे द्यावे लागणार आहे. त्याचे सोर्सेस तयार केले आहेत का? उद्या पेपरमध्ये बातम्या आल्यानंतर तिथे टप-या टाकायला सुरुवात होणार आहे. आपल्याकडे यंत्रणा आहे का. शेतकरी काय म्हणणार, माझी जागा गेली आहे. गोरगरीबांचे नुकसान होते याला कोण जबाबदार आहे? माझी आपल्याला नम्र विनंती आहे, या गोष्टींचा विचार करत असताना डेफिनेटली विचार करा. हा विषय जरुर मंजूर करा. हा कायद्याचा,नियमाचा भाग आहे. पण दत्तवाडीसारखी परिस्थिती शहरात होता कामा नये. त्याची मान्यता तुमच्याकडे दिली आहे. तुम्ही म्हणता, मी कोर्टाचे आदेश पाळतो. तुम्ही बोलून मोकळे होता. तुम्हाला बोलणे सोप्पे आहे. आम्हाला फेस करताना अवघड होते. आज लोक जेवत नाहीत. १५ दिवसांची नोटीस दिली आहे. तुम्ही नगररचनाला विचारा, तुम्ही प्राधिकरणाला विचारा, सूचना/हरकतींची संधी त्यांना का दिली नाही? मग त्यांनी घरे बांधली असती का? ते गोरगरीब आहेत, अशिक्षित आहेत. त्यांना माहित नाही. मार्किंग करायचा विषय तहकूब झाला. झाले ते झाले आत्ता मार्किंग करुन काय मिळणार आहे त्याचा विचार करा. तुम्ही दोघे मिळून फायनल करता, कमिटी फायनल करते. प्रतिनिधी म्हणून काम करत असताना आम्हाला उत्तर द्यायला अडचण होते. तुम्ही सूचना/हरकती दिल्या होत्या का? तुम्ही टॅक्स गोळा करताय. पाणीपट्टी गोळा करताय, शास्ती कर गोळा करताय मग याचा फायदा काय? पार्कींग झोनची परिस्थिती वाईट आहे. आत्ता मा.बाबासाहेब धुमाळ, मा.मंगलाताई कदम यांनी सांगितले. तिथे तशी प्रोव्हिजन आत्ताच करुन ठेवा. छोटे-छोटे रोड असतात, दुकाने असतात नंतर परिस्थिती काय होते? फक्त लोकांना हॉटेल्स् दिसतात. आज

शोरुम,हॉस्पिटल्स् ची परिस्थीती काय आहे? याचा कोणी विचार करत नाही. प्रायव्हेट कोचिंग क्लासेस आहेत. याचा कोण विचार करतो? आपण करत असताना भविष्यात अडचण होता कामा नये. तिथे नक्की विचार करावा लागेल. आरक्षणे हा आपला अधिकार आहे. आपण करणारच आहात. आम्ही संमती देणार आहोत. तुम्ही केलेले काम चांगले असेल असे गृहित धरतो आमच्या दत्तवाडीच्या विषयाचा नक्की विचार करावा. त्यात थोडे काही चान्सेस असतील तर त्याचा नक्की विचार करावा.

**मा.विलास नांदगुडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ताथवडे डि.पी.चा विषय याठिकाणी सभागृहात चर्चेसाठी आलेला आहे. याठिकाणी नियोजन समितीने काही बदल केलेले आहेत. त्या बदलांना आमचा याठिकाणी विरोध आहे. कारण तुम्ही पाहिले असेल, १९ नंबरचे आरक्षण आहे. तिथे प्राथमिक शाळा व खेळाच्या मैदानाचे आरक्षण नियोजन समितीने त्याचा रिमार्क मारला आहे. प्राथमिक शाळेचे आरक्षण मोठ्या रहदारीच्या रस्त्यावर योग्य वाटत नाही. मग कोणी कुठेतरी नदी कडेला करणार का. जिथे रस्ता असेल तिथेच शाळा पाहीजे. का नाल्यापाशी शाळा करायची म्हणून या मुद्याला विरोध आहे. ही जागा रहिवासी विभागात कन्व्हर्ट करा हे योग्य नाही. २) २१ नंबरचे आरक्षण – तिथे माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान असे आरक्षण आहे. याला काय रिमार्क मिळाला आहे की, माध्यमिक शाळेचे आरक्षण काढून टाका. म्हणजे कोणी शिकलेच नाही पाहीजे. कोणी खेळलेच नाही पाहीजे. मैदान नको असे म्हटले आहे. त्याचे रहिवासी विभागात रुपांतर करा. टाऊन प्लॅनिंगच्या लोकांनी या भागात किती वस्ती होईल, कसे रस्ते पाहीजेत, किती आरक्षणे पाहीजेत. संपूर्ण कमिटीने अभ्यास करते, त्या पद्धतीने आरक्षणांचे नियोजन करते. इथे शाळाच नको असे म्हटले आहे. कारण कोणी शिकलेच नाही पाहीजे. अनेक ठिकाणी आयुक्तांनी चांगला विषय आणला आहे. लोक पार्किंग करुन जातात, दंड मारला पाहीजे हे योग्य आहे. पार्किंग पाहिजे. इतकी लोकसंख्या वाढली आहे. हजारो गाड्या तासन तास अडकून पडतात. अशा ठिकाणी वाहनतळ पाहीजे. नियोजन समितीने डी.पी. तयार केला. क्र.२५मध्ये सांगितले आहे, वाहन तळाची जागाच काढून टाका. वाहने लावायची नाहीत. त्यांनी उत्तर दिले, रस्त्यावर वाहने लावा. कसाकाय अभ्यास करतात. क्र.२६ नंबरचे बघा. रिटेलसाठी स्पर्धा चालते. अनेक परदेशी कंपन्या भारतात येतात. त्यांच्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली पाहीजे. असे सेंट्रल लेवलवर ठरते आहे. यांनी सांगितले रिटेलचे रिझर्वेशन काढून टाका. त्याची आवश्यकता नाही. ही जागा रहिवासी विभागात कन्व्हर्ट करा. ३२ नंबरचा तशाच पद्धतीचा विषय आहे. माध्यमिक शाळा व खेळाचे मैदानाचे आरक्षण वगळूनच टाका. मुले टि.व्ही पुढे जाऊन बसली पाहीजेत. कोणी शिकले नाही पाहीजे, खेळले नाही पाहीजे. अशा पद्धतीचे नियोजन इथे केले आहे. वाचनालय – वाचलनालयांची गरजच नाही. त्यांचे आरक्षण काढून टाका. ते सुद्धा रहिवासी भागांत कन्व्हर्ट करा. ४२

क्रमांकाच्या विषयात – एक जमिन मालकाचा विचार केला गेला आहे. चांगला निर्णय घेतला आहे. त्याबद्दल नियोजन समितीचे अभिनंदन करतो. याठिकाणी एवढे विषय करतो. वास्तविक पाहता हा डि.पी. टाऊन प्लॅनिंग यांनी डिक्लेअर केला, त्यावेळी त्याबद्दल कोणतीही चर्चा नव्हती. सगळ्यांनी भदाणे मॅडम यांचे अभिनंदन केले होते. एका हुशार महिलेने चांगला डि.पी. आपल्यासमोर दिला आहे. असे वाटले खरोखर अभ्यासपूर्वक मांडला आहे. कोणावरही अन्याय केला नाही. आरक्षणे टाकताना शेतक-यांचा विचार केला आहे. असा पद्धतीचे वातावरण निर्माण झाले होते. ज्यावेळी महापालिकेने नियोजन समितीची नियुक्ती केली, त्यावेळी त्यांचे स्टेटमेंट आले. शेतक-यांच्या जागांवर आरक्षणे टाकली आहेत व बिल्डर लोकांना त्याठिकाणी साईड दिली आहे. प्रचंड प्रमाणात भदाणे मॅडम व त्यांच्या सहका-यांनी करप्शन केले आहे अशी बातम्या पेपरमधून वाचनात आल्या, त्यावेळी सर्वांच्या मनात पाल चुकचुकली. सगळीकडे हा विषय चर्चेला आला. भदाणे मॅडम यांनी यातून काहीतरी काळेबेरे केलेले आहे. नियोजन समितीने दुरुस्त करुन चांगला आराखडा समोर आणला असे त्यांचे स्टेटमेंट होते. परंतू त्यावर पूर्ण कळस झाला. पिपंरी चिंचवडचा बिल्डर आसवानी यांनी डायरेक्ट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली की माझ्याकडे नियोजन समिती ५ कोटी मागत आहे. एवढे मोठे करप्शन तिथे चालले आहे. बातमी आल्यानंतर सर्वसामान्य माणसात, शहरात वेगळी चर्चा होते आहे. आयुक्त साहेब, आज इथे सगळ्यांना वाचवण्यासाठी एक प्रामाणिक माणूस काम करतो आहे. याचे दूर्देव वाटते. आयुक्त साहेब वेगवेगळे विषय आणून शहराला शिस्त लावायचा प्रयत्न करत आहेत. ९१,००० मिळकती नोंदवल्या गेल्या नव्हत्या. लबाड लोक बांधून राहत आहेत. भाडे घेत होते. महापालिकेचे पाणी वापरत होते. त्या लोकांना या माणसाने शोधून शोधून काढले, त्यांच्यावर टॅक्स लावायचा प्रयत्न केला. सगळे विषय इथे आले. अनधिकृत पार्किंग करतो त्याला दंड मारण्याचा विषय आला आहे. एक डॉक्टर माणूस मास्तरचे काम करतोय. चांगले घडवायचं काम करतोय. त्याला सुद्धा बदलण्याचा घाट इथे घातला जातोय. यासाठी आम्ही इथे प्रचंड आंदोलन करु. हे सुद्धा मुद्दाम इथे सांगायचे आहे. नियोजन समितीकडून ज्या चुका झाल्या असतील तर त्या पुन्हा दुरुस्त करा. चांगला आराखडा करा. जेणेकरुन समाजाचा आणि पिंपरी चिंचवड शहराचा फायदा होईल.

**मा.जावेद शेख** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,आजच्या या विषयाला माझा विरोध नाही. परंतू आमचे सहकारी मा.उल्हास शेट्टी यांनी दत्तवाडीतील आरक्षण क्रमांक ५४८ बद्दल विषय मांडला. हा विषय माझ्या प्रभागातील आहे. बरेच दिवस शेट्टी साहेब व मी मिळून त्या नागरीकांशी चर्चा करतोय. काय उपाययोजना करता येतील यासाठी आमचे प्रयत्न चालू आहेत. यासंदर्भात आयुक्त साहेबांच्या केबीनमध्ये २/३ दिवसांपूर्वी मूळ जमिन मालकांना आणले होते. सर्वांनी विनंती केली होती, हे लोक सर्वे नंबर

मध्ये २०० मीटर आतमध्ये हस्तांतर करण्यासाठी तयार झाले आहेत. माझी आपल्याला विनंती होती, या सगळ्या गोष्टींसाठी वेळ जाणार आहे. काल तुमचा अधिकारी आला. त्यांनी आढावा घेतला. आलेख पाहिला. परंतू अजूनपर्यंत त्यांनी माझ्यासमोर आराखडा ठेवला नाही. मला कळाले नाही. अजून ही जागा दाखवतात, त्या जागेत आरक्षणाची पूर्तता पूर्णपणे होणार का नाही. २१ तारखेला त्यांच्यावर कारवाई होते आहे. माझी मनापासून विनंती आहे, तुम्ही तुमच्या कर्मचा-यांना बांधकाम काढून घ्या म्हणून वेळ देताय. या नागरीकांना वेळ का देत नाही. पेपरमध्ये वेळोवेळी बातम्या आल्या. नागरीकांना कोणी वेळ देत नाही. त्यावेळी उत्तर दिले होते, १८ तारखेला पाहू. आज मिटींग होईल. सोमवारी पुन्हा जी.बी. आहे. तुमच्यासमोर कधी येणार, तुम्ही कधी पाहणार. कधी करणार. माझी आपल्याला विनंती आहे, सध्या या कारवाईला थांबवावे. खरोखरच एखाद्या माणसाला प्रतिनिधी करुन दुसरी जागा हस्तांतरीत करण्यासाठी मनधरणी करतोय. ते देखील तयार झाले आहेत. ज्याप्रमाणे नागरीकांची घरे तुटणार, त्याप्रमाणे त्यांचे सुद्धा घर तुटणार आहे. आज हे नागरीक इतके हतबल झाले आहेत. काही जण कोर्टात धावायचा प्रयत्न करत आहेत. कोणाकोणाच्या हातापाया पडत आहेत. मूळ मालकाच्या हातापाया पडतात. मूळ मालकाला चर्चा करण्यासाठी वेळ दिला नाही. नागरीकांची जी साठगाठ बनली त्यात दुरावा निर्माण होईल. परंतू यासाठी एक निश्चित स्वरुपाचा वेळ द्यावा लागणार आहे. तो आम्हाला मिळावा. हा आमचा अधिकार आहे. आरक्षण १९९५ ला पडले होते. १९९७ नंतर बांधकामांना सुरुवात झाली. ती २००७ पर्यंत होत राहीली. त्यावेळी आपला अधिकारी वर्ग झोपला होता का? काय करत होता. स्थापत्य विभागातील जे कार्यकारी अभियंता होते, नागरीकांना सांगायचे हे त्यांचे काम होते. इते बांधकाम कराल तर भविष्य काळात पाडणारच एवढे सुद्धा हे सांगू शकले नाहीत. माझी मनापासून विनंती आहे, आपल्या अधिका-यांना आपण जी सूचना केली, हे पुढे थांबवा. परंतू नागरीकांच्या वतीने मी विनंती करतो, काही झालेतरी ही २१ तारीख वगळता पुढील महिन्यातील तारीख ठेवावी. यात ४/८ बंधू भगिनी आहेत. मुख्य माणूस तयार झाला आहे. नागरीकांच्या वतीने पुन्हा एकदा आपण या गोष्टी ऐकाल. महापौर साहेब, पुन्हा एकदा विनंती करतो, आपण आयुक्त साहेबांना सूचना द्याव्यात.

**मा.विमल जगताप** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या ताथवडेच्या विषयात खरोखरच मागासवर्गीयांवर अन्याय होतो आहे. आत्ताच त्या भागातील नगरसेवक मा.शेखर ओव्हाळ यांनी सांगितले. सातबारावर महार वतनाच्या जागा वगळून आरक्षणे टाकली आहेत. ही आरक्षणे सोडून ठेकेदार पद्धतीने जो प्रकार चालले आहे. हा खरोखरच मागासवर्गीयांवर अन्याय झाला आहे. मा.शेखर ओव्हाळ यांना सुद्धा विश्वासात घेतले पाहीजे होते. हा चाललेला कारभार कुठेतरी थांबला पाहिजे.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर ताथवडे डि.पी.च्या विषयात संपूर्ण सभागृहाचे व संपूर्ण शहराचे वेगळे लक्ष लागले आहे. काय गोलमाल आहे यात. काय आर्थिक व्यवहार झाला आहे, त्यासंदर्भात सातत्याने वृत्तपत्रामध्ये येणा-या बातम्या, या अनुषंगाने ताथवडे परिसरात राहणारा नागरीक असेल, पिंपरी चिंचवड शहरात राहणार नागरीक असेल तो सातत्याने या डी.पी बाबतीत शंका उपस्थित करतो आहे. खरेतर ज्या-ज्या वेळी हा विषय सभागृहात आला, त्यावेळी पहिले प्रथम मी या विषयाला विरोध केला होता. आयुक्त साहेब, दि.२०/१/१२ रोजी मंजूरी घेण्यासंदर्भात ज्यावेळी पहिले प्रथम सभागृहात विषय आला, त्यावेळी देखील १के खाली विषय आला होता. या विषयाला मंजूरी देण्यासंदर्भात विषय आला, तो देखील १ के खाली विषय आला. ज्यावेळी १के खाली विषय सभागृहात आला, त्यावेळी त्याला प्रखरपणे विरोध केला होता. त्यावेळी मी सांगितले होते, शहर सुधारणा समितीतून हा विषय मा.महापालिका सभेसमोर येऊ द्या. तुम्हाला एवढी घाई झाली होती. दि.१९/१०/१३ ला मा.महापालिका सभेत विषय आला होता. त्याला जवळपास ३ महिने झाले आहेत. विषय आणायची एवढी घाई केली. विषय आणला. हा विषय १के खाली आला नसतातर त्यावेळी त्यावर सखोलपणे सन्माननियांनी चर्चा केली असती. तुमचे पक्षाचे सदस्य शंका उपस्थित करतात. मा.शेखर ओव्हाळ या स्थानिक नगरसेवकाला विश्वासात घेतले नाही असे ते सांगतात. मा.विलास नांदगुडे यांनी तर समितीवर जाहिरपणे आरोप केले आहेत. कदाचित त्या आरोपांत तथ्य असेलही. ते सक्षम आहेत. ते स्थायी समितीचे अध्यक्ष होते. जवळपास ते महापालिकेचे ज्येष्ठ नगरसेवक म्हणून काम करतात, हे न कळण्याइतके ते लहान नाहीत. ते माझ्या शेजारी बसतात त्यामुळे शंका येऊ शकते. हा डि.पी. आयुक्तांच्या लॉकरमध्ये ६ महिने ठेवण्यात आला होता. नियोजन समितीच्या माध्यमातून त्यात फेरफार करायचे होते. म्हणून बदल घडायला सुद्धा कोण भेटतो का, कोण येऊन मिळतो का म्हणून सह्या झालेल्या असताना देखील आयुक्तांच्या तिजोरीत हा डि.पी. ६ महिने पडून होता. मग शंकेची पाल चुकचुकणार नाही का. मी जाहीरपणे सांगतो, राज्य शासनातील चिल्लाळ नावाच्या सर्व्हेअरने कोट्यावधी रुपये गोळा करायचे काम डी.पी.च्या माध्यमातून त्याने केलेले आहे. नियोजन समितीसमोर त्याचे नाव घेऊन सांगितले तरी कोणीही त्याच्यावर आजपर्यंत कारवाई केलेली नाही. जोपर्यंत तो सापडत नाही, त्याला पकडत नाही, तोपर्यंत त्याच्यावरील भ्रष्टाचार सिद्ध होणार नाही. एखादा सन्मा. सदस्य जेव्हा आरोप करतो, समितीपुढे देखील जाहिरपणे सांगितले. या डि.पी.चे काम करणा-याच्या संपत्तीची चौकशी करा. मग त्यांची चौकशी का केली नाही. मग या सभागृहातील कोणातरी सदस्यावर आरोप होतो. मुळात हा डि.पी. करत असताना मोठ्या प्रमाणावर प्रशासनाने चूक केली आहे. मा.योगेश बहल यांच्या शेजारी मी जाऊन बसलो होतो. पत्रकारांना वाटले मी काही पाहतो आहे. ज्या उपसूचना मांडणार आहेत ते पाहतोय. जो बदल झाला हा डि.पी. चुकीच्या पद्धतीने केला आहे.

नगररचना विभागाने चुकीचे काम केले आहे. जाहीर आरोप आहे, प्रशासनाचे चुकले नसते, चुकीचा कारभार केला नसतातर, सदस्य सुद्धा आरोप करायला धजावले नसते. ताथवडेमध्ये ग्रामपंचायतीतील अनेक घरे आहेत. तिथे इंडस्ट्रीयल झोन टाकला. लोकांच्या राहत्या घरांवर रस्ता टाकला आहे. सदस्य आरोप का करणार नाही. समितीकडे न्याय मागायला का जाणार नाहीत. त्यांच्याकडे न्याय मागण्यासाठी गेल्यावर काहीतरी झाले असेल. मी समितीला सुद्धा दोषी ठरवतो. बाहेर जे आरोप होत होते, समितीने त्याला देखील त्याच वेळी उत्तर द्यायला पाहीजे होते. डि.पी. करताना नगरविकास विभाग चुकला आहे, प्रशासन चुकले आहे. ए.सी.त बसून, पंचतारांकीत हॉटेलमधे जाऊन त्याची रचना केली आहे. डि.पी.चा विषय १के खाली सादर करताना त्याचा नकाशा देखील दाखवला नाही. हे लपून राहीलेले नाही की हा नकाशा बाहेर हजार दोन हजार रुपयांना मार्केटमध्ये मिळतो आहे. तुम्ही काही लपवून ठेवले नाही. पाहीजे तसा मिळतो आहे. संबंधित विभागाच्या प्रमुखांशी हात मिळवणी करुन ज्याचा कोणी कर्ताधर्ता नाही, जो कुणापर्यंत पोचू शकत नाही अशा गरीबांच्या जागेवर रिझर्वेशन टाकायचे काम झाले आहे. डि.पी. करताना तो पारदर्शक झालेला नाही. गरीबाला, शेतक-याला न्याय मिळालेला नाही. डि.पी. आवर्जून बिल्डरसाठी झाला आहे. बिल्डर लोकांनी त्यात कोट्यावधी रुपये ओतले आहेत. ज्यांनी माल घेतला आहे, त्यांचे भले झाले आहे. रहिवास भागातील नागरीकांचे व शेतक-यांचे भले झालेले नाही. आयुक्त साहेब, या संदर्भात सखोलपणे चर्चा झाली आहे. बहुमताच्या जोरावर इथे डि.पी.ला मंजूरी मिळेल. पण त्याकरिता यात मला राजकारण बिल्कूल करायचे नाही. परंतू चुकीच्या पद्धतीने डि.पी. झाला आहे हे त्या भागाचे सन्मा.नगरसेवक सभागृहात सांगतात ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती लपवायचे कारण नाही. पशुसंवर्धन खात्याची जवळपास १०० एकर जागा यशदासाठी रिझर्वेशनसाठी ठेवली आहे. त्यासाठी पशुसंवर्धन खात्याच्या जागेतील रस्ता वळवला आहे. म्हणून केवळ चुकीच्या पद्धतीने काम होत असेल तर ते चुकीचे होते आहे. चुकीच्या कामाला आम्ही विरोधक असलो, आम्ही संख्येने कमी असलो तरी याठिकाणी ख-या अर्थाने या प्रश्नी वाचा फोडायचे काम आम्ही करत असतो. वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी माध्यमे देखील गरीब माणसावरील अन्याय दूर करण्यासाठी, भ्रष्टाचार बाहेर काढण्यासाठी काम करतात. त्यांनी दिलेल्या बातम्या चुकीच्या नाहीत असे माझ्यासारख्या सदस्याला सांगावे लागते. यावर गांभिर्याने विचार व्हावा. आपल्या हातात काही राहीले नाही. पण आपल्या हातात काही राहीले नाही असे म्हणून चालणार नाही. महापालिकेचे आयुक्त म्हणून आपली बदली झाली नाहीतरी, बहुमताच्या जोरावर या विषयाला मंजुरी मिळाली तरी यावर महापालिकेचे आयुक्त म्हणून अभिप्राय देताना, अहवाल देताना आपण सक्षमपणे आपला अभिप्राय द्यावा एवढेच या निमित्ताने सांगतो.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बहुचर्चित ताथवडेचा विकास आराखडा ब-याच कालावधीनंतर सभागृहात मंजूरीसाठी ठेवण्यात आला आहे. मा.महापौर साहेब, या विकास आराखड्यासंदर्भात ज्या-ज्या काही बातम्या वर्तमानपत्रांमध्ये आल्या होत्या, ज्या ज्या काही हरकती/सूचना प्राप्त झाल्या आहेत, त्यावर मला सभागृहाचे लक्ष वेधायचे आहे. सर्वप्रथम प्रशासनाने ज्या काही भयंकर चूका केल्या आहेत त्याकडे मी लक्ष वेधू इच्छिते. त्यावेळी वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती की हा १,००० कोटींचा स्कॅम्प आहे. काही इलेक्ट्रॉनिक मिडीया यांनी सुद्धा यासंदर्भात मोठमोठ्या बाईटस् दिल्या गेल्या. एवढा मोठा स्कॅम्प म्हटल्यानंतर अर्थातच आमच्या पक्षाचे सर्व नेते, सर्व राजकीय मंडळींचे याकडे लक्ष वळाले. आपले नगरसेवक,स्थानिक पदाधिकारी त्याठिकाणी काय करत आहेत अशी विचारणा झाली. त्यात सगळ्यात महत्वाचे काम टाऊन प्लॅनिंगच्या लोकांनी केले आहे. जे आरोप झाले, दोन नकाशे झाले त्याचा खुलासा इथे व्यवस्थित झाला पाहीजे. तत्कालिन आयुक्त श्री.आशिष शर्मा असताना जो नकाशा तयार करण्यात आला तो त्यांच्या कस्टडीत असताना तो बाहेर गेला कसा, याला कोण जबाबदार याची प्रथम चौकशी झाली पाहीजे. तो नकाशात व आत्ता दिलेल्या ड्राफ्ट नकाशात काय बदल झाले याचा सुद्धा खुलासा याठिकाणी झाला पाहीजे. दूध का दूध व पाणी का पानी होईल. कोणी काय बोलतेय कोण काय बोलतेय यात खरे काम करणारे नामानिराळे राहतील. खरा दोषी कोण. आयुक्त साहेब, झारीतले शुक्राचार्य शोधून काढायचे काम आपले आहे. आपली बदली होणार, झाली माहित नाही तरी ताथवडे डि.पी. चा निर्णय होईपर्यंत आपण जाऊ नये अशी आमची विनंती आहे. विकास आराखड्यात सर्वे नं. ९९ हा सगळ्यात मोठे क्षेत्र, सांगण्यात आले ते रहिवासी क्षेत्र केले गेले. कृषि उत्पन्न बाजार समितीची सगळ्यात मोठी लॅण्ड इथे होती. ही टोटल लॅण्ड किती आहे. त्यावर किती आरक्षणे इथे पडली आहेत. किंवा ही जागा यलो करण्यामागे प्रयोजन काय आहे, त्या लॅण्डसंदर्भात मा.शासनाकडे मा.उच्च न्यायालयात काही खटले चालू आहेत का, जर खटले चालू असतील तर हे बदल का केले. एवढे डेअरींग कोणी केले, हा सगळा भाग रहिवास केला हा माझा मूळ प्रश्न आहे. दुसरे मा.उल्हास शेट्टी यांनी मघाशी सांगितले, काही ठिकाणी इंडस्ट्रीयलचे रिझर्वेशन पडले. काही इमारतींत सामान्य नागरीकांनी फ्लॅट विकत घेऊन ते तिथे राहतात. त्यांना कम्प्लिशन आहे. बिल्डींग परमिशन आहे अशा इमारतींवर इंडस्ट्रीयलचे रिझर्वेशन कसे काय टाकले आहे. इथे कानाडोळा कसे काय झाला, यासाठी काय उत्तर शोधले याची कारणमिमांसा तुम्ही केली पाहीजे. टाऊन प्लॅनिंगच्या तत्कालिन अधिका-यांनी, तत्कालीन आयुक्त होते त्यांनी काय केले याची सुद्धा चौकशी झाली पाहीजे. आम्ही पक्षाच्या वतीने फार मोठ्या प्रमाणात हरकती/सूचना दिल्या गेल्या. मा.नियोजन समितीने त्या सूचनांचा विचार करुन काही बदल देखील केले. त्यासाठी त्यांचे मनापासून आभार मानेल. आमच्या या सूचना/हरकतींचा विचार करुन बदल केले गेले. परंतू हे बदल करत असताना ज्या

सूचनांच्या आधारे नियोजन समितीमध्ये जी ३ तज्ञ मंडळी आणि ३ आमचे नगरसेवक आहेत. परंतू त्या नगरसेवकांना टेक्निकल ज्ञान असण्याचे काही कारण नाही. जो रेशियो आहे त्याप्रमाणे सांगितले गेले. Proposed land use analysis - residential area 311.64 hectre area, commercial 30.39, industrial 4.30, Public 105.27, Public utility 5.79, Transport & communication 88.48, Garden, Play ground 8.40 , total developed area 609.9. & non-develop area 17.08, water body area 10.77, total area 637.75 हा रेशियो आहे. याप्रमाणे डेव्हलपमेंट प्लॅन बनवला गेला. नियोजन समितीतील तज्ञ लोकांवर माझा प्रामुख्याने आरोप आहे की, ज्या हरकती/सूचना घेतल्या गेल्या, त्या लक्षात घेतल्या. चुकीच्या पद्धतीने सुद्धा काम केले आहे. हे त्यांचे काम होते, जरी कोणीही आला त्याठिकाणी त्याने सांगितले आम्हाला इथले आरक्षण बदलायचे आहे. त्या पाठिमागे शेतकरी नक्की आहेत का, हे तपासणे या तज्ञ लोकांचे काम होते. तसे करताना इथे दिसले नाही म्हणून माझी तज्ञ लोकांवर प्रथम हरकत आहे. हे रिटायर्ड असले तरी ते शासनाचे अधिकारी आहेत. त्यांच्यावर पण कारवाई झाली पाहीजे. त्यांची पेंशन, जप्त केली पाहीजे. ग्रॅच्युईटी,प्रॉव्हिडंट फंड सगळे शासनाने रद्द केले पाहीजे. दि.७ मार्च २०१३ रोजी ताथवडे गावाचा डि.पी. प्रसिद्ध झाला होता. दि.४ एप्रिल २०१३ पर्यंत सूचना हरकती घेण्यात आल्या. नियोजन समितीने दि. ११ ऑक्टोबर २०१३ रोजी तो सादर केला. नियमाप्रमाणे डिसेंबर २०१३ पर्यंत त्यावर निर्णय घेणे आवश्यक होते. परंतू त्यावेळी नगररचना विभागाने तिथे चुकीचे काम केले. त्यावर आरोप प्रत्यारोप झाले. बाजारात एक एकरला ४० लाखाचा भाव फुटला. ज्यांना काही कळत नाही त्यांनी सुद्धा त्यात आपली पोळी भाजण्याचा प्रयत्न केला. त्या भागातील जे स्थानिक नगरसेवक आहेत त्यांना मात्र त्याठिकाणी काहीच माहित नाही, त्यांना काही कळाले नाही. ज्या बांधकाम व्यावसायिकांच्या जागांवरील आरक्षणे वगळली, त्याबद्दल सुद्धा मार्केटमध्ये चर्चा सुरु आहे. ज्या अनुषंगाने त्यांचे सातबारे दाखवले आहेत, ज्या बांधकाम व्यावसायिकांची नावे त्यावर आहेत, ते सर्वे नंबर आरक्षणातून वगळले आहेत. त्यात प्रामुख्याने गुरुमुख सुखवानी, भोजवानी, मथानी, घनश्याम आसवानी. कुठलीतरी घनश्याम आसवानीची ऑडियो क्लिप ऐकली होती. ते बोलतात असे त्यात ऐकले गेले आहे. आम्ही आर्थिक व्यवहार केला आहे असे ते सांगतात. यांच्यावर या सगळ्यांवर फौजदारी दाखल झाली पाहीजे. घनश्याम आसवानी यांची १०,००० चौ.मी. क्षेत्र आहे, गुरुमुख सुखवानी यांची १०,००० चौ.मी. एकूण जागा आहे. मा.विलास नांदगुडे यांनी सागिंतले त्यांच्यासाठी शाळेचे आरक्षण डिलिट केले आहे. त्याच्या सातबाराचे मालक गुरुमुख आसवानी, सुखवानी आहेत. सर्वे नं.१३६,१३७,१३९,१४०मध्ये नियोजन समितीने हे आरक्षण स्थलांतर केले आहे. या आरक्षणात सुद्धा इंडस्ट्रीयल झोन आहे. एका ठिकाणी फार्मसी कॉलेज, दुसरीकडे रेसिडेन्शियल भाग त्या सर्वे नंबरमध्ये आहे. जेव्हा हे शिफ्ट करतोय, त्यावेळी त्यांच्यावर अन्याय होत नाही का? या जागेची बाजारभावातील किंमत मला माहित

नाही. मी बिल्डर नाही. माझा कुठेही सातबारा नाही. पण आज तिथे १० कोटी इतकी बाजारभावातील किंमत आहे. तिथे रहिवास झोन म्हणून आपण बदल करतोय. नियोजन समितीतील या तज्ञ लोकांनी ही शाळा व शाळेचे मैदान शिफ्ट केले आहे. याठिकाणी उद्योग क्षेत्रातील वाहनतळ रद्द केले आहे. तो रहिवास भाग केला आहे. हे सुद्धा मा.विलास नांदगुडे यांनी मघाशी सांगितले होते. आयटूआर लागू असताना हा भाग इंडस्ट्रीयल होतो. आपला रेसिडेन्शियलचा प्रिमियम बुडतोय. त्यामुळे महापालिकेचे सुद्धा आर्थिक नुकसान होते आहे. आरक्षण क्र.२५ मध्ये – वाहनतळाची सर्वे नं १३६, १५७ एकूण क्षेत्र ४००० चौ.मी. त्याचा आजचा बाजारभाव ४ कोटी अंदाजे आहे. मोहिनी बिल्डर, मतानी बिल्डर यांच्या नावाचा उल्लेख इथे झाला आहे. त्याला कण्णू आसवानी या बिल्डरचे नाव म्हटले आहे. दुसरे नाव साईसर्व्हिसचे खासदार सुरेश कलमाडी यांचे बंधू मुकेश कलमाडी यांच्या नावाने आहे. वाहनतळाचे आरक्षण पूर्णपणे रद्द करत असताना का रद्द केले तर तिथे रस्ता नाही. आधी तिथला २४ मी.चा रस्ता रद्द केला नंतर तिथे रस्ता नाही म्हणून वाहनतळाचे आरक्षण रद्द केले. किती तांत्रिक, शार्प बुद्धीचे लोक आहेत. हा रस्ता मुंबई-बेंगलोर एक्सप्रेस हायवेला कनेक्ट होऊन गावात आला आहे. त्या रस्त्यात जी घरे येतात. घरे असतील तर रस्ता शिफ्ट होऊ शकतो डायव्हर्जन देऊ शकतो. मग कलेक्टर एन.ए. असून सुद्धा त्रिवेणी नगरमध्ये आपण रस्त्यासाठी २०० घरे पाडतोय. का तर रस्ता झाला पाहीजे. हा विरोधाभास नाही का. डेव्हलपमेंट करत असताना या शहरातील अनेक घरे पाडली आहेत. मग ते नागरीक नाहीत का. मग याठिकाणी कोणासाठी, कशासाठी या गोष्टी केल्या गेल्या असा माझा प्रश्न आहे. या जागेवरील वाहनतळाचे आरक्षण वगळायला आमचा विरोध आहे. झोनिंग बदलून सर्वे क्र. ११२, १७३ व १७४ मधील ब्ल्यू लाईनपलीकडील ग्रीन झोन रहिवास क्षेत्र करावे असे म्हटले आहे. सर्वे क्र. १७३, १७४ याचे मालक बांधकाम व्यावसायिक आहेत. मेहता, सुखवानी प्रा. लि., मतानी, लुंकड, मारवाडी, गादीया अशी सगळ्यांची नावे आहेत. त्यांचे सातबारे मी बरोबर आणले आहेत. आरक्षण क्र. १३ चा मल्टीपरपज बदलण्यात आला. इथे कमिटीने सांगितले, घरे आहेत. टाऊन प्लॅनिंगमध्ये गेले त्यांना विचारले तिथे घरे असतील तर त्याचा बीएलयू नकाशा दाखवा. याठिकाणी बीएलयू नकाशा आहे. इथे आरक्षणात कुठेही घरे नाहीत. गुरुमुख दास यांनी इथे घरे दाखवली. इथे सुद्धा कुठे घरे दिसत नाहीत. अशा प्रकारच्या शिफारसी करुन दिशाभूल केली गेली आहे. सर्वे नं. १३ १४ मल्टीपरपजचे आरक्षण बदलले आहे. ही सगळ्या परिसरातील आरक्षणे सर्वे नं. २७ इथे वाहनतळाचे आरक्षण टाकले गेले आहे. वाहनतळाच्या शेजारी सर्वे नं. ४२ व ६१ मध्ये रिटेल मार्केट, सगळा २५ एकरचा भूखंड रहिवासी भाग करण्यात आला आहे. या भूखंडाची बाजारभावातील किंमत ९० कोटी आहे. शेजारी वाहनतळाच्या जागेवर कमर्शियलचे आरक्षण टाकले गेले. जेणेकरुन बिल्डरची बाजारभावातली किंमत वाढली पाहिजे. सगळ्यात जास्त किंमतीने जमिनी विकल्या

गेल्या पाहीजेत अशी सोय करण्यात आली आहे. सिंगापूर मार्केटच्या धर्तीवर मार्केट व्हावी अशी सगळ्या इथल्या आमदारांची, खासदारांची, सगळ्या पदाधिका-यांची, अजित दादा यांची सुद्धा इच्छा होती. परंतू त्यांना त्याठिकाणी विचारले नाही. या परिसरातील स्थानिक व्यावसायिकांसाठी रिटेल मार्केट झाली असती, त्यांना संधी मिळाली असती. त्याचा सुद्धा रहिवास झोन म्हणून बदल केला आहे. त्या जागेचे मालक त्याचे नाव तुम्हाला सांगते. भागीदार कृष्णकुमार शहा, संजय हरिश मिरचंदानी, संजीवनी एंटरप्रायजेसचे जैन, अगरवाल अशा बांधकाम व्यावसायिकांच्या नावाने तिथे सातबारे आहेत.सर्वे नं. ६१ रहिवासी केला आहे. त्याठिकाणी वाहनतळाचे आरक्षण आहे ते ३६,००० वरुन १२,००० कमिटीने केले आहे. मल्टीपर्पज आले, कमर्शियल रिझर्वेशन टाकले. नवीन अमेंडमेंट प्रमाणे दि.७ एप्रिल २०११ प्रमाणे नियोजन समितीवर हरकत घेण्याचा अधिकार शासनाकडे घेतला आहे. त्यामुळे शेतकरी तुमच्याकडे दाद मागू शकत नाहीत. पवार, कुंभार, जगदाळे, लोंढे या शेतक-यांचे सातबारे तिथे आहेत. त्यांच्यावर अन्याय होतो आहे. त्यांनी कुठे दाद मागायची. रहिवास करायचा असेल तर सूचना आहे. रहिवासी करायचे असेल तर सर्वे क्र. २७ रहिवासी क्षेत्र करा. त्याठिकाणचे शेतकरी तरी आनंदी होतील. बिल्डरांच्या सोयीसाठी नवीन रस्ता सूचवला आहे. जो बिल्डरच्या फायद्याचा आहे. बाकीचे अनेक रस्ते डिलिट केले गेले आहेत. सर्वे क्र. ६३, ६४ चे उद्यान क्षेत्र १०,००० चौ.मी. त्याची अंदाजे किंमत १० कोटी आहे. हे उद्यानाचे आरक्षण पूर्णपणे डिलिट केले आहे. नागरिकांना सोयी-सुविधा मिळाव्यात. यासाठी काही आरक्षणे मानांकनाप्रमाणे करायला पाहीजेत. परवा ई.डब्ल्यू.एस.चे उद्घाटन होत असताना मा.मुख्यमंत्री व मा.दादांनी देखील सांगितले, या परिसरात एवढी घरे होत आहेत तर नागरीकांना सोयी-सुविधा दिल्या पाहिजेत. इथे गार्डन करा, शाळा बांधा, हॉस्पिटले असे एकिकडे नेते मंडळी सांगत असताना, विकास आराखड्यातून सगळी आरक्षणे डिलिट करतोय. नियोजन समितीने कारण सांगितले, इथे घरे आहेत. नागरीकांचे एकही घर मलातरी दिसले नाही. सातबा-यावर नावे सांगते. अथर्व, स्वस्तिक – पटेल, गोयल, ओपल प्रॉपर्टीज् संजय मिरचंदानी हे सगळे बांधकाम व्यावसायिक त्या प्रॉपर्टीचे मालक आहेत. आरक्षण क्र.१९ – प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान सर्वे क्र.१४६, १४७ क्षेत्र ८,००० चौ.मी. – याची किंमत अंदाजे ८ कोटी आहे. पूर्णपणे रद्द केला. हे क्षेत्र रहिवास सुद्धा झाले पाहीजे. बीआरटीच्या मोठ्या जंक्शनवर ही शाळा असल्यामुळे ती रद्द केली आहे. शाहू कॉलेज कुठे आहे, इंजिनिअरींग कॉलेज कुठे आहे हि सगळी कॉलेज हाय-वे वर आहेत. विद्यार्थ्यांना येण्याजाण्यासाठी सोय व्हावी म्हणून केले असेल. त्या कॉलेजला बॅक एन्ट्री देऊ शकतो. ते शिफ्ट न करता पूर्ण डिलिट करायला, यलो करायला आमचा विरोध आहे. सर्व सातबारे व चार्ट, यासंदर्भातील समितीच्या शिफारसी आपल्याकडे सगळे सोपवले आहे. पुन्हा एकदा आपल्याकडे देत आहे. यासंदर्भात मा.मुख्यमंत्र्यांच्या ऑफिसला तक्रार केली आहे. माझा विरोध आहे. शिवसेनेने यावर

हरकती घेतलेल्या आहेत. नंतर अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर गटबाजी होते. वर्तमानपत्रातून चुकीच्या बातम्या पसरवायचा कोणाचा काय हेतू आहे ते समजत नाही. आम्ही कोणाला सांगून करत नाही. माझा या संपूर्ण डि.पी.ला विरोध राहील. असाप्रकारे चुकीचे काम झाले असेलतर रद्द झाला तरी चालेल. नाशिकचा डि.पी. रद्द केला आहे. तिथे मनसेची सत्ता आहे. पुण्याच्या डि.पी.ची केस मा.उच्च न्यायालयात गेली आहे. वर्ष झाले. आपल्या हद्दीतील एका गावाचा डी.पी. आणि त्याची चर्चा सगळ्या महाराष्ट्रात, भारतात होते, आपली बदनामी होते. आपल्याला अधिकार नाही परंतू या शहराचे आयुक्त म्हणून, महापौर म्हणून, सभागृहाचे सदस्य म्हणून ही प्रत्येकाचीच जबाबदारी आहे. यात काही चुकीचे झाले असेल तर निश्चितपणे याची चौकशी झाली पाहीजे. आपल्याकडून तो स्टे गेला पाहीजे. नाहीतर आम्ही शासनात जाणार आहोत. प्रधान नगरविकास यांच्याकडे तक्रार करणार आहोत. सरकार थोडे दिवसांनंतर याचा निर्णय घेणार आहे. अन्यथा आम्ही कोर्टात जाऊ अशी याठिकाणी सूचना करते.

**मा.सुनिता वाघेरे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला महापौर साहेबांना एकच विनंती करायची आहे. आम्ही ताथवडे गावाच्या विकास आराखड्याच्या नियोजन समितीत ३ सदस्य होतो. आमच्याबरोबर शासनाचे ३ सदस्य होते. विकास आराखड्यात जे बदल केले आहेत ते विचारपूर्वक केले आहेत. ब-याच नगरसेवकांनी हरकती आणल्या होत्या. शाळा बदला, हाय-वे वर शाळा नको आहे. आम्ही एकंदर जागेवर जाऊन पाहणी केली होती. वेळोवेळी पेपरमध्ये निवेदन दिले होते. हरकती मागविल्या होत्या. शाळेचे आरक्षण काढायचे कारण एवढेच होते. तिथे आधीच शाळा अस्तित्वात आहे. ५०० कि.मी. अंतरावर दुस-या शाळेला परवानगी मिळत नाही. यामागे आमचा अजिबात हेतू नाही की, मुलांनी खेळू नये, शिकू नये. आम्ही सगळ्यांचा विचार करुनच हा आराखडा तयार केला आहे. नियोजन समितीचा आम्हाला अनुभव नाही. सगळ्यांनी आम्हाला नावे ठेवली आहेत. शेवटी मा.महापालिका सभेत निर्णय होणार आहे. महापालिका सभेने काय तो निर्णय घ्यायचा तो घ्यावा. हा विषय आपण मंजूर करावा अशी विनंती करते.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर कलम ३७ची कारवाई असू दे, नाहीतर ताथवडे गावचा डि.पी. असू दे, सार्वजनिकरित्या हरकती घेण्याचा पायंडा जर कोणी पाडला असेल तर मला स्वतःबद्दल प्रचंड अभिमान वाटतो की, या सगळ्याला मी सुरुवात केली आहे. अशा प्रकारच्या हरकती/सूचना मागविण्यासाठी नोटीसी प्रसिद्धी व्हायच्या काही जणांची ही दुसरी टर्म असेल, काहींची पाचवी टर्म असेल त्यांनी सांगावे, यापूर्वी अशा हरकती/सूचना घेतल्या होत्या का. तर याचे उत्तर नाही आहे. नाही असेच म्हणावे लागेल. कारण हरकती/सूचना मागवायच्या असतील तर तुम्हाला त्या विषयाचा अभ्यास लागतो. परंतू अभ्यास करत असतानासुद्धा या सगळ्या

डी.पी.चा अभ्यास करत असताना आम्हालासुद्धा ज्या संशयाच्या नजरेतून जावे लागले, आमची सुद्धा स्क्रिन टेस्ट झाली आहे. हे दूर्देवाने सांगते. एकानेही सांगावे, माझे त्यांना आव्हान आहे, कोणी पैसे घेतले, कसे घेतले तिथे सिमा सावळे इनव्हॉल्व्ह होती का, सत्ताधारी पक्षाने, माझ्या स्वपक्षियांना पण माझे यासाठी आव्हान आहे. ज्यावेळी शालजोडीतून मारतो, त्यावेळी ते आम्हाला कळत नाही इतके दूधखुळे आम्ही निश्चितच नाही. एखादा माणूस चांगले काम करत असेलतर त्याच्या पाठिशी उभे राहायचे. पण ते होत नाही. कोणाच्यातरी प्रसिद्धीवर जळायचे, कोणालातरी कमी लेखायचे म्हणजे मी मोठा होतो की काय ही भावना दूर्देवाने राजकारण्यांमध्ये आणि अधिका-यांमध्येसुद्धा रुजायला लागली आहे. माझी स्क्रिनिंग झाली, याबद्दल मला वाईट वाटत नाही. दूध का दूध, पानी का पानी मी करणारच आहे. सगळ्या सभागृहाला माहित आहे, हायकोर्टात कोण जाते. महापालिकेच्या बाजुने म्हणायला जाते. मी महापालिकेसाठी हायकोर्टात लढले बीआरटी संदर्भात व उत्पन्न बुडून नये म्हणून, पुण्याप्रमाणे बीआरटीसंदर्भात ४०० कोटी अडकून पडू नयेत म्हणून हाय़कोर्टाने निर्णय बदलायला सांगितला. हे माझे पहिले यश आहे. ताथवडे विकास आराखड्याचा विषय ज्यावेळी १के खाली दाखल झाला होता, त्यावेळी शिवसेना गटनेते श्री.श्रीरंग बारणे यांनी खरेतर पहिला आक्षेप घेतला होता. खरेतर त्यांच्याकडे दूर्लक्ष केले. त्यांच्याकडे दूर्लक्ष करुन आपण हा विषय १के खाली दाखल करुन घेतला. त्यावेळी खरेतर ताथवडे डि.पी. १के खाली का आला. हे विचारण्यासाठी माझ्यासहीत २/३ लोक सोडलेतर बाकी कोणी हालचाल केली नाही. परंतू त्यानंतर मात्र त्यावर नको त्या चर्चा व्हायला लागल्या. त्यावेळी हा विषय रितसर मंजुरीसाठी सभागृहापुढे आला असता तर मला वाटत नाही एवढी चर्चा आज घडतेय ती त्यावेळी घडली नसती. महापौर साहेब, ताथवडे प्रारुप विकास आराखड्याची केलेली कार्यवाही एमआरटीपी ॲक्ट १९६६च्या कलम २६नुसार करण्यात आली आहे. सदर नियोजन समितीची स्थापना एमआरटीपी ॲक्टच्या कलम २८ नुसार करण्यात आली आहे. कलम २८ काय सांगते – जर एखाद्या नियोजन समितीने अहवाल तयार केला असेल तर तो अहवाल संबंधित महापालिका सभेकडे सुपूर्द केला पाहिजे. त्यासाठी त्या नियमांत मा.शहर सुधारणा समितीकडे जाण्याची तरतूद नाही. त्यामुळे ज्यादिवशी हा विषय १के खाली महापालिका सभेपुढे आला. त्याच दिवशी खरेतर हा विषय १के खाली न आणता रितसर आणला असता तर त्यात निश्चितपणे वेगळे काही करायला आम्हाला संधी होती. बीएलयू,बीएलयूबद्दल खूप चर्चा झाली आहे. मोनार्च नावाच्या संस्थेने हा बीएलयू केला आहे. ही संस्था अत्यंत नामांकीत रेटींग संस्था आहे. संपूर्ण महाराष्ट्रात डि.पी. करणारी संस्था आहे. हा बीएलयू करताना मोनार्च संस्थेने महापालिकेला पत्र लिहिले आहे, भदाणे मॅडम यांनी इतके बदल सूचविले आहेत की संपूर्ण गावाचा बीएलयूच बदलतो आहे. इतके आक्षेपार्ह पत्र दडवण्यात आले आहे. किंवा त्याचे गांभिर्य कोणी घेतले नाही. पर्यायाने आपण घेतले नाही असे याठिकाणी म्हणावे

लागेल. मोनार्च संस्थेने सांगितले होते, बीएलयूत रोज उठून भदाणे मॅडम इतके बदल सूचवत असतील तर आम्हाला काम करणे अशक्य होईल. असे आयुक्तांना, भदाणे मॅडम यांना या संस्थेने पत्र दिले आहे. त्या फाईलमध्ये सुद्धा हे पत्र आहे. मग भ्रष्टाचार कोणी केला. नियोजन समितीत जर ३ सदस्य माझे नगरसेवक बंधुभगिनी असतील, रिटायर्ड लोक असतील, मा.माया बारणे या नवीन सदस्य आहेत, खूप हुशार आहेत. सुनिता ताईंची सेकण्ड टर्म आहे. मा.नवनाथ जगताप यांच्याबद्दल तर बोलायलाच नको. जगताप नाव असल्यामुळे, जगताप म्हणजे टीडीआर किंग म्हणून सगळ्यांना माहित आहे. त्यांच्या जगताप नावामुळे सगळेजण त्यांच्याकडे तसेच बघतात. यात कोणी भ्रष्टाचार करायचे ठरवले असते तरी करु शकले नसते. इतकी फूल प्रोव्हिजन डिडिटिपी भदाणे मॅडम यांनी केली होती. कोणाला किती मिळते, एकाला किती मिळते असे चालत असेलतर यासाठी जागेवर जायची गरज नाही. मा.नवनाथ जगताप व त्यांचे सहकारी यांना पाठिशी घालते असे नाही. परंतू जे सत्य आहे, ते सभागृहापुढे आले पाहीजे. एवढी चर्चा का करतो ते मला कळत नाही. गंमत सांगते, मला वाटते, याच्यावरच हा डि.पी. रद्द होऊ शकतो. ज्या-ज्या मंडळींना वाटले, आपण प्रशासनाला नवा डि.पी. करायला सांगू. या खेळाला सुरुवात करते.

महापौर साहेब, कलम २६ नुसार प्रारुप विकास योजना प्रसिद्ध करण्यात आली. ठराव क्र.२३७ अन्वये मान्यता देण्यात आली. सदर ठरावाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये मौजे ताथवडे या गावाच्या प्रस्तावित आराखड्यामध्ये सदर आरक्षणे रस्ते तत्सम सोयी सुविधा या हद्दीमध्ये कमाल ३ चटई क्षेत्र निर्देशांक वापरणे योग्य राहीले. याप्रमाणे आराखड्यातील उपाययोजना असाव्यात व त्यास मान्यता देणेत येत आहे असा उल्लेख केला आहे. खरेतर ही उपसूचना होती - (वाचून दाखवले) ही उपसूचना मा.प्रशांत शितोळे यांनी मांडली होती. मा.राजेंद्र काटे यांनी उपसूचना स्विकारली होती. सेक्शन २८ खाली मा.नियोजन समिती सूचना मागविते नंतर सुनावणी होते, हरकती सूचना येता त्याची सुनावणी झाल्यानंतर जी.बी पुणे मान्यतेसाठी येते

आपले सभागृह चालू असतानाच मी पाठिमागे जाऊन गॅझेट व नोटीस दोन्ही पाहीले. ही उपसूचना वाचली होती. ज्यावेळी ताथवडे गावाचा विषय १के खाली सभागृहात आला होता त्यादिवशी दिलेली ही उपसूचना होती. ताथवडे गावाचा डि.पी. करताना ज्या हरकती/सूचना मागविल्या होत्या, त्यात मा.प्रशांत शितोळे यांची देखील उपसूचना होती. ती समाविष्ट का करण्यात आली नाही. सभागृहाने मंजूर केलेल्या ठरावात काटछाट करायचा अधिकार कोणाला नाही. आयुक्तांना नाही ना भदाणे मॅडम यांना आहे. मग कोणी असे कसे केले. ज्या हरकती / सूचना मागविल्या होत्या त्या बेकायदेशीर होत्या का. या एकाच मुद्यावर हा डि.पी. रद्द होऊ शकतो. आरोप करताय. लाज वाटली पाहीजे. आपण काय करतोय त्याचे. मला माहित आहे कोण-कोण झारीतले शुक्राचार्य होते. कोणी रेकॉर्डींग केले, कसे केले ते मी ऐकले आहे. माझ्या विरोधात कसे व्हायचे

यासाठी हा खटाटोप चालला होता. कोणी प्रयत्न केला, माजी महापौर वैशाली घोडेकर यांनी. महाराष्ट्रभर गाजलेली, राष्ट्रवादीच्या माजी महिला महापौर, बचत संघात ३ कोटींचा भ्रष्टाचार करणा-या, टिडीआर दलाल असणा-या वैशाली घोडेकर यांनी भ्रष्टाचाराचे कुरण करुन ठेवले आहे त्यांनी याबद्दल बोलू नये. कोणी हरकती घेतल्या, कोणी कोणावर आरोप करायचा, रात्री झोपा येत नसतील. चारित्र्य हनन करायचे, बदनाम करायचे. ते निमूटपणे सहन करायचे. तुम्ही डि.पी.वर बोलणार वाटते. बोलणार नाहीतर काय आम्ही रितसर त्याठिकाणी हरकती घेतल्या आहेत. नोंदविल्या आहेत. त्यावर सुनावणी झाली आहे. मी काही बोलणार नाही. तुमचे व नवनाथ जगताप यांचे जास्तच पटते ना. जास्त पटते म्हणजे काय् मी त्यांना शिव्या देते काय. तो समोर बोलतो, तो चांगले बोलतो. मी चांगली बोलते. एखादी गोष्ट नवीन सदस्यांना कळत नसेल तर त्यांना सांगितले पाहीजे. लाखोंच्या भ्रष्टाचारात यांना कुठे कुठे बसवायचे यावर मिटींगा केल्या. मग हा भ्रष्टाचार नाही का. मग तो यांचा शिष्टाचार आहे. महापौर साहेब, खरेतर जो डि.पी. सभागृहापुढे, प्रशासनाने आणला होता, जी उपसूचना आली होती, त्यांचा यात अंतर्भाव नसल्यामुळे तो रद्द करण्यात यावा अशी आपल्याकडे मागणी करते. सभागृहाने बेकायदेशीर विषयासाठी विसंगत ठराव केला असला तरी असा ठराव महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे कलम ४५१ अन्वये तो विखंडीत करायची तरतूद आहे. आयुक्त साहेब, मला विचारायचे आहे, मा.प्रशांत शितोळे यांची उपसूचना शासनाकडे पाठवली का, ती विखंडीत केली का. यावर हरकती/सूचना मागवल्या आहेत. आयुक्त साहेबांकडून मला खुलासा हवा आहे. आयुक्त म्हणतील, माझा या मुद्याशी, डि.पी.शी संबंध नाही. जरी संबंध नसलातरी But you are Boss. उपसूचना वगळली कशी. वगळली असेल तर हा सभागृहाचा अपमान नाही का. जर ती उपसूचना चुकीची होती तर शासनाकडे जाऊन विखंडीत व्हायला पाहीजे होती. मा.नगरसचिव यांना सुद्धा सांगते, तो संपूर्ण ठराव शासनाकडे पाठवावा लागतो. नुसती उपसूचना पाठवून चालत नाही. तुम्ही काय केले, तुमच्या फायद्याचा डि.पी.चा विषय तेवढाच पास केला. मा.प्रशांत शितोळे यांची उपसूचनेला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. तसे असले तरी हे सभागृह लोकशाहीसाठी आहे. होम टाऊन म्हणून कोणी वापरायचे कारण नाही. माझी नगरसचिव यांना विनंती आहे, त्यांनी मला सांगावे. महाराष्ट्र मन.पा. अधिनियम १९४९ च्या कोणत्या कलमाच्या आधारे ही उपसूचना ठरावातून काढली. उरलेल्या अर्धवट मजकूराची अंमलबजावणी कशी करण्यात आली यावर खरेतर प्रशासनाने खुलासा केला पाहीजे.

माझ्यासहित ताथवडे गावातील अनेक नागरीकांनी ज्यांच्या घरांवरुन रस्ता जात असताना रस्त्याबाबत हरकती/सूचना घेतल्या होत्या. या महत्वाच्या काही विषयांबाबत मा.नियोजन समितीने कोणताही अभिप्राय दिलेला नाही. प्रारुप विकास योजना नकाशा प्रसिद्धीपूर्वीच्या कारवाई संबंधी उपस्थित केलेले मुद्दे मा.नियोजन समितीच्या अहवालात नमूद केले आहेत. मा.नियोजन समिती असे कसे म्हणू शकते. त्यांना असे बोलायचा

अधिकार काय आहे. प्रारुप आराखड्यावर हरकती/सूचना मागविल्या. त्यावर आमचे म्हणणे मागविले आहे. म्हणून याठिकाणी विषय आहे जर प्रशासनाचे अधिकारी होते. त्यांनी अहवाल तयार केला. प्रशासनातील त्यांच्या सहका-यांना ते उघडे पाडणार नाहीत म्हणून खात्री होती म्हणून त्यांनी अशा प्रकारचा अभिप्राय दिलेला आहे. अत्यंत चुकीची बाब आहे. खरेतर विकास योजना अहवाल व विकास नियंत्रण नियमावलीबाबत हरकती सूचनांबाबत मा.नियोजन समिती गठीत करण्यात आली आहे. त्यात मा.सभागृहाने ठरविल्याप्रमाणे कार्यवाही झाली नसलीतरी कायदेशीर मत देणे त्यांचे काम होते. परंतू हे आमचे काम नाही असे सांगू शकत नाही. ठरावातील मजकूर वगळून केलेली संपूर्ण कार्यवाही बेकायदेशीर आहे म्हणून ताथवडे डि.पी रद्द करण्यात यावा. आपण हा डि.पी. रद्द केला नाही, सभागृह रद्द करणार नाही हे मला माहित आहे. का करणार नाही. २० लाख, २५ लाख, ५० लाख, २ कोट, ५० पेट्या हे शब्द ऐकून सुद्धा कान एवढे गरम होत आहेत. महापौर साहेब, जर आजचा हा डि.पी. रद्द केला नाहीतर सर्व सदस्यांना इथे सांगते की, या डि.पी.साठी मी हायकोर्टात जाणार आहे, दाद मागणार आहे. माझे हे म्हणणे लक्षात घेऊन हा डि.पी. याठिकाणीच रद्द करण्यात यावा.

ताथवडे विकास आराखडा प्रत्यक्ष दोन टप्प्यांत आहे. पहिला टप्पा प्रस्तावित जमिन वापर नकाशा तयार करणे, दुसरा टप्पा उपसूचना, हरकती/सूचनांचा निर्णय, नियोजन समितीने केलेले फेरबदल, या २ टप्प्यांत काम करताना, ताथवडे गावाची प्रस्तावित जमिन वापर करताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. याची २/३ उदाहरणे देणार आहे. आयुक्त साहेब म्हणतात पूरावा द्या. भ्रष्टाचार करताना कोणी मागे पूरावे ठेवत नाहीत. कागदोपत्री सिद्ध होत असेलतर त्यांच्यावर कारवाई झालीच पाहीजे. आमच्या गटनेत्यांनी मागणी केली तशी सन्मा. प्रतिभा भदाणे, उपसंचालक नगररचना यांच्या मालमत्तेची चौकशी झाली पाहीजे. यांची सीबीआय कडून चौकशी झाली पाहीजे. ताथवडेचा प्रस्तावित जमिन वापर नकाशा तयार करताना जो भ्रष्टाचार त्यात झाला त्यात फेब्रुवारी २०१२ रोजीच १४ १/२ इंचाचा हा नकाशा तयार झाला होता. २०१२ रोजी महापालिकेच्या नगररचना विभागाची ताथवडेचा प्रस्तावित जमिन वापर नकाशा तयार करुन एमआरटीपीच्या कलम २६ अन्वये प्रसिद्धीसाठी मा.महापालिका सभेत सादर करण्यात येणार होता. मा.महापालिका सभेत मान्यता मिळावी असे तत्कालिन आयुक्त आशिष शर्मा यांनी चिठ्टी लिहिली होती. नगररचना विभागाच्या उपसंचालिका भदाणे मॅडम व तत्कालिन आयुक्त श्री.आशिष शर्मा यांच्या सहीने पाठवण्यात आला होता. फेब्रुवारी २०१२ मध्ये तयार झालेल्या प्रारुप विकास योजना आराखडा तब्बल एक वर्षानंतर म्हणजे फेब्रुवारी २०१३ पर्यंत मांडण्यात आला नाही. खरी गोम तर इथेच आहे. शर्मा गेले, नवीन आयुक्त श्रीकर परदेशी आले. आयुक्त साहेब, तुम्ही आल्या-आल्या तुमच्या मागे अनधिकृत बांधकामाचे झेंगाट लागले. त्यातून मान वर काढतो न काढतो तोच दुसरे येऊन धडकते आहे. परंतू हाताखालची लोक सुद्धा काम करायला इमानदार

लागतात. एकटे श्रीकर परदेशी इमानदार आहेत म्हणजे सगळे चांगले असे होत नाही. खरेतर तुम्ही भदाणे मॅडम यांना विचारायला पाहीजे होते. एक वर्षापूर्वी हा नकाशा तयार झाला तरी तुम्ही काय करत होता. तोच नकाशा शिवसेनेचे गटनेते मा.श्रीरंग बारणे यांनी दाखवला होता. तो दोन हजार रुपयांत बाहेर मिळतो आहे. ज्याला जमेल तशी त्याची दुकानदारी चालू झाली आहे. २०१२ मध्ये नकाशा झाला त्यात त्यावेळी पूररेषा नव्हती. सभागृहातील एका सन्मा.सदस्यांनी पूररेषेतील जागेची १० लाख गुंठा दराने विक्री केली आहे. त्यांचे सदस्यत्व रद्द करावे म्हणून पत्र देणार आहे. त्यांचे नाव घेणार नाही. त्यांना मला इथे बोलू द्यायचे आहे. खरेदीखतावर त्यांचा फोटो आहे. सातबारावर त्यांचे नाव आहे. त्यानंतर ही जमिन गोरगरीब लोकांना विकली. त्याचे तीन/साडेतीन कोटी छापले. त्या जागेवर आत्ता पूररेषा आली. म्हणून ती पुसून टाकली. इथे कोणी फसवणूक केली. स्वतःच्या पदाचा गैरवापर करतात. सगळे उघड्या डोळ्यांनी बघतोय. सहन करत आहोत. त्यांचे भाषण झाल्यानंतर पत्र देणार आहे. महाराष्ट्र मनपा अधिनियमाच्या कलम ११ ड मध्ये सदस्यत्व रद्द करण्याबाबत तरतूद आहे. जर सदस्याचे आर्थिक हितसंबंध असतील तर त्याचे पद रद्द करण्याचा अधिकार आहे. पूररेषा, टिडीआरवर सदस्य बोलले आहेत. बीआरटीवर सदस्य बोलले आहेत. त्यांची आजची शेवटची सभा असणार आहे. माझे काही व्हायचे ते होऊन दे पण मी खपवून घेणार नाही. तुम्ही केले नाहीतर तुम्हाला पण सोडणार नाही. तुमच्या विरोधातसुद्धा दाद मागणार आहे. कोणाची जमिन होती, कोणाची आहे. पूररेशा कशी आली याची सुद्धा चौकशी करा. म्हणून एक वर्ष नकाशा तयार करायला लागतो. दुकानदारी करायची होती. काही लोकांचे महापालिका म्हणजे दुकानदारीचे ठिकाण झाले आहे. सगळ्यांचे नाही. खरेतर फेब्रुवारी २०१२ मध्ये तयार असलेला प्रारुप नकाशा एक वर्षानंतर १के खाली सभागृहापुढे येतो काय. सभागृह मंजूरी देते काय. आंधळ दळतंय, कुत्र पीठ खातयं असा प्रशासनाचा कारभार चालला आहे. आयुक्त साहेब, खरेतर यात अनेक व्यावसायिकांचे हितसंबंध जोपासले गेले होते म्हणून बिनबोभाट मंजूरी दिली. कायद्याच्या तरतूदीप्रमाणे ज्या हरकती/सूचना नकाशावर मांडल्या. ज्या-ज्या वेळी डि.सी. रुल मध्ये बदल केले गेले. लोकहिताविरोधात होते, मी त्या-त्या वेळी कायद्याच्या चौकटीत राहून हरकती/सूचना नोंदविल्या आहेत. याचा मला अभिमान वाटतो. महापौर साहेब, आपण माझ्यापेक्षा ज्येष्ठ आहात. परंतू ४/५ वर्षांच्या दरम्यान एकही चुकीचा फेरबदल प्रशासन करु शकले नाही. सत्ताधारी आमच्यापेक्षा कितीतरी संख्येने जास्त असून सुद्धा शासनाकडून मंजूरी आणू शकले नाहीत. खरेतर हे यश खरे बोलणा-यांचे यश आहे. खरे बोलायला धाडस लागते. पैशांचा मोह टाळावा लागतो. मला तुमच्याशी भांडायचे आहे. तुमच्यावर कधी धावून चालत नाही गोड बोलावे लागते. म्हणून काही सदस्यांना स्वप्न पडायला लागले, काहीतरी झाले आहे, काहीतरी झाले आहे. एका पत्रकाराचे नाव घेत नाही. तो सुद्धा त्याठिकाणी ब्लॅकमेल करत होता. त्याचे सुद्धा

ऑडिओ रेकॉर्डींग माझ्याकडे आहे. नाव घेतले तर इतक्या लोकांचे फोन, इतक्या लोकांचे प्रेशर गेले ४/५ महिने झेलतेय. जितका जास्त विरोध, तितकी जास्त ताकद माझी वाढत जाते. मला जितका विरोध जास्त होतो, तितकी माझी काम करायची शक्ती वाढत जाते.

खरेतर ताथवडे गावाच्या विकास आराखड्यात प्रसिद्ध झाला. या गावात गेले. जागेची, रस्त्यांची नकाशा घेऊन पाहणी केली. मग हरकती/सूचना मांडल्या. माझे अंकुश नावाचे पुस्तक ४०० पानांचे प्रसिद्ध केले आहे. माझे यापेक्षा यश काय असू शकते. त्यात मी ज्या हरकती सूचना केल्या होत्या, त्या मांडल्या आहेत. यापेक्षा दुसरी कुठली गोष्ट असू शकत नाही. ज्या दिवशी आम्ही प्रारुप विकास आराखडा घेऊन गावात फिरत होतो, अनेक शेतक-यांनी अर्धा/एक गुंठ्यांत बांधकाम केले आहे. ७० सालापासून तिथे ते रहायला होते. हे सगळे लोक आमच्यभोवती गोळा झाले. सगळे सांगायला लागले, आमची इथे घरे आहेत, आमची इथे घरे आहेत. लक्षात आले, व्यवस्थित मार्गदर्शन करता येणार नाही म्हणून गावक-यांचा जाहीर मेळावा थेरगाव इथे मी बोलवला होता. सगळ्यांना ओपन होता. ज्यांना–ज्यांना शंका होती त्यांनी या मेळाव्याला यायला पाहिजे होते, ते आले नाहीत. अभ्यास करायचा नाही. पण ब्लॅकमेल करुन चार पैसे कसे गोळा करता येतील अशा पद्धतीचे ज्यांचे विचार आहेत ते इथे फिरकले नाहीत. हरकती देताना कायदेशीर भाषेत या हरकती कशा घ्यायच्या म्हणजे घरे वाचतील हे मी या शेतक-यांना नागरीकांना नुसतेच सांगितले नाहीतर त्यांना लिहून दिले आहे. एखादा सर्वे नंबर वाचला तर त्यामध्ये सर्वे नं. २९ मोहिनी लांडे, सर्वे नं. २९ सिमा सावळे असे वाचले म्हणजे सर्वे नं. २९ वर सिमा सावळे यांची जागा होते का. बाकी लोक पण असतात. जागेवर घरे दाखवली नाहीत. म्हणजे घरे नाहीत का. ती का दाखवली नाहीत तर बिल्डरची जागा तिथे मोकळी करायची होती. सर्वसमान्य शेतक-यांच्या घरांवर आरक्षण टाकायचे होते म्हणून घरे दाखवली नाहीत. सर्वे नं. ३७,३८ आरक्षण क्र. १३ येथे मल्टीपर्पज हॉलचे शिफारस केली आहे. याठिकाणी आरक्षणच नाही. घरेच नाहीत. सर्वे नं.२७ मध्ये आरक्षण बदलून बिल्डरला अमिनिटीज उपलब्ध करण्यात आल्या, पेमेण्ट करण्यात आले. त्याला माझे उत्तर आहे, हा आपल्या महापालिकेच्या करसंकलन विभागाचा कागद आहे. सर्वे क्र. ३८ मध्ये कोणकोण राहतो, ज्यांच्या मिळकती आहेत त्यांची नावे सांगते. विजय मारुती कुंभार – मिळकत क्र. १०४११००५१२, विठ्ठल मारुती कुंभार मिळकत क्र. १०४११००५१३, दगडू कुंभार – मिळकत क्र. १०४११००५१४, दिलिप किसन कुंभार १०४११००५१६ व १०४११००५१५, सुभाष मथरे मिळकत क्र. १०४११००५२६ ही ६० ते ७० घरांची यादी माझ्याकडे आहे. ही कुटूंबे आहेत. बीएलयूत म्हणतात, इथे घरे नाहीत. भदाणे मॅडम यांना विचारा. त्यांनी ए.सी. ऑफीसमध्ये बसून नकाशा तयार केला आहे. त्यांना समोर आणा. तिथे घरे नसतील तर मी या सभागृहाचा राजिनामा देते. माझे चॅलेंज स्विकारा. तुम्हाला गोरगरीबांची घरे

दिसत नाहीत. अर्धा गुंठा, एक गुंठ्यात झोपड्या असतात का. तुम्ही लोकांच्या मुंडक्यावर बसून घरे बांधली म्हणून गोरगरीबांच्या घरांची कदर येत नाही. सभागृहात मा.प्रमोद ताम्हणकर एक सदस्य आहेत. ते काळेवाडी भागात रहायला आहेत. जवळपास २०० घरे पाडली आहेत. जो पूल जातो आहे, एम्पायर इस्टेटकडे. १९८४ मध्ये घरे बांधले आहे. डि.पी १९९५ मध्ये झाला होता. जेव्हा डि.पी. होऊन सुद्धा १४/१५ वर्षे झाली असतील, यांच्यासारख्या असंख्य लोकांनी हरकती घेतल्या नाहीत, त्यांना तुमच्या ईडब्ल्यूएसमध्ये घरे दिलेली आहेत. का ते लोक नव्हते का. त्यावेळी या लोकांना कोणी सांगितले असते की तुम्ही हरकती घ्या तर तुम्हाला त्यावेळी त्यांच्या घरांसाठी हा डि.पी. रस्ता फिरवायला लागला असता. दुसरीकडे टाकावा लागला असता. थोपटे लॉन्सजवळची घरे आत्ता पाडलीत. ११ तारखेला त्या माणसाच्या मुलीचे लग्न होते. त्याचे सुद्धा खरेदीखत १९८४/८५ चे होते. मी काळेवाडीत १५ वर्षे काढली आहेत. त्याने सांगितले, ११ तारखेला घरात लग्न होते आणि आपण १० तारखेला कारवाई केली. मी सुद्धा त्यांना काही मदत करु शकले नाही. घर शोधावेच लागेल मी सुद्धा त्यांना सांगितले. असे असेल तर यांची जागा असताना, रस्ता असताना त्यांच्या जागेवर आरक्षण टाकले आहे हे यांना कळाले नाही. जर मी त्यांना हे सांगितले तर मी काय पाप केले. खरेतर तो रस्ता शिफ्ट केला. तुमचा सर्वे नंबर केवढा, किती एकरचा आहे. तो लगेच बिल्डरच्या नावावर टाकला म्हणजे बिल्डरचा झाला का. माझ्यावर आरोप करणा-यांना माझे आव्हान आहे की, प्रत्यक्ष जावे, तिथे घरे आहे का नाहीत आपण आपल्या डोळ्यांनी बघावे. मा.नियोजन समितीने सर्वे क्र. ६३/६४ मध्ये आरक्षण क्र. १६ गार्डनच्या ठिकाणी असलेले आरक्षण रद्द करायची शिफारस केली आहे. त्याठिकाणी घरेच नाहीत. परत तोच प्रकार, तोच खेळ. याठिकाणी सुद्धा सर्वे क्र. ६३ व ६४ वर, आपल्या महापालिकेचा कागद माझ्याकडे आहे. १९३८ मधील घरे आहेत. आपल्याच साईटवरून हि प्रिंट काढली आहे. आपल्याकडून काही कागद प्रत्यक्ष घेऊन गेले आहे. सर्वे क्र. ६३ व ६४ मध्ये ज्यांची घरे आहेत, श्री.अशोक कांबळे हे मागासवर्गीय समाजातील आहेत. आत्ताच एका नगरसेवकाने सांगितले मी आत्मदहन करेन. आम्ही काय मागसवर्गीय, दलित. मुळात आम्हाला इज्जत कमी, समाजातली आमची पत कमी. मग यांच्या बापाचे काय जातेय. हे कुठे बोंबलत जाणार. मग यांच्या जागांवर आरक्षण टाका. अशोक कांबळे - मिळकत क्र. १०४११००४१२, लक्ष्मी सोनवणे - मिळकत क्र.१०४११००६०६, शत्रुघ्न भिमा सोनवणे - मिळकत क्र.१०४११०००१७, देवीदास सोनवणे - मिळकत क्र.१०४११००७०८, सुरेखा सोनवणे – मिळकत क्र. १०४११००३७६, नारायण कांबळे – मिळकत क्र. १०४११००३७७, यशपाल कांबळे – मिळकत क्र. १०४११००३८६ ही नावे मी फक्त नमुन्यादाखल सांगते आहे. हे सगळे मागासवर्गीय समाजातील लोक आहेत. ज्या समाजात मी राहते त्या दलित समाजातील ही घरे आहेत. माझे कर्तव्य आहे, माझ्या समाजातील लोकांच्या घरावर जर रस्ता टाकत असतील तर निश्चितपणे

मी त्याविरोधात आवाज उठवला पाहीजे. खरेतर या दलित लोकांची घरे बीआरटीसाठी विनामोबदला ताब्यात घेतली आहे. त्यांनी दुस-या जागेवर घरे बांधली तिथे सुद्धा आपण रस्ता टाकला आहे. म्हणून या आरक्षणाला मी विरोध केला. यांच्या घरावरुन रस्ता गेला, ज्या बिल्डरची नावे मी वाचून दाखवली त्यांच्या सर्वे नंबर मधून रस्ता गेला का. तुम्ही पुढील वर्षी प्रोजेक्टर लावता आला पाहीजे. म्हणजे नवीन नगरसेवकांनासुद्धा कळेल. पत्रकारांनासुद्धा कळेल. लॉबीत बसलेल्या नागरीकांना सुद्धा कळेल. इथे उचलली जीभ लावली टाळ्याला. ५ कोटी, १० कोटी करोड असो, कागद पहायला ते कळतात का. खरेतर आज आप पार्टीचे श्री.अरविंज केजरीवाल यांनी भ्रष्टाचार मिटवण्यासाठी पक्ष काढला. भदाणे मॅडम यांनी भ्रष्टाचारासाठी पक्ष काढावा एवढे राजकारण, एवढ्या खालच्या दर्जाचे राजकारण करणा-या बाई मी आयुष्यात कधी पाहिल्या नाहीत. त्यांच्याकडील संपत्तीची सीबीआयकडून चौकशी करायला लावली नाहीतर, येत्या २/३ दिवसांत सीबीआय चौकशी करायला मी लावणार आहे. राजकारण करतात काय, २/४ सोम्यागोम्यांना हाताशी धरले म्हणजे काहीही करता येते असे त्यांना वाटले काय. असे होत नाही. मी ज्या-ज्या लोकांची नावे वाचली माझ्याबरोबर त्या लोकांनी सुद्धा इथे हरकती घेतल्या होत्या. म्हणून मा.नियोजन समितीने फक्त त्यांच्या घरांवर आरक्षणे टाकली आहेत. तेवढा अभ्यास मी केला आहे. नागरीकांनी दाखवा म्हटले तरी ते दाखवू शकत नाही. मा.नियोजन समितीने आरक्षण क्र.२५ वाहनतळाच प्रस्तावित २४ मी पूर्व-पश्चिम रस्ता रद्द करायची शिफारस केली आहे. मालक नसल्यामुळे आरक्षण रद्द करायची शिफारस केली होती. वस्तुतः आरक्षण क्र. २५ वाहनतळाच्या उत्तरेकडे पूर्व-पश्चिम रस्त्याच्या जवळ सर्वे नं. ५९ ते १५६ या जागेवर वापरात असलेला अस्तित्वातील रस्ता प्रारुप नकाशातून गायब करण्यात आला होता. मोनार्च संस्थेने यावर आक्षेप घेतला आहे ज्या अधिका-यांना नकाशा करण्यासाठी नियुक्त केले होते, ही संस्था अधिका-यांना जर असे सांगत असेल तुम्ही इतके बदल सूचवता की आम्हाला त्या जागेचा संपूर्ण डि.पी.च बदलावा लागेल. तो अस्तित्वातील प्रारुप नकाशातील रस्ताच नंतर गायब केला. खरेतर त्याठिकाणी २४ मी. च्या रस्त्याला त्या ठिकाणच्या नागरीकांनी हरकत घेतली आहे. भदाणे मॅडमचे कोणताही गणित बिघडले नाही. घेतलेल्या पैशांचा संबंधित विभागाकडून पूरेपूर फायदा करुन घ्यायचा म्हणून त्यांनी केलेली ही सगळी शाळा आहे. सर्वे क्र.१५९ ते १५६ मधील जागेवरील प्रातिनिधीक नावे वाचून दाखवते. राहूल फुलपगार - मिळकत क्र. १०४१२७१, अभिजित शिंपी – मिळकत क्र.१०४१३५१, ऋदयनाथ रामकृष्ण - मिळकत क्र.१०४१ ९३, वसंत नामदेव फसवे व बाबुराव शिंदे- मिळकत क्र.१०४१३१९ व १०४११८९, रमेश रामकृष्ण भिसे - मिळकत क्र.१०४१३१६, सुरेश गारंबे – मिळकत क्र. १०४१०, बबन शेळके - मिळकत क्र.१०४१०५९ हे मिळकत क्रमांक असून आपण त्यांच्याकडून मिळकत कर घेतोय. हे मी केलेले नाही. मग कसे म्हणून शकतो, त्याठिकाणी घरच नाही.

बीएलयूच्या नोंदणीत घर नव्हते. घरे कशी नव्हती. पत्र वाचा. त्यात काय सांगताहेत, एक नाही दोन नाही जवळपास ८५० मिळकती त्याठिकाणी आहेत. मी संपूर्ण मिळकतींचा तपशील इथेच देणार आहे. त्यांच्या घरांवर आरक्षणे टाकणार असाल तर, उपसंचालक भदाणे मॅडम यांना आजच्या आज घरी पाठवले पाहीजे. सभागृहाने निर्णय घेतला पाहीजे. आपण पुरावा द्या असे म्हणाल. काय पुरावा देऊ, कसा पुरावा द्यायचा. तुम्ही येणार नाही. बाई कागदाने खोटे बोलणार. आम्ही महिन्यातून एकदा तुमच्या समोर येणार. एकदा बोलायला संधी मिळणारी. एक नंबरचा खोटारडा अधिकारी आहे. जागेवर जाऊन सगळे रस्ते बघायचे. माझी सदस्यांना विनंती आहे, खरोखर रस्ता आहे का नाही ते बघा. एका सर्वे नंबरमध्ये एकाच माणसाची जागा असते का. एक गुंठा, अर्ध्या गुंठ्यातली घरे श्रीमंत लोकांची घरे नाहीत. मा.महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे, आपण सुद्धा नियोजन समितीला बरोबर घ्या. भदाणे मॅडम यांना बरोबर घ्या. प्रत्यक्ष जाऊन रस्त्यातील घरे बघा. घरे असतील तर त्यांच्यावर कारवाई केली पाहीजे. भदाणे मॅडम यांनी राजकीय पार्टी जॉईन करावी. त्यांना खालच्या दर्जाचे राजकारण चांगले करता येते.

मा.महापौर साहेब, ताथवडे विकास आराखडा योजनेनुसार सर्वे नं. ४१ व ६५, वर आरक्षण क्र.२६ मध्ये किरकोळ बाजारचे आरक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे. प्रारुप विकास अहवालात २०३१ साली ताथवडे गावाची संभाव्य लोकसंख्या ३५,००० होणार आहे. हा डि.पी. रिपोर्ट आहे. टाऊन प्लॅनिंग नॉर्मस्, १९६९ मधील राज्य शासनाच्या मंजूर मानांकनाप्रमाणे हा डि.पी. २० वर्षासाठी तयार करण्यात येतो. १.४० हेक्टरचे आरक्षण किरकोळ बाजारासाठी आवश्यक आहे असे नमूद करण्यात आले आहे. असे असताना १.४० हेक्टर ऐवजी त्यात ९ हेक्टर क्षेत्र किरकोळ बाजारासाठी ठेवणे हे अवाजवी ठरते. सर्वे क्र.९९ बद्दल बोलणारच आहे. किरकोळ बाजारासाठी एवढे मोठे क्षेत्र ठेवले आहे. त्या पाठिमागे काय गौडबंगाल आहे. त्यामध्ये ज्यांनी डि.पी तयार केला त्या नियोजन समितीचा अहवाल आहे की, त्यात सर्वे क्र. २६ मध्ये सदर वापरासाठी आरक्षण असून त्याचा उद्देश्य समजून येत नाही. मोठे आरक्षण ठेवण्याचे कोणतेही स्पष्टीकरण दिसून येत नाही म्हणून हे आरक्षण वगळावे. हे क्षेत्र रहिवास क्षेत्र करण्यात यावे. इथे सर्वे क्र.९९ व डि.पी. चा जवळचा संबंध आहे. यात रिटेल मार्केटचा भाग, याच जागेत असलेल्या कुमार बिल्डर यांची जागा आहे. इथे २ ते दीड एकर जागा याशिवाय आरक्षण टाकले गेलेले नाही. कुमार बिल्डर यांनी हायकोर्टात सांगितले आहे, एका कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी २० ते २२ एकर इतकी जागा पुरी पडते म्हणून माझी जागा या आरक्षणातून वगळण्यात यावी. त्यांनी कोर्टाला विनंती केली आहे. खरी गोम इथे आहे. त्यांच्याकडे आरक्षण टाकायचे नाही. आरक्षण वगळता येत नाही म्हणून रिटेल मार्केट किती हेक्टरची केली. याठिकाणी माझ्याकडे संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरातील जुन्या गावाचे जे किरकोळ बाजार आहेत त्याची यादी आहे. किरकोळ

बाजारासाठी अ प्रभागात आरक्षण सर्वे क्र. २८६ मध्ये सर्वे क्र. २० पैकी ०.३१ आर जागा, अ प्रभाग आकुर्डी भाजी मंडई – सर्वे क्र. २७० पैकी ०.१० आर, अ प्रभाग आकुर्डी – सर्वे क्र. २६० मध्ये सर्वे क्र. १८० पैकी ०.१० आर, अ प्रभाग आकुर्डी –आरक्षण क्र. २५६ – सर्वे क्र. ४४,४५ पैकी ०.१० आर, अ प्रभाग चिखली गाव आरक्षण क्र. १/९२ – सर्वे क्र. १५५२ पैकी ०.१० आर म्हणजे मा.महापौर साहेब, संपूर्ण जुन्या गावाच्या डि.पी.त या किरकोळ बाजारासाठी ६.५३ हेक्टर हे आरक्षण तसेच ठेवले आहे. म्हणजे हे लोक किती मूर्ख होते. भदाणे मॅडम किती हुशार आहेत. काही लोकांनी त्यांचे खूप गुणगाण गाईले हे लोक कोण आहेत हे मी सांगायची गरज नाही. पण संपूर्ण शहरासाठी ६.५३ हेक्टर क्षेत्र असेलतर नवीन गावात किरकोळ बाजारासाठी एवढी जागा ठेवायचे कारण काय. तिथे कुमार बिल्डरची जागा सोप्यात सोडवायची म्हणून इथे आरक्षण टाकायचे. सरकारकडून विचारणा होईल, काय झाले त्या आरक्षणाचे. तर सांगता येईल, दुस-या २२ एकरमध्ये आरक्षण टाकले आहे. कुमार बिल्डरची जागा सहजासहजी सुटेल. भदाणे मॅडम यांनी काय घेतले असेल तर देऊन टाका. जर १.४ हेक्टर ऐवजी ९ हेक्टर आरक्षित करायचे ठरले असेल तर खरेतर हि आरक्षणे रद्द व्हायला पाहीजेत. तिथे वेगवेगळया ठिकाणी किरकोळ बाजारासाठी छोटी छोटी आरक्षणे ठेवली पाहीजेत. महापालिकेच्या जुन्या व वाढीव हद्दीत किरकोळ बाजारासाठी एकूण ४७ आरक्षणे आहेत. एकूण ६.७३ हेक्टर क्षेत्र आरक्षित आहे. हे आरक्षण १७ लाख लोकसंख्येला पूरक असेल तर ताथवडे गावाची आजची ११,००० लोकसंख्या २०३१ पर्यंतची लोकसंख्या ३५,००० होणार असताना तिथे ९.८ हेक्टर ठेवायचे कारण काय. मग सिंगापूरच्या धर्तीवर बाजार करायचा होता, का शनिशिंगणापूरच्या धर्तीवर केला आहे. डि.पी. त मात्र दिल्ली हटच्या धर्तीवर मॅडम करणार होत्या. सिंगापूर ते दिल्ली हे अंतर खूप आहे. उपसंचालकांना हे अंतर समजले नाही की काय समजून घेतले नाही हा खरा प्रश्न आहे. आजची ११,००० लोकसंख्या २० वर्षानंतर होणारी ३१,००० लोकसंख्या याला इतके मोठे क्षेत्र आरक्षित ठेवणे योग्य होईल का याचा याठिकाणी विचार करायला पाहीजे. म्हणूनच जर त्याठिकाणी जुन्या व नव्या वाढीव हद्दीत १०/१० गुंठे आरक्षणे असतील तर तशीच इथे असली पाहीजेत. किरकोळ बाजारासाठी जी ४७ आरक्षणे संपूर्ण शहरात आहेत, त्यात १६.३२ हेक्टर एवढीच जागा ठेवली आहे. मग ताथवडे गावासाठी ९ हेक्टर क्षेत्र म्हणजे २२ १/२ हे किरकोळ बाजारासाठी आरक्षण कोणाच्या हितासाठी ठेवले आहे. हे कोर्टात साबीत करायला मला फार वेळ लागणार नाही. तसेच आरक्षण क्र. २७ नुसार ३.६० हेक्टर क्षेत्र म्हणजे ९ एकर क्षेत्र वाहनतळासाठी आरक्षित करण्यात आले आहे. वाहनतळाचे आरक्षण ताथवडे गावाच्या किरकोळ बाजारासाठी प्रस्तावित करण्यात आलेले आहे. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, या पाठिमागील गौडबंगाल काय ते समजून घ्या. एकिकडे २२ एकर किरकोळ बाजाराच्या आरक्षणासाठी जागा ठेवायचे, दुसरीकडे ९ एकर वाहनतळासाठी जागा ठेवायची. म्हणजे सर्वे क्र. ९० तसाच सुटतो.

त्यासाठी कष्ट सुद्धा करावे लागत नाहीत. वाहनतळाचे आरक्षण व किरकोळ बाजाराचे आरक्षण बिल्डरच्या सोयीसाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. वाहनतळासाठी इतके मोठे क्षेत्र आरक्षित करणे अनावश्यक ठरेल. त्यामुळे हे आरक्षण ५ किंवा १० गुंठ्यांचे करावे. यासाठी यापूर्वी जुन्या गावाचा व वाढीव हद्दीचा डि.पी. आहे, त्यातले एक उदाहरण वाचून दाखवते. अ प्रभाग आकुर्डी – आ.क्र.२९१ प्रयोजन वाहनतळ स. न. १४९ पैकी ०.१० आर, अ प्रभाग आकुर्डी - आ.क्र. २७१ सर्वे क्र. २७६ प्रयोजन वाहनतळ एमआयडीसी - ०.५० आर, अ प्रभाग आकुर्डी – ३०७, वाहनतळ एमआयडीसी ०.७६ आर, चिखली - सर्वे क्र.१५६७ पैकी ०.७ आर. मा.महापौर साहेब, या याद्या अभ्यास करायला देते. यामध्ये डि.पी. करताना फक्त याच तज्ञ, बाकी सगळे मुर्ख असे समजायचे काही कारण नाही. प्रशासनाने किरकोळ बाजार व वाहनतळासाठी सुमारे ३२ एकरचे आरक्षण हे कोणाच्या हितासाठी ठेवले होते. नगर नियोजन मानांकनाच्या कितीतरी पटीने जास्त आरक्षण चुकीच्या पद्धतीने ठेवले आहे. नियोजनाबाबत तज्ञ असलेल्या, शासनाने नियुक्त केलेल्या अधिका-यांनी प्राधान्याने इतके क्षेत्रात आरक्षण का ठेवले याचा बोध झाला नाही असे त्यांच्या अहवालात स्पष्ट म्हटले आहे. त्यामुळे ताथवडे गावाला आवश्यक असणारी आरक्षणे प्रस्तावित करुन उर्वरीत आरक्षणे वगळण्याची माझी मागणी मान्य करण्यात आली. ज्यांच्यासाठी ही आरक्षणे करण्यात आली होती त्या टोळधाडींना याची खबर लागली. गेले २ महिन्यांत जो वणवा लागला होता.त्याची आग माझ्या मनाला पार जाळून गेली. अजून तरी कोणत्या चुकीच्या कामात माझ्यावर आरोप झालेला नाही. परंतू यात दोन जोडे मारायचा प्रकार मागे झाला आहे. माझे खच्चीकरण करायचा प्रयत्न झाला आहे. तुम्ही भ्रष्टाचार करता मग आम्हाला कशाला बरोबर घेता. माझ्याकडे कोणी जाऊ नये, कोणी म्हणू नये, आमच्या पाठिशी कोणी उभे राहू नये म्हणून हेतूपुरस्सर खेळ करण्यात आला. गेले २/३ महिने मी तेवढ्याच ताकदीने हा खेळ पचवत आले आहे. यासाठी शांतता नव्हती. मला पर्दाफाश करायचा होता. चार पाऊल मागे जाऊन पर्दाफाश करता येईल हे मला माहित होते. म्हणून ही आरक्षणे कोणाच्या सोयीसाठी ठेवली आहेत. आपण जाऊन बघावे. कोणी सांगावे, या बाईने भ्रष्टाचार केला आहे. इथे लोक काहीही बोलतात, समितीत असणा-यांच्या झोपा उडल्या. चांगले करु नका पण बदनाम करु नये. चांगले काम करायला हिंमत आहे त्यांना निश्चितपणे काम करु द्यावे. या ताथवडे डि.पी.त ज्या-ज्या नागरीकांनी आरक्षणासंदर्भात हरकती घेतल्या, मा.नियोजन समितीने त्यांचे त्यांच्या घरापुरते आरक्षण सरकवले आहे, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. सर्वे क्र. ९९ बाबतीत खरेतर निर्णय देण्यात आलेला नाही. सर्वे क्र.९९ बाबत वेगवेगळ्या प्रकारचे आक्षेप आहेत. तुमचा अभिप्राय आहे, जरी कृषि उत्पन्न बाजार समितीला त्यांना जमिन संपादित करावयाची असेल तरी रहिवास भागाबद्दल तो प्रस्ताव शासनाकडे सादर करु शकते. महापालिकेला जागा द्यायची किंवा बाजारसमितीला द्यायची किंवा कसे

याबाबत शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेऊ शकते म्हणून या सर्वे क्र. ९९ साठी कृषि उत्पन्न बाजार समितीला जागा आरक्षित करण्याची आवश्यकता वाटत नाही. मंजूर प्रादेशिक योजनेमध्ये सर्वे क्र.९९चा भाग सार्वजनिक/निमसार्वजनिक विभागांत दाखवला आहे. मात्र विकास योजनेच्या डिव्हिएशन स्टेटमेंटमध्ये विभाग विकास योजनेचा अपुरा उल्लेख असल्याचा आक्षेप आहे. म्हणून वस्तुस्थिती काय आहे यात याची खातरजमा करुन योग्य त्या दुरुस्ती करायची शिफारस आहे असे मा.नियोजन समितीने सूचविले आहे. परत एकदा मॅडम मध्ये पडल्या, पुरावा आहे. हे डेव्हिएशन स्टेटमेंट आहे, यात त्यांनी फक्त सर्वे क्र.९९ची २००९ पर्यंतची हिस्टरी समोर आणली आहे. याचा निर्णय झालेला नाही. ताथवडे गावाचा विकास प्रादेशिक य़ोजनेत सर्वे क्र.९९ चे एकत्रित क्षेत्र शासकीय, निमशासकीय मध्ये समाविष्ट आहे. परंतू प्रारुप विकास आराखड्यात हा भाग शासकीय निमशासकीय विभागातून वगळून रहिवास विभागात करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. यावर समिती नेमणार आहे. हा विषय सभागृहापुढे जाणार आहे. त्यांना काम करायला काही स्कोप आहे. तिथे हितसंबंध आडवे येतात म्हणून त्यासाठी घाई झालेली आहे. हा प्रारुप आराखडाच रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आला होता. रहिवास विभागांत समाविष्ट करताना त्याची कारणमिमांस देण्यात आली आहेत. त्यात सर्वे क्र. ९९ मध्ये कृषि उत्पन्न बाजार समिती तालुका मुळशी यांची जमिन संपादन प्रक्रिया मा.सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी अपिल क्र. ५६१४/०९ चा निकाल रद्द केला असून शासनाला आवश्यकता असल्यास, शासनाला आवश्यक असलेला भूसंपादन कायदा १९८४ च्या कलम ४ अन्वये नव्याने नोटीस काढायला परवानगी दिली आहे असे उल्लेखित केले आहे. डिव्हिएशन स्टेटमेंटमध्ये कोर्टाने जागा फ्रि केली इतकेच लिहिले आहे. त्यांनी पुढे पण सांगितले, तुम्ही जमिन ताब्यात घेऊ शकतो, त्याची कारवाई करु शकतो. कारण कलम ६ची कारवाई चुकीची झाली म्हणून जमिन मालकाच्या बाजुने मे.कुमार बिल्डर कोर्टात गेले होते. कोर्टाने त्यांना सांगितले, जमिन ताब्यात घेताना कारवाई चुकीची झाली आहे. ती रद्द करतो. हे डिव्हिएशन स्टेटमेंटमध्ये का नाही. ही हिस्टरी भदाणे मॅडम यांनी दिलेली नाही. चुकीच्या पद्धतीने गोरगरीबांच्या घरांवरून रस्ता टाकण्यात आला. मी त्यांच्या मिळकतींची नोंद वाचून दाखवली आहे. ९२ एकर जागा आहे. त्यांच्याकडे ताब्यात आली नाही. याचे आश्चर्य वाटते. ज्यांनी ज्यांनी आक्षेप घेतला. सर्वे क्र.९९ मध्ये आळीमिळी गुपचिळी. ५ कोटींचा फायदा झाला. तो बिल्डरचा एकट्याचा आहे का तर नाही. सर्वे नं. ९९ मध्ये ज्यांची घरे आहेत, कुठे आहेत. रस्त्याशेजारी घरे आहेत का. ते बघायचे नाही. एवढ्या काटेकोरपणे प्लॅन केला आहे. डि.डि.टी.पी. अत्यंत हुशार, स्वच्छ प्रशासन चालविणा-या मा.प्रतिभा भदाणे मॅडम. सर्वे क्र. ९९ मध्ये ही याचिका रद्द केली असली तरी शासनाला आवश्यक असल्यास भूसंपादन कायदा १९८४ च्या कलम ४ अन्वये निविदा नोटीस काढायला परवानगी दिली आहे. निमशासकीय/शासकीय विभागातून

वगळण्यात आले व ताथवडे गावाच्या ग्रामपंचायतीतील ठरावाप्रमाणे १५०० चौ.मी. क्षेत्र पोलिस चौकीसाटी, ४१,००० चौ.मी. पुनर्वसन घरांसाठी, १०,००० चौ.मी. प्राथमिक शाळेसाठी प्रस्तावित आहे. उर्वरित क्षेत्र रहिवास विभागांत समाविष्ट करण्यात आले आहे. याची बेरीज केली तर किती येते. रहिवासमध्ये बदल केला आहे तो किती येतो. एकिकडे गरीबांच्या घरांवरून रस्ते जातात. याची थोडीतरी लाज बाळगायची. थोडी जास्त नाही. कुठेतरी श्रम घेतले पाहीजेत. एवढे मोठे क्षेत्र शासकीय/निमशासकीयतून वगळून रहिवासमध्ये समाविष्ट केले आहे. तरीसुद्धा गरीबांच्या घरांवर आरक्षणे टाकतो. खरेतर सर्वे क्र. ९९चे क्षेत्र ठराविक बिल्डरांचे हित जपण्यासाठी सामान्य माणसाच्या हिताकडे दूर्लक्ष करुन ते शासकीय, निमशासकीय विभागातून वगळले आहे. सदर जमिनीचे संपादन मोशी कृषि उत्पन्न बाजार समितीसाठी करण्यात येत होते. मा.सर्वोच्च न्यायालयाने तांत्रिक कारणामुळे कलम ६ची कारवाई रद्द केली आहे. पण नव्याने एमआरटीपी कायद्याच्या कलम ४ अन्वये नोटीस काढायची कारवाई मा.सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी अपिल क्र. ५६१४ च्या याचिकेच्या सुनावणीनंतर दि. १८/८/२००९ च्या निर्णयाअन्वये करण्यास परवानगी देण्यात आली आहे. हे डिव्हिएशन स्टेटमेंटमध्ये असायला पाहीजे होते. ते आलेले नाही. आयुक्त साहेब, एखादा अधिकारी हेतूपुरस्सर अशी लपवाछपवी करत असेल, तुमच्याकडे कायद्यात काहीतरी असेल, त्यांना काय शिक्षा करायची. तुम्ही एकटेच लढता. सगळी भुतावळं आहे. तुमच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेतात. तुमच्यापर्यंत आम्ही पोचू शकत नाही याचा गैरफायदा घेतात. सर्वे क्र.९२ मध्ये एकच जागा रहिवासी केली. एकिकडे डिव्हिएशन स्टेटमेंटनुसार २००९ पर्यंत तुम्ही कधी आलात महापालिकेत, कधी जॉईन झालात त्यानंतर काय हिस्टरी केली. आजही सातबारावर कृषि उत्पन्न बाजार समितीचे नाव लागलेले आहे. कुठे ते डिव्हिएशन स्टेटमेंटमध्ये आहे, मग भ्रष्टाचार झाला नाही म्हणता, झाला आहे. यालाच तर म्हणतात भ्रष्टाचार. यापेक्षा दुसरी व्याख्या कोणती असू शकते मला माहित नाही.

सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी अपिल क्र.५६१४/२००९च्या सुनावणीअंतीच्या दिवशी दि.१८/८/०९च्या निर्णयाअन्वये दिले होते. त्याप्रमाणे मुख्य बाजारासाठी भूसंपादन कायद्यातील कलम ४ची नुसार कारवाई नव्याने सुरु करण्यात आली आहे. ती २००९ला सर्वोच्च न्यायालयाने रद्द केली होती त्यानंतर कलम ४ ची कारवाई कृषि उत्पन्न बाजार समितीने, मा.सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा सुरुवात केली होती. सदर माहिती मा.उपनिबंधक अधिकारी मावळ यांनी ३/६/२०१० ला एक पत्र दिले होते. पत्र क्र.भूसंपादन/कावि/२९४/१० अन्वये, ही माहिती संबंधित महसूल विभागाच्या अधिका-यांनी दिली होती. सर्वे न. ९४ च्या सातबाराच्या उता-यावर फेरफार क्र.५२०० नुसार त्याबाबतची नोंद सुद्धा करण्यात आली. ही हिस्टरी २०१०ची आहे. २००९ ला सर्वोच्च न्यायालयाने त्यांची याचिका रद्द केली होती. त्यांचे म्हणणे होते, कलम ६ची कार्यवाही चुकीच्या पद्धतीने झाली आहे. कोर्टाने म्हटले. तुमचे म्हणणे बरोबर आहे. ही कार्यवाही

रद्द करतो. परत भूसंपादन करायला सांगितले होते. त्याप्रमाणे कार्यवाही सुद्धा चालू होती. हे पत्र आहे भूसंपादन/कावि/२९४/२०१० महसूल विभागाच्या अधिका-यांनी पाठवलेले हे पत्र मला मिळू शकते, मी वाचू शकते. ते सुद्धा नगररचनाच्या फाईलमधून. मग भदाणे मॅडम यांनी वाचले नसेल का. मग त्यांनी भ्रष्टाचार केला असे म्हणणार नाही काय. दुसरी व्याख्या काय. मोठ्ठा बिल्डर आहे. मोठे लागेबांधे आहे. गोरगरीबांच्या घरांवर टाकलेली रस्त्याचे आरक्षणे काढली म्हणून कांगावा करणा-यांनी याकडे हेतूपूरस्सर दूर्लक्ष केले. डिप्लोमॅटीक आहेत. डिव्हिएशन स्टेटमेंट कोणी का वाचले नाही. सर्वे क्र. ९९ ची ९२ एकर जागा निमशासकीय, शासकीय मधून वगळून रहिवास होते. मा.नितीन काळजे हे नगरसेवक आहेत. यांची जागा ग्रीन झोन मधून डेव्हलप करायला तुम्ही त्यांना परवानगी देत नाही. त्यांची उपसूचना स्विकारत नाही. इथे बिल्डर असल्यामुळे अधिका-यांचा दुटप्पीपणा बघा. तुमचे अधिकारी चांगले नाहीत, भ्रष्टाचारी आहेत. एकिकडे मा.नितीन काळजे दीड वर्षापासून प्रयत्न करत आहेत. त्यांची स्वतःची जागा आहे ती रहिवास होऊ देत नाही. आणि बिल्डरची ९२ एकर जागा रहिवासमध्ये कन्व्हर्ट होते. त्याला कोणी विरोध करत नाही. यात यांचा दुटप्पीपणा लपला आहे. खरेतर या बाबी या डिव्हिएशन स्टेटमेंटमध्ये, डि.पी. रिपोर्ट मध्ये मांडल्या पाहीजे होत्या, त्या आल्या नाहीत. लपवल्या गेल्या. का आणि याच्या पाठिशी कोण आहे याची सीबीआय चौकशी झाली पाहीजे. जोपर्यंत याची सीबीआय चौकशी होणार नाही, तोपर्यंत एवढे क्षेत्र निवासी कसे केले गेले हे समोर येणार नाही. खरेतर सदरचे क्षेत्र शासकीय/निमशासकीय विभागातून वगळून रहिवास विभागात प्रस्तावित करण्याआधी याबाबतची सखोल चौकशी करुन त्याची पडताळणी करणे अत्यंत गरजेचे व नियमसंगत होते. मात्र सदर आराखडा करताना भ्रष्ट हेतूने प्रेरित असलेल्या अधिका-यांनी विकास योजना अहवालाची म्हणजे डिव्हिएशन स्टेटमेंटमध्ये अपूर्ण माहिती देऊन सभागृहाची व जनतेची दिशाभूल व फसवणूक केली आहे. सन्मा.उपसंचालिका प्रतिभा भदाणे यांनी सभागृहाची फसवणूक केली म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हायला पाहीजे. आपण केल नाहीतरी मी करणार, मी त्यांना सोडणार नाही. ज्याप्रकारचे गलिच्छ राजकारण करायचा त्यांनी प्रयत्न केला आहे, त्यांना मी माफ करणार नाही. कारण एकिकडे ९२ एकरचे क्षेत्र रहिवास विभागात कन्व्हर्ट करतो, दुसरीकडे तुम्ही केलेल्या सगळ्या भ्रष्टाचारात गरीबांची घरे वाचतेय काय. बिल्डरला धक्का बसतोय का यात त्यांनी जे प्रभागात राजकारण केले त्यात त्या स्वतः अडकल्या आहेत. याचा शेवट मात्र मी करणार आहे. खरेतर १० कोटी, १५ कोटी, २० कोटी फक्त कोटी नाहीतर रुपयाला सुद्धा महत्व आहे. परंतू नगररचना उपसंचालक यांनी जी दिशाभूल केली म्हणून माझी मागणी आहे, हा डि.पी. रद्द करावा. परत प्रक्रिया चालू करावी. मा.हायकोर्टाचे निर्णय मानावा लागेल. ९२ एकर क्षेत्र सुमारे १,००० कोटी रुपयांचे आहे. ही जागा सरळ सरळ शासकीय निमशासकीय मधून डायरेक्ट प्रारुपमध्ये रहिवासमध्ये

टाकली आहे. म्हणून त्याची किंमत केली आहे. हे संपूर्ण क्षेत्र एकाच मापाचे आहे. एकाच कुमार बिल्डरकडे आहे. याचा मालक तटके आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. महापालिकेच्या अंदाधुंद कारभाराचे हे उत्तम उदाहरण आहे. माझ्या हरकतीबाबत नियोजन समितीने सर्वे नंबरची वस्तुस्थिती काय आहे. विकास योजना अहवालात डिव्हिएशन क्षेत्रात योग्य त्या दुरुस्त्या करायची शिफारस केली आहे. मा.नियोजन समितीने काय केले. यांनी सभागृहावर तो निर्णय सोडला आहे. याठिकाणी आपल्याला माझा प्रस्ताव आहे, कृषि उत्पन्न बाजार समितीला ही जागा हवी आहे. सर्वे क्र.९९च्या ९२ एकर क्षेत्रावर परत त्याठिकाणी कृषि उत्पन्न बाजार समितीचेच आरक्षण टाकण्यात यावे हा माझा प्रस्ताव आहे. ताथवडे विकास आराखड्यात मा.नियोजन समितीचा अहवाल १० ऑक्टोबर २०१३ रोजी ९० दिवसांपूर्वी आपल्याकडे दाखल झाला आहे. खरेतर या विषयाला ३ महिने झाले. याठिकाणी मा.नियोजन समितीने सांगितले असेल की सर्वे क्र.९९ मध्ये सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे. त्यात डिव्हिएशन स्टेटमेंटमध्ये दुरुस्त्या सूचविल्या आहेत. मला विचारायचे आहे, आयुक्त साहेब, आपण अशा काही सूचना, आपल्याकडे असे प्रस्ताव घेऊन नगररचना उपसंचालिका भदाणे मॅडम आपल्याकडे आल्या होत्या का. ही फसवणूक नाही का. मग मी डी.पी. रद्द करा म्हणून कोर्टात जाणार आहे, त्यांना सोडणार नाही. डिव्हिएशन स्टेटमेंटमध्ये मा.नियोजन समितीने सांगितले असेल तर त्यांचे सांगण्याचे तात्पर्य आहे, ज्यावेळी हरकती घेतल्या, त्यावेळी प्रक्रिया सांगितली शासनाकडे झालेला पत्रव्यवहार आणला. जो मला मिळू शकतो. मग यांना मिळू शकत नाही का. २००९ नंतरची माहिती त्यांनी दडवली आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई झाली पाहीजे. याचा खुलासा खरेतर नगररचना उपसंचालिका भदाणे मॅडम यांनीच करावा. डिव्हिएशन स्टेटमेंटमध्ये बदल का केले नाही. त्यांच्या नावाने बोंब मारलीच पाहीजे. त्यांनी भ्रष्टाचार केला असेल तर शंभर टक्के अटक झाली पाहीजे. अटक झाली पाहीजे का सोडले पाहीजे. त्या या सभागृहाच्या कोण लागतात. त्यांच्यावर कारवाई झालीच पाहीजे. टिडीआरचा विषय माझा असेलतर मागे ठेवायचा, आशा शेंडगेचा असेलतर लगेच घ्यायचा म्हणून त्यांना घेऊन नाचायचे. मॅडम आल्यापासून नवीन प्रकार, नवीन प्रणाली सुरु झाली आहे. त्यांना घरी सोडायला एक गाडी जाते व घ्यायला दुसरी गाडी. चाकणपुढे कसा व्यवहार चालतो, कोणकोण भेटते, हा इथला विषय नाही. मला त्यांच्या ॲक्शनची वाट बघायची आहे. मग त्याची रिॲक्शन काय होते ते बघा. सर्वे क्र. ९९ साठी ९० दिवस झाले, हा विषय व्हायला पाहीजे होता, तो केला नाही का केला नाही याचे त्यांनी उत्तर द्यावे. उत्तर द्यायचे नसेल तर त्यांनी या सभागृहाची, महापालिकेची फसवणूक केली म्हणून त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहीजे. सर्वे न. ९९ चे क्षेत्र शासकीय, निमशासकीय विभाग वगळून खोट्या माहितीच्या आधारे प्रस्तावित करण्यात आले होते. सर्वे क्र. ४१ व ६२ मध्ये आरक्षण क्र. २६ वर रिटेल मार्केट, आरक्षण क्र.२७ वर वाहनतळ सर्वे नं. ९९ मध्ये हे बिल्डरच्या

सोयीसाठी टाकले आहेत. उद्या शासन विचारणारच. शासनाला तुम्ही फसवू शकणार नाही. मी फसवू देणार नाही. मी नगरविकास खात्याला तक्रार करणार. नुसती तक्रार करणार नाही. त्याचा पाठपुरावा पण करते आहे. तुम्ही पत्र दिले. पत्राचे काय झाले. काय झाले. एक दिवस त्या एका सन्माननियांबरोबर बोलत होत्या. त्या म्हणत होत्या, त्या बाईंनी पत्र दिले आहे. त्याचे उत्तर काय द्यायचे ते आम्ही बघू. आम्ही करु काय करायचे ते. म्हणून मी शासनाकडे जाणार, त्याचा पाठपुरावा करणार आहे. मी शंभर टक्के कोर्टाचे दार वाजवणारच. हा डि.पी. हाणून पाडणार आहे. बिल्डरधार्जिणा डि.पी. आहे. तो हाणून पाडणार डि.पी.त इतकी पारदर्शकता झाली पाहीजे. जागेवर कोण आहे, कोणाकोणाची घरे आहेत का, नाही. मॅडम बीएलयू नकाशा दाखवतोय. जागेवर जायचे टाळून ए.सी. रुममध्ये बसून तो तुम्ही जाहीर केला आहे. सर्वे क्र.९९ चे क्षेत्र मोकळे करुन ते सर्वे क्र. ४१ व ४२ मध्ये टाकायचे जो प्रकार मा.नियोजन समिती व नगररचनाच्या उपसंचालिका यांनी केला आहे. तो मुळात फसलेला आहे. आम्हाला हरकती घेण्याची व्यवस्था आहे. म्हणून एवढी अंगाला आग लागली आहे. काय करु नी काय नको. मग राष्ट्रवादीचे उंबरे झिजवले, शिवसेनेचे उंबरे झिडवले, भाजपाचे उंबरे झिजवले, झिजवून काय होतेय. आढ्यात नाहीतर पोह-यात कुठून येणार असा प्रकार अधिका-यांनी करु नये. तुम्ही भ्रष्टाचार केला म्हणून आम्ही उघडकीस आणायचा म्हणून आम्हाला भ्रष्टाचारी ठरवायचा प्रयत्न त्यांनी केला. ज्याज्या नगरसेवक त्यात आहेत त्यांचे आत्ताच राजिनामे घ्या. मी सांगायची काय गरज. मला थांबवायची ज्यांचीज्यांची हिंमत असेल तर त्यांनी दाखवावी. करत नाही म्हणून बोलत नाही. आत्ता आम्ही तसे करत नाही. मी पण गोड बोलते, आणि खोड मोडते. मी सुद्धा राजकारण शिकले. खरेतर नगर नियोजन समितीच्या मानांकनाप्रमाणे रिटेल मार्केटचे आरक्षण अवाजवी असल्यामुळे ते प्रस्तावित करायला विरोध करते आहे. मावळ, डुडुळगाव, भोर, वेल्हा या भागातील शेतक-यांना कृषि उत्पन्न बाजार समितीमुळे माल विकायला जागा मिळेल. शहरातील नागरीकांना स्वस्त भावात भाजीपाला, अन्नधान्य मिळेल. तिथे असंख्य तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. हा भाग दूर्लक्षित करुन सर्वे क्र. ९९ निवासी भाग करण्यात आला आहे. म्हणून महापौर साहेब, हा ताथवडे डि.पी. रद्द झाला पाहिजे. भिंतीआडून बघणारे आपण मघाशी प्रशांत शितोळे म्हणाले विकास झाला पाहीजे. पण विकासाच्या नावाखाली शहर भकास करुन चालणार नाही. कुठेतरी थांबा. इथे कृषि उत्पन्न बाजार समिती झालीतर आपल्याला सुद्धा शहरात ताजा भाजीपाला मिळेल. त्याचबरोबर शेतक-यांना इथून मुंबईला जाणे सोप्पे होईल. त्यांचे पण उत्पन्न वाढेल. शेतकरी जगला पाहीजे का नाही. मुंबईपर्यंत माल येईपर्यंत निम्मा सडलेला असतो. त्यांचा विचार करणार आहात का नाही. आपल्या खेड्यांचे शहरीकरण झाले, एकिकडे केंद्रीय कृषिमंत्री मा.शरद पवार साहेब म्हणतात, खेड्याकडे चला. दुसरीकडे त्यांचे पाईक असणारे शहरात राष्ट्रवादीची सत्ता असणारे सत्ताधारी गोरगरीबांच्या पोटावर पाय द्यायला

निघाले आहेत. हे कधी होणार तुम्ही त्यांना पाठिशी घातले तर. जे शहर भकास करणार आहेत त्यांना आपण पाठिशी घातले नाहीतर निश्चितपणे शेतकरी, गोरगरीब आपल्याला आशिर्वाद दिल्याशिवाय राहणार नाहीत.

माझी नगरसचिव विभागाला विनंती आहे, बोलण्याच्या ओघात भदाणे मॅडम यांचा ज्या ठिकाणी एकेरी उल्लेख केला असेल तर तिथे तूच्या जागी तुम्ही असा उल्लेख करा. सभागृहासमोर सन्माननियांसमोर त्यांची मी माफी मागते. अशाच प्रकारचे राजकारण्यांना कामकाजात योग्य प्रकारे वापरुन घेण्याची खुबी त्यांच्याकडे आहे. मला नाशिकपासून त्यांची हिस्टरी माहिती आहे. नाशिकमध्ये माझे एक फॅमिलि फ्रेंड आहेत. त्यांनी सांगितले. भदाणे मॅडम त्यांना म्हणाल्या, तुम्ही सिमा सावळेंना माझी माहिती पुरवता. तुम्ही त्यांना सांगा, आमच्या नादी लागू नका. ज्यांनी फोन केला त्यांचे सुद्धा रेकॉर्डींग आहे. त्यांची ३०० एकर जागा आहे. त्या अधिकारी नाहीततर आमच्या पैकीच एक नगरसेवक आहेत. आयुक्त साहेब, खरेतर आपल्या नावाखाली प्रचंड मोठा भ्रष्टाचार चालू आहे. तुम्ही एकटे चांगले किती दिवस लढणार आहात. जोपर्यंत आपण भ्रष्टाचार शोधून काढणार नाही. या बाईंनी हिस्टरी लिहीलेली नाही. काय कारवाई करणार आहात आपण. ९० दिवस झाले सभागृहात विषय होऊन तरी कोणतीही दुरुस्ती झाली नाही. मोठा बिल्डर आहे म्हणून, मोठी व्यक्ती आहे म्हणून. मोठ्यांना साथ देता व गरीबांना चिरडता. बाकी लोकांचा वापर करता. असे चालणार नाही. माझी आपल्याकडे खास करुन मागणी असणार आहे, तुमच्यासारखे आयुक्त या शहराला मिळाले हे आमचे भाग्य आहे. तुम्ही उद्या गेल्यानंतर आम्हाला तुमचा फायदा करुन घेता आला नाही, आम्हाला प्रशासन दुरुस्त करुन घेता आले नाही म्हणून आम्ही कपाळकरंटे ठरु. तुम्ही इथेच रहावे. तुम्हाला मनापासून शुभेच्छा देते. तुमच्यासारखे आयुक्त आम्हाला पुन्हा भेटणार नाहीत. तुम्ही कडक कारवाई करता, आपण निष्पक्षपातीपणा करता. तुम्हाला सांगितले, तुम्ही चौकशी लावता. एवढे पुरावे प्रशासनापुढे सादर करते. सभागृहात बोलताना काही अपशब्द निघाला असेल तर माफी मागते. पुन्हा एकदा सांगते. आपण ताथवडे डि.पी. रद्द करावा. अन्यथा मला हायकोर्टाचे दार वाजवावे लागेल. पर्यायाने हा डि.पी.चा निर्णय व्हायला २/३ वर्षे लागतील. जोपर्यंत डिव्हिएशन स्टेटमेंटमध्ये बदल होत नाही, प्रशासन सत्य लोकांपुढे आणत नाही, लोकांची घरे होती का नाही हे सांगत नाही, तोपर्यंत काही म्हणा मी हायकोर्टात जाणार आहे. हा डि.पी. रद्द करावा. मा.महापौर साहेब, रद्द न केल्यास आपल्याकडे मी मतदान घेण्याची मागणी करते. मी विरोध करणार आहे. या विषयावर मतदान घ्या. गेले ४ महापालिका सभा झाल्या, आपल्याकडे वारंवार पत्र दिले आहे. ज्या सदस्यांचे हितसंबंध असतील त्यांना इथे बोलायची संधी देऊ नये. वारंवार हे सदस्य इथे बोलतात. महापौर साहेब, आपली सत्ता आहे. पण आपल्याला सुद्धा अधिकार आहेत. ते बोलले तर मी पत्र इथे देणार. माझ्या पत्राचे इथे वाचन करावे. आज नाहीतर उद्या तरी त्यावर कार्यवाही करावी लागणार आहे. धन्यवाद!

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ताथवडे डि.पी.संदर्भात सगळ्यांना ब-याच जणांनी मते मांडली आहेत. जवळजवळ सगळे विषय कव्हर केले आहेत. मा.सिमाताईंनी काही बोलायचे ठेवले नाही. परंतू हा डी.पी. ठेवत असताना प्रशासनावर आरोप झाले आहेत. जेव्हा प्रशासन डि.पी. प्लॅन करत असते. तेव्हा नागरीकांमध्ये, शेतक-यांमध्ये याबाबत अज्ञान असते. नगरसेवक म्हणून आम्ही काम करतो. आत्ता मिडीयामुळे, माहिती अधिकारामुळे खूप मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण झाली आहे. पूर्वी डि.पी. प्लॅन व्हायचा, फार कोणाला माहिती मिळत नसायची. आता प्रत्येकाला प्रत्येक गोष्टीची माहिती मिळते. हा डि.पी. होत असताना ज्या काही चुका झाल्या, त्या चुका सुधारायचे काम निश्चितपणे नियोजन समितीच्या माध्यमातून करण्यात आले आहे. ज्या हरकती/सूचना घेतल्या,त्या हरकती /सूचनांचा विचार करुन समितीने चांगले काम करायचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. विकास आराखडा आहे, त्या गावाचा नियोजनबद्ध विकास व्हावा, शेतक-यांवर किंवा नागरीकांवर अन्याय होऊ नये, तिथल्या सगळ्या सुख-सुविधा नागरीकांना मिळाव्यात या दृष्टिकोणातून खरेतर विकास आराखडा होत असतो. मागिल काळात च-होली, दिघी, चिखली, रावेत, पुनावळे ही गावे घेतली गेली, इथे गावे महापालिकेच्या हद्दीत घेत असताना या गावांतील लोकांना विरोध केला होता. महापालिकेत समाविष्ट व्हायचे नाही, या मागचे मुख्य कारण तिथले शेतकरी, नागरीक यांची मानसिकता होती. हे शेतकरी किंवा नागरीक वर्षानुवर्षे या भागात राहतात. आमची शेती आहे, जमिन आहे, यावर आरक्षण पडू नये. त्यानंतर आम्ही भूमिहिन, बेघर होऊ नये, अशी मानसिकता तिथल्या नागरीकांची झालेली असते. तोच अनुभव नवीन गावे समाविष्ट करत असताना येतो आहे. महापालिका हद्दीत नवीन गावे समाविष्ट करण्यासाठी शासनाकडून प्रयत्न होतोय. खेड तालुक्यातील परिसरातील नागरीक त्याला विरोध करत आहेत. त्यांच्या मनात भिती आहे. आमची घरे जातील. रस्त्याचे आरक्षण पडेल, अशा चुका झाल्या, म्हणून आम्हाला पालिकेत यायचे नाही अशी त्यांची मानसिकता होते. याची दुसरी बाजू बघितली तर महापालिकेत समाविष्ट झाल्यावर खरेतर खूप चांगला विकास होतो. त्या ग्रामीण भागाकडे तसे बजेट नसते. ड्रेनेज लाईन, पाण्याची लाईन, इन्फ्रास्ट्रक्चर देण्याच्या दृष्टीकोणातून ही ग्रामपंचायत किंवा नगरपालिका सक्षम नसते म्हणून महापालिका व केंद्र शासन निर्णय घेत असते. परंतू या मागील हा मुख्य मुद्दा आहे की, जेव्हा विकास आराखडा तयार होत असताना तिथल्या नागरीकांना विश्वासात घेणे अत्यंत गरजेचे असते. सिमाताईंनी खूप चांगले मुद्दे मांडले आहेत. एवढ्या मोठ्या गावाचा विकास आराखडा करताना प्रशासनाकडून चूका झाल्या आहेत. जुन्या रिजनल प्लॅनमध्ये ९९ एकर मधील मार्केटचे आरक्षण वगळून तो रेसिडेन्शियल झोन करण्यात आला आहे. दुसरीकडे मोठ्या प्रमाणात रिटेल मार्केटचे आरक्षण टाकण्यात आले होते. यामुळे एका ठिकाणी कोणालातरी फेवर केल्यासारखे दिसते. दुसरीकडे छोटे-छोटे जागा मालक यांच्या जागांवर मोठ्या प्रमाणात आरक्षणे

टाकली गेली. खरेतर आमचे मित्र श्री.नवनाथ जगताप यांचे अभिनंदन केले पाहीजे. त्यांनी खूप अभ्यास केला आहे. गुरवपिंपळे यांचा त्यांना अभ्यास नाही इतका अभ्यास ताथवडे गावाचा त्यांचा झाला आहे. किमान ६००/७०० घरे बेघर होण्यापासून वाचवण्याचा त्यांनी यशस्वीपणे प्रयत्न केला आहे. म्हणून आज याठिकाणी ब-याच जणांनी सांगितले आहे, मा.नियोजन समितीने चांगले काम केले आहे. काही गोष्टी त्यांच्याकडून सुद्धा दूर्लक्षित राहिल्या आहेत. इथे पक्षनेते, पक्षाध्यक्ष बसलेले आहेत. ज्या काही दुरुस्त्या आहेत, जसे मा.शारदा बाबर यांनी एक मुद्दा मांडला, या डि.पी. त बस टर्मिनससाठी जागा असली पाहीजे होती. प्रशासनाकडून किंवा नियोजन समितीकडून राहून गेले आहे. सिमाताईंनी व सुलभाताईंनी विषय मांडला की, एकाच ठिकाणी ९९ एकरचा रेसिडेन्शियल झोन केला, तिथे आरक्षणे असली पाहीजेत. यासंदर्भात आपण विचार करावा. जे काही गैरसमज असतील ते दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. आमचा सर्वांना बरोबर घेऊन काम करायचा प्रयत्न राहिला आहे. सत्ताधारी म्हणून सत्तेच्या जोरावर चुकीच्या पद्धतीने प्रयत्न केलेला नाही. निश्चितपणे सर्व पक्षाच्या लोकांना विश्वासात घेऊन नागरीकांच्या हिताच्या दृष्टीकोणातून काम करायचा प्रयत्न केला आहे. म्हणून विकास आराखडा होत असताना ज्या सूचना केल्या आहेत, नियोजन समितीने जे काही केले त्यात चुका असतील तर त्यात बदल करु शकतो. या निमित्ताने प्रशासन व सभागृहाला व सर्व पक्षांच्या सदस्यांना माझी विनंती आहे की, हा आराखडा, एक गोष्ट लक्षात आला असेल तर ताथवडे गावातील नागरीकांचा, शेतक-यांचा कोणत्याही प्रकारचा या गोष्टीला विरोध नाही. कोणताही शेतकरी, नागरीक तुमच्याकडे येथे आलेला नाही. हा आराखडा होत असताना मा.नियोजन समितीने काम केले यात आमच्यावर अन्याय झाला आहे असे झाले नाही. म्हणून मला वाटते, सन्मा. सदस्यांनी ज्या दुरुस्त्या सुचवल्या आहेत, त्या उपसूचना घेऊन हा विकास आराखडा मंजूर करावा असे सांगतो.

**मा.सुलभाताई ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी एक विज्डम कोट वाचून दाखवते – Do not make your voice loud may other hear you, you make your attitude too loud that other that to listen you. एवढ्या जोरात ओरडून बोलू नका की दुसरे तुम्हाला ऐकत नाहीत असे तुम्हाला वाटतेय, तुमचा ॲटीट्युड तसा ठेवा की दुसरे तुम्हाला ऐकायला मजबूर होतील. असा याचा मराठीतून अर्थ सांगितला आहे. कोणी बोलताना मी मध्ये बोलले नाही. मी पूर्ण पेशन्स ठेवून बोलते आहे. तुम्ही मला अक्कल शिकवायची गरज नाही. याठिकाणी एक मराठी म्हण आहे, बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले. कोणाचा इतिहास काय आहे, कोण काय आहे हे सगळ्यांना माहिती आहे. महापौर साहेब, हा तुमचा अधिकार आहे. तुम्ही सांगा. एक सदस्य बोलत असताना दुस-या सदस्याने बोलायचे नाही. मी कम्पलिटली सुरुवात करताना सर्वे नं.९९

पासूनच सुरुवात केलेली आहे. सर्वे नं.९९ बाबत मी सुरुवातीला सांगितले होते, इथे जागेवर आरक्षण टाकले गेले नाही. टोटल क्षेत्रफळ कसे आहे, त्यात काय काय त्रुटी आहेत. हे मी पहिल्यांदा विचारले होते. मग यांना त्रुटी दिसल्या होत्या तर त्यांनी हरकती/सूचना का घेतल्या नाही. त्यावर मा.नियोजन समितीने आरक्षण का टाकले नाही, ते का सोडले. कोण कोणाला मदत करतो, कोण कुठे जाऊन काय करतो इतके दुधखुळे सभागृह नाही. दुधखुळी जनताही नाही. बीएलयू मी बनवला नाही, ज्यांनी बनवला, त्यांना विचारा. मी काय म्हटले, बीएलयूत म्हटले आहे, तिथे घरे नाहीत. जागेवर जाऊन घरे आहेत का नाही हे बघायला मला वेळ नाही. मला माझा नवरा, मुलं, प्रपंच, लग्नकार्य सगळ्या गोष्टी असतात. मला यातून वेळ मिळणार नाही किंवा मी एवढी हुशार नाही की मी एवढा कायद्याचा अभ्यास करु शकते. माझी एवढीच विनंती आहे की, विकास आराखडा राबवित असताना शहरात अनेक ठिकाणी घरे तुटली आहेत. त्यावेळी कुठेही हरकती/सूचना घ्यायला कोणी आले नाही. ज्यावेळी सेक्टर २२ मधील लोक घरघर करुन, विजयनगरचे लोक घरघर करुन तडफडताहेत. आमची सगळी मंडळी गोरगरीब नाहीत. त्यांच्याकडे कोणाचे लक्ष जात नाही. आज आपण काम करत असताना कोण कुठे कुठे जातो, काय-काय करतो, वॉर्डात किती काम करतो. सुसंस्कृत माणसाचे लक्षण हेच असते की, त्याने घरापासून सुरुवात करावी. महापौर साहेब, माझी विनंती आहे, या महापालिका सभेत डि.पी. संदर्भात जे जे काही बोलले गेले आहे, ते जसे आहे तसे तक्रारींत समाविष्ट करुन घ्यावे. यासंदर्भात आमचे म्हणणे आहे, प्रशासनाने काय केले. आम्ही त्यांची बाजू का घेतली. कोण कोणाला वापरुन घेतोय हे जगाला माहित आहे. हजार कोटींचे आकडे कोणाचे आहेत ते बघा. आमचा अभ्यास कमी आहे. हे आम्हाला कळत नाही हे मान्य करते. तुमची हुशारी चालते. हायकोर्ट तुमचे, आम्हाला तेवढे कळते बाकीच्यांना समजायचे कारण नाही. जिथे जिथे गरज आहे, तिथे आपण लक्षात घेत नाही. आम्ही घरचे बघतो. आम्ही निश्चितपणे तसे पण करु शकतो. दाखवायचे लोकांचे हित, जाता जाता स्वतःचे हित साधायचे. सर्वे नं.९९ बाबत संपूर्ण चौकशी झाली पाहीजे. जी-जी आरक्षणे सातबारावर दाखवली आहेत, बिल्डरची जागा दाखवली, आमचे लोक मोजणी करायला गेले नव्हते. सगळ्यांचे सातबारे तपासावेत. प्रथम ड्राफ्ट दिलेला तेवढा तपासून गुगलवरुन मॅप काढला जातो. रस्ता किती गरजेचा आहे. तो डिलिट करता येतो का. इकडे नको असेल तर तिकडे वळवा. रस्ता डिलिट करणार असू तर गोरगरीबांच्या नावाखाली सगळ्या गोष्टी तुम्ही थांबवल्या पाहीजेत. जास्तीत जास्त घरे वाचली पाहीजेत. या मताशी आम्ही सहमत आहोत. मी गेले २ महिने हीच बोंब मारतेय. या दिवसाची वाट बघत नव्हते. कधीच बोलायचे होते. ७/१२ ऑन लाईन काढायला घ्यायचे तर साईट किती दिवस बंद होती. फिल्डींग कुठपासून कुठे आहे बघा. आयुक्त साहेब, तुम्हाला चांगले, हुशार म्हटले आहे, इमानदार म्हटले आहे. तुम्ही तेवढे इमानी म्हणजे बाकीचे सगळे बेईमान आहेत असे

होत नाही. माझी आपल्याला विनंती आहे, या प्रकरणाची सीबीआय चौकशीच काय पण १२८ लोकांची नार्को टेस्ट करा. कोण-कोण त्यात आहेत कोणालाही सोडायचे नाही. डि.पी. होऊन गेला, त्यात भ्रष्टाचार झाला असेल तर ते करणा-या प्रत्येक व्यक्तीला इथे शिक्षा झालीच पाहीजे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले. माझी मैत्रिण मा.सुलभा ऊबाळे यांनी खूप चांगले उदाहरण दिले. मी कोणाचे नाव घेतले नाही. मी साहेबांची तारीफ केली. चांगल्या माणसाला आम्ही चांगले म्हणणारच. दुध का दुध, पानी का पानी मी करणारच. पुढे काय विषय नाही. कोण कोणाला कसे शिकवते. शिवसेना विरुद्ध शिवसेना करता काय, सभागृहात शोभा होईल. ज्यादिवशी मी शिवसेनेची मेंबरशिप घेतली, त्या दिवसापासून शिवसेनेबरोबर शिवसैनिकांबरोबर कोणी हरकती घेतल्या,सूचना घेतल्या. पहिल्या दिवसापासून. मी मजाक मध्ये म्हटले नवनाथ काय करतोय, दे पैसे. तुम्हाला बोलले नाही. या सभागृहात भ्रष्टाचार करणारे अनेक सदस्य आहेत. मग तोंड दाखवायला जागा राहते का. मग याला पत्र देऊ का त्याला पत्र देऊ. सगळा भाव कशासाठी. सुखवानी मघाशी दिसला. काही लोकांनी त्याची सुपारी घेऊन त्याच्या जागेवर आरक्षण टाकले. मग त्याच्या जागेवर आरक्षण टाकले ते काढा, ते काढा. त्यांची सुद्धा उपसूचना आली आहे. मग सभागृहाला, पत्रकारांना व लोकांना पण कळेल कोण कोणाच्या बाजुने आहे. विषय असा आहे. मी जोराने बोलले म्हणून कोणाला ऐकू गेले नसेल. माझा आवाजच मुळात तसाच आहे. ख-याचा आवाज मोठाच असतो. भजन जोरात चालते. संतवाणी जोरातच असते. आत्ता उपसूचना आल्या नाहीत तर मला सांगा. त्यांच्या उपसूचना आल्यातर मी काय बोलले ते शंभर टक्के बरोबर आहे. त्याच्यासाठी हे सगळे प्रकरण निघालेले आहे. ज्यांच्या उपसूचना आल्या होत्या त्या प्रत्येकाने दिल्यात. सदस्य वाचतीलच. मग बघा. बोलायचे नव्हते ते मला बोलायला लावले. जे जे बिल्डर आहेत, त्यांच्या जागेवर आरक्षणे पडली होती ती सगळी सगळी उपसूचना देऊन काढणार आहेत. मग आपण त्या उपसूचना स्विकारणार आहात का नाही. स्विकारणार. त्या आसवानीसाठी, गरीब शेतक-यांसाठी. आसवानी नावाचा शेतकीर असतो का. आख्खे शहर, त्याने मुख्यमंत्र्यांपर्यंत तक्रार केली. आसवानीसारख्या बिल्डरसाठी एवढा तमाशा होऊ शकतो तर गोरगरीबांसाठी झालाच पाहीजे. तो त्यांचा हक्क आहे. आत्ता उपसूचना आली तर बोलणा-यांनी आपली तोंडं काळी करायची. याठिकाणी बसलेल्या पत्रकार बंधू भगिनींना माझी विनंती आहे की, आसवानीबद्दल अपशब्द काढले असतील, पण उपसूचना आली तर आपण प्रसिद्धी देताना योग्य ते लिहावे, योग्य ते मांडावे. मी आजच हरकत घेत नाहीतर गेले कित्येक वर्षांपासून घेते आहे. गोरगरीबांच्याच घरांसाठी नाहीतर झोपडपट्टी पुनर्वसनातील लोकांसाठी. या योजनेतील लोकांचा सर्वे केला, कमिटी

बसवली. २४७ लोक बोगस निघाले. मा.तानाजी खाडे यांना विचारा. तुम्ही उपसूचना काय देणार. तुमचे लागेबांधे आहेत. तसे आमचेही काहीजण तुमच्या पक्षात आहेत. आम्हाला सुद्धा उपसूचना कळाल्या आहेत. मला बदनाम करायचे असेल, तुम्हाला बघतो असे म्हणून माझ्या अंगावर माणसे सोडू नका. कुत्र्यासारखी मी त्यांना लाथ घालते. आयुक्त साहेब, माझी विनंती असणार एकतर डि.पी. रद्द करा. नाहीतर यांच्या कोणत्याही प्रकारची उपसूचना स्विकारु नका. या उपसूचना स्विकारल्यातर मी काही बोलायची गरज नाही. हात कंगन को आरसी क्या !

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आधी सांगितल्याप्रमाणे मलाही या सभागृहात २५ वर्षे झाली. दूर्दैवाने अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेल्या लोकांचे ज्ञान इतके वेळ ऐकावे लागले. यामुळे ज्ञानात काही भर झाली नाही. कायदा, एलयूटी, एक्झिस्टींग लॅण्ड यूज, सेक्शन २६, सेक्शन २८ आत्ता सेक्शन ३० हे सगळ्या जगाला माहिती आहे. मिडीयाने कोणाला सोडले नाही, पत्रकारांनी सगळ्या गोष्टी लिहून काढल्या. भदाणे मॅडमचे नाव एखाद्या महिलेचे नाव, एखाद्या अधिका-याचे नाव अशा पद्धतीने घेऊन कोणावर आरोप करुन काय सिद्ध करायचे होते हे मलाही कळत नाही. वास्तविक पाहता, मा.आशिष शर्मा साहेब असताना हा आराखडा तयार झाला होता. ते ट्रेनिंगला गेले. हा आराखडा आयुक्तांच्या कस्टडीत होता. अर्थात आयुक्तांच्या कस्टडीत आराखडा होता. नवीन आयुक्त आल्यानंतर प्रसिद्धी द्यायची, स्वतःच्या स्वाक्षरीने द्यायची का शर्मा यांच्या सहीने द्यायची. शर्मा यांच्या काळात कलेक्टर असतील, पालकमंत्री असतील या लोकांना काही बदल सूचवायचे असतील. आयुक्तांना तशा प्रकारचे जर निर्देश दिले गेले तर सेक्शन २६ हा महापालिका सभेसमोर येण्याआधी विषय एकदा, दुस-यांदा, तिस-यांदा आयुक्तांना वाटले बदल करावा तर हा आयुक्तांचा अधिकार आहे. एमआरटीपी कायद्याने हा अधिकार आयुक्तांना दिला आहे. ही बातमी लिक व्हायला नाही पाहीजे होती. ही गोष्ट तितकीच खरी आहे. मा.श्रीरंग बारणे यांनी सांगितले, हा नकाशा बाजारात उपलब्ध आहे. विषय सभागृहासमोर येईपर्यंत ते सेक्शन २६ पर्यंत येईपर्यंत प्रशासनाकडून जी गुप्तता पाळली गेली पाहीजे होती. ती पाळली गेली नाही. हे तितकेच दूर्दैव आहे. परंतू त्यात बदल करायचा अधिकार हा मात्र आयुक्तांना आहे. दरम्यानच्या काळात सेक्शन २६ आधी परदेशी साहेब यांची बदली झाली असती तर, कदाचित दुस-या आयुक्तांना निर्देश असतेतर शेवटी आयुक्त सुद्धा महत्वाचे आहेत. फक्त भदाणे मॅडम, भदाणे बाईंना बोलण्यात काही अर्थ आहे का. चूका झाल्या आहेत हे पण मान्य आहे. सर्वेक्षण नीट झाले नाही हे सुद्धा मान्य आहे. नियोजन समितीवर काही आरोप झाले. नियमाप्रमाणे नियोजन समितीकडे आहे. त्यांना सेक्शन २६ मध्ये काय केले. एक्झिस्टींग मॅन्युअलमध्ये काय केले. या सगळ्या गोष्टींचा ऊहापोह भरपूर वेळा झाला. ज्यांना अधिक अभ्यास करायचा ते अधिक अभ्यास करतात. ज्यांना घरचा अभ्यास

सोडून , आख्या गावाचा अभ्यास करायचा ते आख्या गावाचा अभ्यास करतात. ज्यांना आपला प्रपंच सोडून सर्व प्रपंचाची काळजी घ्यायची ते सगळ्या प्रपंचाची काळजी करतात. ज्याचे काम त्याने करावे. सगळ्यांची ताकद इतकी असतेच असे नाही. जो तो त्याच्या ताकदीप्रमाणे काम करत असतो. सेक्शन ३० चा अधिकार महासभेचा आहे. आयुक्तांनी काय केले. किंवा सेक्शन २८ प्रमाणे मा.नियोजन समितीने काय केले, या दोन्हींचा निर्णय बदलायचा अधिकार एमआरटीपी १९६६ च्या सेक्शन ३० प्रमाणे महासभेला आहे. मग उपसूचना द्यायची का, ते वगळायचे का ठेवायचे काय करायचे हा अधिकार महासभेचा आहे. महासभेने तो घ्यावा, राबवावा. ज्यांना वाटते हे चुकीचे आहे, ते चुकीचे आहे. मला परवा काही पत्रकारांनी विचारले होते. मी सांगितले होते, आम्ही जे करायचे ते नियमानुसार करणार आहोत. नियम सोडून काही काम करणार नाही. त्या व्यतिरिक्त कोणाला पटले नाहीतर ते मतदान घेऊ शकतात, हायकोर्टात जाऊ शकतात, हायकोर्टात समाधान झाले नाहीतर सुप्रिम कोर्टात जाऊ शकतात. कायद्याअन्वये सर्वांना मुभा आहे, अधिकार आहे. आम्ही कोणालाच नावे ठेवली नाहीत. आम्हाला माहित असते, एवढ्या अभ्यासपूर्वक लोक इथे येतात. आम्हाला अधिकार असता, आम्ही आमच्या पालकमंत्र्यांना सांगितले असते, या ३ लोकांबरोबर यांना सुद्धा इथे पाठवून द्या. एवढा सभागृहाचा वेळ घेण्यापेक्षा मग एवढ्या चुका आयुक्तांनी केल्या नसत्या, स्थायी समितीने केल्या नसत्या. वास्तविक इतके हुशार, विद्वान लोक सभागृहात असताना अशा चुका कशा काय होतात. हा पण खूप मोठा प्रश्न आपल्या सर्वांसमोर आहे. या महापालिकेत ताथवडे गावातील दोन्ही नगरसेवक राष्ट्रवादी पक्षाचे आहेत. एकाने खंत व्यक्त केली. दुस-याने पवार साहेबांना पत्र दिले आहे. आम्हाला आत्तापर्यंत पत्र दाखवायची सवय नव्हती. पण दुर्दैवाने काळाप्रमाणे बदलावे लागते. ते पत्र महापौर साहेब तुम्हाला देतो. नवले साहेबांचे पत्र आहे. ग्रामस्थांचे पत्र आहे, हा डि.पी. लवकरात लवकर मंजूर करावा. ते तुमच्याकडे पत्र घ्या. माजी खासदारांचे पत्र आहे, हा डि.पी. मंजूर करावा. आमच्याकडे २/४ अतिकार्यक्षम लोक आहेत त्यांना वाटले. ते तिथे गेले. काही ग्रामस्थांनी सांगितले, सगळ्यांनी विरोध केला. नव्याने याचा ऊहापोह चालू झाला. अर्थात हा आरोप होईल. काहीतरी बोलतील, करतील, यात हे करुन दाखवा, ते करुन दाखवा. हिंमत असेल तर ते करा. हे करा. हिंमत सर्वांना आहे. पुरुषांनी काही बोलले तर ते नियमबाह्य होते. महिलांनी मात्र तोंडसुख घ्यायचे. सगळ्यांचे कपडे काढून टाकायचे. मोठेपणाने मग म्हणायचे, माझे काय चुकले असेल तर ते पोटात घ्या. जो काम करतो तो चुकतो. जो काम करत नाही तो बिनचुक बरोबर असतो. आम्ही व्यवसाय करतो, ब्लॅकमेलिंगचा धंदा करत नाही. व्यवसाय करताना आमच्याकडे शेतकरी बोंबलत आले नाहीत. नजराणा भरला, पैसे भरले. रितसर पावती आहे. कायदा, कायदा काय, सर्व तुम्हाला एकट्यालाच कळतो का आम्हाला कायदा कळत नाही का. सारखे ओरडत सुटायचे हे करतो. तुम्हाला करायचे ते करा मुभा आहे.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत झोळ्या घेऊन फिरायला मुभा दिलीच आहे. याच्या उकिरड्यात हात घाला, त्याच्या उकिरड्यात हात घाला. उठलसुटलं उकिरड्यात हात घालायचा. आम्हाला आमचा उकिरडा वापरायचा आहे. मोशीच्या उकिरड्याचा प्रश्न पडला आहे तो आधी सोडवा. माझे म्हणणे आहे, ९९ बद्दल त्यावर उपसूचनेद्वारे राष्ट्रवादीचे सर्व मान्यवर बसलेले असतील, त्यांनी सांगितले, खासदारांना पण पाहिजे, आमदारांना पण पाहिजे. आम्ही शासनाकडे सिंगापूरच्या धर्तीवर रिटेल मार्केटचे रिझर्वेशन टाकले होते. दुसरे सांगा, बिल्डर,बिल्डर,बिल्डर, या बिल्डरांकडे जाणारे लोक कोण आहेत. बिल्डरांची चापलूसी कोण करतो. बिल्डरांपर्यंत निरोप कोण देतो. त्यांना ब्लॅकमेलिंग कोण करतो, त्यांच्या चौकश्यांमागे कोण लागतो, त्यांचे रेकॉर्ड कोण चाळतो, त्यांच्या मागे वेळ कोण घालवतो हा मोठ्ठा संशोधनाचा विषय आहे. दुस-याचे घर बघायचे. आपल्याला आपल्या घरात सुख मिळत नसेल तर माणूस गावभर फिरतो. मी पत्रकारांनाही सांगू इच्छितो की, आम्ही सर्वे क्र. ९९ वर मा.नियोजन समितीने त्यात काही आरक्षण टाकले नव्हते. राष्ट्रवादीवर टिका व्हायला नको. त्यामुळे मागे सुद्धा नियोजन समितीत सांगितले, इतके क्षेत्राला इतक्या हेक्टरमागे इतके आरक्षण टाकू शकतो. मग हे नॉर्मस् लक्षात घेता त्याठिकाणी ६ १/२ हेक्टरवर रिटेल मार्केटचे आरक्षण टाकले आहे. ५ १/२ हेक्टरचे पार्किंगचे आरक्षण टाकलेले आहे व एक हेक्टर वर मल्टीपर्पज हॉलचे आरक्षण टाकले आहे. त्या मा.नांदगुडे सांगत होते, लायब्ररी, मल्टी पर्पज हॉल इथे टाकले आहे. आम्ही सर्वे क्र.९९ मध्ये ९२ एकरमध्ये ७/८ हेक्टर जागेवर राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने म्हटले तरी चालेल तिथे आरक्षण टाकले आहे. बिल्डरला स्कोप दिलेला नाही. त्याठिकाणी तिथे नाना लोंढे असतील, पवार, पाटिल आहेत, काटे, जगताप आहेत या लोकांच्या जमिनी आहेत. या शेतक-यांनी बिल्डर होऊ नये का. काटे, जगताप यांनी बिल्डर व्हायचे नाही का. जगताप यांनी टिडीआर किंग म्हणाले. त्यांनी टिडीआर केला मग ते काय चोर आहेत का. तुम्हाला मिळत नाही. कळत नाही. दिसत नाही तर रडता कशाला. टिडीआर सरकारने कायद्याअन्वये सर्वांना दिलेला हा अधिकार दिला आहे. कोणाच्या घरातून चोरुन आणलेला नाही. टिडीआर किंग म्हणायला. आयुक्त साहेब, आम्ही तुम्हाला विनंती केली होती, टिडीआरच्या मिटींग लवकर घ्या. सन २००९-१० नंतर नवीन धोरणाप्रमाणे रेडी रेकनरपेक्षा दुप्पट दर देण्याचा कायदा केला आहे. कलेक्टर यांना अधिकार दिला आहे, ५० टक्के पर्यंत एक्सट्रा द्यावेत. यापुढे शेतकरी तुम्हाला जागा देणार नाही. उलट रेडी रेकनरप्रमाणे महापालिकेला डेव्हलप करता येणार नाही. अशी कितीतरी आरक्षणे आहेत. दुसरा विषय काढला गेला श्री.आसवानी यांचा. सर्वे क्र.५९/६० मध्ये आयुक्तांचा मूळ प्रस्ताव ठेवला होता. त्यात लिहिले आहे, निवासी विभाग आहे. तिथे आरक्षण नव्हते. ते आरक्षण चुकून टाकले गेले. रागाने टाकले गेलं. किंवा नियोजन समितीकडून टाकले गेले. त्यावर चर्चा केली. अशी जागा आहे. ऐकवले की श्री. आसवानी यांनी घेतले असेलतर तो महापालिकेचा करदाता आहे, चोर आहे. तो कोण आहे. त्याने

तुम्हाला घाबरुन आम्ही उपसूचना द्यायची. कोर्टात जायचे असेल तर जा. एमआरटीपी ॲक्टच्या सेक्शन ३० अन्वये आम्हाला अधिकार आहेत. आम्ही या उपसूचना देणार. तुम्हाला मतदान घ्यायचे असले तर घ्या. आम्ही कायद्याने मंजूर करणार. ज्यांना कोर्टात जायचे आहे त्यांनी जावे. कायद्याने लोकांचे पॉझिटीव्ह ते बघा. याचे वाट्टोळे, त्याचे वाट्टोळे. सकाळपासून दप्तर घेऊन फिरायचे, हे लोक दमत कसे नाहीत मला माहित नाही. जे करायचे ते नियमाने करा. आम्ही नियमांत हयगय करणार नाही.

आत्ता सांगितले, डि.पी. मंजूर करु देणार नाही. सर्व अधिकार यांनाच देऊन टाका. आम्ही जातो घरी. खरेतर मा.प्रशांत शितोळे यांनी जी उपसूचना मांडली होती. स्वतः मा.प्रशांत शितोळे व मा.अजित गव्हाणे मॅडम यांच्याकडे गेले होते. मॅडमनी स्वतः सांगितले, मा.प्रशांत शितोळे यांनी दिलेली सूचना तुम्ही का मला इनकार्पोरेट केली नाही. मॅडम यांनी आम्हाला १६ डिसेंबर १९९३चे महाराष्ट्र शासनाचे नोटीफिकेशन दिले. त्यात स्पष्ट म्हटले आहे, (नोटीफिकेशनचे वाचन केले.) ॲक्ट काय म्हणतो – (वाचन केले.) याचा अर्थ असा आहे, जर महापालिकेने, राज्य शासनाने नियमावली आहे त्याच्या अनुषंगाने १ चटई निर्देशांक करायचे जर तुम्हाला बंधन टाकले आहे. सेक्शन १५४ प्रमाणे असे डायरेक्शन्स असताना वाढीव करणार नाही. कोणाच्याही मनात येईल, ५ द्यावा, ४ द्यावे. अशा पद्धतीने डॉक्युमेंटमध्ये पब्लिश करु शकत नाही. असा सेक्शन/प्रोव्हिजन असल्यामुळे मा.प्रशांत शितोळे यांनी दिलेली उपसूचना त्यात मर्ज करता आली नाही या गॅजेटप्रमाणे. फक्त तुम्ही एकट्याने अभ्यास करायचा मक्ता घेतलेला नाही. आम्हाला सुद्धा कळते. मी १० वेळा म्हटले. आम्ही तुमच्या विरोधात एकही शब्द बोललो नाही. तुम्हाला राग का येतो. तुम्ही अडीच तास सभागृहाचा वेळ घेतला. तुम्ही लोकांना सांगता, माझ्या नादी लागू नका. जे नादी लागतात त्याच्या कंबरड्यात लाथ घालते. मी असे करते, तसे करते. तुमचे नाव घेतले नाही.

(मा.सिमा सावळे यांनी यावेळी भाषणास आक्षेप घेतला.)

**मा.योगेश बहल** - सुरुवात तुम्ही केली होती. या पद्धतीने मी तुम्हाला वैयक्तिक बोललो नाही. जर बोललो असेलतर त्याबद्दल माफी मागतो. दिलगीरी व्यक्त करतो. तुमचे माझे व्यक्तिगत भांडण नाही. आरक्षणाबाबत जे आरोप केले जातात, त्यात ९९ मध्ये ज्या प्रकारची आरक्षणे टाकलेली आहेत, त्याठिकाणी ज्या चुका झाल्या आहेत. या चुका दुरुस्त करायचा प्रयत्न आम्ही सुद्धा केला आहे. म्हणून सेक्शन २६, सेक्शन २८ प्रमाणे ज्या दुरुस्त्या अपेक्षित होत्या. त्या सेक्शन ३० मध्ये दुरुस्ती करुन त्याअनुषंगाने साधारणपणे १३/१४ उपसूचना देऊन त्या दुरुस्त्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड शहराचा विकास यात जेव्हा पिंपरी चिंचवड हे एक गाव होते, हे गाव आता पिंपरी चिंचवड शहर म्हणून ओळखले जाते. एखाद्या गावाला सिटी असे केव्हा म्हटले जाते, तेव्हा बाहेरुन येणारे लोकदेखील त्या शहरावर प्रेम करतात. शहराचा विकास वाढत चालला आहे. आज लोकांची मागणी सुरु झाली. पिंपरी चिंचवडमध्ये आम्हाला आल्यानंतर इथे सगळ्या सुखसोयी मिळतात. ग्रेड सेपरेटर, उड्डाणपूल आहे. पाणी व्यवस्था चांगली आहे. खूप लोकांचे म्हणणे आहे, सिटि म्हणून ज्या-ज्या गोष्टी असाव्यात त्या इथे मिळतात. कोणाला कमी लेखायचे नाही. जेव्हा पुण्यातून पिंपरी चिंचवडमध्ये येताना दापोडीत आल्यावरच समजते आपण पिंपरी चिंचवडमध्ये आलो आहोत. या महापालिकेला आशिया खंडातील श्रीमंत महापालिका म्हणतात. आपण इथे काम करता असताना, १९९७ मध्ये काही गावे महापालिका हद्दीत समाविष्ट केली. त्यावेळी आदरणीय नानासाहेबांचे म्हणणे होते, गावाचे गावपण रहावे. त्यांचा मान ठेवून ज्यावेळी ताथवडे गावाचा डि.पी.तून वगळले. त्यानंतर त्यांनी स्वतःच मागणी केली होती. ग्रामस्थांची मागणी आली. ताथवडे गावाच्या पलिकडे हिंजवडी, अलिकडे पिंपरी चिंचवड शहर आहे. मोठे मोठे रस्ते आहेत, पूल आहे. पाण्याची व्यवस्था व्यवस्थित आहे. सगळ्या गोष्टी बघता ग्रामस्थांना वाटले, आम्हाला महापालिकेत येणे गरजेचे आहे. आमच्या जमिनी चांगल्या प्रकारे डेव्हलप झाल्या पाहीजेत. आमच्या मुलाबाळांना चांगल्या पद्धतीने काम करता आले पाहीजे. जमिन विक्री केल्यानंतर जास्त उत्पन्न मिळण्यासाठी, चांगल्या गोष्टी करण्यासाठी ताथवडे गावातील ग्रामस्थांना वाटले, आपण हा डि.पी. मंजूर करुन घेतला पाहीजे. या माध्यमातून खासदारांचे म्हणणे होते त्याप्रमाणे ताथवडे गावाचा डि.पी. करायला घेतला. त्यावर बराच उहापोह झाला. सर्वसाधारण महिला म्हणून वाटते, आजूबाजूच्या गावांनासुद्धा पिंपरी चिंचवड सारखीच सुविधा मिळाली पाहीजे. सावत्रपणाची भूमिका नको. सगळ्या सुविधा मिळाल्या पाहीजेत. याठिकाणी हा प्रस्ताव सुद्धा मान्य केला. केंद्र सरकारनेसुद्धा १ जानेवारीला आम्ही पत्रकार परिषद घेतली. ताथवडेचे लोक किती नशीबवान आहेत. जलनिस्सारण व्यवस्था करण्यासाठी केंद्र सरकारने पाणी पुरवठा व्यवस्था ४१.५० व ४०.५१ अशी तरतूद मिळाली. या त्याचा कायापालट कसा होणार आहे तो आम्ही समजू शकतो. चालतो तो चुकतो. चालणार नाही तो बिनचुक असतो. अशा पद्धतीने कोण कुणाकडे गेला, कोणी काय केले त्यात काही तथ्य आहे असे वाटत नाही. ज्यांना अधिकार आहेत त्यांनी हे अधिकार समाजाने दिलेले आहेत त्यांनी ते नक्की वापरावेत. सगळ्या गोष्टींचे पोस्टमार्टम झाले आहे. त्यावेळी ज्यांचे अधिकार आहेत त्यांनी त्यांनी ते अधिकार वापरले आहेत. शर्मा साहेबांना त्यांचा अधिकार होता. भदाणे मॅडम यांना त्यांचे अधिकार आहेत. परदेशी साहेबांनी त्यांचे अधिकार वापरले. सभागृहाला समितीला देखील अधिकार आहेत. ते पुढेही वापरणार आहेत. सुनितातार्इंनी म्हटले तुम्हाला वाटत असेल तर त्यांनी चूक केलीतर ती नक्की

दुरुस्त करा. पहिली बातमी आली, ९९चे आरक्षणात प्रश्नचिन्ह आहे. वाटते, खरेतर त्यात काही आहे का. बातमी वाचल्यानंतर प्रत्येक व्यक्तीला वाटते. शेवटी कोळसा उगाळलातर काळाच निघतो. आम्हाला ताथवडेचा सर्वांगिण विकास करायचा आहे. खरेतर त्या शेजारीच पार्किंगचे आरक्षण आहे. नियोजन समिती आहे. त्यांनी आम्ही विनंती केली. मी असेल, सभागृह नेते असतील, ज्येष्ट सहकारी असतील त्यांना वाटत असेल बैठका झाल्या, ज्या-ज्या गोष्टी वाटल्या. ८ एकरवर सगळे कसे बसू शकते, काय केले पाहीजे. कशा पद्धतीचे केले पाहीजे. या सगळ्या गोष्टींचा विचार करुन सारासार पद्धतीने ताथवडेमध्ये रिटेल मार्केट करावी या दृष्टीकोणातून प्रयत्न राहीले. पहिल्यापासून काय विषय आहेत. स्मशानभूमी आहे, मैलाशुद्धीकरण केंद्र आहे, इलेक्ट्रॉनीक हब हवे आहे हे पहिले, सगळ्या गोष्टी आहेत. कमिटीने जे दिले आहेत. सुखवानीचे १६० विषय आहेत. कोणाचा तरी मित्र, प्रतिनिधी असतो, ओळख असते. या दृष्टीकोणातून सहकार्य करायचे कोणाला वाटते.आम्हाला सुद्धा वाटले, भोसरी, त्रिवेणीनगरची घरे पाडली, काळेवाडीतली घरे पाडली. ज्याच्या घराची भिंत ढासळते, त्याचे मन कसे तुटत असेल त्याचे अक्षरशः त्याचा प्रत्यय आम्ही महिला आहोत. गृहिणी आहोत. त्याचा किती त्रास होत असेल यातना होत असतील. म्हणून कुठे बदल करावा लागेल म्हणजे घरे वाचतील म्हणून कमिटीपेक्षा आम्ही जास्तीत जास्त ६०० ते ८०० घरे वाचवायचा प्रयत्न केला आहे. रस्ता होत असेल तर ते ठिक आहे. समोर शाळा आहे. रस्ता तिथे करता आला नाही. मग तिथे आरक्षण करता येते का. सगळ्या गोष्टी बघून आम्ही या पद्धतीने विचार केला. याचा विचार करण्यापेक्षा सन्माननीयांच्या ब-याचशा सूचनांचा सहभाग करुन घेतला आहे. मला स्वतःला स्त्रीबद्दल प्रचंड अभिमान आहे. कोणत्याही स्त्रीबद्दल गैर बोलायला, ऐकायला मला अजिबात आवडत नाही. तुम्हाला त्यात वाईट वाटायचे कारण नाही. फक्त आमचेच ३ लोक त्यात होते असे नाही, शासनाचे ३ लोक सुद्धा त्यात होते. आमच्या शहर अध्यक्षांनी सुद्धा सांगितले, जर सर्वे क्र. ९९ चा माणूस बिल्डर आहे. त्यांने दोन नंबरचा पैसा आणला आहे का. त्याने काम धंदा केला आहे. पैसे कमवले आहेत. मग त्याने काम करु नये का, जमिन घेऊ नये का. मला समाजसेवेची आवड आहे म्हणून मी हे क्षेत्र सोडून दिले. ज्या-ज्या क्षेत्रात जे जे लोक आहेत, त्यांनी ते काम केले पाहीजे. म्हणजे इथेच सगळे उचलून त्याच्या अंगावर टाकायचे का. तरीसुद्धा राष्ट्रवादी पक्षाची निंदा होऊ नये. काय आहे ९९ नंबर. ९९ हा ९९ नंबरच असतो. ९९ हा शुभ अंक आहे, त्याची बेरीज करा अंक ९ च येतो. कोणाला असे वाटायला नको. सिनिअर अधिकारी भदाणे मॅडम यांच्या वर कोणी आक्षेप घेऊ नये. त्यांना विचारले होते. त्या म्हणाल्या तुम्हाला अधिकार आहे. असे तुम्हाला करायचे ते बदल तुम्ही करु शकता. सर्वे क्र. ९९ वर आरक्षण टाकले तिथे स्मशानभूमी आहे. चेअरमन यांना रिक्वेस्ट केली, तिथे स्मशानभूमी आहे. आरक्षणात जास्त बदल करु नका. मुलांना खेळायला ग्राऊंड पण पाहीजे त्या दृष्टीकोणातून विचार करा. मी सुद्धा उपसूचना देणार आहे. सगळ्या

गोष्टींचा सारासार विचार करुन उपसूचना देण्याचा प्रयत्न करणार आहोत. कोणाला झुकत माप, कशाचा मॅप कळत नाही. मी इथे गेली २२ वर्षे येते. आज ऐकल्यानंतर मी आयुष्यात असे आकडे कधी ऐकले नाहीत. हे पवित्र सभागृह आहे. कामकाज करताना एकमेकांवर शिंतोडे उडवण्यापेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संविधानसमोर आहे, ते समोर ठेवुन आपण काम करत असतो. त्यावेळी खरेतर खूप चांगल्या पद्धतीने काम केले पाहीजे. सभागृहात तैलचित्र लावलेली ही सगळी मंडळी देशासाठी, समाजासाठी काम करणारी मंडळी आहेत. याचा सारासार विचार केला पाहीजे असे मनापासून वाटते. प्रत्येकाच्या हक्काप्रमाणे पहिल्या पानात सांगितले तसेच दुस-या पानात सुद्धा हॉस्पीटल आहे, फायरब्रिगेड आहे,मल्टीपरपज हॉल आहे. सगळ्या गोष्टींत प्रत्येकाने प्रयत्न केला आहे. सभागृहाने निर्णय घेण्याच्या दृष्टीकोणातून बदल घडवायचा आम्ही सुद्धा प्रयत्न केला आहे. चुकीची दुरुस्ती ही केली पाहीजे. परंतू समाजातील गरीब लोकांचे कुठेतरी नुकसान होत नाही. याची खबर प्रत्येकाने घेतली पाहीजे. प्रत्येक माणूस कितीतरी कि.मी. अंतरावरुन आलेला माणूस आहे. घर मिळाले नाहीतर झोपडीत राहतो. झोपडी काढून टाकली तरी तो रस्त्यावर थांबतो. परत गावाला निघायला लागतो. ही समाजाबरोबर कामकाज करणारी मंडळी आहेत. त्या माध्यमातून काम करतो. महापालिका सभा तहकूब करु नका, काल नानासाहेबांनी फोन केला होता. आजदेखील सांगता येत नाही. म्हणून बोलून गेले, आम्ही नक्की समजून सांगू. यमुनाताईबरोबर त्यांचे ग्रामस्थ आले होते. त्यांनी विनंती केली होती. आम्हाला ग्रामस्थ म्हणून घ्यायचे नाही. आम्हाला सुद्धा सिटीत यायचे आहे. उरलेले आयुष्य चांगल्या पद्धतीने घालवायचे आहे या दृष्टीकोणातून सगळेजण प्रत्यत्न करु या. पलिकडील आय.टी. हब आहे त्याला शोभेल असे कसे करता येईल याचा विचार केला गेला पाहीजे. माझे सहकारी श्री. प्रशांत शितोळे यांना बोलता बोलता मी थांबवले होते. ते उपसूचना वाचणार आहेत. त्यांना विनंती करते की त्यांनी उपसूचना वाचाव्यात.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ताथवडे विकास आराखड्याच्या विषयावर ज्या दुरुस्त्या सुचवल्या गेल्या, त्या येत्या ४/५ दिवसांत उपसूचना तयार केल्या आहेत. सर्वांनी या उपसूचना व्यवस्थित ऐकाव्यात. या उपसूचना माझ्या एकट्याच्या नसून सर्वसमावेशक आहेत. अडचणी दूर करायचा प्रयत्न करण्यात आला आहे.

उपसूचना क्र. २)

**मा.सुरेश म्हेत्रे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

१) सर्व्हे नं.४१ व ६२ मधील रद्द करण्यात आलेले आरक्षण व त्यामधील २४ मीटर रोड हा सर्व्हे नं.६३ च्या हद्दीपासून ६२ व ४१ उत्तर हद्दीपासून करण्यात यावा. त्यामुळे अनेक शेतक-यांना रोडचा उपयोग होईल.

२) सर्व्हे नं.७८ मधील स्थानिक शेतक-यांचे घर शैक्षणिक झोनमध्ये दाखविण्यात आले आहे. तरी ते वगळून असणा-या झोनमध्ये वर्ग करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.वसंत लोंढे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. ३)

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नुकतीच दुरुस्ती करण्यात येत असणा-या बांधकाम परवानगी नियमावलीमध्ये पिंपरी चिंचवड शहरात बी.आर.टी. कॉरीडॉर हा १०० मीटर ऐवजी २०० मीटर ठेवणेच्या अनुषंगाने हरकती-सूचना मागविल्या त्याचप्रमाणे नव्याने समावेश होणा-या मौजे ताथवडे गाव येथील बी.आर.टी. कॉरीडॉर २०० मीटरपर्यंत लागू ठेवून पुढील आवश्यक ती सर्व प्रकारची प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करणेस मु.बा.न.प्रा.अ.नि. चे कलम १९६६ च्या ३० अन्वये मान्यता देणेत यावी.

**मा.शत्रुघ्न काटे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. ४)

**मा.किरण मोटे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

ताथवडे गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन आहे. सदर विकास योजनेतील स.न.१७५ येथिल जागेवर आरक्षण क्र.३ खेळाचे मैदान क्षेत्र १०००० चौ.मी. मा.आयुक्त यांनी प्रस्तावीत केलेले होते. नियोजन समितीने सदरचे आरक्षण स.न.१६० व स.न.१६१ मध्ये स्थानांतरीत करण्याचा निर्णय घेतला आहे. तो रद्द करावा व मा.आयुक्त यांनी सुचविलेले खेळाचे मैदान हे आरक्षण योग्य असल्याने स.न.१७५ मधिल जागा निळ्या पूररेषेत आहे. त्यामुळे प्रचलित नियमानुसार व शासनाच्या धोरणानुसार ओपन यूझर अनुज्ञेय आहे. त्यामुळे

स.न.१७५ मधिल १०००० चौ.मी. जागा खेळाचे मैदानासाठी आरक्षित करावी व त्या शेजारील स.न.१७४ व १७५ हि जागा सुद्धा निळ्या पुररेषेतील असल्याने सदर जागा उद्यानासाठी आरक्षित करावी. त्यासाठी सोबत नकाशा जोडलेला आहे म्हणजे स.न.१७५ मधिल नदीला लागून असलेल्या जागेचा उपयोग जमिन मालकाला होणार नसल्याने मनपाला ही जागा लवकर ताब्यात मिळू शकेल व तेथिल नागरिकांना खेळाचे मैदान व उद्यान या सुविधेचा वापर करता येईल. यानुसार मान्यता देणेत यावी.

**मा.जितेंद्र ननवरे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. ५)

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते -

मौजे ताथवडे गावाचा प्रारुप विकास आराखडा प्रसिद्ध करणेत आला असून सदर आराखड्यामध्ये स.न.५५ व ५६ च्या हद्दीवर नियोजित दक्षिण-उत्तर १८ मी. रस्ता प्रस्तावित करणेत आला आहे. सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस नागरीकांनी छोटे छोटे भूखंड विकत घेतले असून मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार भूखंड विकसित करतांना साईड मार्जिन मिळणार नाही. त्यामुळे नागरीकांना बांधकाम परवानगी मिळू शकणार नाही. त्यामुळे स.न.५६ मधील पूर्व पश्चिम १८ मी. रस्त्यापर्यंतचा, स.न.५५ व ५६च्या हद्दीवरील नियोजित दक्षिण-उत्तर १८ मी. रस्ता रद्द करुन रस्त्याखालील जागा निवासी विभागात बदल करणेत यावा.

**मा.प्रतिभा भालेराव** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. ६)

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

मौजे ताथवडे गावाचे प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेत आ.क्र. २६ रिटेल मार्केट स.नं.४१, ६२ क्षेत्र ९०००० चौ.मी. व आ.क्र. २७ वाहनतळ स.नं. २७,४१,४२ क्षेत्र ३६००० चौ.मी. प्रस्तावित आहे. नियोजन समितीने आ.क्र. २६ च्या वापरासाठी दर्शविलेले ९.०० हेक्टर क्षेत्र आरक्षित करण्याचा उद्देश समजून येत नाही. एवढ्या मोठ्या क्षेत्रासाठी संपादनाचा खर्च ही मोठा असेल एवढ्या मोठ्या क्षेत्राचे सबळ स्पष्टीकरण दिसून येत नाही. त्यामुळे हे आरक्षण वगळावे व त्याखालील क्षेत्र रहिवासात वर्ग करण्यात यावे अशी शिफारस केली आहे. त्याचप्रमाणे आ.क्र. २६ रिटेल मार्केट ह्या आरक्षणासंदर्भात आ.क्र.२७ पार्किंगचे आरक्षण प्रस्तावित केल्याचे दिसते. आता आ.क्र.२६ रिटेल मार्केट

वगळण्यात आले असल्याने ह्या वाहनतळाखालील आरक्षित क्षेत्राची जागा १) आ.क्र. २७ पार्किंग २) आ.क्र.१३ मल्टीपरपज हॉल ३) आ.क्र.१४ वाचनालय, ४) आ.क्र. १५ कम्युनिटी सेंटर व ५) आ.क्र. २६ रिटेल मार्केट ही आरक्षणे आ.क्र. २७ मध्ये प्रस्तावित करण्यात यावी अशी नियोजन समितीने शिफारस केली आहे. प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेत प्रशासनामार्फत प्रस्तावित केलेला रिटेल मार्केट प्रकल्प हा महत्वाकांक्षी व ताथवडे गावाचे वैभव वाढविणारा असा आहे. परंतू सदर आरक्षणासाठी सुचविलेले स्थळ अस्तित्वातील दाट लोकवस्ती, अरुंद रस्ते इ. बाबींचा विचार करता सुयोग्य नाही. त्यामुळे प्रशासनामार्फत प्रसिद्ध केलेल्या प्रारुप विकास योजनेतील आ.क्र. २६ व २७ रद्द करुन निवासी विभागात समाविष्ट करण्यात यावे. तसेच नियोजन समितीने शिफारस केल्याप्रमाणे आ.क्र. १३,१४,१५,२६ व २७ ही आरक्षणे आ.क्र.२७ मध्ये प्रस्तावित करण्याची शिफारस ही अमान्य करण्यात येत आहे. आ.क्र. १३,१४ व १५ चे मुळ विकास योजनेत प्रस्तावित केलेले आरक्षित क्षेत्र रद्द करुन निवासी विभागात समाविष्ट करावे. रिटेल मार्केट व अनुषंगीक आरक्षणे यांचे स्थान मुंबई बेंगलोर बाह्यवळण मार्गाचे पश्चिम बाजूने स.न.९९ मध्ये आ.क्र. ४० व ४१ चे उत्तर बाजूस नियोजित पुर्व पश्चिम १८ मी व २४ मी./१२ मी. रस्ता यामधील क्षेत्रात खालीलप्रमाणे आरक्षणे व क्षेत्र प्रस्तावित करणे योग्य व संयुक्तिक आहे.

१) आ.क्र. २६, रिटेल मार्केट (स.नं.९९) क्षेत्र ४.५० हेक्टर,

२) आ.क्र.२७, वाहनतळ (स.नं.९९) क्षेत्र १.५० हेक्टर,

३) आ.क्र. १३, मनपा उपयोग् (स.नं.९९) क्षेत्र १.०० हेक्टर

आ.क्र.१३ मनपा उपयोग यामध्ये मल्टीपरपज हॉल, कम्युनिटी सेंटर व वाचनालय ही प्रयोजने संयुक्तपणे विकसित करता येतील. उपरोक्तप्रमाणे आरक्षणांचे क्षेत्र व स्थान कायम करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. ७)

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते -

ताथवडे गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन आहे. विकास आराखडा तयार करताना बहुधा रस्ते शासकीय जमिनीवर व शासकीय जमिन उपलब्ध नसल्यास खाजगी जमिनीवर घेण्याचे निकष असताना सुद्धा शासकीय जमिन स.न. ४५ मधून न दाखवता खाजगी जागेत १८ मीटर रस्ता दाखविलेला आहे. हा नकाशात दर्शविलेला रस्ता रद्द करुन १८ मीटरचा रस्ता स.न. ४५ हद्दीवर (सोबतच्या नकाशानुसार) दाखविण्यात यावा. जेणेकरुन शासकीय

जागा मनपाला मोबदला न देता मिळू शकेल व रस्ता विकसनाचे काम लवकर करता येईल. सोबत नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे रस्ता करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.अरुणा भालेकर** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. ८)

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

मौजे ताथवडे गावाचे प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेत स.नं.५७ व ५८ च्या हद्दीवरुन दक्षिणोत्तर १८ मी. रस्ता प्रस्तावित आहे. स.नं. ५७ व ५८ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी क्र. बीपीताथवडे/लेआऊट/०८/२०११ दि.१९/१२/२०११ अन्वये मंजूर आहे. त्याचप्रमाणे वेळोवेळी बांधकाम परवानगी नकाशे सुधारीत करण्यात आले आहे. प्रत्यक्षात जागेवर सर्व इमारतींचे बांधकाम पुर्ण होऊन प्लींथ चेकिंग प्रमाणपत्र ही मनपामार्फत देण्यात आले आहे. विकास योजनेत प्रस्तावित केलेल्या १८ मी. नियोजित रस्त्यामुळे मनपामार्फत देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीस व त्यानुसार सामासिक अंतरामध्ये कमतरता निर्माण होत आहे. विकास योजना तयार करताना १८ मी. रस्ता नियोजित करताना मनपा मार्फत मंजूर केलेले बांधकाम परवानगी क्रमप्राप्त होते. बांधकाम परवानगी दिल्यानंतर रस्त्याचे त्याठिकाणी नियोजन करणे निश्चितच योग्य ठरत नाही. त्याचप्रमाणे स.नं.५८ मधील पुर्व पश्चिम १८ मी. रस्त्याने जागेवरील शैक्षणिक संकुलांच्या मंजुरीनुसार बांधकाम झालेल्या इमारती बाधीत करत असल्याने रद्द करावा अशी नियोजन समितीने शिफारस केली आहे. स.नं. ५७,५८ मध्ये मनपामार्फत देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी विचारात घेऊन पुर्व पश्चिम व दक्षिणोत्तर १८ मी. रस्त्याची आखणी सदर मिळकती बाधीत होणार नाही. याप्रमाणे स.नं.५७ व ५५ च्या सामाईक शिवेवरुन स.नं. ५७, व ५४ च्या हद्दीवरील विद्यमान रस्त्याने व पुढे स.न.४५ व ५९ चे दक्षिण हद्दीस प्रस्तावित करुन स.नं. ८३ व ८४ चे पुर्व पश्चिम १२ मी. रुंद रस्त्याचे चौकात जोडावा. याप्रमाणे स.नं. ५७ व ५८ मधील पुर्व पश्चिम व उत्तर दक्षिण १८ मी. रस्त्याची आखणी स्थलांतरीत करण्यास व स.नं. ५७ व ५८ मध्ये प्रस्तावित केलेला रस्त्याखालील क्षेत्र निवासी करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. ९)

**मा.विनय उर्फ विनायक गायकवाड** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

१) सर्वे नं. ४३ मधील २४ मीटर रोड पुर्व पश्चिम व १८ मीटर रोड दक्षिण उत्तर रद्द करण्यात यावा व त्याऐवजी औंध रावेत बी.आर.टी. रोडपासुन सर्वे नं. २६,२७, ४२ व ४३ च्या पुर्व हद्दीवरुन दक्षिण उत्तर १८ मीटर रोड सर्वे नं. ४६ पर्यंत करण्यात यावा. त्यामुळे येथील किमान २००० लोकवस्तीला व यापुढे होणा-या लोकवस्तीला या रोडचा चांगला प्रकारे उपयोग होणार आहे. सोबत नकाशाची प्रत जोडली आहे.

२) ताथवडे येथील सर्वे नं.११३ मधील २० गुंठे जागा पाण्याच्या टाकीसाठी आरक्षित असुन, ती जागा अपुरी पडत असल्याने पाण्याच्या टाकीसाठी ६० गुंठे जागा आरक्षित करण्यात यावी. ती आरक्षित करताना सर्वे नं.११३ व ११४ अशी मिळुन ६० गुंठे करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. १०)

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

ताथवडे येथिल स.न.९२ पैकी ६९०० चौ.मी. इतके क्षेत्र Regional Plan मध्ये रहिवासी विभागात समाविष्ट आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सदर क्षेत्रावर दि.१२/१२/२०११ रोजी रेखांकन नकाशा (रहिवासी इमारतीचे) मंजुर केलेले आहेत. मा.जिल्हाधिकारी पुणे यांनी सदर क्षेत्राच्या अकृषिक (निवासी) वापरास दि. ८/४/२०१२ रोजीच्या आदेशान्वये (NA ORDER) परवानगी दिलेली आहे. सदर क्षेत्रावरील इमारतीचा जोते तपासणी दाखला आपल्या महापालिकेने दि.७/४/२०१३ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारुप विकास योजनेत सदर क्षेत्र औद्योगिक विभागात दर्शविण्यात आले आहे. सदर क्षेत्राच्या मालकांनी यास दि.७/८/२०१३ रोजी सदर क्षेत्र औद्योगिक करण्यास हरकत घेतली आहे. त्यावर दि.२२/८/२०१३ रोजी नियोजन समितीकडून सुनावणी देण्यात आलेली आहे. तदनंतरसुद्धा सदर क्षेत्र औद्योगिक विभागात दाखविण्यात आले आहे. वरील सर्व वस्तुस्थितीचा विचार करता मौजे ताथवडे येथील स.न.९२ मधील मंजुर रेखांकनाप्रमाणे ६९०० चौ.मी. इतके क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करावे व उर्वरीत औद्योगिक विभागात मुळ नकाशाप्रमाणे असावे.

**मा.चंद्रकांत वाळके** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. ११)

**मा.अनुराधा गोफणे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

ताथवडे गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन आहे. सदर विकास योजनेतील स.न.८५ येथिल आरक्षण क्र.४३ वाहनतळ (पार्कींग) क्षेत्र ४००० चौ.मी. प्रस्तावीत केलेले आहे. स.न.८५ पैकी या जागेवर यापूर्वी मा.जिल्हाधिकारी यांनी अकृषिक परवानगी व ले आऊटला मंजुरी दिलेली आहे. सदर परवानगी दिलेली असल्याने या जागेवर वाहनतळाचे (पार्कींग) आरक्षण दाखविणे योग्य नाही. तसेच सदर जागेचे मालक यांनी गावाकडील शेतजमिन विकून शहरामध्ये ही जागा विकत घेतलेली असून सदर जागा आरक्षित केल्यास ते भूमिहिन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आरक्षण नं. ४३ वाहनतळ (पार्किंग) हे रद्द करुन रहिवास विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सुपे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. १२)

**मा.अतुल शितोळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

मौजे ताथवडे गावाचे प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेत स.नं. १३० मध्ये आ.क्र. २४ झोन ऑफीस आरक्षणासाठी ७५०० चौ.मी. क्षेत्र प्रस्तावित आहे. नियोजन समितीने आ.क्र. २४ झोन ऑफीस आरक्षण रहिवास विभागापासुन लांब असल्याने व त्यासाठी बाह्यवळण मार्ग वारंवार ओलांडावा लागेल. त्यामुळे हे आरक्षण शेजाराच्या पार्किंग या आ.क्र.२३ मध्ये समाविष्ट करुन संपुर्ण आरक्षणाचे नामाभिदान आ.क्र.२३ पार्किंग म्हणून दर्शवावे व आ.क्र. २४ झोन ऑफिस चे स्थान स.नं.२९ या बी.आर.टी. ला लागुन असलेल्या बी.आर.टी.च्या दक्षिणेस सध्याच्या आरक्षित क्षेत्राएवढे ठेवण्याबाबत नियोजन समितीने शिफारस केली आहे. प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेत आ.क्र. २३ वाहनतळासाठी दर्शविलेले १.०० हेक्टर क्षेत्र स.नं. १३१ पुरते मर्यादित असून ते पुरेसे आहे. त्यामुळे स.न. १३० मध्ये वाहन तळाचे आरक्षणाचे वाढीव क्षेत्र प्रस्तावित न करता सदर स.नं.१३० चे उर्वरीत व आजूबाजूचे स.नं. औद्योगिक विभागात समाविष्ट असल्याने स.नं. १३० मधील आरक्षणाखालील ७५०० चौ.मी. क्षेत्र औद्योगीक विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.बाळासाहेब तरस** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. १३)

**मा.सोनाली जम** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते -

ताथवडे गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन आहे. सदर विकास योजनेतील स.न.१२,१३ व १४० येथिल जागेवर इंडस्ट्रीयल झोन दाखविलेला आहे. नकाशाचे अवलोकन केले असता स.न. १२,१३ व १४० लागून पूर्वेला पशुसंवर्धन विभागाची जागा आहे व पश्चिमेला निवासी विभाग आहे. त्यामुळे ही छोटीशी इंडस्ट्रीयल झोनमधील जागा इंडस्ट्रीसाठी विकसित केल्यास आजूबाजूला राहणा-या जनतेला नाहक त्रास होईल. तसेच सदर जागेवर मोठ्या प्रमाणात नागरीकांची राहती घरे आहेत. त्यामुळे स.न. १२,१३ व १४० मधिल इंडस्ट्रीयल झोन वगळून निवासी झोनमध्ये समाविष्ट करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुभद्रा ठोंबरे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. १४)

**मा.संध्या गायकवाड** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते -

ताथवडे गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन आहे. सदर विकास योजनेतील स.न.१४९ व १५० येथिल जागेवर आरक्षण क्र.२१ माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान क्षेत्र १०००० चौ.मी. दर्शविलेले आहे. सदरचे आरक्षण रद्द करुन स.न.१३५ मध्ये क्षेत्र ५००० चौ.मी. व १३६ क्षेत्र ५००० चौ.मी. असे एकुण १०००० चौ.मी. क्षेत्र माध्यमिक शाळा व खेळाचे मैदानासाठी आरक्षित करावे व २४ मीटर रस्त्यालगत दर्शविण्यात यावे. सदर आरक्षण स्थलांतरण करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.रमा ओव्हाळ** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. १५)

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते -

ताथवडे गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन आहे. पशुसंवर्धन या विभागाकरीता या आरक्षित असलेल्या

साधारणपणे २०० एकर पेक्षा अधिक असलेल्या जागेपैकी स.न.१६ बोट क्लबलगतच्या स.न.१५ च्या पूर्व बाजूस २५०० चौ.मी. क्षेत्र Municipal Purpose या प्रयोजनाकरीता आरक्षित करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.आशा सुर्यवंशी** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

उपसूचना क्र. १६)

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते -

मौजे ताथवडे गावाचा विकास आराखडा मंजुरीसाठी शासनाकडे पाठविणेत येणार आहे. सदर आराखड्यातील सर्व्हे क्र. ७० मधील व सर्व्हे क्र.७१ मधील आरक्षण क्रमांक १७ व १८ अनुक्रमे भाजीमंडई व सम्प ॲण्ड पंप हाऊस हे आरक्षण वगळणेत यावे व सदर जागा निवासी विभागात समाविष्ट करणेत यावी व आरक्षण क्र. १७ व १८ ही आरक्षणे ताथवडे येथील सर्व्हे क्र. ९९ मध्ये योग्य ठिकाणी स्थलांतरीत करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.नितीन लांडगे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, १ ते १५ उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, विषय क्र. २३ ताथवडे गावाचा विकास आराखडा रद्द करावा, झालेला भ्रष्टाचार यातून बाहेर यावा म्हणून मी मतदानाची मागणी करते. ज्यांचा ज्यांचा विरोध असेल त्यांचा नावासहीत विरोध नोंदवून घेण्यात यावा.

**मा.नगरसचिव** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब व सर्व सन्मा.सदस्य, उपसुचनांसह विषय क्र.२३ करीता मतदान घेण्यात येत आहे. जे सन्मा.सदस्य ठरावाच्या बाजुने आहेत, त्यांनी हात वर करावा.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, विषय क्र. २३ ताथवडे गावाचा विकास आराखडा रद्द करावा म्हणून मागणी आहे. डी.पी.ची पुनर्रचना करण्यात यावी.

**मा.नगरसचिव** – विषय मंजूर करावा किंवा नामंजूर करावा यासाठी मतदान घेण्यात येत आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, ज्यांना हा विषय मंजूर करायचा आहे, त्यांनी पहिल्यांदा हात वर करावेत. ज्यांना विरोध करायचा आहे, त्यांनी नंतर हात वर करावेत.

**मा.किरण मोटे** – मा.महापौर साहेब, नगरसचिव यांना नियमाप्रमाणे मतदान घेतलेले आहे. त्याप्रमाणे त्याची नोंद करुन घ्या.

**मा.नगरसचिव** – मा.महापौर साहेब, विषय मंजूर करण्यासाठी हात वर करुन मतदान घेण्यात आले. त्यात विषयाच्या बाजुने ५७ आणि विषयाच्या विरोधात ०९ अशी मते पडली आहेत.

**मा.महापौर** – सदर विषय, उपसूचनांसह मतदानास टाकण्यात आला असता विषयाच्या बाजुने ५७ आणि विषयाच्या विरोधात ०९ अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४४८ विषय क्रमांक – २३
दिनांक - १८/०१/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१६/२३२/२०१३,दि.१९/१०/२०१३
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४१७, दि.२१/११/२०१३

मौजे ताथवडे हे गाव शासन अधिसूचना क्र. पीसीसी ३००७/१२६७/प्र.क्र.१७४/०७/नवि-२२, दिनांक ३०/०७/२००९ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेले आहे. त्याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ०६/०८/२००९ रोजी प्रसिद्ध झालेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम २१ मधील तरतुदीनुसार सदर नव्याने समाविष्ट ताथवडे गावाची प्रारुप विकास योजना तयार करुन ती ३ वर्षांच्या आत शासनास मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.७२८ दि.२१/०८/२००९ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम २३ व २४ मधील तरतुदीनुसार मौजे ताथवडे या गावाच्या क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर केला आहे. सदर इराद्याबाबत दिनांक ०१/०१/२०१० रोजी जाहिर केला असून सदर सूचना शासनाच्या राजपत्र दिनांक १४/०१/२०१० मध्ये प्रसिद्ध झालेला आहे. सदर क्षेत्राची विकास योजना तयार करण्याकरीता पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेच्या महासभेने संदर्भ क्र.२ च्या ठरावाने उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची नगर अधिकारी म्हणून नेमणूक करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये मौजे ताथवडे या गावाची विकास योजना तयार करण्याकामी उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची नगररचना अधिकारी म्हणून कार्यालयीन आदेश क्र. नरवि/कावि/५/५८/२०११, दि.०५/०३/२०११ अन्वये नेमणुक केली आहे. त्यानुसार ताथवडे गावाचा विद्यमान जमिन वापर नकाशा उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दि. २०/०१/२०१२ रोजी सादर करण्यात आला आहे.

उपरोक्त विकास योजना तयार करण्याचा इरादा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१(१) अन्वये जाहीर केल्यापासुन ३ वर्षांच्या आत शासनास सादर करणे आवश्यक आहे. सदर विकास योजना तयार करण्याचा इरादा दि.१४/०१/२०१० च्या शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेला आहे. तथापि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील सुधारीत तरतुदीनुसार आणि त्याअन्वये शासनाने पत्र क्र. टिपीएस-१८११/१८४८/प्र.क्र.२१९/११/नवि-१३ दि.०५/१२/२०११ अन्वये दिलेल्या मार्गदर्शनानुसार सदर विकास योजना तयार करण्याचा इरादा दि.०५/०४/२०११ रोजी झाला असल्याचे गृहीत धरण्यात येत आहे. सदर दि.०५/०४/२०११ इरादाची तारीख गृहीत धरल्यास तदनंतर ६ महिन्याच्या आत म्हणजेच दि.०४/१०/२०११ पर्यंत विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणे उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक आहे. त्यामुळे विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणेकरीता दि. ०५/१०/२०११ ते दि. २०/०१/२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत मा.महासभेने ठराव घेण्याकरीता मान्यतेसाठी सादर.

मौजे ताथवडे या गावाची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्याकरीता मा.महासभेने संदर्भ क्र.३ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर विकास योजना दि. ७.३.२०१३ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाली आहे.

सदर विकास योजना प्रसिद्धीनंतर प्राप्त होणा-या हरकतधारकांना सुनावणी देण्याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम २८(२) अन्वये नियोजन समितीमध्ये मनपाच्या स्थायी समिती मधील ३ सदस्य श्री.जगताप, श्रीमती बारणे, श्रीमती वाघेरे यांच्या नेमणुकीबाबत मा.महासभेने ठराव क्र. २८१ दि.९/०५/२०१३ रोजी मान्यता दिलेली आहे. तसेच मा.संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि.४/०४/२०१३ चे पत्रान्वये नगररचना विभागातील निवृत्त अधिकारी श्री.कोलटकर, श्री.कुलकर्णी, श्री.रानडे यांची नियोजन समितीमध्ये सदस्य म्हणुन नियुक्त करणेत आले आहे. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र.नरवि/कावि/१०/ताथवडे/ ५७२/२०१३ दि.१२/०८/२०१३ अन्वये

नियोजन समिती स्थापन करणेत आली आहे. सदर नियोजन समितीने दि.२१/०८/२०१३ ते दि.३१/०८/२०१३ पर्यंत संबंधित हरकत धारकांना सुनावणी देवुन प्रसिद्ध विकास योजनेच्या अनुषंगाने त्यांचा अहवाल दि.११/१०/२०१३ च्या पत्राने सादर केलेला आहे. नियोजन समितीने सादर केलेला अहवाल मा.महासभेच्या मान्यतेसाठी सोबत सादर करीत आहे. सदर विकास योजना महाराष्ट प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ च्या कलम ३० अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर करणेस मान्यता देणेस तसेच मौजे ताथवडे या गावांची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्याकरीता मा.महासभेने ठराव क्र.२३७, दि.२०/०२/२०१३ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर विकास योजना दि.७.३.२०१३ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाली आहे. सदर विकास योजना प्रसिद्धीनंतर प्राप्त होणा-या हरकतधारकांना सुनावणी देवुन उक्त अधिनियमाच्या कलम २८(२) अन्वये नियोजन समितीने त्यांचा अहवाल दि.११/१०/२०१३च्या पत्राने सादर केलेला असुन सदर अहवाल मा.महासभेच्या मान्यतेसाठी तसेच सदर विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि. १९६६ च्या कलम ३० अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर करणेकरीता मान्यता मिळणेकरीता प्रस्तुत विषय महासभेपुढे ठेवण्यात आलेला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये विकास योजना प्रसिद्ध झालेनंतर ६ महिन्याच्या व तदनंतर वाढीव ६ महिने असे एकुण १ वर्षाच्या आत म्हणजे कलम २६ अन्वये राजपत्रात प्रसिद्धीचा दि.७/३/२०१३ पासुन १ वर्ष दि.६/३/२०१४ पर्यंत शासनास सादर होणे आवश्यक आहे. तत्पुर्वी १ महिना कलम २८(४) अन्वये महासभेने घेतलेला निर्णय जनतेच्या अवलोकनार्थ ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे मौजे ताथवडे या गावाची विकास योजना कलम ३० अन्वये शासनास सादर करणेकरीता वाढीव ६ महिनेसाठी (दि.६/९/२०१३ पासुन पुढील सहा महिने) मुदतवाढ देणेस तसेच

१) सर्व्हे नं.४१ व ६२ मधील रद्द करण्यात आलेले आरक्षण व त्यामधील २४ मीटर रोड हा सर्व्हे नं.६३ च्या हद्दीपासून ६२ व ४१ उत्तर हद्दीपासून करण्यात यावा. त्यामुळे अनेक शेतक-यांना रोडचा उपयोग होईल.

२) सर्व्हे नं.७८ मधील स्थानिक शेतक-यांचे घर शैक्षणिक झोनमध्ये दाखविण्यात आले आहे. तरी ते वगळून असणा-या झोनमध्ये वर्ग करण्यास तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नुकतीच दुरुस्ती करण्यात येत असणा-या बांधकाम परवानगी नियमावलीमध्ये पिंपरी चिंचवड शहरात बी.आर.टी. कॉरीडॉर हा १०० मीटर ऐवजी २०० मीटर ठेवणेच्या अनुषंगाने हरकती-सूचना मागविल्या त्याचप्रमाणे नव्याने समावेश होणा-या मौजे ताथवडे गाव येथील बी.आर.टी. कॉरीडॉर २०० मीटरपर्यंत लागू ठेवून पुढील आवश्यक ती सर्व प्रकारची प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करणेस मु.बा.न.प्रा.अ.नि. चे कलम १९६६ च्या ३० अन्वये मान्यता देणेस तसेच ताथवडे

गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन आहे. सदर विकास योजनेतील स.न.१७५ येथिल जागेवर आरक्षण क्र.३ खेळाचे मैदान क्षेत्र १०००० चौ.मी. मा.आयुक्त यांनी प्रस्तावीत केलेले होते. नियोजन समितीने सदरचे आरक्षण स.न.१६० व स.न.१६१ मध्ये स्थानांतरीत करण्याचा निर्णय घेतला आहे. तो रद्द करावा व मा.आयुक्त यांनी सुचविलेले खेळाचे मैदान हे आरक्षण योग्य असल्याने स.न.१७५ मधिल जागा निळ्या पूररेषेत आहे. त्यामुळे प्रचलित नियमानुसार व शासनाच्या धोरणानुसार ओपन यूझर अनुज्ञेय आहे. त्यामुळे स.न.१७५ मधिल १०००० चौ.मी. जागा खेळाचे मैदानासाठी आरक्षित करावी व त्या शेजारील स.न.१७४ व १७५ हि जागा सुद्धा निळ्या पुररेषेतील असल्याने सदर जागा उद्यानासाठी आरक्षित करावी. त्यासाठी सोबत नकाशा जोडलेला आहे म्हणजे स.न.१७५ मधिल नदीला लागून असलेल्या जागेचा उपयोग जमिन मालकाला होणार नसल्याने मनपाला ही जागा लवकर ताब्यात मिळू शकेल व तेथिल नागरिकांना खेळाचे मैदान व उद्यान या सुविधेचा वापर करता येईल. यानुसार मान्यता देणेस तसेच मौजे ताथवडे गावाचा प्रारुप विकास आराखडा प्रसिद्ध करणेत आला असून सदर आराखड्यामध्ये स.न.५५ व ५६ च्या हद्दीवर नियोजित दक्षिण-उत्तर १८ मी. रस्ता प्रस्तावित करणेत आला आहे. सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस नागरीकांनी छोटे छोटे भूखंड विकत घेतले असून मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार भूखंड विकसित करतांना साईड मार्जिन मिळणार नाही. त्यामुळे नागरीकांना बांधकाम परवानगी मिळू शकणार नाही. त्यामुळे स.न.५६ मधील पूर्व पश्चिम १८ मी. रस्त्यापर्यंतचा, स.न.५५ व ५६च्या हद्दीवरील नियोजित दक्षिण-उत्तर १८ मी. रस्ता रद्द करुन रस्त्याखालील जागा निवासी विभागात बदल करणेस तसेच मौजे ताथवडे गावाचे प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेत आ.क्र. २६ रिटेल मार्केट स.नं.४१, ६२ क्षेत्र ९०००० चौ.मी. व आ.क्र. २७ वाहनतळ स.नं. २७,४१,४२ क्षेत्र ३६००० चौ.मी. प्रस्तावित आहे. नियोजन समितीने आ.क्र. २६ च्या वापरासाठी दर्शविलेले ९.०० हेक्टर क्षेत्र आरक्षित करण्याचा उद्देश समजून येत नाही. एवढ्या मोठ्या क्षेत्रासाठी संपादनाचा खर्च ही मोठा असेल एवढ्या मोठ्या क्षेत्राचे सबळ स्पष्टीकरण दिसून येत नाही. त्यामुळे हे आरक्षण वगळावे व त्याखालील क्षेत्र रहिवासात वर्ग करण्यात यावे अशी शिफारस केली आहे. त्याचप्रमाणे आ.क्र. २६ रिटेल मार्केट ह्या आरक्षणासंदर्भात आ.क्र.२७ पार्किंगचे आरक्षण प्रस्तावित केल्याचे दिसते. आता आ.क्र.२६ रिटेल मार्केट वगळण्यात आले असल्याने ह्या वाहनतळाखालील आरक्षित क्षेत्राची जागा १) आ.क्र. २७ पार्किंग २) आ.क्र. १३ मल्टीपरपज हॉल ३) आ.क्र.१४ वाचनालय, ४) आ.क्र. १५ कम्युनिटी सेंटर व ५) आ.क्र. २६ रिटेल मार्केट ही आरक्षणे आ.क्र. २७ मध्ये प्रस्तावित करण्यात यावी अशी नियोजन समितीने शिफारस केली आहे. प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेत प्रशासनामार्फत प्रस्तावित केलेला रिटेल मार्केट प्रकल्प हा महत्वाकांक्षी व ताथवडे गावाचे वैभव वाढविणारा असा आहे. परंतू सदर आरक्षणासाठी सुचविलेले स्थळ

अस्तित्वातील दाट लोकवस्ती, अरुंद रस्ते इ. बाबींचा विचार करता सुयोग्य नाही. त्यामुळे प्रशासनामार्फत प्रसिद्ध केलेल्या प्रारुप विकास योजनेतील आ.क्र. २६ व २७ रद्द करुन निवासी विभागात समाविष्ट करण्यात यावे. तसेच नियोजन समितीने शिफारस केल्याप्रमाणे आ.क्र. १३,१४,१५,२६ व २७ ही आरक्षणे आ.क्र.२७ मध्ये प्रस्तावित करण्याची शिफारस ही अमान्य करण्यात येत आहे. आ.क्र. १३,१४ व १५ चे मुळ विकास योजनेत प्रस्तावित केलेले आरक्षित क्षेत्र रद्द करुन निवासी विभागात समाविष्ट करावे. रिटेल मार्केट व अनुषंगीक आरक्षणे यांचे स्थान मुंबई बेंगलोर बाह्यवळण मार्गाचे पश्चिम बाजूने स.न.९९ मध्ये आ.क्र. ४० व ४१ चे उत्तर बाजूस नियोजित पुर्व पश्चिम १८ मी व २४ मी./१२ मी. रस्ता यामधील क्षेत्रात खालीलप्रमाणे आरक्षणे व क्षेत्र प्रस्तावित करणे योग्य व संयुक्तिक आहे.

१) आ.क्र. २६, रिटेल मार्केट (स.नं.९९) क्षेत्र ४.५० हेक्टर,

२) आ.क्र.२७, वाहनतळ (स.नं.९९) क्षेत्र १.५० हेक्टर,

३) आ.क्र. १३, मनपा उपयोग् (स.नं.९९) क्षेत्र १.०० हेक्टर

आ.क्र.१३ मनपा उपयोग यामध्ये मल्टीपरपज हॉल, कम्युनिटी सेंटर व वाचनालय ही प्रयोजने संयुक्तपणे विकसित करता येतील. उपरोक्तप्रमाणे आरक्षणांचे क्षेत्र व स्थान कायम करण्यास तसेच ताथवडे गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन आहे. विकास आराखडा तयार करताना बहुधा रस्ते शासकीय जमिनीवर व शासकीय जमिन उपलब्ध नसल्यास खाजगी जमिनीवर घेण्याचे निकष असताना सुद्धा शासकीय जमिन स.न. ४५ मधून न दाखवता खाजगी जागेत १८ मीटर रस्ता दाखविलेला आहे. हा नकाशात दर्शविलेला रस्ता रद्द करुन १८ मीटरचा रस्ता स.न. ४५ हद्दीवर (सोबतच्या नकाशानुसार) दाखविण्यात यावा. जेणेकरुन शासकीय जागा मनपाला मोबदला न देता मिळू शकेल व रस्ता विकसनाचे काम लवकर करता येईल. सोबत नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे रस्ता करण्यास मान्यता देणेस तसेच मौजे ताथवडे गावाचे प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेत स.नं.५७ व ५८ च्या हद्दीवरुन दक्षिणोत्तर १८ मी. रस्ता प्रस्तावित आहे. स.नं. ५७ व ५८ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी क्र. बीपीताथवडे/लेआऊट/०८/२०११ दि.१९/१२/२०११ अन्वये मंजूर आहे. त्याचप्रमाणे वेळोवेळी बांधकाम परवानगी नकाशे सुधारीत करण्यात आले आहे. प्रत्यक्षात जागेवर सर्व इमारतींचे बांधकाम पुर्ण होऊन प्लींथ चेकिंग प्रमाणपत्र ही मनपामार्फत देण्यात आले आहे. विकास योजनेत प्रस्तावित केलेल्या १८ मी. नियोजित रस्त्यामुळे मनपामार्फत देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीस व त्यानुसार सामासिक अंतरामध्ये कमतरता निर्माण होत आहे. विकास योजना तयार करताना १८ मी. रस्ता नियोजित करताना मनपा मार्फत मंजूर केलेले बांधकाम परवानगी क्रमप्राप्त होते. बांधकाम परवानगी दिल्यानंतर रस्त्याचे त्याठिकाणी नियोजन करणे निश्चितच योग्य ठरत नाही. त्याचप्रमाणे स.नं.५८ मधील पुर्व पश्चिम

१८ मी. रस्त्याने जागेवरील शैक्षणिक संकुलांच्या मंजुरीनुसार बांधकाम झालेल्या इमारती बाधीत करत असल्याने रद्द करावा अशी नियोजन समितीने शिफारस केली आहे. स.नं. ५७,५८ मध्ये मनपामार्फत देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी विचारात घेऊन पुर्व पश्चिम व दक्षिणोत्तर १८ मी. रस्त्याची आखणी सदर मिळकती बाधीत होणार नाही. याप्रमाणे स.नं.५७ व ५५ च्या सामाईक शिवेवरुन स.नं. ५७, व ५४ च्या हद्दीवरील विद्यमान रस्त्याने व पुढे स.न.४५ व ५९ चे दक्षिण हद्दीस प्रस्तावित करुन स.नं. ८३ व ८४ चे पुर्व पश्चिम १२ मी. रुंद रस्त्याचे चौकात जोडावा. याप्रमाणे स.नं. ५७ व ५८ मधील पुर्व पश्चिम व उत्तर दक्षिण १८ मी. रस्त्याची आखणी स्थलांतरीत करण्यास व स.नं. ५७ व ५८ मध्ये प्रस्तावित केलेला रस्त्याखालील क्षेत्र निवासी करण्यास तसेच

१) सर्वे नं. ४३ मधील २४ मीटर रोड पुर्व पश्चिम व १८ मीटर रोड दक्षिण उत्तर रद्द करण्यात यावा व त्याऐवजी औंध रावेत बी.आर.टी. रोडपासुन सर्वे नं. २६,२७, ४२ व ४३ च्या पुर्व हद्दीवरुन दक्षिण उत्तर १८ मीटर रोड सर्वे नं. ४६ पर्यंत करण्यात यावा. त्यामुळे येथील किमान २००० लोकवस्तीला व यापुढे होणा-या लोकवस्तीला या रोडचा चांगला प्रकारे उपयोग होणार आहे. सोबत नकाशाची प्रत जोडली आहे.

२) ताथवडे येथील सर्वे नं.११३ मधील २० गुंठे जागा पाण्याच्या टाकीसाठी आरक्षित असुन, ती जागा अपुरी पडत असल्याने पाण्याच्या टाकीसाठी ६० गुंठे जागा आरक्षित करण्यात यावी. ती आरक्षित करताना सर्वे नं.११३ व ११४ अशी मिळुन ६० गुंठे करण्यास

तसेच ताथवडे येथिल स.न.९२ पैकी ६९०० चौ.मी. इतके क्षेत्र Regional Plan मध्ये रहिवासी विभागात समाविष्ट आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सदर क्षेत्रावर दि.१२/१२/२०११ रोजी रेखांकन नकाशा (रहिवासी इमारतीचे) मंजुर केलेले आहेत. मा.जिल्हाधिकारी पुणे यांनी सदर क्षेत्राच्या अकृषिक (निवासी) वापरास दि. ८/४/२०१२ रोजीच्या आदेशान्वये (NA ORDER) परवानगी दिलेली आहे. सदर क्षेत्रावरील इमारतीचा जोते तपासणी दाखला आपल्या महापालिकेने दि.७/४/२०१३ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारुप विकास योजनेत सदर क्षेत्र औद्योगिक विभागात दर्शविण्यात आले आहे. सदर क्षेत्राच्या मालकांनी यास दि.७/८/२०१३ रोजी सदर क्षेत्र औद्योगिक करण्यास हरकत घेतली आहे. त्यावर दि.२२/८/२०१३ रोजी नियोजन समितीकडून सुनावणी देण्यात आलेली आहे. तदनंतरसुद्धा सदर क्षेत्र औद्योगिक विभागात दाखविण्यात आले आहे. वरील सर्व वस्तुस्थितीचा विचार करता मौजे ताथवडे येथील स.न.९२ मधील मंजुर रेखांकनाप्रमाणे ६९०० चौ.मी. इतके क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करावे व उर्वरीत औद्योगिक विभागात मुळ नकाशाप्रमाणे असावे. तसेच ताथवडे गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन

आहे. सदर विकास योजनेतील स.न.८५ येथिल आरक्षण क्र.४३ वाहनतळ (पार्कींग) क्षेत्र ४००० चौ.मी. प्रस्तावीत केलेले आहे. स.न.८५ पैकी या जागेवर यापूर्वी मा.जिल्हाधिकारी यांनी अकृषिक परवानगी व ले आऊटला मंजुरी दिलेली आहे. सदर परवानगी दिलेली असल्याने या जागेवर वाहनतळाचे (पार्कींग) आरक्षण दाखविणे योग्य नाही. तसेच सदर जागेचे मालक यांनी गावाकडील शेतजमिन विकून शहरामध्ये ही जागा विकत घेतलेली असून सदर जागा आरक्षित केल्यास ते भूमिहिन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आरक्षण नं. ४३ वाहनतळ (पार्किंग) हे रद्द करुन रहिवास विभागात समाविष्ट करणेस तसेच मौजे ताथवडे गावाचे प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेत स.नं. १३० मध्ये आ.क्र. २४ झोन ऑफीस आरक्षणासाठी ७५०० चौ.मी. क्षेत्र प्रस्तावित आहे. नियोजन समितीने आ.क्र. २४ झोन ऑफीस आरक्षण रहिवास विभागापासुन लांब असल्याने व त्यासाठी बाह्यवळण मार्ग वारंवार ओलांडावा लागेल. त्यामुळे हे आरक्षण शेजाराच्या पार्किंग या आ.क्र.२३ मध्ये समाविष्ट करुन संपुर्ण आरक्षणाचे नामाभिदान आ.क्र.२३ पार्किंग म्हणून दर्शवावे व आ.क्र. २४ झोन ऑफिस चे स्थान स.नं.२९ या बी.आर.टी. ला लागुन असलेल्या बी.आर.टी.च्या दक्षिणेस सध्याच्या आरक्षित क्षेत्राएवढे ठेवण्याबाबत नियोजन समितीने शिफारस केली आहे. प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेत आ.क्र. २३ वाहनतळासाठी दर्शविलेले १.०० हेक्टर क्षेत्र स.नं. १३१ पुरते मर्यादित असून ते पुरेसे आहे. त्यामुळे स.न. १३० मध्ये वाहन तळाचे आरक्षणाचे वाढीव क्षेत्र प्रस्तावित न करता सदर स.नं.१३० चे उर्वरीत व आजूबाजूचे स.नं. औद्योगिक विभागात समाविष्ट असल्याने स.नं. १३० मधील आरक्षणाखालील ७५०० चौ.मी. क्षेत्र औद्योगीक विभागात समाविष्ट करणेस तसेच ताथवडे गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन आहे. सदर विकास योजनेतील स.न.१२,१३ व १४० येथिल जागेवर इंडस्ट्रीयल झोन दाखविलेला आहे. नकाशाचे अवलोकन केले असता स.न. १२,१३ व १४० लागून पूर्वेला पशुसंवर्धन विभागाची जागा आहे व पश्चिमेला निवासी विभाग आहे. त्यामुळे ही छोटीशी इंडस्ट्रीयल झोनमधील जागा इंडस्ट्रीसाठी विकसित केल्यास आजूबाजूला राहणा-या जनतेला नाहक त्रास होईल. तसेच सदर जागेवर मोठ्या प्रमाणात नागरीकांची राहती घरे आहेत. त्यामुळे स.न. १२,१३ व १४० मधिल इंडस्ट्रीयल झोन वगळून निवासी झोनमध्ये समाविष्ट करणेस तसेच ताथवडे गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन आहे. सदर विकास योजनेतील स.न.१४९ व १५० येथिल जागेवर आरक्षण क्र.२१ माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान क्षेत्र १०००० चौ.मी. दर्शविलेले आहे. सदरचे आरक्षण रद्द करुन स.न.१३५ मध्ये क्षेत्र ५००० चौ.मी. व १३६ क्षेत्र ५००० चौ.मी. असे एकुण १०००० चौ.मी. क्षेत्र माध्यमिक शाळा व खेळाचे मैदानासाठी आरक्षित करावे व २४ मीटर रस्त्यालगत दर्शविण्यात यावे. सदर आरक्षण स्थलांतरण करण्यास तसेच ताथवडे गावाची विकास योजनेस मान्यता देण्याचा विषय मा.महापालिका सभेसमोर विचाराधीन

आहे. पशुसंवर्धन या विभागाकरीता या आरक्षित असलेल्या साधारणपणे २०० एकर पेक्षा अधिक असलेल्या जागेपैकी स.न.१६ बोट क्लबलगतच्या स.न.१५ च्या पूर्व बाजूस २५०० चौ.मी. क्षेत्र Municipal Purpose या प्रयोजनाकरीता आरक्षित करणेस तसेच मौजे ताथवडे गावाचा विकास आराखडा मंजुरीसाठी शासनाकडे पाठविणेत येणार आहे. सदर आराखड्यातील सर्व्हे क्र. ७० मधील व सर्व्हे क्र.७१ मधील आरक्षण क्रमांक १७ व १८ अनुक्रमे भाजीमंडई व सम्प ॲण्ड पंप हाऊस हे आरक्षण वगळणेत यावे व सदर जागा निवासी विभागात समाविष्ट करणेत यावी व आरक्षण क्र. १७ व १८ ही आरक्षणे ताथवडे येथील सर्व्हे क्र. ९९ मध्ये योग्य ठिकाणी स्थलांतरीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ५७ प्रतिकूल – ०९

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/२७७/१४
दिनांक – १५/०३/२०१४

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.